यशोदा-चिंतामणि-निधि पुरस्कृत ग्रंथमाला क्र. १६

भारत इतिहास संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ५१

संशोधकाचा मित्र

पहिला भाग

लेखक

गणेश हरी खरे

क्यूरेटर, भा. इ. सं. मंडळ, पुणे

श. १८७२] मूल्य चार रुपये [इ. १९५१

भा. इ. सं. मंडळाचे सभासदास साडे तीन रुपये

अर्पण

प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्त्ती । आणि मीं दुबला अर्चितसें भक्ति ।।
म्हणौनि बोलु जऱ्हीं गंगावती । तऱ्हीं स्वीकराल ।।

राजवाडी ज्ञानेश्वरी ९।१४

ब्रीद

अनेकसंशयोच्छेदि तत्त्वार्थस्यापि दर्शकम् ।
सद्भिश्च सेवितं नित्यं शुद्धं ज्ञानमुपास्महे ।।

ढोबळ अनुक्रम

निवेदन	क
पुरस्कार	ज
अनुक्रम	ट
आवश्यक संक्षेपांचा खुलासा	ड
ग्रंथगर्भ	१–२३८
१ शब्दसंक्षेप	१
२ शब्दमूल्यें	६
३ अक्षरमूल्यें	१२
४ मंगल व शापाशीर्वाद वचनें	१८
५. वृत्तें	३९
६ कालगणना	४७
७ मूर्तिपरिचय	१६७
८ वंशावळी	१९१
९ उत्खनन	२२७
१० ठसे	२३३

प्रकाशक : गणेश हरी खरे, भा. इ. सं. मंडळ,
३१२अ सदाशिव पेठ, पुणें २

मुद्रक : स. रा. सरदेसाई, बी. ए., एल्‌एल्. बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, ४१ बुधवार, पुणें २.

निवेदन

पहिल्या असहकारितेच्या चळवळींत इ. १९२१ च्या प्रारंभीं कॉलेज सोडल्यावर अल्पमतिशक्तीप्रमाणें देशसेवेचें काम करीत असतां वारंवार जाणवें कीं, मध्यंतरींच अभ्यासास रामराम ठोकल्यामुळें आपली बौद्धिक उंची खुंटली. म्हणून साताऱ्च्या राष्ट्रीय शाळेंत शिक्षकाचें काम करीत असतां ती वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांत इतिहासाभ्यासानें मनावर मोठीच पक्कड बसविली. तेव्हां वाटूं लागलें कीं, असहकारामुळें आधिभौतिक शास्त्रांतील संशोधन करून मध्यम प्रतीची देशसेवा करणें आतां शक्य नसलें तरी इतिहास-संशोधन करून कनिष्ठ प्रतीची देशसेवा खात्रीनें करतां येईल. म्हणून सातारा सोडून इ. १९२९ च्या आरंभीं पुण्यास आलों. येथें आल्यावर पांच-सात महिने प्रायः बेकारींतच पण पूर्वतयारी करण्यांत घालविले. नंतर भा. इ. सं. मंडळाच्या शिवचरित्रकार्यालयांत काम मिळालें आणि इ. १९३० च्या, मला वाटतें, जूनमध्यें मी मंडळाचा नोकर बनलों. कै. डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं कोठें तरी स्पर्धाविरहित क्षेत्रांत काम करण्याच्या स्वप्रवृत्तीबद्दल लिहिल्याचें स्मरतें. आपणही त्या प्रवृत्तीचें अनुयायी व्हावें असें ठरवून मंडळांत त्या वेळीं ज्या शाखांचें काम प्रायः होत नसे त्यांकडे मुख्यतः लक्ष दिलें. यामुळें अरबी, कानडी व फार्सी या भाषा आणि लेखविद्या, नाणकशास्त्र, मूर्तिविज्ञान, मुसलमानी इतिहास, इत्यादींचा उणा-अधिक अभ्यास करावा लागला. अगोदरच मंदमतिगति; त्यांतून कोणत्याही विषयांत मार्गदर्शक प्रायः कोणी नव्हताच. तेव्हां त्या त्या विषयावरचे संदर्भग्रंथ जाणण्यापासून त्यांतील विषय आत्मसात करण्यापर्यंत सर्व काम, चुकत, अडखळत, ठेचा खात खात स्वतःच केलें व करीत आहे. वाटाड्यामुळें जें कार्य तासांत व्हावयाचें तें मजकडून होण्यास दिवस लागे. पण निराश न होतां धिमेपणा राखला आणि सांगण्यास हरकत नाहीं कीं, आतांपर्यंत म्हणजे गेल्या २२ वर्षांत माझ्या हातून संशोधनसंकलनात्मक मजकुराचीं तीन हजाराहून अधिक पृष्ठें लिहून प्रकाशित झालीं. मात्र याबद्दल समाधान मानावें कीं नाहीं हा प्रश्नच आहे. शिक्षण अर्धवट सोडल्यानें जी कुचंबणा झाली व होत आहे ती न होती तर

गुणानें व मापानें दुप्पट तरी काम झालें असतें व अजूनही होईल असें वाटतें. मी कॉलेज सोडलें तेव्हांच कयास केला होता कीं, आपणांस पुढील सारा जन्म गरीबींत काढावा लागेल आणि त्याविषयीं माझी तक्रारही नाहीं. श्रीमंत होऊन विलास उपभोगावे असें ध्येय मीं कधींच धरलें नव्हतें. पण मनापासून इच्छीत व प्रयत्न करीत होतों, आहे व राहीन कीं, माझे जीवनांतील प्रत्येक क्षण सर्वोत्कृष्ट सत्कार्यांत खर्च व्हावा. त्यासाठीं गेलीं बावीस वर्षें अव्याहत व एकनिष्ठेनें प्रयत्नही केला. तरीही अर्धवट शिक्षण व तज्जन्य द्रव्याभाव यामुळें जो कोंडमारा, जो अवमान, जो कालापव्यय, जो शक्तीचा अन्यथा खर्च झाला व होत आहे तो ध्यानांत घेतला म्हणजे हृदय विदीर्ण होतें. परस्तावलों, कावलों, तप्त झालों, तरी मी कोठें आहे व आयुष्याच्या अखेरीपर्यंत तरी कांहीं भरीव सत्कार्य होणार आहे कीं नाहीं याविषयीं संशय उत्पन्न होऊन अस्वस्थ होतों. संशोधक पैशाचे मागें नसतो हें खरें. पण उत्साहानें काम करूं शकेल इतकें पौष्टिक अन्न, चार विद्वान लोकांत बसण्याचा संकोच वाटणार नाहीं इतपत चांगले कपडे, केवळ बाह्य हवामानाच्या त्रासानेंच काम बंद पडणार नाहीं इतकीच थंड अभ्यासाची खोली, खरीखुरी विश्रांति घेऊं शकेल अशी शांत व निवाऱ्याची जागा, आवश्यक ते वैद्यकीय उपचार करून घेण्याचें सामर्थ्य, अव्याहत योगक्षेमाची तरतूद, संशोधनाचेंच काम अडून न पडेल इतक्या सुखानें प्रवास, उत्तम संशोधन होईल इतकी फुरसत व ग्रंथादींची साह्यता येवढ्या गोष्टींचीही त्यानें अपेक्षा करूं नये कां? कुणीकडे यूनोची मानवी हक्कांची सनद व तीमधील एतद्विषयक निर्देशांचीं कलमें व कुणीकडे मजसारखे संशोधक; पण आतां त्यास उपाय नाहीं. ‘अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्तेर्भवति हृदयदाही शल्यतुल्यो विपाकः’ ही उक्ति सहस्रशः खरी आहे.

वरील भाषा व विषय यांचा अभ्यास करतांना ध्यानांत आलें कीं, यांस अनुरूप पुस्तकें मंडळांत तर नाहींतच; पण भांडारकर इन्स्टिट्यूट, आर्किऑलॉजीचें ऑफिस, बी. ए. पुढील अभ्यास करवून घेणारीं पुण्यांतील कॉलेजें, यांपैकीं एकांतही संपूर्णतया नाहींत. तेव्हां या सर्वांच्या नियमित किंवा अनियमित वाऱ्या करूं लागलों. शिवाय रॉयल एशियाटिक सोसायटीची मुंबई शाखा, मुंबई विद्यापीठ इत्यादि मुंबईतील संस्थांच्या ग्रंथालयांचाही

यथाशक्य उपयोग करून घेऊं लागलों. या संस्थांच्या ग्रंथपालांकडून यावच्छक्य सर्व मदत मिळाली व मिळत आहे ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. ज्ञान केवळ पुस्तकीं न राहावें म्हणून पेशावर ते कन्याकुमारी–रामेश्वर आणि जोधपूर ते कलकत्ता प्रवास करून संग्रहालयें, उत्खननकेंद्रें इत्यादींचा अभ्यास केला, शक्य तें प्रत्यक्ष ज्ञान संपादन केलें आणि उत्खननापासून भिकारड्या चिटोऱ्याच्या वाचनापर्यंत सर्व संशोधनशाखांचा यावच्छक्य अनुभव घेतला. तो अपुरा असेल; पण इतिहासाचीं साधनें व त्यांतून निघणाऱ्या इतिहासाचें स्वरूप यांची योग्य कल्पना येण्यास तो पुरेसा आहे.

अशा प्रकारें गेल्या २२ वर्षांत इतिहासाच्या विविध क्षेत्रांत मगदुराप्रमाणें संशोधन करीत असतां मला शेंकडों पुस्तकें कमी अधिक प्रमाणांत आलोडावीं लागलीं. त्यांतील कित्येक संदर्भासाठीं प्रत्यहीं हाताशीं पाहिजेत अशीं होतीं. पण तीं पाहिजे तेव्हां मिळविणें व हाताशीं ठेवणें यांपैकीं कोणतेंच जमेना. तेव्हां अशा पुस्तकांतील आवश्यक मजकूर एकत्रित उतरून ठेवण्याचा उपक्रम सुरू केला. बरीच सामुग्री जमल्यानंतर वाटूं लागलें कीं, आपणांस ज्या अडचणी आल्या त्या इतर संशोधकांसही येत असतील कदाचित्, त्यांतील कित्येकांना माझ्या इतकींही पुस्तकें पहावयास व अभ्यासावयास मिळालीं किंवा मिळत नसतील अगर मिळूनही विविध भाषांच्या ज्ञानाभावीं त्यांचा उपयोग करतां येत नसेल, कित्येकांस मजप्रमाणेंच कोणी मार्गदर्शक नसेल, तात्पर्य ज्यांची योग्य माहितीच्या अभावीं कुचंबणा होत असेल अशा संशोधकांसाठीं मी जमविलेली ही सर्व माहिती पुस्तकरूपानें प्रकाशित केली तर किती नामी होईल? शिवाय संशोधनसंचारांत मला व इतरांना पुष्कळदां अनुभव येतो कीं, ज्या गृहस्थाकडील सामुग्री तपासावयाची तो तिजमधील काल, व्यक्ति, लिपी, चिन्हें इत्यादींविषयीं अनेक प्रश्न कुतूहलानें विचारतो; त्यांचीं सुसूत्र व तात्काल समाधानकारक उत्तरें देणें सामुग्री हस्तगत होण्याच्या दृष्टीनें अगदीं आवश्यक असतें. पण हीं उत्तरें जरूर तीं कोष्टकें, तक्ते, इत्यादि जवळ नसतील तर नीट देतां येत नाहींत. खेरीज कित्येक वेळां ताम्रशिला-शासनें, मूर्ति, नाणीं, कागद, देवळें अशा कांहीं वस्तू–वास्तू अधिक अभ्यासा-साठीं उचलून आणणें अगर त्यांचे ठसे किंवा फोटो घेणेंही शक्य नसतें. त्यांचा अभ्यास जेथल्या तेथेंच करावा लागतो. अशा वेळीं या एकत्रित माहितीचा

मला फार फायदा झाला. मला झाला तो फायदा इतरांना कां न व्हावा? अवश्य होईल! त्यांचेही पुष्कळ श्रम वाचतील, निदान आवश्यक माहिती मिळाल्यानें प्रगति खुंटणार नाहीं. म्हणूनही मी एकत्र केलेल्या माहितीस ठाकठिकीचें स्वरूप देऊन ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा खटाटोप केला.

आपण शेकडों पुस्तकें वाचतों; पण त्यांतील माहिती शब्दशः किंवा अक्षरशः ध्यानांत राहाते असा मनुष्य विरळाच. ती सामान्य मनुष्याच्या ध्यानींत सारांशरूपानें राहाते; त्यांतही विशिष्ट विधान अधिक स्मरतें, व्यक्तिस्थलवस्तु-नामांची आठवण अस्पष्ट होऊं लागते, आकडे बव्हंशीं विसरतो, मग आंकड्यांचीं कोष्टकें कसचीं लक्षांत राहाणार? म्हणून या पुस्तकांत आकडे व कोष्टकें यांचाच भरणा फार केला आहे. मजकूर मुख्यतः त्यांच्या स्पष्टतेसाठीं आहे. अर्थात् हें पुस्तक जवळ ठेवण्यानें संशोधकाच्या मेंदूवरचा ताण पुष्कळच कमी होईल.

या पुस्तकांतील प्रत्येक प्रकरण पूर्णपणें विस्तृत व मूलग्राही करावें अशी आकांक्षा मी कधींच धरली नव्हती. कारण कांहीं प्रकरणें अशीं आहेत कीं, त्यांची तपशीलवार व विशेष माहिती द्यावयाची तर एकेका प्रकरणासाठीं एकेक दोन दोन वर्षें झटावयास हवें आणि क्वचित् या सबंध पुस्तकाचीं पानें खर्चीं घातलीं तरी तीस पूर्णता यावयाची नाहीं. यामुळें या पुस्तकांतील माहिती आवश्यक तेवढीच आहे हें न सांगतांही कळण्यासारखें आहे. पण ती बिनचूक असावी याविषयीं आटोकाट प्रयत्न केला आहे. तरीही कांहीं चुका राहाणें अपरिहार्य आहे. त्यांविषयीं क्षमस्व येवढेंच म्हणावेसें वाटतें.

मूर्तिविज्ञान पुस्तकाच्या पुरस्कारांत कै. रा. ब. का. ना. दीक्षित यांनीं आणि ओरिएंटल लिटररी डायजेस्टमधील अभिप्रायांत श्री. प. कृ. गोडे यांनीं मी त्या पुस्तकांत पुष्कळ माहिती अगदीं थोड्या जागेंत किंवा शब्दांत आणल्याचें सांगितलें आहे. मलाही तसेंच वाटतें. पण माझ्या कांहीं मित्रांनीं हीच माहिती अधिक विस्तारानें कां मांडिली नाहीं म्हणून मला दोष लाविला. मला त्यांचें म्हणणें पटलें नाहीं. विषय विस्तारानें मांडिला तर त्याचा उलगडा लवकर व चांगला होतो हें खरें असलें तरी त्यामुळें पुस्तकाचीं पृष्ठें वाढतात. पृष्ठांच्या वाढीमुळें किंमत वाढते. अधिक किंमतीच्या पुस्तकांना गिऱ्हाईक कमी भेटतें. त्यांतून संशोधनाचें पुस्तक असलें तर मग विचारावयास

नको. छपाईकरतां देणग्या स्वीकारूनही घस लागली नाहीं म्हणजे मिळविली. म्हणून पुस्तकाचीं पृष्ठें वाढूं न देण्यावर माझा भर आहे. त्यासाठीं लेखन थोडें दुर्बोध झालें तरी त्यांत संक्षेप करण्यासाठीं झटतों. या पुस्तकांतही विषय निराळा असला तरी तसा प्रयत्न केला आहे; पण तो म्हणावा तितका साधला नाहीं. उदा० ग्रहणांचे आकडे देतांना संक्षेप करतों तर कांहीं पृष्ठें वाचलीं असतीं; पण चटकन् कल्पना सुचली नाहीं. त्याची भरपाई हिजरीचे आरंभदिन देतांना केली आहे. खिळे जुळविण्याची साद्यंत माहिती असती तर आणखी थोडीं पृष्ठें वाचलीं असतीं किंवा येवढ्याच पृष्ठांत कोष्टकें अधिक विस्तारानें देतां आलीं असतीं. उलट माझे एक एम्. ए. झालेले मित्र मला नेहमीं म्हणतात कीं, मी प्रत्येक प्रकरण नवख्या मनुष्याचा देखील इतिहाससंशोधनाच्या विविध शाखांत सहज प्रवेश होईल इतक्या विस्तारानें लिहावयास पाहिजे होतें. त्यांचें हें म्हणणें कदाचित् खरें असेल. पण माझ्या पुढें जमलेल्या पैशांत शक्य तितका संक्षेप करूनही आवश्यक ती माहिती कशी बसवावयाची हा प्रश्न होता व त्याची सोडवणूक मी माझ्या दृष्टीनें उत्तम केली आहे. दोष व उणीवा राहिल्या असल्यास त्यांना आवश्यक ती फुरसत व पुरेसा पैसा न मिळणें हीं दोन कारणें आहेत याची खात्री असों द्यावी.

यासारखीं पुस्तकें खरोखर संस्थांनींच त्यांसाठीं लेखकाच्या योगक्षेमाची व साह्याची आवश्यक ती सर्व व्यवस्था करून प्रकाशित करावयास पाहिजेत. निदान ज्यास पैसा व फुरसत यांची भरपूर अनुकूलता आहे त्यानेंच अशा प्रकारचें पुस्तक प्रसिद्ध करण्याची हौस धरावी. दोन्ही गोष्टींच्या अभावीं काम मनासारखें होणें शक्यच नाहीं. मी अनेकदां हिशेब करून पाहिलें तेव्हां नेहमीं मला हेंच आढळलें कीं, मी ज्या पद्धतीनें व दर्जाचें काम करूं इच्छितों, त्यासाठीं मजपाशीं असलेल्या फुरसतीपैकीं शेकडा पंचाहत्तर टक्के वेळ उपयुक्त पुस्तकें मिळविणें व परत करणें यांत जातो. अशा परिस्थितींत अत्यंत उच्च दर्जाचें काम कसें व्हावें ? आणि आवश्यक तितका उच्च दर्जा राहिला नाहीं तर त्याचा दोष कोणाकडे जातो ?

या पुस्तकाची मीं प्रथम आखणी केली तेव्हां, मिळणारी आर्थिक मदत, पूर्वतयारीस येणारा खर्च, जमा केलेल्या सामुग्रीचा मुद्रणांत होणारा व्याप व त्यासाठीं होणारा व्यय यांचा अंदाज करून, असें ठरविलें होतें कीं, योजिलेल्या

विषयांचें विवरण व तें समजण्यासाठीं द्यावे लागणारे तक्ते यांचा २५६ पृष्ठांत समावेश करून पुस्तक हातांवेगळें करावें. अपेक्षेप्रमाणें मदत थोड्याफार कष्टानें कां होईना पण मिळाली. विवरण मात्र २५६ पृष्ठांत संपण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां मूळचा अंदाज सोडून पृष्ठांची मर्यादा ३०० पर्यंत वाढविण्याचें ठरविलें. तरीही विषय संपेल असें मुळींच वाटेना. म्हणून मूळ आखणीप्रमाणें २५६ पृष्ठांतच आवरतें घेतलें आहे. पण यामुळें नाणीं, शिक्के, लेखविद्या, हीं तीन प्रकरणें, या भागांत आलेल्या प्रकरणांच्या पुरवण्या, प्रायः प्रत्येक प्रकरणाचा खुलासा, संदर्भग्रंथसूची व तक्ते येवढा भाग राहून गेला. हा सर्व भाग द्यावयाचा तर आणखी सुमारें १२८ पृष्ठें सहज पाहिजेत व त्या मानानें पैसा लागेल. पैकीं लेखन व तक्ते तयार आहेतच म्हणाना. थोड्याशा श्रमानें ही सर्व सामुग्री एकदम छापखान्यांत देतांही येईल. पण यांतील अदमासें निम्मी सामुग्री फार्सी लिपींत आहे. आणि आपल्या या विद्वत्तेच्या माहेरघरीं–पुण्यांत एका वेळीं क्राउन आकाराचीं आठ पानें फार्सी मजकूर उभा करील असा एकही छापखाना नाहीं. तेव्हां खर्चाची व्यवस्था झाली असें गृहीत धरलें तरी मुद्रण मंदगतीनें चालून हें पुस्तक बाहेर पडण्यास आणखी कमींत कमी सहा महिने लागणार हें उघड दिसूं लागलें; पण अजून एका बाजूस नव्या खर्चाची व्यवस्था कशी करावी ही चिंता आणि दुसरीकडे सहानुभूतिकांनीं दिलेल्या पैशाचें लवकर फळ कसें दिसेल ही काळजी. अशा दोन–विशेषतः दुसऱ्या विचारानें मी इतका बेचैन झालों कीं, कांहींही करून इ. १९५१ च्या आरंभीं झालेलें काम प्रकाशित करून मोकळें व्हावें असा निश्चय केला व आज तें हातांवेगळें करीत आहें. उर्वरित कामही अगदीं मुद्रणायोग्य करून ठेवीत आहे. आवश्यक खर्चाची सोय होतांच किंवा होण्याचा संभव दिसूं लागतांच दुसरा भागही छापून काढावा असा मानस आहे. या पुस्तकासाठीं वापरलेला कागद, मला पसंत नव्हता तरी, जवळच्या पैशांत इ. १९४७ मध्यें उघड्या बाजारांत मिळाला तसला घेतला. पुढील भागासाठीं त्यांतल्या त्यांत चांगल्या कागदाची व्यवस्था केली आहे.

या पुस्तकाचीं १६० पृष्ठें इ. १९४७ च्या अखेरीस छापून झालीं असतां बाकीचीं ९६ पृष्ठें छापून पुस्तक बाहेर पडण्यास आणखी पक्कीं तीन वर्षें लागलीं. याचें एक महत्त्वाचें व मुख्य कारण संभाव्य गैरसमज दूर

होण्याचे दृष्टीनें येथें नमूद करणें आवश्यक आहे. हें किंवा गतकालांतील मंडळाशीं असंबद्ध असें केलेलें इतर कोणतेंही लेखनकार्य मीं मंडळाचें सर्व काम संभाळून माझ्या खाजगी फुरसतीच्या वेळांत केलें आहे. त्यासाठीं मंडळाचा वेळ खर्चीं घातलेला नाहीं. गेल्या तीन वर्षांत या फुरसतीच्या वेळांत मुख्यतः तीन कार्यें केलीं. पहिलें आपला अभ्यास वाढविणें, दुसरें या पुस्तकाचें काम करणें आणि तिसरें मराठी इतिहासाच्या विस्तृत शकावली-साठीं मुंबई (४००) व पुणें (५००) विद्यापीठें आणि इचलकरंजी एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट (२००) यांकडून मिळालेल्या ११०० रुपये देणगीचा योग्य विनियोग करणें. यांपैकीं पहिल्या दोन कामांत माझा किती वेळ गेला हें सांगतां येत नाहीं. पण शकावलीसाठीं गेल्या तीन सालांत माझे कमींत कमी १००० तास तरी खर्च झाले असतील. नुसत्या तारखा तपासण्यांत किमान ६०० तास खर्च झाले आहेत. संशोधनासाठीं मदत मिळालेल्या व्यक्तींस स्वतः केलेल्या कामाबद्दल मोबदला घेतां येत नाहीं हा दंडक सुप्रसिद्ध आहे. तेव्हां हे ११०० रुपये खर्च करून सुमारें ३१००० शका-वलीच्या चिठ्या तयार करविल्या आहेत. मी माझा वेळ पुस्तकें मिळविणें, चिठ्या कशा करावयाच्या तें दाखविणें, उत्पन्न होणाऱ्या शंका निरसणें, चिठ्या व मूळ पत्रें यांच्या तारखा तपासणें यांत घालविला आहे. केवळ पेशवे दप्तराच्या तारखा तपासण्यासाठीं किती श्रम करावे लागले हें मी पोतदार-गौरव-ग्रंथांतील माझ्या लेखांत दिग्दर्शित केलें आहे. या शकावलीच्या कामानें माझा अपेक्षेबाहेर वेळ खाल्ला. शिवाय हेंही लक्षांत घेणें आवश्यक आहे कीं, मंडळातर्फे संशोधनासाठीं किंवा खाजगी कामासाठीं बाहेरगावीं गेलों म्हणजे फुरसतीचीं कामें करतां येत नाहींत. गेल्या तीन वर्षांत केवळ संशोधनसंचारांत माझे किती तरी दिवस गेले. यावरून या पुस्तकाचें खाजगी वेळांत चालणारें काम येवढ्या मंदगतीनें कां चाललें हें ध्यानांत येईल.

पुस्तकाच्या प्रकाशनास इतका वेळ लागण्याचें दुसरें कारण पुस्तकाचा विषय. या पुस्तकांत असें एकही प्रकरण नाहीं कीं, ज्यांतील माहिती केवळ एका पुस्तकांतून उतरून घेतली आहे. सर्वांत सोपें वृत्तें प्रकरण घेतलें तरी तें तयार करण्यापूर्वीं सुमारें पन्नास ताम्रशिलाशासनें तपासलीं होतीं. नवीन माहिती कशी मिळते व तीसाठीं वेळ किती मोडत असेल याची कल्पना

स्था लहानशा प्रकरणावरूनही येऊं शकेल. मग कालगणना, वंशावळी, इत्यादि प्रकरणांसाठीं किती श्रम करावे लागले असतील याचा अंदाज करावा. वंशावळी प्रकरण तीनदां पुनः पुनः तपासून लिहून काढावें लागलें.

शेवटचें काम आभार मानावयाचें. ते कोणाचे व किती हेंच समजत नाहीं. मागितलें त्यांनीं त्यांजकडून बनेल तेवढें साह्य केलें. मला अज्ञात असेही साह्यकर्ते असतील. पण ज्ञात आणि आवश्यक तेवढ्यांचाच येथें निर्देश करतों. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं मुंबई विद्यापीठानें पांचशे रुपयांची भरीव मदत केली. इचलकरंजी एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्टनेंही पांचशे रुपयांचें भरीव साह्य केलें. यशोदा–चिंतामणि–निधींतून तीनशे रुपये देण्याचें कै. तात्यासाहेब केळकर यांनीं कबूल केलें होतें. त्याची पूर्ति त्यांचे चिरंजीव व माझे मित्र श्री. य. न. केळकर यांनीं केली. कऱ्हाडचे श्रीमंत पांडुरंग केशव शिराळकर व मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड सोशिऑलॉजीमधील माजी प्राध्यापक डॉ. नौशीरवान् ए. थूथी यांनीं प्रत्येकीं शंभर रुपये दिले आणि डॉ. थूथी यांनीं आणखीही साह्य करण्याचें आश्वासन दिलें आहे. साताऱ्याचे जुने मित्र श्री. शिवराम विष्णु मोडक व श्री. गंगाजलनिर्मल गंगाबाई उर्फ मावशी परचुरे यांनीं अनुक्रमें एक्कावन व पन्नास रुपये दिले. या संस्था व ही मंडळी मागितल्यास आणखीही साह्य करतील याची पक्की खात्री आहे. या सर्वांचे मी हार्दिक आभार मानतों व कृतज्ञता व्यक्त करतों.

श. १८७२ शिवजयंति (२५।३।५१) लेखक

पुरस्कार

आमच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे आजीव संशोधक व वस्तुपाल (क्यूरेटर) श्री. गणपतराव खरे यांनीं उभा केलेला हा ' संशोधकाचा मित्र ' अगदीं जाणत्या मित्राप्रमाणेंच इतिहाससंशोधकांना साहाय्यक होणारा आहे यांत शंका नाहीं. श्री. खरे यांनीं अत्यंत परिश्रमानें व दीर्घ काळच्या चिकाटीनें संशोधनाला आवश्यक असलेलीं जीं साधनें जमविलीं तीं आयतीं या व्यवसायांतील मंडळींना मिळत आहेत हें त्यांचें भाग्य समजलें पाहिजे. श्री. खरे यांना प्रस्तुत ग्रंथांतील माहिती मिळविण्याची जी अतिशय यातायात पडली ती इतर संशोधकांना पडूं नये म्हणून त्यांनीं आपलें भांडार अगदीं खुलें केलें आहे. या त्यांच्या औदार्याबद्दल संशोधक त्यांचे ऋणी राहातील.

या ग्रंथांतील शब्दसंक्षेप, शब्दाक्षरमूल्यें, विविध कालगणना व वंशावळी यांसंबंधीची अगदीं सविस्तर माहिती त्यांनीं जी दिली आहे ती पाहून त्यांच्या दीर्घ आणि सूक्ष्म अभ्यासाबद्दल सादर कौतुक वाटतें. एखाद्या शास्त्रीय विषयाचा अभ्यास कसा करावा याचें अनुकरणीय उदाहरण म्हणून हें दाखवितां येईल. संस्कृत वचनें आणि वृत्तें देण्यामध्येंहि त्यांचा हेतु संशोधकाला इतर संदर्भग्रंथ चाळावयाची दगदग नको, असा मित्रत्वाचाच आहे. तथापि, त्यांनीं बांधून दिलेली एवढी शिदोरी संशोधकाला पुरणार नाहीं याचीहि त्यांना जाणीव आहे. यापुढील दुसऱ्या भागांत चित्रांचा आणि नाण्यांचा अभ्यास, कागदपत्रें वाचतांना ध्यानांत घ्यावयाचा गोष्टी, उपयुक्त संदर्भग्रंथ, इत्यादि उरलेलीं संशोधकीय साधनें देण्याचा संकल्प त्यांनीं सोडलाच आहे.

तीस वर्षांपूर्वीं कै. दत्तोपंत आपटे यांनीं ' संशोधकाची छोटी जंत्री ' प्रसिद्ध केली व आतां त्यांच्या सच्छिष्यांनीं ही बृहत् जंत्री देऊन मंडळाची परंपरा पुढें चांगली चालविल्याची साक्ष ठेविली आहे, असेंच प्रांजलपणें म्हणावें लागतें. श्री. खरे हे कोठल्याहि महाविद्यालयांत आयत्या पैशानें चैनींत शिकून बाहेर पडलेले व नंतर शिक्षित विद्येचा कांहींहि उपयोग न

करणारे असे नांवाचे स्नातक नव्हत. उच्च विद्यार्जन त्यांनीं कसें व कोणत्या हेतूनें जिवापाड कष्ट सोसून केलें हें त्यांच्या 'निवेदना'वरून समजून येणार आहे. त्यांची अल्प द्रव्यप्राप्ति बव्हंशीं त्यांच्या विद्याव्यासंगाकडे खर्च होते. तेव्हां त्यांना जर आर्थिक साहाय्य चांगलें लाभेल तर त्यांच्या हातून अशासारखीं कितीतरी आवश्यक व उपयुक्त पुस्तकें लिहिलीं जातील, याची खात्री असूं द्यावी. असो.

मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत एक नवीन उत्कृष्ट भर पडत आहे याचा फार आनंद वाटतो.

शक १८७२,
माघ विजया ११

चिंतामण गणेश कर्वे
चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ, पुणें

अनुक्रम

पृष्ठ

१ शब्दसंक्षेप १

२ शब्दमूल्यें ६

३ अक्षरमूल्यें १२

४ मंगल व शापाशीर्वाद वचनें १८

संस्कृत २०, कानडी ३७.

५ वृत्तें ३९

अक्षरवृत्तें ४०; मात्रावृत्तें ४४; वृत्तांची वर्णानुक्रमानें सूची ४५; वृत्तांची अक्षरमात्रासंख्यानुक्रमानें सूची ४६.

६ कालगणना ४७

प्रस्ताव ४६; अमली = कटकी, बंगाली, विलायती ४७; इलाही ४८; इसवी ४९; कलचुरि ५०; कोल्लम् ५२; गांगेय = गंग-कदंब, गुप्त ५३; ग्रहणें-सूर्य ५४; ग्रहणें-चंद्र ६१; ग्रहपरिवृत्ति ७०; चालुक्य विक्रम, जुलूस वर्ष ७१; तुर्की द्वादशवर्षचक्र ८०; नेवार, पुदुवैप्पु ८५; फसली ८६; बार्हस्पत्य वर्षचक्र-बारा वर्षांचें ९१-साठ वर्षांचें ९२; क्षय संवत्सरें ९८; बुद्धनिर्वाण १००; भाटिक, मगी, मव्लूदी १०१; मौर्य १०४; राज्याभिषेक, लक्ष्मणसेन १०५; विक्रम १०६; वीरनिर्वाण, शालिवाहन शक १०८; शुहूर-दक्षिणी ११०; शुहूर-फारूकी ११४; सप्तर्षि ११७; सिंह ११८; सेल्युकिडि, हर्ष ११९; हिजरी १२०; हिजरी वर्षारंभाचें कोष्टक १२४; हिजरी तारखेशीं मिळता वार काढण्याचे तक्ते १३३; हिंदू चैत्र व त्याशीं जुळते मुसल्मानी महिने १३४; महिने, ऋतु, वार, तिथि, इत्यादि-महिने १३६; अधिक व क्षय मास १३८-त्यांची यादी १४२; विविध महिने व त्यांचे दिवस १४८; ऋतु, वार १५१; तिथि १५३; राशि १५५; ग्रह, नक्षत्रें, योग १५६; करण, कालादर्श १५७; शुहूर सनाचें परिशिष्ट १५९; राजशकाचें परिशिष्ट १६३; जुळत्या हिंदू-मुसलमानी महिन्यांचें कोष्टक १६६.

७ मूर्तिपरिचय १६७

प्रस्ताव १६७; वैदिकधर्मी मूर्ति १८१; जैन मूर्ति १८५; बौद्ध मूर्ति १८७.

८ वंशावळी १९१

प्रस्ताव १९१; अयोध्या-नबाब, अर्काट-नबाब, अर्घून, अर्घून-तर्खान, आदिलशाही १९३; आंध्र-शातवाहन, इमादशाही, कछवाह-जयपूर १९४; कण्व, कदंब-गोवें, कदंब-वनवासी १९५; कदंब-हानगल, कळचुर्य (१); कळचुर्य (२)-कल्याण, काशी-राजे १९६; काश्मीर-सुल्तान, कुत्बशाही, कुषाण, क्षत्रप-महाक्षत्रप (१,२) १९७; क्षत्रप-महाक्षत्रप (३), खलजी-दिल्ली, गव्हर्नर जनरल १९८; गव्हर्नर-मुंबई १९९; गायकवाड-बडोदें २००; गुजरात-सुल्तान, गुत्त-गुत्तल, गुप्त-सम्राट् २०१; गूर्जर, घुलाम, चालुक्य-गुजरात (१-३), चालुक्य-बदामी+कल्याण २०२; चालुक्य-वेमुलवाडा २०३; चौहान-सम्राट्, चौहान-बूंदी, जाट-कुंभेर+डीग+भरतपूर, तुघ्लुक २०४; दुर्रानी, नंद, नायक-केळदि, नायक-तंजावर, नायक-मदुरा २०५; निजामशाही, निजाम-हैदराबाद, पटवर्धन २०६; परमार-माळवा २०७; पवार-देवास (थोरली व धाकटी पाती)+धार, पेशवे-पुणें २०८; फारूकी-खानदेश २०९; बंगाल-सुभेदार, बंगाल-सुल्तान (१ सुभेदार + २ बल्बन घराणें + ३ स्वतंत्र + ४ इलियासशाह घराणें + ५ राजा गणेश घराणें + ६ इलियासशाह घराणें + ७ हबशी सुल्तान + ८ हुसेनशाही घराणें + ९ सूरी घराणें + १० कररानी घराणें) २१०; बरीदशाही, बहमनी २११; बुंदेले, भोपाळ नबाब, भोसले-कोल्हापूर २१२; भोसले-तंजावर, भोसले-नागपूर २१३; भोसले-सातारा २१४; महाराणा-उदेपूर, मदुरा-सुल्तान २१५; माळवा-सुभेदार, माळवा-सुल्तान, मुघल २१६; मुलतान-सुल्तान, मौर्य, म्हैसूर-ओडेयर २१७; म्हैसूर-सुल्तान, यमीनी-घझ्ना, यादव-देवगिरि २१८; रट्ट-सवंदत्ती (१,२), रणजितसिंघ घराणें, राठोड-जोधपूर, राठोड-बिकानेर, राष्ट्रकूट-गुजरात (१,२), राष्ट्रकूट-बैतूल, राष्ट्रकूट-मयूरखंडी + मान्यखेट २२०; राष्ट्रकूट-मानपुर, लोदी, वाकाटक-वत्सगुल्म, वाकाटक-सम्राट्, विजय-

नगर-आरवीडु २२१; विजयनगर-तुलुव, विजयनगर-संगम २२२; विजयनगर-साळुव, शिलाहार-कऱ्हाड+कोल्हापूर, शिलाहार-खारेपाटण, शिलाहार-ठाणें २२३; शिंदे-ग्वाल्हेर, शुंग-विदिशा, शैशुनाग-मगध, सय्यिद, सावनूर-नबाब २२४; सिंद-एरं-एलबरगे, सिंद-सिंदवाडी, सिंध-जाम, सूरी-दिल्ली, सेन्द्रक, सोळंकी-गुजरात २२५; सोळंकी-वाघेला, होयसळ-द्वारसमुद्र-हळेबीड, होळकर-ईंदूर २२६.

९ उत्खनन २२७

१० ठसे

तामपट २३४, नाणीं २३५, शिलालेख २३६. २३३

आवश्यक संक्षेपांचा खुलासा

इकॅ—इंडियन कॅलेंडर-दीक्षित व सेवेलकृत.

इंडि. अँटि.—इंडियन अँटिक्वेरी-नियतकालिक.

एपि. इंडि.—एपिग्राफिया इंडिका-नियतकालिक.

जेबीएच्एस्—जर्नल ऑफ दि बाँबे हिस्टॉरिकल सोसायटी.

द.म.इ.सा.—दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें-ग. ह. खरेकृत.

प्रालिमा—भारतीय प्राचीन लिपिमाला-ओझाकृत

रा. ए. सो.—रॉयल एशियाटिक सोसायटी.

लिस्ट—डॉ. दे. रा. भांडारकरकृत व एपि. इंडि. खंड १९-२३ मध्यें प्रकाशित.

लिस्ट १ व २—डॉ. किल्हॉर्नकृत व अनुक्रमें एपि. इंडि. खंड ५ व ७ यांचीं परिशिष्टें म्हणून प्रकाशित.

सिइकॅ—दि सिद्धांताज अँड दि इंडियन कॅलेंडर-सेवेलकृत.

माझी साहित्यसेवा

१,२ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ (अंशतः) —मू. ७ रु.

३ मंडळांतील नाणीं —इ. १९३३—मू. १ रु.

४,५ शिवचरित्रसाहित्य खंड ३ (अंशतः) व ६ (पूर्णतः) —इ. १९३०, ३७—मू. ३ व १॥ रु.

६—९ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ ते ४ —इ. १९३४,३७,३९,४९—मू. १ते३ प्रत्येकीं १॥ रु.; ४चें ३ रु.

१०—१२ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ते ३ —इ. १९३०, ३४,४९ मू. १॥, २ व ३ रु.

१३, १४ शिवचरित्रवृत्तसंग्रह खड २ व ३ (फार्सी साधनांचे अनुवाद) —इ. १९३९, ४१—मू. प्रत्येकीं १॥ रु.

१५,१६ हिंगणे दप्तर खंड १ व २ —इ. १९४४, ४७—मू. प्रत्येकीं ३ रु.

१७ भोर ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयप्रदर्शिका इ. १९३५—मू. ८ आ.

१८ भोर संस्थान ऐतिहासिक स्थलदर्शन ,, १९४५—मू. ८ आ.

१९ ऐतिहासिक आख्यायिका ,, १९४४—मू. ४ आ.

२० पंढरपूरचा विठोबा ,, १९४७—मू. ४ आ.

२१ लाठी शिक्षक भाग १ ,, १९२८—मू. २ आ.

२२ श्रीक्षेत्र आळंदी ,, १९३१—मू. २ आ.

२३ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर ,, १९३८—मू. ६ आ.

२४ मूर्तिविज्ञान ,, १९३९—मू. ५ रु.

२५ संशोधकाचा मित्र ,, १९५१—मू. ४ रु.

२६ Simhagaḍh ,, १९४८—मू. ४ आ.

२७ तुलादानविधि ,, १९४८—मू. ८ आ.

२८ सिंहगड ,, १९४८—मू. ८ आ.

२९ शनिवार वाडा ,, १९४९—मू. ८ आ.

३० Explorations at Karad (अंशतः) ,, १९४९—मू. ५ रु.

३१ पेशवे दप्तर-पत्रें कालनिर्णय-सुधारणा ,, १९५०—मू. ८ आ.

३२ Sanivāra Palace ,, १९५०—मू. १० आ.

३३ इतिहासकर्ते मराठे ,, १९५१—मू. २ रु.

२०३ इंग्रजी-मराठी (५६+१४७) लेख

१. शब्दसंक्षेप

मनुष्याइतका परावलंबी दुसरा प्राणी नसेल. मनुष्य पशुयोनि सोडून नुकताच मानवयोनींत आला तेव्हां हें परावलंबित्व पुष्कळ कमी असेल. पण जों जों त्यास सुरक्षिततेनें व सुलभपणानें जगण्यासाठीं संघ करून राहण्याची जरूरी भासूं लागली तों तों त्याचे परस्पर व्यवहार वाढूं लागले. लेखनकला उत्पन्न होण्याच्या अनेक कारणांपैकीं हें एक आहे. पत्रव्यवहार, जमाखर्च, राजकीय हुकूम, पोथ्या-पुस्तकें इत्यादींच्या लेखनांत कित्येक सर्वसामान्य शब्द इतके वारंवार येतात कीं, ते पूर्ण स्वरूपांत पुन्हा पुन्हा लिहिणें मनुष्यास कंटाळवाणें व त्रासाचें वाटूं लागतें. त्यामुळें मनुष्य अशा शब्दांचे संक्षेप करूं लागला. कागदाचा शोध लागून त्याचा प्रसार होऊं लागल्यावर लेखनाची एकदम वाढ होऊन शब्दसंक्षेप करण्याची प्रवृत्ति फार झपाट्यानें फोफावली आणि तिचा प्रवेश हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व भाषांतील लिखाणांतून झाला. मीं बालबोध, मोडी, कानडी, हिंदी या लिपींतील आणि मराठी, कानडी, हिंदी या भाषांतील जुन्या पोथ्या व पुराणें, ऐतिहासिक कागद आणि अनेक लिपी व भाषा यांमधील ताम्रपट, शिलालेख, नाणीं इत्यादि साधनें पाहिलीं आहेत. त्यांपैकीं विशेषतः मोडी कागदपत्रांमध्यें हे संक्षेप फार मोठ्या प्रमाणांत आढळतात. येवढेंच नव्हे, तर फार्सी शिलालेख व कागदपत्र यांतही असे संक्षेप केल्याचें दिसून येतें. मात्र त्यांची संख्या फार नाहीं.

ताम्रपट, शिलालेख व नाणीं यांत शब्दसंक्षेप करतांना शब्दाचें पहिलें किंवा पहिलीं दोन अक्षरें सामान्यतः लिहिलेलीं असतात, कांहीं ठिकाणीं आद्याक्षरापुढें पोकळ टिंब दिलेलें असतें; पण कागदपत्र व त्यांच्या सुमाराचीं नाणीं यांतील संक्षेप निराळ्या पद्धतीनें केल्याचें आढळतें. यांत ज्या शब्दाचा संक्षेप करावयाचा त्याचें आद्याक्षर किंवा पहिलीं दोन अक्षरें घेऊन त्यांपुढें सामान्यतः दोन काने देतात. शब्दांत अनुस्वार व एकाच अक्षरावर एक किंवा दोन मात्रा असल्यास अनुस्वार व एक किंवा दोन मात्रा याही अक्षरावर येतात. कधीं कधीं शब्दाचीं आद्य व अंत्य किंवा आद्य व शेवटचीं दोन अक्षरें कायम

ठेवून मधल्या सामान्यतः एक, दोन किंवा तीन अक्षरांबद्दल आद्याक्षरापुढें दोन काने देतात.

सामान्यनाम, विशेषण, क्रियापद, अव्यय इत्यादि सर्व जातींच्या शब्दांचे संक्षेप केलेले आढळतात आणि नेहमींच्या सरावानें ते चटकन् ओळखूंही येतात; पण जेव्हां विशेषनामांचे संक्षेप करतात तेव्हां संदर्भ नीट ध्यानांत घेतल्याशिवाय संक्षेपांचा उलगडा होत नाहीं.

नाण्यांवरील संक्षेपांच्या बाबतींत पुष्कळ वेळां कल्पनाशक्तीस चांगलाच ताण द्यावा लागतो आणि इतकें करूनही अंदाज चुकीचा ठरण्याचा संभव असतो. कोणत्याहि शब्दाचा संक्षेप करतांना पाया म्हणून त्याचें शुद्ध रूपच घेतलें असतें असें नाहीं. अनेक ठिकाणीं अशुद्ध रूपें घेतल्यानें एकाच शब्दाचे अनेक संक्षेप झाल्याचें आढळतें. त्याचप्रमाणें केवळ आद्याक्षरापुढें दोन दंड देऊन संक्षेप साधल्यानें भिन्नार्थक अनेक शब्दांबद्दल एकच संक्षेप बनलेला आहे. याच न्यायानें क्रियापदांचे संक्षेप करितांना भिन्न लिंगी क्रियापदांबद्दल एक संक्षेप तर येतोच; पण भिन्न कालिक व वचनांच्या क्रियापदरूपांबद्दल तोच संक्षेप येऊं शकतो.

अशा तऱ्हेचे बरेच संक्षेप याखालीं एकत्र करून दिले आहेत. ते येवढेच आहेत असें मात्र कोणीं समजूं नये.

अ=अर्जुनपाल (करौली)
आ=अनाम, अर्दास, असामी, आनंदराव (बडोदें)
अव.=
आ.=आचार्य
इा=इनाम इब्तिदा, इशरीन, इस्तकबाल, इशारत, इस्तकबील, इस्तिकामत
इादार=इजारदार, इनामदार
उ.=उत (पुत्र), उप
एा=एकूण
क=किशनदास ब्यास (सुजात–जोधपूर दारोगा)
का०=कारित
का=कर्यात, कल्हईचें, कसबे, कारकीर्द
कादार=कमाविसदार
कि=कित्ता, किंमत
कुं–कुन्द०=कुन्दकुन्दाचार्य–र्या–न्वये–म्नाये
कृ०=
कैा=कैलां

ख-खा=खंडेराव (गायकवाड)
खा=खरीफ, खान, खारिज, खास, खासगत
खुा=खुदायेवंद, खुर्द, खुर्दखत, खुर्दा, खुली
खो=खरेदी, खेरीज
ग=गण, गच्छ, गणपति; (उलटा) =कर्णीराम (जोध.-दारोगा), तख्तसिंग (जोध.-राजा)
गड=जुनागड (नबाब)
गा=गायकवाड
गाा=गायकवाड
गि=ग्रीष्म
गुा=गुजारत, गुजारिलें, गुदस्त, गुमास्ते
गृ=ग्रीष्म
गो.=गोत्रीय, झोरावरखान किंवा मुहम्मद बिस्मिल्लाहखान (राधनपूर-गुजरात), गोपाळपेठ
गो=गोसावी
ग्री=ग्रीष्म
घा=घाऊक
घो=घातलें, घेतलें
चा=चाकर
ज=जंजिरा (मुंबई), जयाजी शिंदे, तख्तसिंग (जोधपूर-राजा)
जा=तख्तसिंग (जोधपूर)
जा=जमीन, जामीन,
जाखर=जमादिला
जावल=जमादिला
जिाद=जिल्काद
जिाज=जिल्हेज
जिराा=जिराईत
जी=झोरावरखान किंवा बिस्मिल्लाहखान (राधनपूर-गुजरात), जयाजी शिंदे (ग्वालेर)
जे=जनकोजी शिंदे (ग्वालेर)
ज्याा=ज्यादती
ट=गोकलचंद बोहरा (सुजात-जोधपूर
ठ०=ठक्कुर
त.=तत्पट्टे
ता=तक्सीम, तपे, तर्फ, तागायत, तारीख, तालीक, तांब्याचें
ता.=तारीख, तालीक, तांब्याचें
ता. वि.=
तर्ा=तर्फ
ति=तिथि
तीा=तीर्थरूप
तो=तपे, तेरीख, तैनात
तां=तहां, तांदूळ
दा=दरवज्ह, दस्तक
दि=दिन
दिा=दिम्मत
दुा=दुर्ग
दो.=

दाो=दाखविणें, देखील
द्वि=द्वितीय
धुाा=धुरंग
नाा=नक्कल, नख्तयाती, नजीक, नफर, नायक
निाा=निमित्त, निशाणी, निसबत
नु, नु ऱ्ही=जसवंतसिंघ (जोधपूर)
प=परीक्षि, परायण
प. ह. पु.=
पाा=परगणे, परवानगी, पारवाडी, पाटील, पादशाही, पायली, पाहिजे
पाजे=पाहिजे
पिाा=पिसाळ
पु०=पुत्र, पुस्तक
पुाा–पुरवणी, पाठवावी
पाो=पाठविले, पावले, पावेतों, पाहिजे, पोष्य
पाों=पैकीं
पाौ=पैवस्ती
पं.=पंडित
पांा=पंचोली
प्र०–प्रति०=प्रतिष्ठितम्, प्रतिष्ठापितम्, प्रातिपद्य ?
प्रा०=
प्राा=प्रगणे, प्रत, प्रधान, प्रभू, प्रसन्न
प्राार=प्रकार
प्राो=प्रमाणें
प्रांा=प्रांत
फुाा–फ्रोाा=फरूख्ती
ब=बलात्कार
ब–बति–दि=बहुल–बहुल तिथि–दिन
बा=बाबी कुल (जुनागढ-नबाब), बालाजी (मंगलचंद दारोगा–पाली–जोधपूर)
बाा=बदल, बरहुक्म, बरोबर, बाब, बनाव
बिाा=बिकलम, बितपशील, बिदानद, बिन, बिऱ्हाडकरू
बुाा=बुद्रुक
बाो=बेश्म
बाों=बांधिलें
ब्र.=ब्रह्मचारिन्
भ–भ०=भंवरपाल (करौली), भट्टारक
भा०=भार्या
भांा=भंडारी
म=मदनपाल (करौली), महाराज
मं=मंडलाचार्य
महं=महन्तम
मा=माधवराव शिंदे (ग्वाल्हेर), जसवंतसिंघ (जोधपूर)
माा=मजकूर, मल्हारराव(गायकवाड), मशरूल, मशार, महसूल, महाडकर, माब, मामले, मालूम
माार=मजकूर, मशार, महार ?

मिा–मिति, मिनहु
मुा=मुक्काम, मुजावर, मुताबिक, मुदत, मुद्दल, मुल्ला, मुहम्मद,
मृा=लाला सेधमल दारोगा (पाली–जोधपूर)
मो=मोकदम, मोर्तब, मोकाम, मोहोर
मोरम=मोहरम
मौ=मौजे
म्हा=म्हणोन
यो=येकूण
र०=रविवार
रा=अनारसिंघ दारोगा (जोधपूर)
रा=रख्तखाने, रवाना, राजेश्री
राखर=रबिलाखर
रावल=रबिलावल
रु०=
रुा=रुपये
रुो=रुकं, राजेश्री
ल=लातूर ?, लक्ष्मणसेन
ल०–ला०=
ला–नझर हरकरण दारोघा (सुजात–जोधपूर)
ला=लागली
लिा=लिहिला-ली-लें, लिहिणें
ले.—लेखक
व०=वद्य, वर्ष, वर्षा ऋतु
वा=वजारत, वद्य, वलद
वति–दि=वद्य तिथि–दिन, बहुल
विा=विज्ञापना, विदित, विद्यमाने, विद्यार्थी, विनंति
वो=वेद, वेदमूर्ति
ब्र=ब्रह्मचारिन्
श०=शक
शा=शक, शास्त्रसंपन्न, शास्त्री
शुति=शुद्ध तिथि
शु–शुा=शुद्ध
श्नो=स्नेहांकित
श्रा=श्रावण
श्री=अजमीर (टा), बायजाबाई शिंदे (ग्वाल्हेर), अमीनाबाद (टा.)
श्री१=भार्या, पुत्र
श्री२=सेवक
श्री३=मित्र
श्री४=शत्रु
श्री५=स्वामी
श्री६=गुरु
श्रुा=श्रुत
श्रे.=श्रेष्ठिन्
स=संवत्सर, सरस्वती
सा.=साहू–धू
सा=सदर, सन, सबब, समस्त, समागमे, सयाजीराव, सरकार, संवत्, साष्टांग, साहेब
सिा=सिरस्ता
सु०=सुतेन
सुा=सुद्धा, सुभे, सुमार, सुहूर,

सू०=सूत्र
सू०-सूत्र०=सूत्रधार
सा॑=सहायॆ, सेकिन, सेर, सेवक, सेवेसी
साॅसी=सेवेसी
सौ=सोळुले
सौवती=सौभाग्यवती
सं—सं०—संव.- संवत्,=संवत्सर
सां=साष्टांग, संमत, संवत्
स्नो=स्नेहांकित
स्व.=स्वस्ति
हा=हजरत, हद्द, हवाला, हस्ते
हुा=हुजूर, हुरमुजी
हे=हेमंत
क्ष०=क्षपणक
ज्ञा०=ज्ञातीय, ज्ञाति
ط.=गाझी उद्दीन हैदर (अयोध्या-नबाब)
ح=हैदर किंवा टिपू (म्हैसूर)
علی=मुम्ताझ अली दारोघा (जोधपूर)
ھ—हिजरी
A=सूबा अवध (टां)
P=पाँदिचेरी
T=तेल्लिचेरी
5=$\frac{1}{5}$of a rupee; एका अनोळखी नाण्यावर

---

२. शब्दमूल्यें

विशिष्ट अंकमूल्याचे निदर्शनासाठीं विशिष्ट अक्षर वापरणें ही पद्धत बहुधा प्रत्येक भाषेंत प्रचलित आहे. पण अंकमूल्याचे निदर्शनासाठीं विशिष्ट शब्द वापरणें ही प्रथा मुख्यतः संस्कृतोद्भव व त्यांच्या शेजारच्या अशा भाषांमध्येंच प्रचलित आहे असें वाटतें. ही प्रथा पडण्याचें प्रमुख कारण वृत्तबद्ध ग्रंथरचनेचा प्रयत्न हें असावें. विशेषतः ज्योतिष व गणित या विषयांत संख्यानिदर्शनाचे प्रसंग फार. अशा वेळीं अंकवाचक प्रमाणित शब्द घेऊन इष्ट संख्या कोणत्याही वृत्तांत व्यक्त करणें अत्यंत प्रयासाचें वाटूं लागल्यानें शब्दमूल्यें तयार झालीं. हीं मूल्यें ठरवितांना कित्येक शब्द त्यामुळें व्यक्त होणाऱ्या नैसर्गिक संख्यांचे प्रतिनिधी म्हणून ठरविण्यांत आले. उदा. मनुष्याला व इतर अनेक प्राण्यांना निसर्गतः दोन डोळे असतात ही बाब लक्षांत घेऊन डोळा हा अर्थ असणारे सर्व शब्द दोन ही संख्या दाखविणारे ठरले. पण दुसरे कांहीं शब्द असे आहेत

कीं, त्यांयोगें व्यक्त होणाऱ्या संख्यांविषयीं मतभेद होऊं शकतील. कारण त्यांनीं व्यक्त होणारी कल्पना कृत्रिम असते. उदा. दिशा चारही आहेत, मानल्यास आठही होऊं शकतील आणि दहा धरल्या तरी चुकणार नाहीं. अशा वेळीं दिशा शब्दानें व्यक्त होणारी संख्या कोणती याचा निश्चय संदर्भ व इतर आनुषंगिक पुरावा यांवरून केला पाहिजे. कांहीं शब्दांना मूलतः अनेक अर्थ असल्यानें त्यांपैकीं एखादा शब्द वापरला असल्यास त्याचेंही मूल्य संदर्भानें ठरवावें लागेल. उदा. रंध्र याचीं वाटोळें भोक व शरीरांतील द्वारें या अर्थांनीं शून्य व नऊ अशीं दोन मूल्यें होऊं शकतील. कांहीं शब्दांचे बाबतींत असें आढळून आलें आहे कीं, सामान्यतः त्यांचें जें मूल्य असावें असा तर्क होतो त्याहून निराळें असें त्यांचें मूल्य असतें. उदा. नवनागस्तोत्रावरून अशी कल्पना होते कीं, नाग शब्दाचें मूल्य नऊ असावें. पण संस्कृत ग्रंथांतरीं नाग किंवा सर्प आठ असल्याची कल्पनाच रूढ आहे. एवढेंच नव्हे, तर मला या शब्दाचीं जीं दोन उदाहरणें आढळलीं तेथें त्याचें मूल्य आठ हेंच घ्यावें लागतें. अंकमूल्य दाखविण्यासाठीं कांहीं विशिष्ट शब्दच वापरले पाहिजेत असें नाहीं. लोककल्पना, तत्वज्ञान, इतिहास, पुराण, शास्त्रें इत्यादींत वापरलेल्या शब्दांमध्यें शून्यापासून अनंतापर्यंत कोणतीहि संख्या दाखविण्याचा अर्थ उत्पन्न झाला तर तो किंवा तदर्थवाचक त्याचा पर्याय विशिष्ट संख्या दाखविण्यासाठीं वापरला जाऊं शकतो. उ. दक्षिण, गार्हपत्य व आहवनीय, असे तीन अग्नि असल्याची कल्पना आहे. तेव्हां अग्नि व त्याचे कृशानु, पावक, अनल इत्यादि सर्व पर्यायशब्द तीन ही संख्या दाखविण्यासाठीं वापरले जातात. कित्येकदां असें आढळतें कीं, संख्यावाचक शब्दाच्या विरुद्ध असलेल्या शब्दांसहि प्रथमोक्त शब्दाचें मूल्य दिलेलें असतें. उदा. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे तीन ताप प्रसिद्ध आहेत. मग तीन सुखें कां असूं नयेत? असलींच पाहिजेत. या अंदाजानें सुख शब्दही तीन संख्या दाखविण्यासाठीं वापरूं लागले. उदा. भा. इ. सं. मंडळांतील वैद्यसंग्रह पोथी क्र. २३ मध्ये 'सुखनिधिपुरुषार्थक्ष्मासमाभिः समाभिः परिमितशककाले जातमार्तण्डटीका' अशी पंक्ति आली आहे. पहिल्या सामासिक पदानें १४९३ ही संख्या व्यक्त होते. यामुळें असे सर्व शब्द द्यावयाचे तर पुढें दिलेली यादी अवाढव्यच झाली असती. म्हणून केवळ वारंवार आढळणारे

शब्दच तेथें दिले आहेत. भारतीय ज्योतिषशास्त्र व गणित हे विषय सोडून दिल्यास या शब्दमूल्यांचा जुन्या पोथ्यांशीं विशेष निकटचा संबंध येतो. रचक व लेखक आपण ग्रंथ कोणत्या सालीं, महिन्यांत व तिथीस लिहिला हें अनेकदां अंकांत न सांगतां संख्यादर्शक शब्दांनीं व्यक्त करीत असतात. अशा वेळीं या यादीचा उपयोग करावयाचा आहे. ही यादी वर्णानुक्रम व अंकानुक्रम अशा दोन्ही पद्धतींनीं दिली आहे.

सांकेतिक शब्दांनीं संख्या व्यक्त करण्याची पद्धत फार प्राचीन आहे. वैदिक वाङ्मयांतही अशा प्रकारें कधीं कधीं संख्या व्यक्त केलेल्या आढळतात. उदा. शतपथ आणि तैत्तिरीय ब्राह्मणांमध्यें ४ साठीं कृत, कात्यायन व लाट्यायन श्रौतसूत्रांमध्यें २४ व ४८ यांसाठीं गायत्री व जगती हे शब्द आणि वेदांग-ज्योतिषांत १, ४, ८, १२ व २७ या संख्यांसाठीं अनुक्रमें रूप, अय, गुण, युग आणि भसमूह हे शब्द वापरले आहेत. पिंगलाच्या छंदःसूत्रांमध्यें तर अनेक ठिकाणीं संख्या याच पद्धतीनें दर्शविल्या आहेत. मूल पुलिशसिद्धांत, वराहमिहिराची पंचसिद्धांतिका (इ. ५०५), ब्रह्मगुप्ताचा ब्रह्मस्फुटसिद्धांत (इ. ६२८) व लल्लाचा शिष्यधीवृद्धिद (इ. ६२८ सुमार) या सातव्या शतकाच्या पूर्वीच्या तसेंच नंतरच्या अनेक ज्योतिष-ग्रंथांमध्यें या पद्धतीचें अनुसरण केलें आहे. येवढेंच नव्हे, तर संस्कृतप्रमाणेंच मराठी, हिंदी, गुजराथी, कानडी, तेलगु इत्यादि अनेक आर्य व द्राविडी भाषांतील ग्रन्थकार व लेखक रचना व लेखन अशा दोन्ही प्रकारच्या कालांचा या पद्धतीनें उल्लेख करीत असल्याचें दिसून आलें आहे. मध्ययुगीन ताम्रपट-शिलालेखांतही कधीं कधीं या पद्धतीचा आश्रय केल्याचें आढळतें.*

आतां हीं शब्दमूल्यें कशीं उपयोगांत आणतात याचीं उपर्युक्त दोन उदाहरणें येथें देतों. त्यांवरून यांच्या प्रयोगांची नीट कल्पना येईल. भा. इ. सं. मंडळ परांजपेसंग्रहांतील अष्टाध्यायीसूत्रपाठाच्या एका पोथींत (क्र. ७९) शेवटीं काशीमध्यें भूकंप झाल्याचा एकच उल्लेख दोन निरनिराळ्या वृत्तांतील श्लोकांत दिला आहे. पैकीं पहिला श्लोक असा—

---

* प्रालिमा पृ. १२१.

काश्यां भानौ संवति **स्वर्धृतिस्थे**। शाके **षण्णागांगभूगे** पराह्ने ।।
भूकंपो ऽभूच्छ्रावणे शुक्लपक्षे। तिथ्यामादौ मन्मथे सार्पपाते ।।

येथें, स्वर् = २१ व धृति = १८ असल्यानें संवत् १८२१ निर्दिष्ट आहे आणि षट् = ६, नाग = ८, अंग = ६ व भू = १ असल्यानें शक १६८६ उल्लिखित आहे. दुसरें उदाहरण त्रिवेंद्रम् संस्कृत सीरीजमधील 'आर्यभटीयम्' या ग्रंथांतून घेतलें आहे (क्र. १०१, पृ. ४२). या ग्रंथाच्या टीकेंत वर्तुळ-परिधि व व्यास यांचें नातें सांगतांना एक श्लोक उद्धृत केला आहे तो असा—

विबुधनेत्रगजाहिहुताशनत्रिगुणवेदभवारणबाहवः।
नवनिखर्वमिते वृतिविस्तरे परिधिमानमिदं जगदुर्बुधाः ।।

विबुध = ३३, नेत्र = २, गज = ८, अहि = ८, हुताशन = ३, त्रि = ३, गुण = ३; वेद = ४, भ = २७, वारण = ८, बाहु = २ असल्यानें पहिल्या ओळीवरून २८२७४३३३८८२३३ या संख्येचा बोध होतो.

असो. महत्त्वाचे मूल्यवाचक शब्द असे—

अक्षौहिणी ११	अयन २	इला १
अग ७	अर्थ ५	**ईक्षण २**
अग्नि ३	अवतार १०	ईश ११
अघोष १३	अवस्था ४	ईश्वर ११
अंक ९	अश्व ७	**उडु २७**
अंग ६	अश्विनौ २	उत्कृति २१
अंगुलि १०	अष्टि १६	उर्वरा १
अतिजगती १३	अहि ८	**ऋतु ६**
अतिधृति १९	**आकर ४**	ऋषि ७
अत्यष्टि १७	आकाश ०	**एषणा ३**
अत्रि ७	आय ४	**ओष्ठ २**
अनुष्टुभ् ८	आश्रम ४	**क १**
अब्ज १	आगा १०	ककुभ् १०
अभ्र ०	**इन्द्र १४**	कर २
अय ४	इन्द्रिय ५	कर्ण २

कर्म ३, १०
कलत्र ७
कला १६, ६४
काम १३
काय ६
कारक ६
काल ३
कु १
कुच २
कुटुंब २
कृत ४
कृति २०
कृती २२
केन्द्र ४
कोष्ठ ४
गज ८
गायत्री २४
गुण ३
गुल्फ २
गो १, ९
ग्रह ९
घस्र १५
चंद्र १
छंद ७
छिद्र ९
जगत् ३
जगती ४८
जंघा २

जाति २२
जानु २
जिन २४
तक्ष ८
तत्त्व ५, २५
तनु १
तर्क ६
तान ४९
ताप ३
तिथि १५
त्रिगत ३ ?
तुर्य ४
दन्त ३२
दर्शन ६
दस्र २
दिन १५
दिश्-दिशा ४,१०
दृष्टि २
देव ३३
द्युमणि १२
द्वन्द्व २
द्वार ९
धातु ७
धी ७
धृति १८
नक्षत्र २७
नख २०
नन्द ९

नरक ४०
नाग ८
नायक १
नासत्य २
निधि ९
नृप १६
नेत्र २
पक्ष २, १५
पङ्क्ति १०
पर्व ५
पर्वत ७
पवन ९
पांडव ५
पितामह १
पुर ७
पुरुषार्थ ४
पूर्ण ०
प्रकृति १८, २१
प्राण ५
बंधु ४
बाण ५
बाहु २
भ २७
भक्ति ९
भर्ग ११
भव ११
भू १
भूत ५

भूति ८
भूभृत् (पर्वत) ७
मंगल ८
मनु १४
महादेव ११
महाभूत ५
महायज्ञ ५
मास १२
मासार्ध ६ ?
यम २
यमल २
युग ४
युगुल २
युग्म २
रत्न ५
रन्ध्र ०, ९
रस ६

राग ६
राम ३
रावणशिरस् १०
राशि १२
रिपु ६
रुद्र ११
रूप १
लोक ३, १४
वर्ण ४
वसु ८
वायु ३
वार ७
विकृति २३
विद्या १४
विश्वेदेव १३
वेद ४
वेदांग ६

व्यय १२
शास्त्र ६
शिखिन् ३
शून्य ०
शूलिन् ११
शृंगार १६
समुद्र ४
सर्प ८
सहोदर ३
सिद्ध २४
सिद्धि ८
सुख ३
सूर्य १२
सेना ४
स्वर ७
स्वर्ग २१
हर ११
होतृ ३

०=अभ्र, आकाश, पूर्ण, रंध्र, शून्य. १=अब्ज, आदि, इला, उर्वरा, क, कु, गो, चंद्र, तनु, नायक, पितामह, भू, रूप. २=अयन, अश्विन, ईक्षण, ओष्ठ, कर, कर्ण, कुच, कुटुंब, गुल्फ, जंघा, जानु, दस्र, दृष्टि, द्वंद्व, नासत्य, नेत्र, पक्ष, बाहु, यम, यमल, युगुल, युग्म. ३=अग्नि, एषणा, कर्म, काल, गुण, जगत्, ताप, त्रिगत ?, राम, लोक, वायु, शिखिन् (अग्नि), सहोदर, सुख, होतृ. ४=अय, अवस्था, आकर, आय, आश्रम, कृत, केन्द्र, कोष्ठ, तुर्य, दिश् (दिशा), पुरुषार्थ, बंधु, युग, वर्ण, वेद, समुद्र, सेना. ५ = अर्थ, इंद्रिय, तत्व, पर्व, पांडव, प्राण, बाण, भूत, महाभूत, महायज्ञ, रत्न. ६ = अंग, ऋतु, काय, कारक, तर्क, दर्शन, मासार्ध ?, रस, राग, रिपु, वेदांग, शास्त्र. ७ = अग, अत्रि, अश्व, ऋषि, कलत्र, छंद, धातु, धी, पर्वत, भूभृत्, वार,

स्वर, पुर. ८ = अनुष्टुभ् , अहि, गज, तक्ष, नाग, भूति, मंगल, वसु, सर्प, सिद्धि. ९ = अंक, गो, ग्रह, छिद्र, द्वार, नंद, निधि, पवन, भक्ति, रंध्र. १० = अंगुलि, अवतार, आशा, ककुभ्, कर्मन् , दिशा, पंक्ति, रावणशिरस्. ११ = अक्षौहिणी, ईश, ईश्वर, भर्ग, भव, महादेव, रुद्र, शूलिन् , हर. १२ = द्युमणि, मास, राशि, व्यय, सूर्य. १३ = अघोष, अतिजगती, काम, विश्वे देवाः. १४ = इंद्र, मनु, लोक, विद्या. १५ = घस्र, तिथि, दिन, पक्ष. १६ = अष्टि, कला, नृप, शृंगार. १७ = अत्यष्टि. १८ = धृति, प्रकृति. १९= अतिधृति. २० = कृति, नख. २१ = उत्कृति, प्रकृति, स्वर्ग. २२ =कृती, जाति. २३ = विकृति. २४ = गायत्री, जिन, सिद्ध. २५ = तत्व. २७ = उडु, नक्षत्र, भ. ३२ = दंत. ३३ = देव. ४० = नरक. ४८ = जगती. ४९ = तान. ६४ = कला.

---

३. अक्षरमूल्यें

ज्योतिष व गणित या विषयांवरील ग्रन्थांमध्यें एकसारखा संख्या सांगण्याचा प्रसंग येतो. सांकेतिक शब्दांनीं संख्या व्यक्त करण्याची पद्धतही अशा कित्येक प्रसंगीं त्रासदायक व लांबट असल्याचें प्रत्ययास येऊं लागलें. म्हणून एकेरी व संयुक्त वर्णांनीं संख्या दाखविण्याची युक्ति उपयोगांत आणली गेली. हिचा प्रथम प्रयोग पहिल्या आर्यभटाच्या आर्यभटीय अथवा आर्यसिद्धांत (इ. ४९९) ग्रंथांत केलेला आढळतो. हिचें स्वरूप असें—

क् = १, ख् = २, ग् = ३, घ् = ४, ङ् = ५, च् = ६, छ् = ७, ज् = ८, झ् = ९, ञ् = १०, ट् = ११, ठ् = १२, ड् = १३, ढ् = १४, ण् = १५, त् = १६, थ् = १७, द् = १८, ध् = १९, न् = २०. प् = २१, फ् = २२, ब् = २३, भ् = २४, म् = २५, य् = ३०, र् = ४०, ल् = ५०, व् = ६०, श् = ७० ष् = ८०, स् = ९०, ह् = १००, अ–आ = १, इ–ई = १००, उ–ऊ = १००००, ऋ–ॠ = १००००००, ऌ = १००००००००, ए = १०००००००००००, ऐ = १००००००००००००००, ओ = १००००००००००००००००, औ = १०००००००००००००००००००.

या पद्धतीनें संख्या दाखवितांना स्वरयुक्त साधें व्यंजन आल्यास दोघांचा गुणाकार करावयाचा असतो. जसें–च = च् × अ = ६ × १ = ६; गि = ग् × इ = ३ × १०० = ३००. स्वरयुक्त संयुक्त व्यंजन आल्यास प्रत्येक व्यंजनास स्वरानें गुणून आलेल्या गुणाकाराची बेरीज करावयाची असते. जसें–ख्यु = ख् × उ + य् × उ = उ (ख् + य्) = १०००० (२ + ३०) = ३२००००. पण ऌ या अक्षराचें निदान सध्याचें स्वरूप असें आहे कीं, हें अक्षर केवळ स्वरही होऊं शकेल व ल् + ऋ ही होऊं शकेल. यामुळें याचीं नेहमींच दोन मूल्यें होतील. पैकीं कोणतें कोठें घ्यावयाचें हें संदर्भावरून ठरवावें लागेल.

अक्षरांनीं संख्या दाखविण्याची आणखी एक पद्धत दुसऱ्या आर्यभटानें (११ वें शतक) दिली आहे ती अशी—

१	२	३	४	५	६	७	८	९	०
क्	ख्	ग्	घ्	ङ्	च्	छ्	ज्	झ्	ञ्
ट्	ठ्	ड्	ढ्	ण्	त्	थ्	द्	ध्	न्
प्	फ्	ब्	भ्	म्					
य्	र्	ल्	व्	श्	ष्	स्	ह्	ळ्	

या पद्धतींत स्वर निरर्थक अथवा शून्यवाचक असतो. संयुक्त व्यंजनांतील प्रत्येक व्यंजन एकेक स्वतंत्र अंक दाखवितें. संस्कृतमध्यें सामान्यतः 'अंकानां वामतो गतिः' अशी पद्धति आहे. म्हणजे प्रथम एकम्, नंतर दहम, तदनंतर शतम् अशा क्रमानें संख्येंतील आकडे सांगितले जातात. पण येथें सर्वोच्च स्थानापासून सर्वाधम स्थानाकडे आकडे सांगत जावयाचें असतें. कधीं कधीं शिलालेख-ताम्रपट व पोथ्या-पुस्तकें यांतून या पद्धतीनें काल सांगितलेला आढळतो; पण फरक असा कीं, 'अंकानां वामतो गतिः' या सूत्रानुसार अंकक्रम घ्यावयाचा असतो आणि संयुक्त व्यंजनांतील फक्त अंत्य व्यंजन अंकनिदर्शक असतें. याशिवाय मलबार व तेलंगण या प्रदेशांत पोथ्यांच्या पानांची संख्या दाखविण्यासाठीं आणखी एका पद्धतीचा उपयोग केलेला आढळतो. हीमध्यें १-३४ अंकांसाठीं क–ळ, ३५–६८ साठी का–ळा, ६९–१०२ साठी कि–ळि, १०३–१३६ साठीं की–ळी अशा क्रमानें संख्यांसाठीं बाराखड्यांचीं अक्षरें

वापरतात. ब्रह्मदेशांतील पोथ्यांमध्यें क–कः, ख–खः, ग–गः, इत्यादि बाराखड्यांनीं अनुक्रमें १-१२, १३–२४, २५–३६, इत्यादि संख्या दाखविण्याची पद्धति आहे. सीलोनमध्यें ऋ, ॠ, ऌ, ॡ या स्वरांचा समावेश करून प्रत्येक बाराखडी सोळा अक्षरांची करीत व क-कः, ख-खः, ग-गः, इत्यादि सोळाखड्यांनीं १-१६, १७-३२, ३३-४८ इत्यादि संख्या दाखविल्या जात. सर्व सोळाखड्या संपल्यावर २क-२ कः अशा तऱ्हेनें पुढील संख्या दाखवीत.*

अक्षरांनीं संख्यानिर्देश करण्याची पद्धत पुष्कळ प्राचीन आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्यें 'स्वरितेनाधिकारः' (१।३।११) असें सूत्र आहे. याचें तात्पर्य असें आहे कीं, एखाद्या सूत्रांतील एखाद्या शब्दाची पुढील एक किंवा अधिक सूत्रांत अनुवृत्ति असेल तर तन्निदर्शनासाठीं त्या शब्दाचा स्वरित उच्चार करावा. येवढ्यानें त्या सूत्राची अनुवृत्ति असणाऱ्या सूत्रांची संख्या निश्चित होत नाहीं. पण या सूत्रावरील कात्यायनाचीं वार्तिकें व कैयटानें दिलेलीं उदाहरणें यांवरुन असें सिद्ध होऊं पहातें कीं, अनुवृत्त सूत्रांची संख्या दाखविण्यासाठीं माहेश्वरसूत्रांतील वर्णांचा उपयोग करीत आणि उपर्युक्त वर्णांचा माहेश्वरसूत्रांतील अनुक्रमांक अनुवृत्त सूत्रांची संख्या दाखवीत असे. उदाहरणार्थ–एखाद्या सूत्रावर ऐ अक्षर घातलें असल्यास, ऐचें अष्टाध्यायींतील माहेश्वरसूत्रांत आठवें स्थान असल्यानें त्या सूत्राची अनुवृत्ति पुढील आठ सूत्रांत आहे असें समजत.†

संस्कृतादि भाषांप्रमाणें अरबी-फार्सी भाषांमध्येंही अक्षरांनीं संख्या दाखविण्याची पद्धत आहे तीस अब्जद किंवा हिसाब-इ-जुम्मल पद्धत म्हणतात. हीमध्यें वाढत्या संख्या दाखविण्यासाठीं घेतलेल्या अक्षरांचा क्रम पाहिला तर असें वाटतें कीं, हिची घडण फार प्राचीन काळीं झाली असली पाहिजे. कारण हीमधील अक्षरांचा क्रम सध्याच्या क्रमाहून भिन्न आहे. पहिल्या बावीस अक्षरांपर्यंत तो हिब्रू व फिनिशियन वर्णमालेंतील अक्षरांशीं जुळता आहे. अक्षरमूल्यें लक्षांत रहावीं म्हणून त्यांचे शब्द बनविले आहेत ते असे—

---

* प्रालिमा १२१-१२४, भारतीय ज्योतिःशास्त्र पृ. १९१, २३२

† प्रालिमा पृ. १२४ व ७ टीप ५

अबजद	हवझ	हतय	कलमन	सअफस
अ, ब्, ज्, द्	ह, व्, झ	ह, त, य्	क्, ल्, म्, न्	स, अ, फ, स्
ا, ب, ج, د	ه, و, ز	ح, ط, ی	ک, ل, م, ن	س, ع, ف, ص
१, २, ३, ४	५, ६, ७	८, ९, १०	२०, ३०, ४०, ५०	६०, ७०, ८०, ९०

क़्, र्, श्, त्	स्, ख्, ज़	ज, ज़, घ्
ق, ر, ش, ت	ث, خ, ذ	ض, ظ, غ
१००, २००, ३००, ४००	५००, ६००, ७००	८००, ९००, १०००

पश्चिम आफ्रिकेंतील अरब (१) सीन् (२) साद् (३) शीन् व (४) घय्न् यांच्या ठिकाणीं अनुक्रमें (१) साद् (२) जाद (३) सीन् व (४) शीन् हीं अक्षरें ठेवतात. यामुळें त्यांच्या हिशेबांत साद् = ६०, जाद् = ९०, सीन् = ३००, शीन् = १००० व घय्न् = ८०० अशा किंमती होतात.

या पद्धतीचा उपयोग मुख्यतः अरबी-फार्सी शिलालेख व ऐतिहासिक पुस्तकें यांमध्यें एखाद्या प्रसंगाचा काल सांगावयाचा असला म्हणजे एक शब्द, शब्दसमूह किंवा वाक्य योजून करतात. अशा वेळीं त्यांतील प्रत्येक अक्षराची किंमत घेऊन त्यांची बेरीज केली असतां इष्ट काल (साल) येतो. एखाद्या अक्षरास द्वित्व असलें तरी हिशेबासाठीं एकच अक्षर धरतात. अशा तऱ्हेचे बहुतेक कालनिर्देश बिनचूक असले तरी कित्येक ठिकाणीं अनुरूप अक्षरांचे शब्द न सांपडल्यानें या निर्देशांतून चुकीचीं सालें निघतात व घोटाळा उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, काफीखान नांवाच्या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें आपल्या मुन्तखबुल्लुबाब नांवाच्या ग्रंथांत शिवाजीच्या मरणाचें साल 'काफिर बजहन्नम् रफ्त' या वाक्यानें व्यक्त केलें आहे. या वाक्यांतील अक्षरांची किंमत अब्जद पद्धतीनें १०९१ येते. हें हिजरी साल धरावें तर शिवाजी हि. १०८१ मध्यें मेला हें निश्चित आहे. हि. १०८१ शीं जुळतें शुहूर साल १०९१ येतें. पण काफीखान सर्वत्र हिजरी सन वापरत असल्यानें येथेंच फक्त सुहूर साल वापरील असें संभवत नाहीं. तेव्हां येथील प्रयोग चुकीचाच समजला पाहिजे. अशाच तऱ्हेच्या आणखी अचूक व चुकीच्या उल्लेखांसाठीं शिवचरित्र-वृत्तसंग्रह खंड २, पृ. ३४ व टीप क्र. १ हे संदर्भ पहावे.

हीखेरीज टिपूनें आणखी एक नवीनच पद्धति सुरू केली होती. तीमध्यें अरबी वर्णमालेचीं अक्षरें क्रमानें घेऊन त्यांस १–९, १०–९०, १०० ते ९००

व १००० अशा किंमती दिल्या होत्या. हींमधील पहिलीं चार अक्षरें ا ب ت ث अलिफ्, बे, ते, से हीं असल्यानें हीस अब्तस पद्धति म्हणतात. हिच्या अधिक विवेचनासाठीं कालगणना हें प्रकरण पहावें. येथें फक्त अब्तस व अब्जद या दोन्ही पद्धतींत अक्षरमूल्यांमध्यें असणारा फरक ध्यानांत यावा म्हणून दोन्ही एकाखालीं एक मांडून दाखवितों.

अलिफ्	बे	ते	से	जीम्-जे	हय्	खय्	दाल्	जाल्
ا	ب	ت	ث	ج	ح	خ	د	ذ
१	२	३	४	५	६	७	८	९
१	२	४००	५००	३	८	६००	४	७००
रे	झे	सीन्	शीन्	साद	ज़ाद्	तोय्	जोय्	अय्न्
ر	ز	س	ش	ص	ض	ط	ظ	ع
१०	२०	३०	४०	५०	६०	७०	८०	९०
२००	७	६०	३००	९०	८००	९	९००	७०
घय्न्	फे	कॉफ्	काफ्	लाम्	मीम्	नून्	वाव्	हे
غ	ف	ق	ک	ل	م	ن	و	ه
१००	२००	३००	४००	५००	६००	७००	८००	९००
१०००	८०	१००	२०	३०	४०	५०	६	५

याय्-ये

ی

१०००

१०

नागरी वर्णानुक्रमानें हीं अक्षरमूल्यें मांडून दाखवितां येतात तीं अशीं—

अक्षरनाम	अक्षर	अब्जद मूल्य	अब्तस मूल्य	अक्षरनाम	अक्षर	अब्जद मूल्य	अब्तस मूल्य
अलिफ्	ا	१	१	खय्	خ	६००	७
अय्न्	ع	७०	९०	गाफ्-काफ्	گ	२०	४००
काफ्-गाफ्	ک	२०	४००	घय्न्	غ	१०००	१००
कॉफ्	ق	१००	३००	चीम्-चे = जीम्-जे	چ	३	५

अक्षरनाम	अक्षर	अब्जद मूल्य	अब्तस मूल्य	अक्षरनाम	अक्षर	अब्जद मूल्य	अब्तस मूल्य
जा, जोय्	ظ	९००	८०	बे = पे	ب	२	२
ज़ाद्	ض	८००	६०	मीम्	م	४०	६००
ज़ाल्	ذ	७००	९	याय्, ये	ي	१०	१०००
जीम्-जे = चीम्-चे	ج	३	५	रे	ر	२००	१०
				लाम्	ل	३०	५००
झे-झे	ز	७	२०	वाव्	و	६	८००
ता-तोय्	ط	९	७०	शीन्	ش	३००	४०
ते	ت	४००	३	साद्	ص	९०	५०
दाल्	د	४	८	सीन्	س	६०	३०
नून्	ن	५०	७००	से़	ث	५००	४
पे = बे	ب	२	२	हय्	ح	८	६
फा-फे	ف	८०	२००	हे	ه	५	९००

संस्कृतादि, अरबी व फार्सी भाषांप्रमाणें प्राचीन व अर्वाचीन युरोपीय भाषांमध्येंही अक्षरांनीं संख्यानिर्देश करण्याची पद्धत चालू होती व सध्या आहे. घड्याळाच्या तबकडीवर तासांची संख्या, पुस्तकांत ग्रंथगर्भाशिवाय प्रस्ताव, विषयप्रवेश, अनुक्रमणिका इत्यादींनीं व्यापलेल्या पृष्ठांचा क्रम, जुन्या छापील पुस्तकांत मुख्यतः छपाईचें साल, प्रतिमापत्रांचा क्रम इत्यादि व्यक्त करण्यासाठीं अक्षरांचा उपयोग करतात. ही पद्धति अजूनहि प्रचारांत आहे आणि भारतीय इतिहास-संशोधनांत हिचा फारसा उपयोग नाहीं. म्हणून हिजविषयीं अधिक विवेचन न करतां हिचें स्वरूप मात्र येथें देतों.

१, २, ३, ४ ५, ६, ७, ८, ९, १०, ११,
I, II, III, IIII–IV, V, VI, VII, VIII, IX, X, XI,
१४, १९, २०, ३०, ४०, ५०, ६०, ९०, १००, २००, ४००,
XIV, XIX, XX, XXX, XL, L, LX, XC, C, CC, CD,
६००, ९००, १०००
DC, CM, M.

४. मंगल व शापाशीर्वाद वचनें

निरनिराळ्या राजकुलांचे, विविध देवता, महंत, ब्राह्मण, सरदार, इत्यादींस उद्देशून दिलेले, अलगअलग धर्मसंबद्ध ताम्रपट-शिलालेख तपासले तर असें आढळतें कीं, अनेकांत आरंभीं एखादें सर्वसामान्य असें मंगलार्थक व शेवटीं बरींच शापाशीर्वादात्मक वचनें असतात. हीं वचनें कधीं गद्य, कधीं पद्य, तर कधीं कधीं गद्य-पद्य मिश्रित असतात. हीं ठाऊक असल्याचा सर्वांत मोठा फायदा हा कीं, यांचे योगानें ताम्रपट-शिलालेखांची लिपी उलगडण्यास मदत होते. मीं तर अनेक प्रसंगीं प्रथम ह्या वचनांची लिपी आत्मसात् करून मग पूर्ण लेख वाचण्याचा प्रयत्न केला आणि प्रत्येक वेळीं मला या पद्धतीचा फार फायदा झाला. यासाठीं अशीं सर्व वचनें पुढें देत आहे.

ह्या वचनांविषयीं पुढील विशेष अवश्य ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.

हे श्लोक शेकडों ताम्रपट-शिलालेखांतून आल्यामुळें यांत पाठभेद पुष्कळ उत्पन्न झाले आहेत. ताम्रपट-शिलालेख जों जों अर्वाचीन तों तों त्यांमध्यें अशा श्लोकांची संख्या सामान्यतः अधिक अधिक आढळते. मात्र अगदीं अर्वाचीन लेखांत ही संख्या पुनः कमी झालेली असते. हे श्लोक वाटतात तितके अर्वाचीन नाहींत. यांतील कित्येक श्लोक निर-निराळ्या स्मृतिग्रंथांतून आणि अत्यंत प्राचीन अशा इतर ग्रंथांत आढळून आले आहेत. ग्रंथाच्या कालाविषयीं पुष्कळदां माहिती नसते किंवा त्याविषयीं मतभेद होऊं शकतो. पण ताम्रपट-शिलालेखांच्या काळांत मतभेद होण्याचे फारसे प्रसंग येत नाहींत. यामुळें या श्लोकांचें अस्तित्व किती प्राचीन आहे हें तर ठरतेंच; पण ज्या ग्रंथांतून हे श्लोक आढळतील त्यांच्या कालनिश्चयासही या श्लोकांमुळें मदत होण्यासारखी आहे.

लेख कोणत्याहि भाषेंत व लिपींत असला तरी त्यांत यांतील एखादा श्लोक तरी सांपडल्याशिवाय राहणार नाहीं. फक्त लेखास दानपत्राचें स्वरूप असलें पाहिजे. प्रशस्तींमधून मात्र हे श्लोक सहसा आढळावयाचे नाहींत. ज्यांत ह्यांपैकीं एखादाहि श्लोक नाहीं, अशीं दानपत्रें फार थोडीं आहेत.

दानपत्र संस्कृतेतर भाषेंत असेल तर या श्लोकांखेरीज त्या भाषेंत लिहिलेला

व शापाशीर्वादस्वरूपाचा असा कांहीं मजकूर त्यांत आढळतो. पैकीं महाराष्ट्रांत कानडी लेखही मिळत असल्यानें कांहीं कानडी लेखांतील मजकूर येथें दिला आहे. पण तो संस्कृत श्लोकांच्या मानानें निःशेष मुळींच नाहीं; येवढेंच नव्हे, तर तो केवळ नमुन्यादाखलच समजावा.

बहुधा याच उद्देशानें पूर्वी दोनदा या श्लोकांच्या एकत्रीकरणाचा प्रयत्न केला गेला. पैकीं एकाचें फलित रा. ए. सो.च्या एका अंकांत दिलें असून दुसरा प्रयत्न श्री. म. म. पां. वा. काणे यांनीं आपल्या हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र खंड २ च्या परिशिष्टांत दिला आहे. दोन्ही प्रयत्नांत सामान्यतः ४०।४५ श्लोक दिले आहेत. मीं जमविलेल्या श्लोकांची संख्या जवळ जवळ २०० आहे. तरीहि आतां हे सर्व श्लोक संपले असें म्हणतां यावयाचें नाहीं. मी मुख्यतः एपिग्राफिया इंडिकाचे उपलब्ध २६ खंड तपासून मिळालेले श्लोक येथें दिले आहेत. ताम्रपटशिलालेखांचीं इतर पुस्तकें चाळलीं असतां निदान आणखी पन्नास तरी श्लोक सांपडावे असा अदमास आहे.

हे श्लोक संदर्भ व काल यांसह येथें देतों तर तें अधिक बरें झालें असतें यांत संशय नाहीं. पण एक तर हे गोळा करितांना ताम्रशिला-शासनें वाचण्यास मदत व्हावी हा एकच उद्देश डोळ्यापुढें ठेविल्यानें संदर्भ व काल यांकडे दुर्लक्ष झालें. शिवाय संदर्भ टिपणें जेवढें सोपें तेवढें एखाद्या श्लोकाचा प्राचीनतम कालनिर्देश देणें सोपें नाहीं. त्यासाठीं प्रत्येक श्लोकापुढें ४००।५०० लेखांचे काल टिपावे लागले असते व या कामीं त्याच्या महत्त्वाच्या मानानें अधिक वेळ गेला असता. म्हणून हे श्लोक देतांना वरील दोन्ही तपशील गाळले आहेत.

या श्लोकांतील पाठभेद ठाऊक असण्यानें लेखवाचनास मदत होईल हें निश्चित. पण एक तर हे श्लोक वेदवाक्यांप्रमाणें महत्त्वाचे नसल्यानें यांत शेंकडों कमीअधिक अर्थवाही व अर्थ बदलणारे असे पाठ उत्पन्न झाले आहेत. ते सर्व येथें देण्याचा विचार करतों तर या पुस्तकाचीं सुमारें सध्याच्या दुप्पट पानें या श्लोकांनींच व्यापिलीं असतीं व याहून महत्त्वाचे विषय बाजूस ठेवावे लागले असते. शिवाय असे पाठ देण्यांत कालाच्या व्ययाचे मानानें फायदा फार कमी; म्हणून बहुधा पाठभेद देण्याचे भरीस पडलों नाहीं. तरीही जे श्लोक वारंवार येतात व म्हणून ज्यांचे पाठभेदहि वारंवार येतात ते येथें नमूद केले आहेत.

या प्रकरणांतील बहुतेक श्लोक अनुष्टुभ् वृत्तांतील आहेत. हें वृत्त अतिशय सोपें व सर्वांत कमी बंधनांचें असल्यानें यांत कविता रचणें जसें सोपें आहे त्याप्रमाणें शेंकडों पाठभेद उत्पन्न होणेंहि साहजिक. हे पाठभेद पादपूरणार्थक अव्ययें, वचनें, पदें, समानार्थक किंवा भिन्नार्थक पण एकरूप घडणीचे किंवा समान मात्रासंख्या असलेले अथवा एकविध गणांचे शब्द इत्यादींचा मनसोक्त उपयोग केल्यानें झाले आहेत. हे पाठभेद समजून घेणें मनोरंजक असलें तरी विशेष लाभकारक नाहीं. विशिष्ट पाठावरून तो पाठ असलेला लेख कोणत्या कुलाचा व केव्हांचा असूं शकेल याचा ढोबळ मानानें पत्ता लागण्याची शक्यता मात्र पुष्कळ ठिकाणीं असते.

कांहीं श्लोकांचे बाबतींत असें आढळून आलें कीं, कधीं चरणांश, कधीं पूर्ण चरण तर कधीं द्विपदी (अर्धी कविता) यांची उलटापालट झालेली असते. चरण किंवा चरणांश यांचे विपर्यय नोंदतां आले नाहींत; पण पाठ स्वीकारतांना बाहुल्यानें आढळलेला क्रम घेतला आहे. कधीं अनेक श्लोकांत दोन चरण सामान्य असतात. त्यांचा समावेश येथें स्वतंत्रतेनें केला आहे.

कांहीं श्लोक वारंवार न आढळल्यानें त्यांत सुधारणा झाली नाहीं व सरस पाठ देतां आले नाहींत किंवा श्लोक पूर्ण करतां आले नाहींत. अधिक अवलोकनानें कदाचित् दोन्ही दोष नाहींसे झाले असते. पण अवलोकनास मर्यादा नाहीं. तेव्हां विशिष्ट कामानंतर अवलोकन थांबविलें. त्यामुळें दोष राहिले.

अकरस्य करीकरणं गोसहस्रवधः स्मृतः ।
करप्रवृत्तिविच्छेदाद्गोकोटिफलमश्नुते ॥
अग्निष्टोमप्रभृतिभिरिष्ट्वा यज्ञैः सदक्षिणैः ।
न तत्फलमवाप्नोति भूमिदानाद्यदश्नुते ॥
अग्निष्टोमादिभिर्यज्ञैरिष्ट्वा विपुलदक्षिणैः ।
न तत्फलमवाप्नोति यद्दत्त्वा वसुधां नृप ॥

अग्नेरपत्यं [1]प्रथमं सुवर्णं [2]भूर्वैष्णवी [3]सूर्यसुताश्च गावः ।
(३) लोकत्रयं तेन [4]भवेद्धि दत्तं यः कांचनं गां च महीं च [5]दद्यात् ॥

[(३) दत्तास्त्रयस्तेन भवन्ति लोकाः १ प्रथितं २ भूरौषधीः ३ भूमि ४ भवेच्च-भवेत्तु-भवेत्स ५ प्रदद्यात्]

अथैव यदि लोप्तास्य शतधा पापभाजनम् ।
पालने हि परो धर्मो हरणे पातकं महत् ।।

अद्भिर्दत्तं त्रिभिर्भुक्तं सद्भि-षड्भि-श्च परिपालितम् ।
एतानि न निवर्तन्ते पूर्वराजकृतानि च ॥

अनुचिन्त्य श्रियं जीर्ण्यं पद्मपत्राणुबिन्दुवत् ।
बुद्ध्वाऽत्रोदाहृतं सर्वं न लोप्याः परकीर्तयः ।।

अन्यदत्तमथवा स्वयं कृतं ब्रह्मदायमिह यस्तु पालयेत् ।
आत्मवंशमखिलं समुद्धरेत्कीर्तिमानिह परत्र पार्थिवः ॥

अन्यायेन हृता भूमिरन्यायेन तु हारिता ।
हरतो हारयतश्च दहत्या-स हन्यात्-सप्तमं कुलम् ।।

अन्यैस्तु छर्दितं भद्रेऽस्वभिश्च छर्दितं न तु ।
ततः कष्टस्ततो नीचः स्वयं दत्तापहारकः ।।

अन्योऽन्यवंशजः कोऽपि यो राजा तु भविष्यति ।
तस्याहं करतले लग्नो मया दत्तं न चालयेत् ॥

अपि गङ्गादितीर्थेषु हन्तुर्गामथवा द्विजम् ।
निष्कृतिः स्यान्न देवस्वब्रह्मस्वहरणे नृणाम् ।।

अपि हस्तमितां भूमिं यो विप्राय प्रयच्छति ।
षष्टिं वर्षसहस्राणि स्वर्गे लोके महीयते ॥

असारेऽपि च संसार जीवितस्य फलद्वयम् ।
पालनं परकीर्तीनां स्वयं कर्तृत्वमेव च ॥

अस्मत्कुलक्रमगताः समुदाहरन्ति । अन्यैश्च दानमिदमप्यनुमोदनीयम् ।
लक्ष्मीश्चला सलिलबुद्बुदवद्धरायां । दानं फलं परमतः प्रतिपालनीयम् ।

अस्मत्कुलं[1]परमुदारमुदाहरद्भिरन्यैश्च दानमिदमत्र[2] तु[3] मोदनीयम् ।
लक्ष्म्यास्तडित्सलिलबुद्बुदचञ्चलाया दानं फलं परयशः प्रतिपालनं च ।।

[१ कुलक्रम २ मिदमभ्यनुमोदनीयम् ३ नु]

अस्मत्कुले यो भविता नरेन्द्रः पुष्पैरसूत्रग्रथितैः स दृष्टः ।
मच्छासनादित्थमिदं भवद्भिर्वाच्यं स्वधर्मं प्रतिपालयेति ।।

अस्मदन्वयजा भूपा भाविभूपतयश्च ये ।
तेषामहं करे लग्नः पालनीयमिदं सदा ॥
अस्मद्वंशजभूपतिर्यदि पुनर्भूपोऽन्यवंशोद्भवो ।
मद्दत्तां परिपालयेदिहमहों तस्मै धृतोऽस्म्यञ्जलिम् ।
यो वा लोभवशाच्च पापहृदयात्क्रोधाच्च मच्छासने ।
व्याघातं कुरुते भवेत्स नियतं निःसंततिः किल्बिषी ॥

(१) [१]अस्मद्वंशे परिक्षीणे (२) यः कश्चिन्नृपतिर्भवेत् ।
(३) [२]तस्याहं [३]पादलग्नोऽस्मि (४) मम दत्तानुपालनात् ॥

[(१) अस्मद्वंशे यदा क्षीणे-व्यतिक्रान्ते, मयि राज्ञि व्यतिक्रान्ते, अस्मिन्वंशे द्विजघ्नोऽपि, मम वंशे क्षतिक्षीणे (२) यः कोऽपि-यश्चान्यो-नृपतिर्भवेत्, योऽन्यः कोऽपि-योऽन्यो राजा-कोऽपि राजा-भविष्यति (३) तस्य दासस्य दासोऽहं (४) शासनं न व्यतिक्रमेत्, न लोप्यं मम शासनम्, मम कीर्तिं न लोपयेत् १ अस्मिन् २ तस्यापि ३ कर-रे-हस्त-लग्नोऽ-हं-स्मि]

अस्मान्प्रतिस्फुरति यश्च विचारणीयाम् । दानान्महानतिशयः परिपालने च ।
--‿-‿‿‿-‿ मथो न किंचित् । --‿ पालनमपालनमाहुरेनः ॥

अहं राघव मार्कण्डः सप्तकल्पानुजीवकः ।
न श्रुतो न मया दृष्टः स्वयंदत्तापहारकः ॥

आगामिनोऽपि नृपतीन्निजतीर्थयुक्तान् । सर्वानधीच्छति वदत्यनुशास्ति चापि ।
अस्मान्समीक्ष्य हरणे च निशम्य दोषम् । दानं भवद्भिरनुपाल्यमिदं सदैव ॥
आगामिभूमिपतिभिः परिरक्ष्य एष । धर्मप्रति प्रतिनिविष्टतमैस्तथान्यैः ।
लक्ष्म्यास्तडित्तुलितबुद्बुदचञ्चलायाः । दानं फलं परयशः प्रतिपालनं च ॥

आचन्द्रार्कमिदं भोज्यमेभिरेषां च वंशजैः ।
(३,४) वसद्भिरेव भोक्तव्यं न चादेयं कदाचन ॥
[(३,४) नादेयं न च विक्रेयं सदा सन्मार्गवर्तिभिः ।]

आज्ञप्तिरस्य धर्मस्य निर्मलो धर्मसंग्रहः ।
बुधमानमले काश्चित्पुण्यवित्तो नरोत्तमः ॥
आदित्यचन्द्रावनिलोऽनलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।
अहश्च रात्रिश्च उभे च सन्ध्ये धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम् ॥

आदित्या इव दीप्यन्ते तेजसा दिवि मानवाः ।
ये प्रयच्छन्ति वसुधां ब्राह्मणायाहिताग्नये ।।

आदित्यो वरुणो [१]वायुर्ब्रह्मा [२]विष्णुर्हुताशनः ।
(३,४) भगवाञ्शूलपाणिश्च अभिनन्दन्ति भूमिदम् ॥
[(३,४) शूलपाणिश्च भगवानभिनन्दन्ति भूमिदम् १ विष्णु २ सोमो]

आयुः पुत्रा धनं सौख्यं सौभाग्यं राज्यमक्षयम् ।
आभिश्रेष्ठ्यं यशः स्वर्गं भूमिदो लभते फलम् ॥

(१) [१]आस्फोटयन्ति [२]पितरः (२) प्रवल्गन्ति पितामहाः ।
(३) [३]भूमिदो ऽस्मत्कुले जातः (४) स नस्त्राता भविष्यति ॥

[(१) नृत्यन्ति पितरस्तस्य (२) प्रनृत्यन्ति पितामहाः (३,४) अपि नः स कुले जातो यस्तटाकं करिष्यति (४) स नः–सोऽस्मान्–संतारयिष्यति १ आनन्दन्ति, आस्फालयन्ति २ पितरो वल्गयन्ति ३ भूमिदाता]

इति कमलदलाम्बुबिन्दुलोलां श्रियमनुचिन्त्य मनुष्यजीवितं च।
(३) अतिविमलमनोभिरात्मनीनैर्न हि पुरुषैः परकीर्तयो विलोप्याः॥
[(३) सकलमिदमुदाहृतं च बुद्ध्वा]

इति ज्ञात्वा परैर्भूपैरस्मद्वंशोद्भवैस्तथा ।
धर्मोऽयमिह नो लोप्यो यैः कैश्चिद्धर्मचिंतकैः ।।

इतःपरं न कार्योऽस्य ग्रामस्योपद्रवो नरैः ।
लोभादुपद्रवं तस्य कुर्याद्यः स नराधमः ।।

इष्टं दत्तं हुतं चैव यत्किंचिद्धर्मसंज्ञितम् ।
अर्धांगुलेन सीमाया हरणेन प्रणश्यति ।।

ऋणहर्ता भूमिहर्ता हारयिता [१]हि ते त्रयः ।
(३,४) एते च नरकं यान्ति यावदिन्द्राश्चतुर्दश ॥
[(३,४) नरकान्न निवर्तन्ते यावदाभूतसंप्लवम् १ च]

एकविंशतिकुलान्याहुः कष्टं हि नरके स्थितम् ।
भूमिदानेन मात्रेणो (४) र्ध्वं यान्ति मृता दिवि ।।
[(४) त्वचैवाहिर्विमुच्यते]

एकैव भगिनी लोके सर्वेषामेव भूभुजाम् ।
न भोज्या न करग्राह्या विप्र-देव-दत्ता वसुंधरा ॥

एवं भीमपराक्रमो नरपतिर्ब्रूते विविच्य स्वयम् ।
---◡◡-◡- वहिकलौ --◡--◡वः ।
दातुं नोत्सहते मनो यदि तदाप्यन्यैर्यदस्मादृशैः ।
दत्तं-◡◡-◡- सुकृतिनः --◡--◡- ॥

कर्मणा मनसा वाचा कर्तव्यं प्राणिभिर्हितम् ।
हर्षेणैतत्समाख्यातं धर्मार्जनमनुत्तमम् ॥

कर्मणा मनसा वाचा यः समर्थोऽप्युपेक्षते ।
सभ्यस्तथैव-सस्यात्तदैव चांडालः सर्वधर्मबहिष्कृतः ॥

कल्पकोटिसहस्राणि कल्पकोटिशतानि च ।
निवसेत्ब्रह्मणो लोके भूमिदानं ददाति यः ॥

किं सूर्यस्तीव्रतापो दहति शशिकला पावकोऽतिज्वलन्ते ।
नो रूढं भूमिसस्यं न वसति विषये माधवश्चाल्पवृष्टिः ।
किं गोषु क्षीरमल्पं शुश (ष्य) ति सरिसरो जीवलोके न वृद्धिः ।
यत्रायं भूमिहर्त्ता वसति परिजने तस्य चिन्हा-निमा-न्यमू-नि ॥

कुलानि तारयेत् कर्ता सप्त सप्त च सप्त च ।
अधो-ऽधः-ऽव- पातयेद्धर्ता सप्त सप्त च सप्त च ॥

कृतत्रेताद्वापरेषु तपोन्यर्थं-न्यद्वै-प्रशस्यते ।
मुनयोऽत्र प्रशंसन्ति दानमेकं कलौ युगे ॥

कोटिश्च वाजपेयानां लक्षं विश्वजितां तथा ।
सहस्रमश्वमेधानां स्वहस्तश्चैव तत्समम् ॥

गण्यन्ते पांसवो भूमेर्गण्यन्त वृष्टिबिन्दवः ।
न गण्यन्ते विधाचापि धर्मसंरक्षणे फलम् ॥
गयागोदावरीगंगाप्रयागादिषु दानतः ।
यत्फलं तत्फलं सर्वं भवेद्भूमिप्रपालनात् ॥

गावो भूमिस्तथा भार्या आक्रम्य हर मानया ।
श्रावयन्ति च राजानं ब्रह्महत्या च लिप्यति ॥

गृह्णन्ति यावतः पांसून्क्रन्दतामश्रुबिन्दवः ।
विप्राणां हृतवृत्तीनां वदान्यानां कुटुम्बिनाम् ॥
घोराश्च दारुणा पाशा नोपसर्पन्ति भूमिदम् ।
.... ॥
चंद्रार्कौ गगने यावत्तपतो लोकसाक्षिणौ ।
तावदव्याहतं स्थेयाद्दानमेतन्महीपतेः ॥
चन्द्रार्कौ च तथा भूमिर्नभस्तापनवानिलः ।
तारकाश्चानलश्चैव धर्मराजस्तथैव च[१] ॥

[१ यापुढें 'तिस्रः संध्या' हा श्लोक.]

चला लक्ष्मीश्चला प्राणाश्चले जीवितयौवने ।
चलाचले हि संसारे धर्म एको हि निश्चलः ॥
जयति जिनोक्तो धर्मः षड्जीवनिकायवत्सलो नित्यम् ।
चूडामणिरिव लोके विभाति यस्सर्वधर्माणाम् ॥
जयत्याविष्कृतं विष्णोर्वाराहं क्षोभितार्णवम् ।
दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रान्तभुवनं वपुः ॥
जयति स्थितिसंहारसृष्टिकारणकारणम् ।
हरिर्दितिजकान्तास्य कुशेशयहिमागमः ॥
जितेन लभते लक्ष्मीं मृतेनापि सुराङ्गनाम् ।
क्षणविध्वंसिनि काये का चिन्ता मरणे रणे ॥
जीयाद्दुरितविद्वेषि शासनं जिनशासनम् ।
यदन्यमतशैलानां भेदने कुलिशायते ॥
तटाके यस्य गावस्तु पिबन्ति तृषिता जलम् ।
मृगयक्षमनुष्याश्च सोऽश्वमेधफलं लभेत् ॥
(१) [१]तडागानां सहस्रेण (२) [२]अश्वमेधशतेन च ।
(३) गवां कोटिप्रदानेन (४) भूमिहर्ता न शुध्यति ॥

[(१) अग्निष्टोम-सहस्रं च-सहस्राणि (२) वाजपेयशतानि-शतेषु-च (१,२) वापीकूपतडागैश्च वाजपेयशतैरपि, षष्टिवर्षसहस्राणि षष्टिवर्षशतानि च (३,४) पौण्डरीकसहस्राणि भूमिदानाधिकं फलम् १ आरामाणां-वापीकूप-अश्वमेध २ तडागानां-वाजपेय-राजसूय]

तडित्तरंगबहुलां श्रियं मत्वा च मर्त्यानाम् ।
न धर्मस्थितयः सद्भिर्युक्ता लोके विलोपितुम् ॥
तडित्तुल्या लक्ष्मीस्तनुरपि च दीपानलसमा ।
भवो दुःखैकान्तः परकृतिमकीर्तिःक्षपयताम् ।
यशांस्याचन्द्रार्कं नियतमवतामत्र च नृपाः ।
करिष्यन्ते बुद्ध्वा यदभिरुचितं किं प्रवचनैः ॥

तपति न तपनः प्रखरो मरुदपि नो वाति शासने तीव्रः ।
ब्रह्मस्वस्तेयपातकमतिशयभीमं समालोच्य ॥

तस्माद्धर्मः प्रयत्नेन रक्षणीयो महीक्षिता ।
स्वकृतोऽन्यकृतो वाऽपि लोकद्वयहितैषिणा ॥

तिस्रः संध्यास्त्रयो वेदास्त्रयो देवास्त्रयोऽग्नयः ।
अहोरात्रं चं दानस्य एते वै साक्षिणः स्मृताः ॥

तृणाग्रजलबिन्दुश्च जलबुद्बुदसदृशम् ।
चंचलं–सदृशं–जीवितं ज्ञात्वा कीर्तिधर्मं न लोपयेत् ॥

तेनेदमनिलविद्युच्चंचलमवगम्य जीवितमसारम् ।
क्षितिदानपरमपुण्यः प्रवर्तितो ब्रह्मदायोऽयम् ॥

त्रीण्याहुरतिदानानि गावः पृथ्वी सरस्वती ।
आसप्तमं फलन्त्येते दोहवाहनिवेदनैः ॥

त्वं धरे सर्वसत्वानामालये ब्रह्मनिर्मिते ।
आधारे सर्वभूतानामतः शान्ति प्रयच्छ मे ।
लक्ष्मीरूपेण विष्णौ त्वं मूर्तिभूता पिनाकिनः ।
संसारसागरादस्मान्समुद्धर वसुन्धरे ॥
दाता चैवानुमन्ता च स्वर्गस्योपरि तिष्ठति (तः) ।
हर्ता हारयिता भूमेः पच्य (च्ये) ते रौरवे ध्रुवम् ॥

दाता दशानुगृह्णाति (२) दशाहन्ति तथाक्षिपन् ।
पूर्वदत्तां हरन्भूमिं नरकायोपगच्छति ।
अतीतानागतानीह कुलानि कुलनन्दन ॥

[(२) यो हरेद्दश हन्ति च]

दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोऽनुपालनम् ।
(३) दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पदम् ॥
[(३) दानादिन्द्रत्वमायाति]

दानाद्विशिष्टमनुपालनजं पुराणाः । धर्मेषु निश्चितधियः प्रवदन्ति [१]पुण्यम् ।
तस्माद्द्विजाय सुविशुद्धकुलश्रुताय । दत्तां भुवं भवतु वो मतिरेव गोप्तुम् ॥
[१ धर्मं]

देवदायः समस्तोऽयं समस्तैर्भाविभूमिपैः ।
पालनीयोऽनुमान्यश्च दानाच्छ्रेयोऽनुपालनम् ॥

देवद्रव्यं गुरोर्द्रव्यं द्रव्यं चैव जिनेश्वरे ।
त्रिविधं पतनं दृष्टं दानभक्षणलंघने ॥

देवद्विजगतां भूमिं पूर्वभुक्तां हरेत यः ।
प्रणष्टमपि कालेन तमाहुर्ब्रह्मघातकम् ॥

देवद्विजप्रदत्ता भूर्न हर्तव्या नृपैर्यतः ।
केनापि सह वेश्येव न गता न चिरं स्थिता ॥

देवस्वानि हरन्तीह नरा नरकनिर्भयाः ।
ब्रह्मस्वानि तु ये मोहात् पच्यन्ते नरकेषु ते ॥

द्विजाश्च नावमन्तव्यास्त्रैलोक्यस्थितिहेतवः ।
देववत्पूजनीयाश्च दानमानार्चनादिभिः ॥

धर्म एष नृपतेः सनातनो यत्प्रसाध्य खलु वैरिमंडलम् ।
पालयत्यखिलमात्ममंडलं ब्रह्मदायसहितं नरेश्वरः ॥

धवलान्यातपत्राणि दन्तिनश्च [१]महोद्धताः ।
भूमिदानस्य [२]पुण्यानि फलं [३]स्वर्गः पुरन्दर ॥
[१ महोल्बणाः–मदोत्कटाः २ पुष्पाणि ३ स्वर्गे-स्वर्गस्तथैवच]

धर्मात्पैजवनो राजा चिराय बुभुजे भुवम् ।
अधर्माच्चैव नहुषः प्रतिपेदे रसातलम् ॥
धर्माद्विवर्धते राज्यं धर्मात्कीर्तिश्च शाश्वती ।
धर्मात्तृप्यन्ति पितरो धर्मात्तुष्यन्ति देवताः ॥

न तथा सफला विद्या न तथा सफलं धनम् ।
यथा तु-त्र-मुनयः प्राहुर्दानमेकं कलौ युगे ॥

न ददाति प्रतिश्रुत्य दत्तां वा हरते तु यः ।
तौ च द्वौ वारुणैः पाशैस्तप्येते मृत्युशासनात् ॥

नमस्तुङ्गशिरश्चुम्बि चंद्रचामरचारवे ।
त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभाय शंभवे ॥

(१) न[१] विषं विषमित्याहुर् (२) ब्रह्मस्वं विषमुच्यते ।
विषमेकाकिनं हन्ति ब्रह्मस्वं पुत्रपौत्रकम् ॥

[(१,२) देवस्वं हि–तु-विषं घोरं कालकूटसमप्रभम् (२) न विषं विषमुच्यते १ अविषं–देवस्वं]

न हि भूमिप्रदानाद्वै दानमन्यद्विशिष्यते ।
न चापि भूमिहरणात्पापमन्यद्विधीयते ॥
नायमत्यंतसंत्रासः कस्यचित्केनचित्सह ।
अस्ति स्वेन शरीरेण किमुतान्यैः पृथग्जनैः ॥
नास्ति भूमिसमं दानं नास्ति राज्ञा समो गुरुः ।
नास्ति सत्यसमो धर्मो नास्ति दानसमो विधिः ॥
नास्य देवा न पितरो हविः पिंडं समाप्नुयुः ।
छिन्नमस्तकवत्तालोऽप्रतिष्ठः पतिष्यति ॥
निघ्नतो भर्तृगोविप्रबालयोषित्तपस्वि-नः-नाम् ।
या गतिः सा भवेद्वृत्तिं हरतः शासनांकिताम् ॥
निशम्य दोषं हरणे महान्तं गुणं च भूमेरनुपालने तु ।
दत्तं नरेन्द्रैः प्रतिपालनीयं श्रेयो हि दानादनुपालनं तु ॥
न्यायेनोपार्जिता भूमिरन्यायेनापहारिता ।
हरन्तो हारयन्तोऽपि आ-प्र-घ्नन्त्यासप्तमं कुलम् ॥
पञ्च पश्वनृते हन्ति दश हन्ति गवानृते ।
शतमश्वानृते हन्ति सहस्रं पुरुषानृते ॥

पण्याङ्गनानां सदनं न देयम् । द्यूतप्रचारोऽपि निवारणीयः ।
शस्त्रादिकं वा-चा-पि न धारणीयम् । सत्कर्मनिष्ठैर्भवितव्यमेभिः ॥

पतंत्यश्रूणि रुदतां दीनानामवसीदताम् ।
ब्राह्मणानां हृते क्षेत्रे हन्ति त्रै-हन्यात्त्रि–पुरुषं कुलम् ॥
परत्र संमतं दिव्यं भूमिदानात्परं न हि ।
तस्मात्सर्वादरेणापि भूमिदानं प्रपालयेत् ॥
परदत्तां तु यो भूमिमुपहिंसेत्कदाचन ।
स बद्धो वारुणैः पाशैः क्षिप्यते पूयशोणिते ॥
पापं निर्मोच्य वस्त्यक्त्वा सोपाना भूमिदानकाः ।
पदे पदे दिवं यान्ति पितृमात्रैकविंशकम् ॥
पितरः पितृलोकस्थाः देवलोके दिवौकसः ।
सन्तर्पयन्ति दातारं भूमेः प्रभवतां वर ॥
पूर्वैः पूर्वतरैश्चैव दत्तां भूमिं हरेत्तु यः ।
स नित्यव्यसने मग्नो नरके च वसेत्पुनः ॥
प्रजाहितार्थं स्थितयः प्रणीताः । धर्मेषु विद्वान्प्रतिपालयेत ।
यो लोभमोहाद्धरते दुरात्मा । सोऽन्धो व्रजेद्दुर्गतिमाशु कष्टाम् ॥
प्रसह्या संप्रदानेन दत्तस्याहरणेन च ।
जन्मप्रभृति यद्दत्तं तत्सर्वं निष्फलं भवेत् ॥
प्राणेन धार्यते कायः स च प्राणसमीरणात् ।
समीरश्चातिचपलः कृतमप्यायुरद्भुतम् ॥
प्रायेण हि नरेन्द्राणां विद्यते न शुभा गतिः ।
पूयन्ते ते तु सततं प्रयच्छन्तो वसुन्धराम् ॥
फलस्य कथितं धर्मं फलान्निष्फलसंभवः ।
भूमिहर्ता फलच्छेत्ता फलान्निष्फलतां व्रजेत् ॥
फालकृष्टां महीं दद्यात् सबीजां सस्यमा-शा-लिनीम् ।
यावत्सूर्य-पुण्य-कृता लोकास्तावत्स्वर्गे महीयते ॥
(१) बहुभिर्वसुधा [१]दत्ता (२) [२]राजभिः सगरादिभिः ।
यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलम् ॥

[(२) बहुभिश्चानुपालिता, राजानो वसुधाधिपैः, भुज्यते हि नराधिपैः, (१,२) बहुभिर्बहुधा दत्ता वसुधा वसुधाधिपैः, इयं राजशतै-राजभिर्बहुभि-र्दत्ता दीयते च पुनः पुनः १ भुक्ता २ पार्थिवैः]

ब्रह्मस्वं दुरनुज्ञातं भुक्तं हन्ति त्रिपूरुषम् ।
प्रसह्य तु बलाद्भुक्तं दश पूर्वान्दशापरान् ।।
ब्रह्मस्वं प्रणयाद्भुक्त्वा दहत्यासप्तमं कुलम् ।
विक्रमेण ये भोज्यन्ते दश पूर्वान्दशापरान् ।।
(१,२) भूमिदानं सुपात्रेषु सुतीर्थेषु सुपर्व-णि-सु ।
अगाधापारसंसारसागरोत्तारणं भवेत् ।।
[(१,२) भूमिं वृत्तिकरीं दत्त्वा छत्री भवति मानवः ।]
भूमिदा-नात्परं-नसमं दानमिह लोके न विद्यते ।
यः प्रयच्छति भूमिं हि सर्वकामान्ददाति सः ।।
भूमिदानस्य यः कर्ता यश्च कारयिता शुचिः ।
पालकश्चानुमन्ताच स्वर्गं गच्छति मानवः ।।
भूमिदानात्परं दानं न भूतं न भविष्यति ।
(३,४) तस्यैव हरणात्पापं न भूतं न भविष्यति ।।
[(३,४) दानेन यत्फलं प्रोक्तं पालनेन ततोऽधिकम् ।।]
भूमिप्रदा दिवि ललन्ति पतन्ति हन्त हृत्वा महानृपतयो नरके नृशंसाः ।
एतद्द्वयं परिकलय्य चलां च लक्ष्मीमायुस्तथा कुरुत यद्भवतामभीष्टः ।।
भूमिप्रदानान्न परं प्रदानं दानाद्विशिष्टं परिपालनं तु ।
सर्वेऽतिसृष्टां परिपाल्य भूमिं नृपा नृगाद्यास्त्रिदिवं प्रपन्नाः ।।
भूमिं यः प्रतिगृह्णाति य-श्च-स्तु भूमिं प्रयच्छति ।
उभौ तौ-तावुभौ-द्वावेतौ-पुण्यकर्माणौ नियतं स्वर्ग-गामि-वासि-नौ
भूमेर्दाता याति लोके सुराणाम् । हंसैर्युक्तं यानमारुह्य दिव्यम् ।
लोहे कुम्भे तैलपूर्णे सुतप्ते । भूमेर्हर्ता पच्यते कालदूतैः ।।
भ्रमत्संसारचक्राग्रधाराधारामिमां श्रियम् ।
प्राप्य ये न ददुस्तेषां पश्चात्तापः परं फलम् ।।
मच्छासने पितृपितामहभूमिभागमध्यप्रदत्त इह यः कुरुतेऽपकारम् ।
शंभोः पुरःस्थितबहुद्विजवत्सघातनिःसंततिः सकलजन्मशतेषु भूयात् ।।
मद्दत्ता पुत्रिका ज्ञेया पितृदत्ता सहोदरा ।
अन्यदत्ता तु जननी दत्तभूमिं परित्यजेत् ।।

मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा
पापादपेतमनसो भुवि भाविभूपाः ।
ये पालयन्ति मम धर्ममिमं समस्तं
तेभ्यो मया विरचितोऽञ्जलिरेष मूर्ध्नि ॥

मद्वंशजा वा परवंशजा वा ये पुण्यवन्तो मम धर्ममेवम् ।
प्रपालयिष्यन्ति नृपास्तु सर्वे कृताञ्जलिः सादरमाह सर्वान् ॥

मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा । ये भूमिपास्सततमुज्ज्वलधर्मचित्ताः ।
(३,४) मद्धर्ममेव परिपालनमाचरन्ति । तत्पादुकाद्वयमहं शिरसा वहामि ॥

[(३,४) तद्धर्ममेव परिपालनमुद्वहन्ति । तत्पादपद्मयुगुलं शिरसा वहामि ॥]

मातुस्साधंकपालेन सोऽत्ति मातंगवेश्मसु ।
श्वमांसं भिक्षया लब्धं भवेद्यो धर्महारकः ॥

मा पार्थिव कदाचिद्धि ब्रह्मस्वं मनसा अ(ह्य)पि ।
अंगे परमभैषज्यमेतद्धालाहलं विषम् ॥

माऽभू-द-द्धः-फलशंका-वः-वा परदत्तेति पार्थिवाः ।
स्व-दत्ता-दाना-त्फलमानन्त्यं परदत्ता-ति-नु-पालने ॥

मृत्योर्हि किंकरा दंडा ह्यग्नितापाः सुदारुणाः ।
घोराश्च वारुणाः पाशा नोपसर्पन्ति भूमिदम् ॥

यज्ञोऽनृतेन क्षरति तपः क्षरति विस्मयात् ।
क्षितिहर्त्तैकविंशानि कुलानि नरकं व्रजेत् ॥

यत्किंचित्कुरुते पापं नरो लोभसमन्वितः ।
अपि गोचर्ममात्रेण भूमिदानेन शुध्यति ॥

यथा जनित्री पुष्णाति क्षीरेण स्वसुतं नृपाः ।
एवं सर्वगुणैर्भूमिर्दातारमनुपुष्यति ॥

यथा निरोहन्त्युप्तानि कीर्णानि च महीतले ।
एवं कामा विरोहन्ति भूमिदानसमार्जिताः ॥

(१,२) यथा चंद्रमसो वृद्धिरहन्यहनि जायते ।
तथा[२] भूमिकृतं दानं सस्ये सस्ये [३]विसर्पति ॥

[(१,२) यथाप्सु पतितः शक्र स्नेहबिन्दुर्विसर्पति   २ एवं   ३ प्ररोहति-विवर्धते]

यदक्षरपदभ्रष्टं मात्राहीनं च यद्भवेत् ।
तत्सर्वं क्षन्तुमर्हन्तः कस्य न स्खलते मनः ॥
यद्वैरिभूपालविलासिनीनामुत्क्षिप्तहारेषु पयोधरेषु ।
अश्रुप्रवाहाः पृथुचापयष्टिर्विनैव सूत्रेण समाससञ्ज ॥
यस्मिन्कुले जायते भूमिदाता स मोदते पुत्रकलत्रधान्यैः ।
सुस्थं प्रजानां वसते च यत्र सौख्यं श्रिया नन्दति भूमिपालः ॥
यस्यान्वये भूपतिरेष जातः यशोगजेत्याहितराजसिंहः ।
यस्मिन्विनिक्षिप्य धुरं धरित्र्याः सुष्वाप वार्धौ मुदितो मुकुन्दः ॥
यस्यावरोधस्तनचन्दनानां प्रक्षालनाद्वारिविहारकाले ।
चित्रोत्पला स्वर्णवती गतापि गंगोर्मिसंसक्तमिवाविभाति ॥
यः स्वयं कुरुते धर्मं यश्च पाति कृतं परैः ।
तयोः पालयिता श्रेष्ठ इति प्राहुर्मनीषिणः ॥

(१,२) यानीह दत्तानि पुरा नरेन्द्रैर्दानानि धर्मार्थयशस्कराणि ।
(३) निर्माल्यवान्तप्रतिमानि तानि को नाम साधुः [१]पुनराददीत ॥

[(१,२) यानीह दारिद्र्यभयान्नरेन्द्रैर्धनानि धर्मायतनीकृतानि (३) निर्भुक्त-माल्य-वान्तिप्रतिमानि, निर्माल्यतुल्यानि भवन्ति १ पुनराददाति]

यायात्पञ्चमहापापी द्रोही सोमेश्वरस्य च ।
गंगायां गोसहस्रस्य वधपापमवाप्नुयात् ॥
यावच्चन्द्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी ।
यावत्तु क्षमकोट्य[श्च] राजवंश[श्च] तावतु ॥
यावत्सूर्यशशांकौ च यावद्भूधरसागराः ।
तावत्पुत्रप्रपौत्रेभ्यो ग्रामः पाल्यो नृपोत्तमैः ॥
यावन्ति सस्यमूलानि गोरोमाणि च संख्यया ।
नरस्तावन्ति वर्षाणि स्वर्गे तिष्ठति भूमिदः ॥
ये ब्राह्मणानामयथा हरन्ति प्रदेशमात्रामपि भूतधात्रीम् ।
पुरीषकूपे पितृभिः समेतास्ते कल्पकोटीरपि यापयन्ति ॥
ये यास्यन्ति महीभृतो मम कुले किंवा परस्मिन्पुरः ।
तस्मिन्नेष मयाञ्जलिर्विरचितो नादेयमस्मात्कियत् ॥

दूर्वामात्रमपि स्वधर्मनिरतैर्दत्तं मया पाल्यताम्।
वायुर्वास्यति तप्स्यति प्रतपनः श्रुत्वा मुनीनां वचः ।।
यैः कृतः सर्वभक्षोऽग्निरपेयश्च महोदधिः।
क्षयी चाप्यायितः सोमः को न नश्येत्प्रकोप्य तान्।।
यैर्वाञ्छितं शिशिरदीधितिशुभ्रकीर्तैर्यैश्चामरप्रणयिनीपरिरंभणस्य ।
ते साधवो नहि हरन्ति परेण दत्तं दानाद्वदन्ति परिपालनमेव साधु ।।
योऽर्चितं प्रतिगृह्णाति ददात्यर्चितमेव वा।
तावुभौ गच्छतः स्वर्गं नरकं तु विपर्यये ।।
रक्षां नरः परकृतौ विदधीत विद्वान्। पादा हि धर्मयशसः परमस्य लब्धाः।
धात्रैव सृष्टमखिलं भुवनं तथापि । रक्षन्ति पुण्यरतयः पृथिवीं नरेन्द्राः ।।
रक्षापालनयोस्तावत्फलं सुगतिदुर्गती।
को नाम स्वर्गमुत्सृज्य नरकं प्रतिपद्यते ।।
रत्नान्नपानं गोष्ट्याद्यं सर्वं भूमौ प्रजायते।
तस्माद् भूमिप्रदानेन नरो भवति सर्वदः ।।
राजानो राजकुल्याश्च तावतोऽब्दान्निरंकुशाः।
कुंभीपाकेषु पच्यन्ते ब्रह्मभूम्यपहारिणः ॥
लोहचूर्णाश्मचूर्णे च विषं च जरयेन्नरः।
ब्रह्मस्वं त्रिषु लोकेषु कः पुमाञ्जरयिष्यति ।।

वाताभ्रविभ्रममिदं वसुधाधिपत्य-
मापातमात्रमधु-रो-रा-विषयोपभोगः-गाः।
प्राणास्तृणाग्रजलबिन्दुसमा
नराणां धर्मः सखा परमहो परलोकयाने ।।

वारिदस्तृप्तिमाप्नोति सुखमक्षयमन्नदः।
तिलप्रदः प्रजामिष्टां दीपदश्च कुरूत्तमम्।
भूमिदः सर्वमाप्नोति दीर्घमायुस्तथैव च ।।
विद्युद्विलासतरलामवगम्य सम्यक्। लोकस्थितिं यशसि सत्कमनोभिरुच्चैः।
नित्यं परोपकृतिमात्ररतैर्भवाद्भिर्धर्माभिराधनपरैरनुमोदितव्यम् ।।

(१) विन्ध्याटवीष्वतोयासु[१] (२) शुष्ककोटरवासिनः[२]।
(३) [३]कृष्णाहयो हि[४] जायन्ते (४) भूमिदायं हरन्ति ये ।।

[(१) वारिहीनेष्वरण्येषु (३) मरुसर्पाभिजायन्ते (४) ब्रह्मदेया–देवद्रव्या–ब्रह्मभूम्य–पहारकाः, भूमिदायाप–भूमिदानाप–देवब्रह्मस्व–ये स्युर्ब्रह्मस्व–हारिणः १ ष्वनम्भस्सु २ शायिनः ३ महाहयो–कृष्णसर्पा ४ ऽभि-श्व–:प्र]

वेदवाक्स्मृतयो जिह्वा वदन्ति ऋषिदेवताः।
भूमिहर्ता तथान्यच्च अहो मा हर मा हर॥

(१) शंखो भद्रासनं छत्रं (२) वराश्वा वरवारणाः।
(३) भूमिदानस्य चिह्नानि (४) फलमेतत्पुरन्दर॥

[(१) सिंहासनं तथा छत्रं (२) गजाश्वं बरवाहनम् (४) फलं-स्वर्गमनुत्तमं–स्वर्गस्तथैव च-स्वर्गः पुरन्दर, दृश्यन्ते तानि भारत]

शत्रुणा हि कृतो धर्मः पालनीयः प्रयत्नतः।
शत्रुरेव हि शत्रुःस्याद्धर्मः शत्रुर्न कस्य चित्॥
शास्त्रेषु पापिनां दृष्टं प्रायश्चित्तं द्विजोत्तम।
न दृष्टं भूमिहर्तॄणां प्रायश्चित्तं द्विज क्वचित्॥
शिवः पात्रं जनो दाता पालकः पुण्यभाक् परम्।
लोपकृच्च महापापी विचार्यैवं प्रपालयेत्॥

श्रीमत्परमगंभीरस्याद्वादामोघलांछनम्।
जीयात्त्रैलोक्यनाथस्य शासनं जिनशासनम्॥
षष्टिवर्षसहस्राणि विष्टायां जायते कृमिः।
गवां शतसहस्रस्य हन्तुः पिबाति दुष्कृतम्॥
(१) षष्टिं वर्षसहस्राणि (२) स्वर्गे [१]तिष्ठति [२]भूमिदः।
(३) [३]आच्छेत्ता चानुमन्ता च (४) तान्येव नरके [४]वसेत्॥

[(१) असंख्येयानि वर्षाणि (३,४) हरणेनानुमन्ता च तस्यैव नरके वसेत्, क्षितिपात्रान्नहर्तारद्वितयं(?) नरकं व्रजेत् (४) द्वौ तौ नरकगामिनौ १ तिष्ठन्ति–मोदन्ति–क्रीडन्ति–वसति–मोदेत २ भूमिदाः–मानवः–वाः–दानदः–दाः–दायदः–दाः ३ आक्षेप्ता ४ विशेत्]

सकलमिदमुदाहृतं निशम्य स्मृतिविहितं हितमात्मनो नरेन्द्राः।
तरलतरतरंगभंगविश्वं स्वयमनुचिन्त्य न कीर्तयो विलोप्याः॥

सत्यं चैव हुतं चैव यत्किंचिद्धर्मसंचितम्।
अर्धांङ्गुलेन सीमाया हरणेन प्रणश्यति॥

सद्यो दानं निरायासं सायासं दीर्घपालनम् ।
अत एव मुनयः प्राहुर्दानाच्छ्रेयोनुपालनम् ॥
संतर्पयति दातारं भूमिः प्रभवतां वर ।
कृशाय कृशभूत्याय वृत्तिक्षीणाय सीदते ॥
सप्तजन्मान्तरेणैव यत्पुण्यं पूर्वसंचितम् ।
अर्धाङ्गुलेन सीमाया हरणेन प्रणश्यति ॥
सप्तलोकैकनाथस्य विष्णोरपि महात्मनः ।
नेयं नियतवासा श्रीः किमुतान्यस्य कस्य चित् ॥
सर्वमान्यकृतधर्मशासनं पालयन्तु भुवि भाविपार्थिवाः ।
अग्रहारपरिरक्षणादृते नास्ति नास्ति हि यशो महीभृताम् ॥
सर्वं वा भूमिहरणाद्धृतमेव न संशयः ।
भूमिहर्ता वसेत्तस्मान्नरके कालमक्षयम् ॥

सर्वेषामेव दानानामेकजन्मानुगं फलम् ।
हाटकाक्षितिगौरीणां सप्तजन्मानुगं फलम् ॥

सर्वेषां तु प्रदानानां भूमिदानं प्रशस्यति ।
कल्पकोटिगतं पापं संचितं जायते नरः ॥
सवत्सां कपिलां शस्त्र्या हत्वास्या मांसशोणिते ।
गंगायां सोऽत्ति यो गृह्णात्यमूं धर्मोर्वरां नरः ॥
तत्पातकफलेनाशु यावच्चन्द्रदिवाकरम् ।
तावद्घोरतरं दुःखमश्नुते नरकावनौ ॥

स वोऽव्याद्वेधसा धाम यन्नाभिकमलं कृतम् ।
हरश्च यस्य कान्तेन्दुकलया कमलं कृतम् ॥

(१) सामान्योऽयं धर्मसेतुर्नृपाणां
(२) काले काले पालनीयो भवद्भिः ।
(३) सर्वानेतान्भाविनः पार्थिवेन्द्रान्
(४) भूयो भूया याचते रामचन्द्रः ॥

[(२) काले काले पालनीयः क्रमेण, स्वे स्वे काले पालनीयो भवद्भिः
(३) सर्वानेवं-नेतान्-दत्त्वा भूमिं-भावि-गि-नो भूमिपालान् (४) भूयो भूयो

याचते रामभद्रः-भर्तृबद्धः-प्रार्थयत्येष रामः। (३,४) स्ववंशजानपरभूपतिवंशजान्वा सर्वानेतान्याचते रामभद्रः]

(१) सुवर्णमेकं गामेकां (२) भूमेरप्येकमङ्गुलम्।
(३) हरन्नरकमाप्नोति (४) यावदाभूतसंप्लवम्॥

[(१) कन्यामेकां गवामेकां, गामेकां स्वर्णमेकं च-वा, हिरण्यमेकं गामेकां, गामेकां रत्निकामेकां, गामेकां च सुवर्णं च, माषमेकं सुवर्णस्य (२) भूमेरर्धार्धमङ्गुलम्, भूमिमप्यर्धमङ्गुलम्, भूमेरप्यर्धमङ्गुलम् (३) हरन्नरकवासी सः-स्यात्, हरन्नरकमायाति, हत्वा नरकमायाति (४) यावदाहूत-तिसंप्लवम्]

सौवर्णा यत्र प्रासादा वसोर्धाराश्च-श्चाशाद्वाराः सकामदाः।
गन्धर्वाप्सरसो यत्र तत्र गच्छति-न्ति भूमिदः-दाः॥

स्वदत्ताद्द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनम्।
परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत्॥
(१) स्वदत्तां परदत्तां वा (२) यत्नाद्रक्ष [१]युधिष्ठिर।
महीं [२]महीमतां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोऽनुपालनम्॥

[(१) प्राग्दत्तां भूमिं विप्रेभ्यो (१,२) पूर्वदत्तां नरेन्द्रैश्च यत्नाद्रक्ष शतक्रतो १ नराधिप २ मतिमतां]

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुन्धराम्।
न तस्य नरकाद्घोराद्विद्यते निष्कृतिः क्वचित्॥

(१) स्वदत्तां परदत्तां वा (२) यो हरेत वसुन्धराम्।
(३) षष्टिं वर्षसहस्राणि (४) विष्ठायां जायते कृमिः॥

[(१) स्वदत्तं परदत्तं वा, सर्वसस्यसमृद्धां तु (२) देवदायं हरेत यः, हरेत् कश्चिद्वसुन्धराम्, ब्रह्मदायं-वृत्तिं हरेत यः (३) दिव्यं वर्षसहस्राणि (४) नरके पच्यते ध्रुवं-तु सः, घोरे तमसि वर्तते-पच्यते, हन्तुर्हरति दुष्कृतम्, कुलजैः सह सीदति (३,४) स स्व-श्व-विष्टायां कृमिर्भूत्वा पितृभिः-कृमिभिः-सह पच्यते-मज्जति, श्वानयोनिशतं गत्वा चाण्डालेष्वभिजायते, तेन जाता जनेता च नरके पातिता ध्रुवम्, गवां शतसहस्रस्य हन्तुः पिबति-प्राप्नोति किल्बिषम्-दुष्कृतम्]

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेद्वसुधां नृपः।
न तस्य पुनरावृत्तिर्नरकात्कुंभिपाकतः॥

स्वदत्तां परदत्तां वा हरेत सुरविप्रयोः ।
वृत्तिं स जायते विष्ठुग्वर्षाणामयुतायुतम् ॥

स्वं दातुं सुमहच्छक्यं
दुःख-क्लेशमन्यत्र-मन्यस्य-मन्यार्थपालनम् ।
दानं वा पालनं वेति दानाच्छ्रेयोऽनुपालनम् ॥

स्वसुकृतपरिपालनात्प्रभूणाम् । परकृतपालनमेव लालनीयम् ।
हरिरपि कमलासनस्य सृष्टिं । सततमेव जगतामभूदुपास्यः ॥

हन्ति जातानुजातांश्च हिरण्यार्थे-भूम्यर्थे योऽनृतं वदेत् ।
(३,४) सर्वं भूम्यनृते हन्ति मा स्म भूम्यनृतं वदीः ॥
[(३,४) सबद्धो वारुणैः पाशैस्तिर्यग्योन्यां तु जायते ॥]

हरते-हरेत हारयेद्भूमिं-यस्तु
मन्दबुद्धिस्तमोवृतः-हतः-स्तु मोहतः ।
स-संबद्धो वारुणैः पाशैस्तिर्यग्यो-
निषु-र्नि स जायते-गच्छति ॥
हरेर्लीलावराहस्य दंष्ट्रा दण्डः स पातु वः ।
हेमाद्रिकलशो यत्र धात्रीच्छत्राश्रियं दधौ ॥

हर्ता देवस्य यो भूमिं ब्राह्मणस्यापि यो हरेत् ।
स्वदत्तां परदत्तां वा स याति नरकं नरः ॥
हिनस्ति विषमत्तारं वह्निरद्भिः प्रशाम्यति ।
कुलं समूलं दहति ब्रह्मस्वारणिपावकः ॥
हिरण्यमणिमुक्तानि वस्त्राण्याभरणानि च ।
तेन सर्वमिदं दत्तं येन दत्ता वसुन्धरा ॥

कानडी लेखांत शापाशीर्वादात्मक संस्कृत श्लोक येऊन शिवाय कांहीं कानडी मजकूर येतो. त्यांत वैविध्य विशेष आढळून येत नाहीं. मीं सुमारें पन्नास कानडी लेख तपासून त्यांतील असे मजकूर पुढें दिले आहेत. बहुतेकांचा आशय असा आहे कीं, जो मनुष्य लेखांत सांगितलेल्या दानधर्मांचें पालन करील त्यास काशी, कुरुक्षेत्र, प्रयाग, गया इत्यादि तीर्थांच्या ठिकाणीं सोनें, रत्नें इत्यादिकांनीं शिंगें मढविलेल्या हजार गाई वेदपारग अशा हजार ब्राह्मणांना दिल्याचें पुण्य मिळेल. आणि उलट जो हे दानधर्म मोडील त्यास

वरील ठिकाणीं उपर्युक्त ब्राह्मण, गाई, तपस्वी, इत्यादींस मारल्याचें पातक लागेल. आशय सामान्यतः हाच असला तरी मध्ययुगांत निरनिराळ्या समयीं खोदलेल्या लेखांत निरनिराळीं व्याकरणरूपें व शब्दप्रयोग येऊन कांहींशीं बहुविधता आली आहे. पुढें दिलेल्या उताऱ्यांत पुष्कळ वेळां येणारा मजकूर मुख्य धरून त्यांमध्यें आढळून येणारे महत्त्वाचे फेरफार तळटीपांत दिले आहेत. या उताऱ्यांचे दोन भाग उघड दिसतात. कधीं एक भाग समरूप व दुसरा भिन्न. असा प्रकार आढळला तेथें भिन्न भाग स्वतंत्रतेनें देऊन शिवाय भिन्नरूप व भिन्नार्थक उतारे स्वतंत्र दिले आहेत. उतारे वर्णानुक्रमानें दिले आहेत. दुसरा कोणताहि क्रम त्यांस अनुरूप नव्हता.

(१) इदनळिदातंगे रोगं दरिद्रत्वं संततिच्छेदमुं वारणासियोळ् कोटिकविलेयुं कोटिब्राह्मणरुं एवकोटितपोधनरुमं कोन्द पंचमहापातकनक्कुं (२) इदनाचंद्रार्कं बरमुदितोदितमागे कादवर्परमसुखास्पदरप्पर् पापदिनळिद दुरात्मनरकगतिगे गळगळनिळिवर् (३) इंतप्पुदनरिदु सासिर्वरुं धर्मोत्तरोत्तराभिवृद्धियप्पंताचंद्रार्कतारंबरं प्रतिपाळिसुवर् (४) इन्तिदराश्रमगुरुधर्मप्रतिपाळनुं सदाचारनुमोळित्तंगे व्यभिचारियुं भक्षकनादातं प्रयागेवारणासियर्घ्यतीर्थं कुरुक्षेत्रमं पुष्करं श्रीपर्वतमेंब महातीर्थंगळोळ् चतुर्वेदपारगरुमं पन्निच्छासिर कविलेयुमनळिद पातकं स्वधर्मदोळ् रक्षिसिदनी तीर्थंगळुमं ईयायनसुमं रक्षिसिद महापुण्याधिकनक्कुं (५) इंती धर्ममनाव न्यायमुमादोडं सर्वनमस्यमागि सासिर्वरु सधर्मदिं प्रतिपाळिपरुं मंगळ महा श्री श्री (६) इंती धर्मवं प्रतिपाळिसिदंगे महापुण्यमिदनळिदं पंचमहापातकनक्कु (७) इंती मठामुमं केय्युमनाववान्तरवसतेन्यायंगळु पुट्टिदडं सासिर्वरुं सद्धर्मदिं प्रतिपाळिपर् ॥ इनितं निश्चयमागे भाविसुवुदी धर्मक्कपायक्के वर्पनमोघं सकुळं निगोदतळदोळ् बीळगुं महापातकं मनमोल्दिदतिदनेय्दे रक्षिसुव देवंगक्कुमायुष्यवर्द्धनं अत्यूर्जितलक्ष्मिनिर्मळयशं भद्रं शुभं मंगळं (८) इंतीयायमनळिदातंगे बाणराशिकुरुक्षेत्रादिगळोळ् पंचमहापातकमं माडिद फलमक्कुं (९) इंती शासन मर्य्यादेयं किडिसिदातं गंगेप्रयागेवारणाशिकुरुक्षेत्रदलु सायिर कापिलेयं कोन्द महापातकमनेय्दुव आदित्यतीर्थंगळल्लि तन्न पिरिय मगनं कोन्दु अवन कपालदलुंड महादोषमनेय्दुव (१०) इवनीयंददिनेय्दे पाळिसिदवंगिष्टार्थ संसिद्धिसंभविकुं कोण्डळिदंगे गंगेगयेकेदारंकुरुक्षेत्रमेंबिवरोळ् पेसदे पार्व्वरं

गोरवरं गोत्रृंदमं पेंडिरं तवे कोंदिक्किद पापमेय्दुगुमवं बीळगुं निगोदंगळोळ् (११) ई धर्ममं[1] प्रतिपाळिसिदंगे[2] [3]वारणासिकुरुक्षेत्रप्रयागे[4]यार्ध्यतीर्थमेंबी तीर्थस्थानंगळोळ् [5]सासिर कविलेयं [6]चतुर्वेदपारगरप्प [7]ब्राह्मणर्गुभयमुखि [8]गोट्ट [9]फलमक्कुमी [10]धर्ममनळिदंगमळियलोडर्चियदंगमी पेळद पुण्यतीर्थ-स्थानंगळोळ् सासिर कविलेयुमं सासिर वेदपारगरप्प [11]ब्राह्मणरुमनळिद[12] [13]पातकमक्कु[14] (१२) ई धर्ममं प्रतिपाळिसिदातंगे विजयश्रीयुं बळायुं आरोग्याभिवृद्धियुमुत्तरोत्तरमक्कु (१३) गंगासागरयमुनासंगमदोळ् कोटि-कविलेयं ब्राह्मणरं लिंगिगळं सले पुण्यदिनंगळोळळिदवर्गळप्परिंतिदनळिदर् (१४) मत्तमिदनळिदंगे गंगायमुनेगळेरडर संगमदोळगण्यपुण्यवरतीर्थस्थानं-गळोंळिळ्द तपोधनर गोब्राह्मणरनळिदनिन्तिदनळिद

---

५. वृत्तें

जुने ताम्रपट-शिलालेख किंवा पोथ्या-बाडें वाचीत असतां वारंवार वृत्तबद्ध रचना येते. पोथ्या अनेकदां ऱ्हस्वदीर्घांचा विधिनिषेध न बाळगतां लिहिलेल्या असतात. ताम्रपट-शिलालेखांतील अक्षरें अपरिचित असल्यामुळें लावून वाचावीं लागतात. पुष्कळदां हे लेख मधून मधून अस्पष्ट झालेले आढळतात. शब्द तोडलेले नसल्यानें आणि पृष्ठमात्रांमुळें वाचनाचें कार्य अधिकच अघवड बनतें. अशा वेळीं वृत्तरचनेचा तक्ता हातांशीं असेल तर वाचनाचे कामांत पुष्कळ मदत होते. म्हणून या ठिकाणीं अगदीं आवश्यक अशा वृत्तांची एकेक ओळ दिली आहे. ओळीच्या आरंभीं वृत्तांतील अक्षरसंख्या दिली असून ओळीच्या पुढें किंवा खालीं अक्षरांचें लघुगुरुत्व अनुक्रमें ल व गा या अक्षरांनीं दर्शविलें आहे. प्रायः संस्कृत कवितांचीं वृत्तें ओळखण्याचा

---

१ + सद्धर्मदिं–मर्यादेयं तप्पदे २ प्रतिपाळिसिदवर्गे–रक्षिसिदवर्गे ३ + गंगे ...४ + गये ५ + सासिर कविलेय कोडुं कोळगुमं सूर्यग्रहणदोळ्–पंचरत्नदलु पंचरत्नदोळ्–सुवर्णदोळ्–पोन्नलु पोन्नदोळ् कट्टिसि–खर्चायिसि ६ + सासिर–सासिर्वर् ७ महाब्राह्मणर्गे ८ दानं गेय्द–महादानंगळं माडिद ९ पुण्यफल १० अळिदवर्गे ११ + एळ्कोटितपोधनरुममं १२ कोंद १३ दोष १४ सार्गु

प्रसंग वारंवार येत असला तरी वृत्ताची घडण व नांव मराठी कवितेमुळें चटकन् ध्यानांत येतात यासाठीं येथें मराठी वृत्तचरणांची योजना केली आहे. शासनें लावतांना यतींच्या ज्ञानाचा फारसा उपयोग होत नसल्यानें त्यांचा निर्देश केला नाहीं. गण समजणेंही तादृश फायद्याचें नसल्यानें गणनिर्दशक चरण सामान्यतः गाळले आहेत. वृत्तनिर्देश त्यांतील अक्षरांच्या संख्यांचे चढत्या वाढत्या अनुक्रमानें केलेले आहेत. सूचींत उल्लिखित वृत्तांचें वर्ण व अक्षरसंख्या अशा दोन्ही अनुक्रमांनीं परिगणन केलें आहे.

मात्र येवढींच वृत्तें येतात असें समजूं नये. याहून निराळीं वृत्तें येण्याचा किंवा या वृत्तांपैकीं एखाद्याचा अभिनव प्रकारहि आढळण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ लोहणेर ताम्रपटांत अगदीं आरंभींचा मंगल श्लोक असा आहे—

जयत्यमलबालेन्दुकोटिप्रकाशदंष्ट्रोत्कटम् ।
रसातलजपङ्काङ्कितस्कन्धलेशमुत्केसरम् ।
जलालुलितघोणाग्रमुक्तप्रभञ्जनोत्सारित-
ध्वनेर्ज्जलधिमध्योपलब्धोर्व्विकोलरूपं हरेः ॥

या वृत्तांत १७ अक्षरें आहेत. याचे ‿–‿ । ‿‿– । –‿– । –‿– । ‿–– । ‿– । असे गण पडतात. यांतील पहिलीं सहा व शेवटचीं सात हीं अक्षरें पृथ्वी वृत्ताशीं एकरूप आहेत. फक्त मधलीं चार भिन्न आहेत. तेव्हां हें वृत्त पृथ्वी वृत्ताचा एक प्रकार तरी असेल अथवा त्याशीं सदृश असें दुसरें एखादें वृत्त असेल. असो.

गण

यमाचा = य गण ‿––	जनास = ज गण ‿–‿
राधिका = र गण –‿–	समरा = स गण ‿‿–
ताराप = त गण ––‿	मानावा = म गण –––
नमन = न गण ‿‿‿	ल = लघु ‿
भास्कर = भ गण –‿‿	ग, गा = गुरु –

अक्षरवृत्तें

८ **प्रमाणिका** तिला म्हणा = लगा लगा लगा लगा
८ **विद्युन्माला** ऐसें बोला = गागा गागा गागा गागा
८ **नानुष्टुभमुखीं** भाना समीं न तग वा जगा

समांतीं ये लरा लामा विषमांतीं मसा क्वचित्
९ त्या **मणिबंधातें** धरिती = गाललगागा गाललगा
१० रामसागीं युक्ता **कलिका** ती = गालगागा गागा ललगा गा
१० **चंपकमाला** तीस म्हणावें = गाललगागा गाललगागा
१० **हंसी** ऐसें म्हणतिल तिथें = गागागागा ललललगा
१० बोलती कवी तीस **कामदा** = गाल गाल गा गाल गाल गा
१० **बर्हिस्त्री** संज्ञा त्या वृत्ता देती = गागागागागा गागागागागा
१० विषमीं दश अक्षरा गणीं = ललगा ललगा लगा लगा
११ समिं एकादश ती **वियोगिनी** = ललगा गालल गालगालगा
१० टळली कशी अजिच वेळ = ललगा लगा ललल गाल
१० अजुनी सदना न येति कां = ललगा ललगा लगाल गा
११ उत्सुक मनिं बहु होउनिया = गालल ललल गालल गा
१३ ललना पथा निरखि **उद्गतानना** = ललगा लगा ललल गालगालगा
११ म्हणति तीस बा **शुद्ध कामदा** = ललल गाल गा गाल गाल गा
११ ती **इंद्रवज्रा** म्हणिजे कवीनें = गागाल गागा ललगाल गागा
११ **उपजाति** = १ + ३ पाद इंद्रवज्रा; २ + ४ पाद उपेंद्रवज्रा
११ **उपेंद्रवज्रा** म्हणतात तीला = लगाल गागा ललगाल गागा
११ **दोधक** नाव तयासचि देती = गालल गालल गालल गागा
११ म्हणति बुध तिलाच **भद्रिका** = ललललललगा लगालगा
११ वृत्त तेंच म्हणती **रथोद्धता** = गाल गाल ललगा लगा लगा
११ त्यास हो कवी **ललित** बोलती = गाल गाल गा ललल गाल गा
११ त्या वृत्ताला **शालिनी** हेंच नाम = गागागागा गालगा गाल गागा
११ **स्वागता** म्हणति सुज्ञ तयाला = गालगा ललगा ललगागा
११ विषमीं अकरा समींच बारा = ललगा ललगा लगाल गागा
१२ तरि संज्ञा तिस होय **माल्यभारा** = ललगा गालल गालगा लगागा
११ विषमीं अकरा चरणीं युता = ललगा ललगा ललगा लगा
१२ द्विदश अक्षर ती **हरिणीप्लुता** = लललगा ललगा ललगा लगा
१२ ती **इंद्रवंशा** कविराज हेरिती = गागालगागा ललगाल गालगा
१२ **जलोद्धतगती** तिलाच म्हणती = लगा लललगा लगा लललगा

१२ वदती कवि **तोटक** वृत्त तया = ललगा ललगा ललगा ललगा
१२ **द्रुतविलंबित** वृत्त घडे तिथें = लललगा ललगा ललगा लगा
१२ **प्रमिताक्षरा** बुध सदा वदतो = ललगा लगाल ललगा ललगा
१२ कवि भले म्हणति ती **प्रियंवदा** = लललगा लललगा लगा लगा
१२ म्हणावें तयाला **भुजंगप्रयात** = लगागा लगागा लगागा लगागा
१२ कविजन बोलति तीस **मालती** = लललल गालल गालगा लगा
१२ **यूथिका** म्हणति वृत्त कवी तया = गालगा लललगा ललगा लगा
१२ अर्पा हरीस **ललिता** गिरा सदा = गागा लगाल ललगा लगा लगा
१२ तयास **वंशस्थचि** नाम ठेविती = लगालगागा ललगाल गालगा
१२ त्या त्या वृत्ताला बोलती **वैश्वदेवी** = गागागागागा गालगा गालगा गा
१२ **सारंग** हें नांव शोभेल त्यालाच = गागाल गागाल गागाल गागाल
१२ **स्त्रग्विणी** वृत्त हें नाम देती तया = गालगा गालगा गालगा गालगा
१२ द्विदश विषमिं अक्षरें समग्रा = लललल ललगा लगाल गागा
१३ त्रिदश समीं पदिं तीच **पुष्पिताग्रा** = लललल गालल गालगाल गागा
१३ म्हणति बुध तिला **चंद्रिका** साच ती = ललल लल लगा गालगा गालगा
१४ **प्रहरणकलिका** कवि म्हणति तिला = लललललगा लललललगा
१३ वृत्तातें म्हणति कवि **प्रहर्षिणी** त्या = गागागा ललललल लगालगागा
१३ म्हणती कवी तिसचि **मंजुभाषिणी** = ललगा लगा ललल गालगा लगा
१३ त्या वृत्ताला बोलति ते **मत्तमयूरी** = गागागागा गाललगा गाललगागा
१३ जनां गमे बहु **रुचिरा** कृति प्रिया = लगालगालल ललगा लगा लगा
१३ वदति ते कवि तयास **विभावरी** = लललगा लललगा ललगालगा
१४ जाणा **वसंततिलकाह्वय** तेंच वृत्त = गागा लगालललगा ललगाल गागा
१३ **प्रभावती** म्हणति सुवृत्त तें गुरू = लगालगा लललगा लगा लगा
१४ त्या वृत्ताला बोलति सुकवि **असंबाधा** =
गागागागा गालललललल गागागा
१५ म्हणति कवि तयाला **मालिनी** वृत्त तेव्हां =
लललललगागा गालगागा लगागा
१४ **मध्यक्षामा** सुकवि म्हणति त्या वृत्ताला =
गागागागा लललललगा गागागा

१४ तियें दिलें बुधजनिं नांव **रुक्मिणीचें** =
लगा लगा ललल गाल गालगागा

१५ **चामराख्य** वृत्त तेंच बोलती कवी सदा =
गालगाल गालगाल गालगाल गालगा

१५ सुजन **रमा** कथिति असें पहा सुवृत्त =
लललगा लललगा लगा लगागा

१६ **चित्र** वृत्त नांव त्यास लोक सत्य देति जाण =
गाल गाल गाल गाल गाल गाल गाल गाल

१६ तयास **पंचचामराख्य** वृत्त बोलती सदा =
लगालगाल गालगाल गालगाल गालगा

१७ **अवितथ** तेंचि **नर्दटक** बोलति हें बुध हो =
ललल गाल गालल गालल गालल गा

१७ सुवृत्त बहु चांगलें म्हणति सुज्ञ **पृथ्वी** तया =
लगाल ललगा लगाल ललगा लगागा लगा

१७ **मंदाक्रांता** म्हणति तिजला वृत्त तें मंद चाले =
गागागागा लललललगा गालगागा लगागा

१७ तया वृत्ता देती विबुधजन संज्ञा **शिखरिणी** =
लगागागागागा लललललगा गाललगा

१७ म्हणति **हरिणी** त्या वृत्ताला पशूंत जशी रुरू =
लललललगा गागागागा लगाल लगा लगा

१८ होतसे **विबुधप्रियाह्वय** वृत्त तें बरवें तिथें =
गा लगालल गा लगालल गा लगालल गा लगा

१९ आहे वृत्त विशाल त्यास म्हणती **शार्दूलविक्रीडित** =
गागागा ललगा लगा ललगा गागालगागालगा

२० विपिनीं देखुनि हासतो मृगपती **मत्तेभविक्रीडित** =
ललगागा लल गा लगा ललगा गागालगागालगा

२१ कंठी माळा धरी जी सुरुचिर तिजला **स्रग्धरा** नाम देती =
गागागागालगागा लललललगा गालगा गालगागा

२२ तीस **उमा** कवि बोलति जी बहु आवडती गिरिशास सती =
गालल गालल गालल गालल गालल गालल गालल गा

२२ **मंदारमाला** कवी बोलती हीस कोणी दिला **अश्वधाटी** असें =
गागाल गागाल गागाल गागाल गागाल गागाल गागाल गा

२२ कुसुमीं शुभ्रीं सुगंधीं सुरुचिर रचली ही **महास्रग्धरा** हो =
ललगा गागालगागा ललललललगा गालगा गालगागा

२२ **सारामृतध्वनि** उदारा नरा सुखवि दारा तिला च म्हणती =
गागा लगा ललगागा लगा ललगागा लगाल ललगा

२३ ती **मदिरा** कवि बोलति जी मन मोहुनिया जन लाविल नादीं =
गालल गालल गालल गालल गालल गालल गालल गागा

२३ ठेविति नाम तया मदिरेसचि थोर थोर कविराज **सवाई** =
गालल गालल गालल गालल गालगालल गालल गागा

२३ कविजन त्या मदिरेसचि लक्षुनि ठेविति नाम **सवाइ** तिला =
ललल गालल गालल गालल गालल गालल गालल गा

२६ धैर्याचा तो मेरू जाणा भयचकित न बघुनिहि जो **भुजंगविजृंभिता** =
गागा गागा गागा गागा ललललललल ललगा लगाललगालगा

मात्रा-वृत्तें

		१ ला पाद मात्रा		२ रा पाद मात्रा		३ रा पाद मात्रा		४ था पाद मात्रा		एकंदर मात्रा
१ उपगीति	=	१२	+	१५	+	१२	+	१५	=	५४
२ उद्गीति	=	१२	+	१५	+	१२	+	१८	=	५७
३ आर्या	=	१२	+	१८	+	१२	+	१५	=	५७
४ प्रगीति	=	१२	+	१८	+	१२	+	१७	=	५९
५ गीति	=	१२	+	१८	+	१२	+	१८	=	६०
६ ललिता	=	१२	+	१८	+	१२	+	२०	=	६२
७ सुगीति	=	१२	+	२०	+	१२	+	१५	=	५९
८ आर्या गीति	=	१२	+	२०	+	१२	+	२०	=	६४
९ वैतालीय	=	१४	+	१६	+	१४	+	१६	=	६०

१० मात्रासमक	=	१६	+	१६	+	१६	+	१६	=	६४
११ पज्झटिका	=	१६	+	१६	+	१६	+	१६	=	६४
		गालल		गालल		ललल		गागा		
१२ औपच्छंदसिक	=	१६	+	१८	+	१६	+	१८	=	६८

वृत्तांची वर्णानुक्रमानें सूची[1]

अनुष्टुभ् ८; अवितथ १७; अश्वधाटी = मंदारमाला; असंबाधा १४; ***आर्या** १२,१८,१२,१५; *आर्या गीति १२,२०; **इंद्रवज्रा** ११; इंद्रवंशा १२; **उद्गतानना** १०,१०,११,१३; *उद्गीति १२,१५,१२,१८; *उपगीति १२,१५; उपजाति ११; उपेन्द्रवज्रा ११; **उमा** २२; *औपच्छंदसिक १६,१८; **कलिका** १०; कामदा (शुद्ध) ११; कामदा (साधी) १०; ***गीति** १२,१८; **चंद्रिका** १३; चंपकमाला १०; चामर १५; चित्र १६; **जलोद्धतगति** १२; **तोटक** १२; **दोधक** ११; द्रुतविलंबित १२; **नर्दटक**=अवितथ; ***पज्झटिका** १६; पंचचामर १६; पुष्पिताग्रा १२,१३; पृथ्वी १७; *प्रगीति १२,१८,१२,१७; प्रभावती १३; प्रमाणिका ८; प्रमिताक्षरा १२; प्रहरणकलिका १४; प्रहर्षिणी १३; प्रियंवदा १२; **बर्हिस्त्री** १०; **भद्रिका** ११; भुजंगप्रयात १२; भुजंगविजृंभित २६; **मंजुभाषिणी** १३; मणिबंध ९; मत्तमयूरी १३; मत्तेभविक्रीडित २०; मदिरा २३; मध्यक्षामा १४; मंदाक्रांता १७; मंदारमाला २२; मयूरी=बर्हिस्त्री; महास्रग्धरा २२; *मात्रासमक १६; मालती १२; मालिनी १५; माल्यभारा ११,१२; **यूथिका** १२; **रथोद्धता** ११; रमा १५; रुक्मिणी १४; रुचिरा १३; **ललित** ११; ललिता १२; *ललिता १२,१८,१२,२०; **वंशस्थ**=वंशस्थविल १२; वसंततिलक १४; विद्युन्माला ८; विबुधप्रिया १८; विभावरी १३; वियोगिनी १०,११; *वैतालीय १४,१६; वैश्वदेवी १२; **शार्दूलविक्रीडित** १९; शालिनी ११; शिखरिणी १७; **सवाई** २३; सारंग १२; सारामृतध्वनि २२; *सुगीति १२,२०,१२,१५; स्रग्धरा १२; स्रग्विणी १२; स्वागता ११; **हरिणी** १७; हरिणीप्लुता ११,१२; हंसी १०.

---

१ तारकांकित नांवें मात्रावृत्तांचीं आहेत.

वृत्तांची अक्षरमात्रासंख्यानुक्रमानें सूची[1]

८ अनुष्टुभ्, प्रमाणिका, विद्युन्माला; ९ मणिबंध; १० कलिका, कामदा चंपकमाला, बर्हिर्ण्री=मयूरी, हंसी; १०, ११ वियोगिनी १०, १०, ११, १३; उद्गतानना; ११ इंद्रवज्रा, उपजाति, उपेंद्रवज्रा, दोधक, भद्रिका, रथोद्धता, ललित, शालिनी, शुद्ध कामदा, स्वागता; ११,१२ माल्यभारा, हरिणीप्लुता; १२ इंद्रवंशा, जलोद्धतगति, तोटक, द्रुतविलंबित, प्रमिताक्षरा, प्रियंवदा, भुजंगप्रयात, मालती, यूथिका, ललिता, वंशस्थ-स्थविल, वैश्वदेवी, सारंग, स्रग्विणी; १२,१३ पुष्पिताग्रा; १३ चंद्रिका, प्रभावती, प्रहर्षिणी, मंजुभाषिणी, मत्तमयूरी, रुचिरा, विभावरी; १४, असंबाधा, प्रहरणकलिका, मध्यक्षामा, रुक्मिणी, वसंततिलक; १५ चामर, मालिनी, रमा; १६ चित्र, पंचचामर; १७ अवितथ = नर्दटक, पृथ्वी, मंदाक्रांता, शिखरिणी, हरिणी; १८ विबुधप्रिया; १९ शार्दूलविक्रीडित; २० मत्तेभविक्रीडित; २१ स्रग्धरा; २२ उमा, मंदार-माला=अश्वधाटी, महास्रग्धरा, सारामृतध्वनि; २३ मदिरा, सवाई २; २६ भुजंगविजृंभित; ५४ उपगीति; ५७ उद्गाति, आर्या; ५९ प्रगीति; ६० गीति; ६२ ललिता; ५०. सुगीति; ६४ आर्या गीति; ६० वैतालीय; ६४ मात्रासमक, पज्झटिका; ६८ औपच्छंदसिक.

---

६. कालगणना

प्रस्ताव

प्राचीन, मध्ययुगीन किंवा अर्वाचीन कालांतील ऐतिहासिक सामुग्रीचा अभ्यास करीत असतां अनेक प्रकारचे कालनिर्देश येतात; त्यांतील अगदीं थोडेच अभ्यासकाच्या चांगल्या परिचयाचे असातात. त्यांची अभ्यास-कास यथातथ्य माहिती असेल तरच त्यास त्यांचें पूर्ण परिचित अशा दुसऱ्या कालांत रूपांतर करतां येईल. यासाठीं येथें अशा कालगणनांची आवश्यक तेवढी माहिती एकत्र केली आहे. ज्या कालांचें परिचित कालांत रूपांतर करण्यास पुष्कळ आंकडेमोड करावी लागते तेथें शक्य तोंवर

---

१ चरणांतील मात्रांच्या संख्यानुक्रमानें मात्रावृत्तें मांडलीं. यामुळें एकंदर मात्रासंख्यानुक्रम साधतां आला नाहीं.

कोष्टकें करून दिलीं आहेत. किंवा असेंही सांगतां येईल कीं, अगदीं निरुपाय असेल तेथेंच आंकडेमोड करावयास सांगितलें आहे. सामान्यतः सर्वत्र कोष्टकें देऊन आंकडेमोडीचे श्रम वांचविले आहेत. कोष्टकांपैकीं कांहीं मीं स्वतः तयार केलीं आहेत आणि कांहीं संदर्भग्रंथांतून घेतलीं आहेत. येथें दिलेले कांहीं काल आजही प्रचलित आहेत आणि कांहीं सध्या तर मृतच आहेत; पण जेव्हां जन्मले तेव्हांच अल्पायुषी व अप्रभावी (विशेष प्रसार न झालेले) ठरले. यामुळें कांहीं कालांविषयीं अधिक तर कांहींविषयीं कमी अशी माहिती येथें दिली आहे.

अमली = कटकी, बंगाली, विलायती

हे चारी काल फसली सनाचीं जवळजवळ रूपांतरेंच आहेत. ह्यांचीं वर्षें सौर असून यांचे आरंभ अनुक्रमें भाद्रपद शुक्ल १२ (अम. कट.), मेष संक्रांती (सौर वैशाखा)चा दुसरा दिवस आणि कन्या संक्रांतीचा पहिला दिवस या वेळीं होतात. पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या कालांच्या वर्षसंख्येंत ५९२-५९३ आणि तिसऱ्याच्या वर्षसंख्येंत ५९३-५९४ मिळविल्यानें इसवी सन येतो. सर्व गणनांत महिन्यांचीं नांवें सौर वैशाखादि आहेत. अमली सनास कटकी असें दुसरेंही एक नांव आहे.

वरील माहिती नीट ध्यानांत यावी म्हणून कोष्टकरूपानें मांडून दाखवितों.

कालनाम	अमली = कटकी	बंगाली	विलायती
वर्षारंभ	भाद्रपद शुद्ध १२	मेष संक्रांति = सौर वैशाख	कन्या संक्रांति = सौर आश्विन
महिने व त्यांचे आरंभ	सौर = वैशाखादि संक्रांतिसमय व दिन	सौर = वैशाखादि; सूर्योदय ते मध्यरात्र = दुसरे दिवशीं; मध्यरात्र ते सूर्योदय=तिसरे दिवशीं	सौर = वैशाखादि; संक्रांतिसमय
इसवी वर्षासाठीं किती मिळवावे	५९२-५९३	५९३-५९४	५९२-५९३
प्रचारदेश	ओडिसा-व्यापार व कचेऱ्या	बंगाल	ओडिसा व अंशतः बंगाल.

इलाही

हिजरी कालास धार्मिक दृष्ट्या कितीहि महत्त्व असलें तरी तो काल केवळ चांद्रमानाचा असल्यानें त्यांत हिशेबाच्या सुलभतेच्या दृष्टीनें अनेक अडचणी आहेत. त्या टाळण्यासाठीं बहुतेक सर्व मुसलमानी देशांत कोणत्या ना कोणत्या रूपानें सौर वर्षमानाचा स्वीकार केला गेला. मुघल सम्राट् अक्बर याच्या कारकिर्दीच्या आरंभीं हिजरी सनच चालू होता. पण त्यांतील उणीवा लक्षांत घेऊन सुधारणा करण्याच्या दृष्टीनें अक्बरानें आपल्या २९ व्या राज्यवर्षी अर्थात् हि. ९९२ (इ. १५८४) सालीं तारीख-इ-इलाही किंवा इलाही या नव्या सौर कालाचा एक स्वतंत्र फर्मान काढून प्रचार सुरू केला. येवढेंच नव्हे तर आपल्या गत कारकिर्दीची माहिती देतांना हिशेब करून याच कालाचे निर्देश करण्याविषयीं फर्माविलें. अक्बर गादीवर बसला (ता. १४।२।१५५६ इ.) त्या दिवशीं याचा आरंभ झाला असें न समजतां, इराणी वर्षारंभदिनीं अथवा ११,२१ मार्च १५५६ इ. रोजीं झाला असें समजतात. या कालांत केवळ सौरमान ग्राह्य धरल्यानें यांतील प्रत्येक वर्षाचा आरंभ मेषसंक्रांतिदिनीं किंवा प्रायः ता. ११ (जुनी पद्धत) किंवा ता. २१ (नवी पद्धत) मार्च रोजीं व क्वचित् एक दिवस आगेंमागें होई. उदा. श्री. वा. सी. बेंद्रे यांच्या तारीख–इ–इलाही या पुस्तिकेंत दिलेल्या कोष्टकांप्रमाणें ४,८,१२,१६,२०,२४ व २८, हीं वर्षें ता. १२ मार्च रोजीं आणि ६५,६९,७३,७७,८१,८५,८९,९३,९७,९८, १०१,१०२,१०५,१०६,१०९,११०,११३,११४,११७ व ११८ हीं वर्षें ता.१० मार्च रोजीं सुरू झालीं होतीं. या कालांतील महिने फर्वर्दीन वगैरे इराणी पद्धतीचे व दिवसही त्याच पद्धतीचे असून त्यांच्या खुलाशासाठीं महिने व दिवस हीं उपप्रकरणें पहावीं. अक्बराच्या कारकिर्दीत इलाही व जुलूस हीं वर्षें एकरूपच होतीं. जहांगीरच्या कारकिर्दीत इलाही वर्ष पुढें गेलें आणि जुलूस वर्ष नव्यानें सुरू झालें. शाहजहानपासून पुढील बादशाहांनीं इलाही कालाचा सामान्यतः त्याग केला असला तरी त्याचा प्रचार अजिबात बंद न पडतां तो शेवटच्या नामधारी मुघल बादशाहाच्या अखेरीपर्यंत कमीजास्त तपशीलानें चालू होता असें मुघली फर्मानांवरून म्हणतां येतें. याचें पहिलें वर्ष इ. १५५६ मार्च ११ ते इ. १५५७ मार्च १० पर्यंत होतें. अर्थात् याचें इसवी सनांत रूपांतर करावयाचें झाल्यास याच्यांत १५५५–५६ मिळविले

पाहिजेत हें उघड होतें. महिना व तारीख दिलीं असल्यास इसवी तारीख काढणें अवघड नाहीं. उदा. आलमगीरनाम्यांत शाइस्तेखानानें चाकण किल्ल्यास औरंगजेबाचें जुलूस वर्ष ३ शहरेवर ३ रोजीं सुरुंग लावल्याचें नमूद आहे. जुलूस सदरांत दिलेल्या कोष्टकांप्रमाणें औरंगजेबाचें तिसरें जुलूस वर्ष इ. १६६० मे १ रोजीं सुरू झालें. १६६०–१५५५=१०५ वें इलाही वर्ष इ. १६६० मार्च १० रोजीं सुरू झालें. फर्वर्दीन १ ते शहरेवर ३ पर्यंत महिने या सदरांत दिलेल्या माहितीप्रमाणें (१५६ + ३ =) १५९ दिवस होतात. इ. १६६० जानेवारी १ ते मार्च ९ पर्यंत (३१ + २९ + ९ =) ६९ दिवस होतात. १५९ + ६९ = २२८ दिवस झाले. इ. १६६० जुलै अखेरपर्यंत २१३ दिवस होतात. तेव्हां २२८ व्या दिवशीं आगस्ट १५ तारीख येते. पण ३ शहरेवर रोजीं १७ जिल्हेज ही तारीख असल्याचेंही नमूद आहे. हिशेब करतां १७ जिल्हेज ही तारीख ता. १४ आगस्ट रोजीं पडते. तात्पर्य प्रस्तुतचा व आणखी कांहीं निर्देश यांचा विचार करतां श्री. बेंद्रे यांनीं दिलेल्या कोष्टकांच्या साह्यानें काढलेल्या तारखांत कांहीं ठिकाणीं तरी एक दिवसाची चूक पडत आहे.

इसवी

जुने कागदपत्र पहात असतां पाश्चिमात्य कागदांमधून इसवी सन, महिने व तारीख यांचा उल्लेख तर येतोच; पण इतिहास ग्रंथ वाचीत असतां अनेकदां कोणत्या तरी इतर कालगणनेचा उल्लेख येऊन त्याचें इसवीमध्यें रूपांतर करावें लागतें. यासाठीं पुढील आवश्यक माहिती दिली आहे.

या कालगणनेंत सौर वर्ष ३६५ दिवस, ५ तास, ४८ मिनिटें, ४५·३७ सेकंद येवढ्या मानाचें असल्यानें आणि दर वर्षास ३६५ दिवस धरतात म्हणून चार वर्षांनीं सुमारें २४ तास कमी पडतात. ते भरून काढण्यासाठीं दर चौथे वर्षीं किंवा चारांनीं पूर्ण भाग जाणाऱ्या वर्षीं फेब्रुवारीच्या अखेरीस एक दिवस अधिक धरून फेब्रुवारीचे २९ दिवस किंवा त्या वर्षाचे ३६६ दिवस करतात. या वर्षास लीप वर्ष म्हणतात. पण या योगानें थोडासा काल अधिक होतो. तेव्हां तो उणें करण्यासाठीं १०० नीं निःशेष भाग जाणाऱ्या वर्षीं म्हणजे १७००, १८००, १९०० इत्यादि वर्षीं अधिक दिवस धरीत नाहींत. पण या योगें कांहीं काल कमी पडतो. तो भरून काढण्यासाठीं ४०० नीं

निःशेष भाग जाणाऱ्या वर्षी ३६६ दिवस धरतात. अशा पद्धतीनें ३६५ किंवा ३६६ दिवसांचें वर्ष धरून गणितागत वर्षमानाशीं मेळ घालतात.

या गणनेंत जुनी व नवी अशा दोन पद्धति (ओल्ड व न्यू स्टाइल) आहेत. ज्यूलियस सीझरनें सौर वर्षाचें गणितागत मान व ३६५ दिवसांचें ढोबळ मान यांचा मेळ घालण्यासाठीं दर चौथे वर्षी एक दिवस अधिक धरावा असें ठरविलें व कालगणना सुरू केली. पण यामुळें दरवर्षी सुमारें ११ मिनिटें १४ सेकंद इतका काल अधिक धरला जात होता. शेंकडों वर्षें अशीं गेल्यामुळें इ. १५८२ पर्यंत दहा दिवस वाढले होते. ते पोप १३ वा ग्रेगरी यानें या वर्षाच्या आक्टोबरमध्यें कमी केले. म्हणजे इ. १५८२ च्या आक्टोबर ५ ला आक्टोबर १५ ही तारीख मानावी असा त्यानें हुकूम काढला. रोमन कॅथॉलिक पंथी म्हणजे इटली, स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड वगैरे देशांनीं ही आज्ञा मानली व नवीन पद्धतीनें तारखा मोजण्यास सुरुवात केली. पण इंग्लंडसारख्या कांहीं प्रॉटेस्टंट पंथी देशांनीं ही आज्ञा मानली नाहीं. तेव्हां विशेषतः इंग्लंडमध्यें इ. १७५२ पर्यंत जुनी पद्धतच चालू राहिली. पण तोंपर्यंत शास्त्रशुद्ध आणि लौकिक वर्षमान यांमध्यें आणखी एक दिवसाचें म्हणजे एकंदर ११ दिवसांचें अंतर पडलें होतें. म्हणून इंग्लंडमध्यें पार्लमेंटच्या एका ठरावानें इ. १७५२ च्या सप्टेंबर तीन या तारखेस सप्टेंबर १४ तारीख समजावी असें घोषित करून वरील सुधारणेस मान्यता दिली. सारांश हा कीं, इ. १५८२ मध्यें रोमन कॅथॉलिक देशांत व इ. १७५२ मध्यें इंग्लंडमध्यें नवी पद्धत सुरू झाली. नवी पद्धत जुनीपेक्षां १० दिवसांनीं पुढें आहे. याचा अर्थ असा कीं जुन्या पद्धतीची इ. १६३० जून १३ ही तारीख नवीन पद्धतींत इ. १६३० जून २३ अशी होईल.

कलचुरि

यास कलचुरि, चेदि किंवा त्रैकूटक अशा संज्ञा असून याचा प्रयोग प्राचीन काळीं दक्षिण गुजरात, उत्तर कोंकण, उत्तर महाराष्ट्र, पूर्व मध्य-हिंदुस्थान व उत्तर मध्यप्रांत या प्रदेशांत होऊन गेलेल्या चालुक्य, सेन्द्रक, गूर्जर, त्रैकूटक, कलचुरि, हैहय इत्यादि राजकुलांच्या लेखांत केलेला आढळतो. या कालाचा स्पष्ट निर्देश करणारा अगदीं पहिला लेख २४५ सालचा आणि सर्वोत्तर समजला जाणारा लेख ९६६ सालचा असून तदनंतर हा काल मागें

पडला असावा. याचा आरंभ इ. २४८ मधील कार्तिक शुद्ध प्रतिपदेस झाला असावा असें अगदीं अलीकडील मत असून याचे उल्लेख प्रायः गत वर्षांचे व क्वचित् चालू वर्षांचे आणि महिने पूर्णिमांत असतात. हा काल कोणीं व केव्हां सुरू केला याविषयीं निश्चयात्मक कांहींच सांगतां येत नसल्यानें अनेक तर्क प्रचलित आहेत (एपि. इंडि. २४।११६).

कलियुग

यास भारतयुद्ध संवत् किंवा युधिष्ठिर शक असेंहि म्हणतात. भारतीय युद्ध सुरू असतांच द्वापरयुग संपून कलियुग सुरू झालें व त्या युद्धांत युधिष्ठिरास जय मिळाला. यामुळें या कालास वरील तीन नावें मिळालीं आहेत. याचा आरंभ इ. पू. ३१०२ फेब्रुवारी १८ या दिवशीं रात्रीं १२ किंवा प्रातःकाळीं झाला असें सध्या समजतात. श. १८६९ च्या पंचांगांत याचीं ५०४८ गत वर्षें दिलीं आहेत. अर्थात् याच्या वर्षसंख्येंतून ३१७९ उणे केले असतां शक वर्ष येईल. हा काल चैत्रादि व मेषादि असा दोन्ही प्रकारचा आहे. भारतीय युद्ध केव्हां झालें याबाबत मतभेद आहे. वराहमिहिर बृहत्संहितेंत युधिष्ठिर राज्य करूं लागून २५२६ वर्षें क्रमल्यानंतर शक काल सुरू झाला असें सांगतो. अर्थात् त्याच्या मतें हा काल ६५३ वर्षें अलीकडे ओढला पाहिजे असें ठरतें. पण हें म्हणणें चूक आहे असें राजतरंगिणीकार कल्हण यानें नमूद केलें आहे. पुराणांनीं कलियुग कृष्ण निजधामास गेल्यानंतर सुरू झालें असें सांगितलें असून महाभारताप्रमाणें ही गोष्ट भारतीय युद्धानंतर ५१ वर्षांनीं झाली असें ठरतें. अर्थात् पुराणें व महाभारतांतील कृष्णनिर्याण यांच्या आधारानें बोलावयाचें तर कलियुगाचा आरंभ शकापूर्वीं ३१२८ वर्षें झाला असें मानलें पाहिजे. पण कांहीं पुराणांत परिक्षितीचा जन्म व महापद्म नंद याचा राज्याभिषेक यांत १११५,१०५० किंवा १०१५ वर्षें गेलीं असें सांगितलें असून नंदकुलानें १०० वर्षें राज्य केल्यावर इ. पू. ३२१ च्या सुमारास चंद्रगुप्त मौर्य राज्याधिकारी झाला अशी समजूत असल्यानें त्या पुराणाप्रमाणें इ. सनापूर्वी १५३६, १४७१ किंवा १४३६ या वर्षी परिक्षित् जन्मला असें ठरतें. भारतीय युद्धकालीं तो गर्भांत असल्यानें तें युद्धही बहुधा त्याच सालीं झालें असलें पाहिजे. तात्पर्य पुराणांप्रमाणें भारतीय युद्धकाल फारच अलीकडे येत आहे. पण ऐहोळीच्या शिलालेखाचा पुरावा फार महत्त्वाचा आहे.

त्यांत भारतीय युद्धास आरंभ होऊन ३७३५ कलिकाल गेला असतां व ५५६ शक वर्षें होऊन गेलीं असतां लेखांतील प्रशस्ति केली असें सांगितलें असल्यानें शकापूर्वीं ३१७९ व्या वर्षीं भारतीय युद्ध झालें व कलिकाल सुरू झाला असें तत्कालीन मत असल्याचें स्पष्ट होतें. कलियुग संवताचे उल्लेख आणखी थोड्या ताम्रपट-शिलालेखांतून आले आहेत. उ० जेसलमीरच्या हनुमन्मंदिरांतील लेखांत युधिष्टिर सिंहासनाधिष्टित होऊन ४८९८ वर्षें व शालिवाहन शकाचीं १७१९ वर्षें गेलीं असतां असा उल्लेख आहे. अर्थात् युधिष्टिर व शालिवाहन या कालांतील अंतर ३१७९ वर्षेंच आहे. गोव्याच्या कदंब वंशाच्या लेखांतहि या कालाचे उल्लेख आले आहेत.

कोल्लम्

यास संस्कृत लेखांत कोलंब संवत् किंवा वर्ष आणि तमिळ लेखांत 'कोल्लम् आंडु' (पश्चिमी वर्ष) असें संबोधिलें आहे आणि मलबारांत यास परशुराम संवत् असेंही म्हणतात. कधीं कधीं याचा कोल्लम्च्या उत्पत्तिपासूनचें वर्ष असा निर्देश येतो. त्यावरून असा तर्क होतो कीं, या कालाचा मलबार किनाऱ्यावरील व अतिप्राचीन कालापासून प्रसिद्ध अशा कोल्लम् (क्विलोन) शहराशीं कांहीं तरी निकट संबंध असावा. तो कशा प्रकारचा होता याविषयीं जेवढ्या कल्पना पुढें मांडल्या गेल्या त्या सर्व वादांत टिकूं शकल्या नाहींत. येवढें मात्र खरें कीं, या कालाच्या सर्व निर्देशांचा विचार केला असतां हा इ. ८२४–२५ मध्यें सुरू झाला असें म्हणतां येतें. आणि वीर रविवर्मन्च्या त्रिवेंद्रम् येथील लेखांत कलियुग ४७०२ (वर्तमान) या वर्षाच्या संगतीनें कोल्लम् वर्ष ७७६ दिलें असल्यानें वरील अनुमानाशीं मेळ बसतो (वर्तमान कलि ४७०२ = गत कलि ४७०१–३१०१ = १६०० आणि कोल्लम् ७७६ + ८२४ = १६००). याचीं प्रत्येकीं हजार वर्षांचें एक अशीं अनेक चक्रें आहेत असें समजत. पण इ. १८२५ मध्यें एक चक्र पुरें झाल्यावर नवीन चक्र सुरू न करतां वर्षसंख्या एक हजाराच्या पुढें मोजणें चालू ठेविलें. हा संपूर्ण मलबार किनारा आणि मद्रास इलाख्याचा तिन्नेवेल्लि जिल्हा यांत अजून प्रचलित आहे. याचें वर्ष व महिने सौर असून उत्तर मलबारमध्यें याचा आरंभ कन्या संक्रांतीपासून तर बाकीच्या भागांत सिंह संक्रांतीपासून धरतात. मलबारमध्यें याच्या महिन्यांस संक्रांतींचीं नावें आहेत. पण तिन्नेवेल्लि जिल्ह्यांत चैत्रादि

मासनामांचीं अपभ्रष्ट रूपें मेषादि सौर महिन्यांना लाविलेलीं आहेत. याचें वर्ष प्रायः वर्तमान असतें. याचे निर्देश अनेक लेखांतून आले आहेत.[१]

गांगेय किंवा गंग-कदंब

या कालाचे उल्लेख पौर्व गंग व कदंब वंशी राजपुरुषांच्या लेखांतून येतो. हा कोणी व केव्हां सुरू केला याविषयीं पुष्कळ चर्चा झाली असली तरी तीमधून अजून निश्चित असें कांहीं निष्पन्न झालेलें नाहीं. याचें कारण एक तर याचे उल्लेख असलेले लेख थोडे मिळाले आहेत आणि शिवाय त्या उल्लेखांत एखाद्या परिचित कालाशीं याचा संबंध जोडलेला आढळत नाहीं. याच्या आरंभवर्षाविषयीं अनेकदां मुख्यतः श्री. आर. सुब्बाराव यांनीं चर्चा केली असून त्यांच्या अगदीं ताज्या मताप्रमाणें श. ४१६–१७ किंवा इ. ४९४–४९५ हें या कालाचें आरंभवर्ष धरावें लागतें. पण प्रो. घोष यांचें मत इ. ४९५–९६ हें आरंभवर्ष धरावें असें असून श्री. कृष्णराव हा काल श. ४१९ = इ. ४९७ श्रावण किंवा भाद्रपद या महिन्यांत सुरू झाला असें मानतात (JBHS Vol. V., p. 38.)

गुप्त

ग्रँट डफनें आपल्या 'हिस्ट्री ऑफ दि मराठाज' मध्यें या सनाविषयीं It was likewise at this period (or 1637-1638) that Fusslee year was introduced into the Mahratta country असें वाक्य घातलें आहे (इ. १९२१, लंडन, पृ. १००). यावरून ग्रँट डफला हा काल दक्षिणेंत सुरू होण्यापूर्वी आणखी कोठें तरी अर्थात् मागील संदर्भावरून उत्तरेंत मोगली रियासतीमध्यें चालू होता आणि दक्षिणेंत मात्र तो इ. १६३७-३८ अर्थात् हि. १०४७ मध्यें सुरू झाला असें वाटत असल्याचें दिसून येतें. 'एसेज ऑन इंडियन अँटिक्विटिज्'च्या दुसऱ्या खंडांत शेवटीं 'यूसफुल टेबल्स' हें प्रकरण आहे. या प्रकरणाच्या पोटांत फसली वर्षाची माहिती आली आहे (पृ. १६८). तीमध्यें ग्रंथकर्त्यानें हॅरिंग्टनच्या 'अॅनॅलिसिस् ऑफ दि लँड रेव्हेन्यू रेग्युलेशन्स'मधून पृ. १७६ वरील एक पादटीप आणि कॅप्टन थोरेस्बीनें पुरविलेला बनारसच्या एका सद्गृहस्थाकडे असलेल्या फार्सी पुस्तकामधील उतारा असा द्विविध मजकूर उद्धृत केला आहे. दोहोंचा मेळ घालणें कठीण असलें तरी त्यांचें तात्पर्य हें आहे कीं, फसली वर्ष हिजरी वर्षामुळें होणारा घोटाळा टाळण्यासाठीं हि. ९६३ मध्यें सुरू करण्यांत आलें किंवा नंतर केव्हां तरी सुरू करण्यांत येऊन त्याचा हि. ९६३ शीं मेळ घालण्यांत आला. तसेंच दक्षिणेंतील फसली अकबराच्या फसलीहून दोन वर्षांनीं पुढें आहे. याचें कारण तो अकबराच्या फसलीपेक्षां उशीरां सुरू झाला असला पाहिजे. इ. १८६१ सालीं दिल्लीस छापलेल्या 'घियासुल्लुगात' मध्यें (पृ. ३०४, ३०५) फसली कालाविषयीं माहिती देतांना म्हटलें आहे कीं, अकबराच्या कारकिर्दींत हिजरी वर्षामुळें सारावसुलींत फार घोटाळा होऊं लागल्यानें कांहीं निराळी व्यवस्था सुरू करणें आवश्यक झालें. इतक्यांत हि. ९७१ मोहरम व खरीफाचा हंगाम यांचा एकदमच आरंभ झाल्यामुळें त्यासच फसली नांव दिलें; आणि तेव्हांपासून सौर मानानें वर्षगणना करूं लागले. 'कावसजी पटेल्स क्रॉनॉलॉजी' (पृ. ५०) मध्यें फसलीची माहिती जवळजवळ शब्दशः प्रिन्सेपच्या यूसफुल टेबल्समधून उतरून घेतली आहे. पण ऋण नमूद केलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. अर्थात्

तेथील माहितींत नवीन असें कांहींच नाहीं. मात्र या पुस्तकांत पुढें जीं कोष्टकें दिलीं आहेत त्यांत १ लें फसली वर्ष इ. स. ५९२ समोर मांडून दाखविलें आहे. तेव्हां ग्रंथकर्त्यास प्रिन्सेपचा अभिप्राय समजला होता कीं नाहीं हेंच कळत नाहीं. 'बुक ऑफ इंडियन ईराज' या पुस्तकांत (पृ. ८२) प्रिन्सेपचा अगदीं थोडक्यांत अनुवाद केला आहे. यामुळें त्याविषयीं येथें अधिक कांहीं सांगण्याची जरूरी नाहीं. 'इंडियन कॅलेंडर 'मध्यें फसली सनाची माहिती देतांना (पृ. ४४) प्रथमच This is the harvest year introduced, as some say, by Akbar' असें विधान केलें असून पुढें It's epoch is apparently A. H. 963 असें सांगितलें आहे. दक्षिणेंतील फसली सनाविषयीं तेथें In Southern India the Fasali year 1302 began on June 5th, 1892 in Bombay and on July 1st 1892 in Madras. It will be seen, therefore, that it is about two years and a quarter in advance of Bengal' अशी माहिती दिली आहे. 'हॉब्सन जॉब्सन' मध्यें (लंडन, १९०३, पृ. ३५९) प्रस्तुत सनाची माहिती देतांना Three at least of these eras [varieties of Fasly era] were established by Akbar applying to different part of his dominions......and commencing in each case with the Hijra year of his accession to the throne (963 = 1555–56) though the month of commencement varies (Ain, Jarret II, 30) अशीं विधानें केलीं आहेत. यावरून या पुस्तकाचे संपादक यूल व बर्नेल यांचें फसली सनाविषयीं मत कसें होतें हें स्पष्ट ठरतें. येथें आईन-इ-अक्बरीचा आधार दिला आहे तो फसली सनाच्या वरील माहितीकरितां असेल तर तो मात्र साफ चुकला आहे. प्राचीन लिपिमाला (पृ. १९२) या पुस्तकांत फसली सनाविषयीं पुढील माहिती दिली आहे 'दोनों फस्लों (रबी और खरीफ)का हासिल नियत-महीनोंमें लेनेमें सुभीता देखकर बादशाह अकबरने हिजरी सन ९७१ (ई. स. १५६३ = वि. सं. १६२०) से यह सन जारी किया. इसीसे इसको फसली सन कहतें हैं. सन तो हिजरी (९७१) ही रखवा गया परंतु महीने सौर

(या चांद्रसौर) माने गये जिससे इसका वर्ष सौर (या चांद्रसौर) वर्षके बराबर हो गया... दक्षिणमें इसका प्रचार बादशाह शाहजहांके समय हिजरी सन १०४६ (ई. स. १६३६ = वि. सं. १६९३) से हुआ और वहा इसका प्रारंभ उसी सनसे गिना गया जिससे उत्तरी और दक्षिणी फसली सनोंके बीच करीब सवादो वर्ष का अंतर पड गया.' जगनलाल गुप्त यांनीं आपल्या 'संसार के सम्वत्' या पुस्तकांत (बुलंदशहर, वि. सं. १९८१, पृ. ६१) फसली सनाविषयों बरीच माहिती दिली आहे. तिचें तात्पर्य असें–आईन–इ–अक्बरीमध्यें लिहिलें आहे कीं, फसली सौर वर्ष असून त्याचा पिकांशीं संबंध आहे. हिजरी सनाचा हंगामाशीं नीट हिशेब न बसल्यानें जमीनधारा वसूल करणें सुलभ जाईना. यासाठीं अकबरानें सौर हिजरी वर्ष सुरू करून त्याचें नांव फस्ली ठेविलें. याची सुरवात त्याच्या राज्याभिषेकानंतर झाली असली तरी त्याची मोजणी राज्याभिषेकाच्याही पूर्वीपासून करावी अशी त्यानें आज्ञा दिली होती. अकबरानें दोन्ही काल १ मुहर्रम ९६२ हिजरीपासून मोजण्यास सुरवात केली होती. अकबरानंतर ८० वर्षांनीं शाहजहाननें हि. १०४४ मध्यें दक्षिणेंतील कांहीं प्रदेश जिंकल्यानंतर तेथें नवीन फसली सन सुरू केला. त्याचाही आरंभ १०४४ मधून ८० वर्षें कमी करून ९६४ सालीं झाला.

वर दिलेल्या उताऱ्यांवरून येवढें स्पष्ट होतें कीं, उल्लिखित बहुतेक ग्रंथकारांच्या मतें फसली साल उत्तरेंत अकबरानें सुरू केलें व दक्षिणेंत शाहजहाननें इ. १६३६ च्या आसपास चालू केलें. तपशीलाच्या बाबतींत पुष्कळ फरक आहे. पण वरील दोन विधानांत एकमत आहे हें निश्चित.

अकबराविषयीं तपशीलवार माहिती देणारे ग्रंथ पुष्कळ असले तरी त्यांत आईन–इ–अक्बरी, अक्बरनामा, मुन्तखबुत्तवारीख, तबकात–इ–अक्बरी हे प्रकाशित व प्रमुख ग्रंथ आहेत. पैकीं आईन–इ–अक्बरीमध्यें अकबरानें आपल्या राज्यकारभारविषक केलेल्या व्यवस्थेची व तदनुषंगिक इतर माहिती आली आहे. तींत अकबराचे कालांत सुरू असलेले विविध काल व अकबरानें सुरू केलेला इलाही काल यांविषयीं विवेचन आहे. पण त्यांत कोठेंही फसली सनाचा निर्देश नाहीं.[१] पिकांवर अवलंबून असलेला जमीन-महसूल व अनेक वसुलाच्या बाबी आणि लोकव्यवहार यांत हिजरी सनामुळें

१ मूळ खंड १, पृ. २६५–२७७; भाषांतर व्हॉ. १, पृ. १–३०.

घोटाळे होऊं लागल्यानें अकबरानें हि. ९९२ मध्यें किंवा स्वराज्याभिषेकाच्या २९ व्या वर्षी सौर वर्ष व महिने असलेला इलाही काल प्रचारांत आणला हें मात्र त्यांत सांगितलें आहे.[१] अक्बरनाम्यामध्यें या सनाची माहिती सांगतांना आईन-इ-अक्बरीमधील तपशीलांत राहिलेल्या उणीवा दूर करून याविषयीं निघालेलें फर्मान उध्दृत केलें आहे. पण फसली सनाचा उल्लेख कोठेंही नाहीं[२]. निजामुद्दीन अहमदच्या तब्कात-इ-अक्बरीमध्यें इलाही सन सौर असून त्याचा आरंभ हि. ९६३ रबिलारवर २७ ला झाला येवढेंच सांगितलें आहे[३]. अब्दुल-कादिर बदाऊनीच्या मुन्तखबुत्तवारीखमध्यें इलाही सनाची माहिती दिल्याचें माझ्या आढळांत आलें नाहीं. तेव्हां फसली गणना अकबरानें सुरू केली हें विधान कशाचा आधारवर केलें गेलें हेंच समजत नाहीं.

दक्षिणेंत फसली सन कोणी व केव्हां सुरू केला याविषयीं रूढ समजूत वर दिली आहे. पण प्रत्यक्ष निर्देश पाहिले तर ती समजूत टिकूं शकत नाहीं. उदारणार्थ मी पुढें शुहूर-सन सदरांत दिलेल्या निर्देशांपैकीं शिवसा खंड ४ ले. ६९१ व भा. इ. सं. मंडळ इतिवृत्त श. १८३४ पृ. १३९ या ठिकाणचे फसली वर्षाचे उल्लेख १०३९ व १०३७ असे असल्यानें ते १०४६ च्या अनुक्रमें ७ व ९ वर्षें पूर्वींचे आहेत. म्हणजे दक्षिणेंत हा काल हि. १०४६ सालीं फसलीचेंही तेंच वर्ष धरून सुरू केला हें म्हणणें लटकें पडतें. तात्पर्य, दक्षिणेंत हें साल केव्हां सुरू झालें याचा आज निश्चय होऊं शकत नाहीं. सर्वांत जुना उल्लेख कोणत्या वर्षाचा मिळतो यावर तो निर्णय अवलंबून राहील.

फसली, सुहूर इत्यादि काल कसे सुरू झाले हें पाहण्यासारखें आहे. मुसलमान लोकांचा धर्मवेडेपणा लक्षांत घेतां त्यांनीं प्रथम प्रथम निव्वळ धार्मिक अशा हिजरी सनाबद्दल मोठा आग्रह धरला असेल. पण तें केवळ चांद्र वर्ष (३५४॥ दिवस) आहे. त्यांत सौर वर्षाशीं (४६५। दिवस) मेळ घालण्याची कांहीं युक्ति नाहीं. यामुळें त्या वर्षाचा आरंभ प्रत्येक वर्षी सुमारें ११ दिवसांनीं अलीकडे येऊं लागतो आणि सुमारें २॥-३ वर्षांत एक महिना अलीकडे येतो. पूर्वी शेतीवरील धान्यरूपानें मिळणारा कर ही सरकारी उत्पन्नाची मुख्य बाब

---

१ उपर्युक्त आधाराचीं शेवटचीं पानें. २ मूळ खंड २, पृ. ९-१३, १८; भाषांतर खंड २, पृ. १५-२४, ३२. ३ भाषांतर खंड २, पृ. २०९.

होती. पिकें पावसावर अवलंबून असतात आणि पाऊस तर सूर्यानें उत्पन्न केलेल्या ऋतूंशीं संबद्ध आहे. तेव्हां पिकें सहजच सूर्याच्या भासमान गतीशीं किंवा सौर वर्षाशीं निगडित आहेत. यामुळें चांद्रवर्षाच्या मानानें ठरविलेला करवसूलीचा काल पिकें तयार होण्याच्या मानानें अधिकाधिक अगोदर येऊं लागला. अर्थात् पिकें तयार होण्यापूर्वीच धान्यरूपानें करवसूली होणें शक्यच नव्हतें. म्हणून विशेषतः करवसुलीवरच कोणत्याही जुन्या सरकारचें जीवन अवलंबून असल्यामुळें महसुलाचे बाबतींत प्रत्येक सरकारला चांद्रमान टाकून देऊन सौरमान स्वीकारणें भाग पडलें. याचा परिणाम असा झाला कीं, कोणताही मुसलमानी देश घेतला तरी त्यांत हिजरी कालास केवळ धार्मिक दृष्ट्या महत्त्व राहिलें असून लोकव्यवहारांत कोणत्याना कोणत्या रूपांत सौरवर्षासच एकमेव स्थान मिळालें आहे. हिंदुस्थानांत सौरमान किंवा चांद्रसौर मान मुसलमानपूर्वकालांत सर्रास प्रचारांत होतेंच; पण मुसलमान येथें राज्यकर्ते म्हणून नांदूं लागल्यावर त्यांनीं येथें शुहूर, फसली, विलायती, अमली, इलाही इत्यादि तत्वतः एकच पण नामरूपतः भिन्न असे अनेक काल सुरू केले. पैकीं अगदीं थोडे अद्याप संस्थानांतून चालू आहेत. बाकी बहुतेक ब्रिटिश हिंदुस्थानांत इसवी सनाचा प्रचार चालू झाल्यानें मागें पडले.

बार्हस्पत्य वर्षचक्र (बारा वर्षांचें)

याचा संबंध गुरूच्या गतीशीं असल्यामुळें यास हें नांव पडलें. गुरूच्या उदयापासून दुसऱ्या उदयापर्यंत (सु. ४०० दिवस) याचें वर्ष धरलें जातें. यामुळें याचें वर्ष सौर वर्षाहून मोठें आहे. १२ सौर वर्षांत याचीं अदमासें ११ वर्षें होतात आणि सौर वर्षांशीं तर मेळ घातला पाहिजे. म्हणून सुमारें बारा वर्षांतून एकदां याचें एक संवत्सरनाम गाळतात. या चक्रांतील वर्षांना महाकार्तिक, महामार्गशीर्ष किंवा क्वचित् नुसतीं कार्तिक, मार्गशीर्ष इत्यादि नांवें आहेत. वर्षचक्राचा आरंभ बहुधा महाकार्तिकापासून होत असावा. पण हा बार्हस्पत्य कालाचा गणितागत प्रकार होय. ढोबळ किंवा मध्यममान प्रकारांत बारा वर्षांस बारा नांवें देऊन व चक्र पुरें करून तेरावे वर्षीं पुन्हा नवें चक्र जारी करतात. या पद्धतींत कोणत्या वर्षीं कोणतें संवत्सरनाम यावयाचें तें ठरलेलें आहे. त्यांचें कोष्टक असें—

१. ४ प्रमोद, १६ चित्रभानु, २८ जय, ४० पराभव, ५२ कालयुक्त.

२. ५ प्रजापति, १७ सुभानु, २९ मन्मथ, ४१ प्लवंग, ५३ सिद्धार्थी.
३. ६ अंगिरा, १८ तारण, ३० दुर्मुख, ४२ कीलक, ५४ रौद्र.
४. ७ श्रीमुख, १९ पार्थिव, ३१ हेमलंबी, ४३ सौम्य, ५५ दुर्मति.
५. ८ भाव, २० व्यय, ३२ विलंबी, ४४ साधारण, ५६ दुंदुभि.
६. ९ युवा, २१ सर्वजित्, ३३ विकारी, ४५ विरोधकृत्, ५७ रुधिरोद्गारी.
७. १० धाता, २२ सर्वधारी, ३४ शार्वरी, ४६ परिधावी, ५८ रक्ताक्ष.
८. ११ ईश्वर, २३ विरोधी, ३५ प्लव, ४७ प्रमादी, ५९ क्रोधन.
९. १२ बहुधान्य, २४ विकृती, ३६ शुभकृत्, ४८ आनंद, ६० क्षय.
१०. १३ प्रमाथी, २५ खर, ३७ शोभन, ४९ राक्षस, १ प्रभव.
११. १४ विक्रम, २६ नंदन, ३८ क्रोधी, ५० नल–अनल, २ विभव.
१२. १५ वृष–भ, २७ विजय, ३९ विश्वावसु, ५१ पिंगल, ३ शुक्ल.

या प्रत्येक ओळींतील संवत्सरांस अनुक्रमें १ महाकार्तिक, २ महामार्गशीर्ष, ३ महापौष, ४ महामाघ, ५ महाफाल्गुन, ६ महाचैत्र, ७ महावैशाख, ८ महाज्येष्ठ, ९ महाआषाढ, १० महाश्रावण, ११ महाभाद्रपद, १२ महाआश्विन, हीं नांवें देतात.

इ. ६०० अखेरच्या प्राचीन लेखांत या संवत्सरनामांचा निर्देश आढळतो. पुढें तो प्रायः लुप्त झाला. सध्या उत्तरेंतील कांहीं पंचांगांत मात्र याचा निर्देश केलेला असतो. उदा. पं. श्रीधर शिवलाल यांच्या वि. सं.१९६५–६६–७४–७५ या वर्षींच्या पंचागांत या कालाचीं अनुक्रमें पौष, फाल्गुन, आश्विन व कार्तिक अशीं नांवें आहेत. अर्थात् वि. स. १९६६ मध्यें माघ संवत्सराचा क्षय झाला हें उघड आहे.

बार्हस्पत्य वर्षचक्र (साठ वर्षांचें)

हें एक साठ वर्षांचें चक्र असून यांतील प्रत्येक वर्षाला एकेक नांव आहे. त्यास संवत्सर म्हणतात. गुरूला एक राशि अंतर तोडण्यास जो काल लागतो तोच या चक्रांतील एका वर्षाचा काल होय. एक सौर वर्ष सूर्यसिद्धांताप्रमाणें अदमासें ३६५.२५८७ दिवसांचें आणि बार्हस्पत्य वर्ष ३६१.०२६७ दिवसांचें असतें. अर्थात् कोणत्याही एका वेळीं हीं दोन्ही वर्षे एकदमच सुरू झालीं तर ८५ किंवा ८६ वर्षांनीं असें सौर वर्ष येईल कीं, त्याच्या आरंभीं अगदीं संपत आलेलें बार्हस्पत्य वर्ष असेल, नंतर २।३ दिवसांत नवीन

बार्हस्पत्य वर्ष सुरू होईल आणि सौर वर्ष संपण्यापूर्वी पुन्हा नवीन बार्हस्पत्य वर्ष चालू होईल. उदाहरणार्थ गत शक १७७८ च्या आरंभीं प्रभव नांवाचें बार्हस्पत्य संवत्सर सुरू होतें. ३.३ दिवसांनीं तें संवत्सर संपून विभव नांवाचें बार्हस्पत्य वर्ष लागलें. हें सौर वर्षारंभापासून ३६४.३ दिवसांनीं संपलें व शुक्ल नांवाचें बार्हस्पत्य वर्ष चालू झालें. याचा अर्थ असा कीं, गत शक १७७८ सुरू होतांना प्रभव संवत्सर होतें आणि गत शक १७७९ सुरू होतांना शुक्ल संवत्सर चालू होतें. अर्थात् विभव संवत्सराचा क्षय झाला असें मानलें पाहिजे.

प्रथम प्रथम उत्तरेंत निरपवाद व दक्षिणेंत विकल्पानें क्षय संवत्सर मानण्याची पद्धति होती; पण पुढें दक्षिणेंत श. ८३० मध्यें ही पद्धत्ति लुप्त होऊन उत्तरेंत मात्र चालू राहिली. यामुळें उत्तरेंतील संवत्सरनामें व दक्षिणेंतील संवत्सरनामें एकमेकांशीं जुळत नाहींत. यासाठीं पुढें शक व संवत्सर नामें यांचीं दक्षिणी व उत्तरी अशीं दोन्हीं प्रकारचीं कोष्टकें दिलीं आहेत. शक किंवा विक्रम वर्षाबरोबर संवत्सरनाम देण्याची पद्धति फार प्राचीन असल्यामुळें कोष्टकें फार प्राचीन कालापासूनचीं दिलीं आहेत. संवत्सरनामांचे श्लोक असे—

१ प्रभवो २ विभवः ३ शुक्लः ४ प्रमोदोऽथ ५ प्रजापतिः ।
६ अंगिराः ७ श्रीमुखो ८ भावो ९ युवा १० धाता तथैव च ।।
११ ईश्वरो १२ बहुधान्यश्च १३ प्रमाथी १४ विक्रमो १५ वृषः ।
१६ चित्रभानुः १७ सुभानुश्च १८ तारणः १९ पार्थिवो २० व्ययः ।।
२१ सर्वजित् २२ सर्वधारी च २३ विरोधी २४ विकृतिः २५ खरः ।
२६ नन्दनो २७ विजयश्चैव २८ जयो २९, ३० मन्मथदुर्मुखौ ।।
३१ हेमलंबी ३२ विलंबी च ३३ विकारी ३४ शार्वरी ३५ प्लवः ।
३६ शुभकृत् ३७ शोभनः ३८ क्रोधी ३९, ४० विश्वावसुपराभवौ ॥
४१ प्लवंगः ४२ कीलकः ४३ सौम्यः ४४, ४५ साधारणविरोधकृत् ।
४६ परिधावी ४७ प्रमादी च ४८ आनंदो ४९ राक्षसो ५० ऽनलः-नलः ।।
५१ पिंगलः ५२ कालयुक्ताक्षः ५३ सिद्धार्थी ५४, ५५ रौद्रदुर्मती ।
५६ दुंदुभी ५७ रुधिरोद्गारी ५८ रक्ताक्षः ५९ क्रोधनः ६० क्षयः ।।

वर जीं संवत्सरनामें दिलीं आहेत, त्यांसंबंधीं कांहीं विशेष ध्यानांत ठेविले पाहिजेत. (१) राक्षसोऽनलः असा पाठ आहे. जुन्या पोथ्यांमधून पुष्कळ वेळां अवग्रह गाळतात. संवत्सरनामांचे श्लोक लिहितांनाही अवग्रह असल्यास

अनेकदां गाळला गेला असावा. यामुळें कित्येक शतकांच्या पूर्वींपासून पन्नासाव्या संवत्सराचें नांव नल कीं अनल असा प्रश्न उत्पन्न होऊन दोन पाठ बनले आणि लेखक आवडीप्रमाणें नल किंवा अनल असें संवत्सरनाम लिहूं लागले. लेख व पोथ्या यांत दोन्ही पाठ सांपडतात. कधीं कधीं एखाद्या संवत्सरनामाबद्दल तदर्थवाचक पर्यायनाम योजिलेलें आढळतें. उदाहरणार्थ वृष (१५) व क्रोधन (५९) ऐवजीं वृषभ व मन्यु असे पर्यायशब्द वापरले आहेत. अज्ञानामुळें कधीं कधीं उपर्युक्त श्लोकांतील पादपूरणार्थकें मागील संवत्सरनामांत मिळविलीं गेल्याचें आढळतें. उदाहरणार्थ प्रमोद (४) व प्रमादी (४७) ऐवजीं प्रमोदूत (=प्रमोदोऽथ) व प्रमादीच असे प्रयोग केले आहेत.

क्षय संवत्सराची भानगड नसलेल्या किंवा सामान्यतः दक्षिणी म्हटल्या जाणाऱ्या पद्धतीप्रमाणें गत शकवर्ष व त्याशीं जुळणारें संवत्सर यांचें कोष्टक असें—

१३ प्रमाथी	१	६१	१२१	१८१	२४१
१४ विक्रम	२	६२	१२२	१८२	२४२
१५ वृष-भ	३	६३	१२३	१८३	२४३
१६ चित्रभानु	४	६४	१२४	१८४	२४४
१७ सुभानु	५	६५	१२५	१८५	२४५
१८ तारण	६	६६	१२६	१८६	२४६
१९ पार्थिव	७	६७	१२७	१८७	२४७
२० व्यय	८	६८	१२८	१८८	२४८
२१ सर्वजित्	९	६९	१२९	१८९	२४९
२२ सर्वधारी	१०	७०	१३०	१९०	२५०
२३ विरोधी	११	७१	१३१	१९१	२५१
२४ विकृति	१२	७२	१३२	१९२	२५२
२५ खर	१३	७३	१३३	१९३	२५३
२६ नंदन	१४	७४	१३४	१९४	२५४
२७ विजय	१५	७५	१३५	१९५	२५५
२८ जय	१६	७६	१३६	१९६	२५६
२९ मन्मथ	१७	७७	१३७	१९७	२५७

३० दुर्मुख	१८	७८	१३८	१९८	२५८
३१ हेमलंब-बी	१९	७९	१३९	१९९	२५९
३२ विलंब-बी	२०	८०	१४०	२००	२६०
३३ विकारी	२१	८१	१४१	२०१	२६१
३४ शार्वरी	२२	८२	१४२	२०२	२६२
३५ प्लव	२३	८३	१४३	२०३	२६३
३६ शुभकृत्	२४	८४	१४४	२०४	२६४
३७ शोभन	२५	८५	१४५	२०५	२६५
३८ क्रोधी	२६	८६	१४६	२०६	२६६
३९ विश्वावसु	२७	८७	१४७	२०७	२६७
४० पराभव	२८	८८	१४८	२०८	२७८
४१ प्लवंग	२९	८९	१४९	२०९	२६९
४२ कीलक	३०	९०	१५०	२१०	२७०
४३ सौम्य	३१	९१	१५१	२११	२७१
४४ साधारण	३२	९२	१५२	२१२	२७२
४५ विरोधकृत्	३३	९३	१५३	२१३	२७३
४६ परिधावी	३४	९४	१५४	२१४	२७४
४७ प्रमादी-च	३५	९५	१५५	२१५	२७५
४८ आनंद	३६	९६	१५६	२१६	२७६
४९ राक्षस	३७	९७	१५७	२१७	२७७
५० नल, अनल	३८	९८	१५८	२१८	२७८
५१ पिंगल	३९	९९	१५९	२१९	२७९
५२ कालयुक्ताक्ष	४०	१००	१६०	२२०	२८०
५३ सिद्धार्थी	४१	१०१	१६१	२२१	२८१
५४ रौद्र	४२	१०२	१६२	२२२	२८२
५५ दुर्मति	४३	१०३	१६३	२२३	२८३
५६ दुंदुभि	४४	१०४	१६४	२२४	२८४
५७ रुधिरोद्गारी	४५	१०५	१६५	२२५	२८५
५८ रक्ताक्ष	४६	१०६	१६६	२२६	२८६

५९ क्रोधन, मन्यु	४७	१०७	१६७	२२७	२८७
६० क्षय	४८	१०८	१६८	२२८	२८८
१ प्रभव	४९	१०९	१६९	२२९	२८९
२ विभव	५०	११०	१७०	२३०	२९०
३ शुक्ल	५१	१११	१७१	२३१	२९१
४ प्रमोद-दूत	५२	११२	१७२	२३२	२९२
५ प्रजापति	५३	११३	१७३	२३३	२९३
६ अंगिरा	५४	११४	१७४	२३४	२९४
७ श्रीमुख	५५	११५	१७५	२३५	२९५
८ भाव-वा	५६	११६	१७६	२३६	२९६
९ युवा	५७	११७	१७७	२३७	२९७
१० धाता	५८	११८	१७८	२३८	२९८
११ ईश्वर	५९	११९	१७९	२३९	२९९
१२ बहुधान्य	६०	१२०	१८०	२४०	३००

वर गत शक १-३०० शीं अनुरूप संवत्सरनामें मांडून दाखविलीं आहेत. ३०० हून अधिक अशा कोणत्याही शक वर्षाशीं अनुरूप संवत्सराचें नांव पहावयाचें असल्यास शकवर्षाच्या संख्येंतून ३०० ची सर्वांत मोठी पट उणे करून राहिलेल्या संख्येशीं जुळतें संवत्सरनाम पाहिलें म्हणजे इष्ट संवत्सरनाम मिळेल. चालू शकवर्षाशीं जुळतें संवत्सरनाम पाहिजे असल्यास वर्षसंख्येंतून एक उणा करून बाकी राहिलेल्या संख्येशीं जुळतें संवत्सरनाम पहावें.

यापुढें निरनिराळ्या सिद्धांतांप्रमाणें कोणत्या गत शकवर्षी कोणत्या संवत्सराचा क्षय झाला अर्थात् त्या शकवर्षास निर्दिष्ट संवत्सरापुढील नांव मिळालें त्यांची यादी देत आहे. तिचा उलगडा होण्यासाठीं पुढील गोष्टी नीट लक्षांत घेतल्या पाहिजेत. (१) बीजरहित सूर्यसिद्धांताच्या यादीच्या अगदीं आरंभीं –२३ = ४० पराभव अशी नोंद आहे. हिचा अर्थ असा कीं,–२३ या गत शकवर्षी ४० वें संवत्सर पराभव हें क्षय असल्यानें त्या वर्षाशीं जुळतें संवत्सरनाम ४१ प्लवंग हें येईल. सबीज सूर्यसिद्धांताच्या यादीमध्यें अगदीं आरंभीं १४३७ = १६ चित्रभानु अशी नोंद आहे. हिचा अर्थ गत शक १४३७ ला १६ वें चित्रभानु संवत्सर क्षय असल्यानें श. १४३७ शीं जुळतें संवत्सर

सुभानु येईल. (२) या यादींतील आकडे मध्यममानानें मध्यम मेष संक्रांति आणि स्पष्ट मानानें मध्यम् व स्पष्ट मेष संक्रांति यांचा आरंभ होतांना कोणतें संवत्सर होतें हें पाहून मग केव्हां कोणतें संवत्सर क्षय होतें तें दाखवीत आहेत. (३) एका पूर्ण नोंदीपुढें अर्धविराम व अर्ध्या नोंदीपुढें स्वल्पविराम घातला आहे. (४) सामान्यतः प्रत्येक एकसंधी नोंद मध्यममान मध्यम मेषसंक्रातीची आहे असें समजावें. शिवाय बीजरहित सूर्यसिद्धांताच्या बाबतींत २३४ ते १५९९, सबीज सूर्यसिद्धांताच्या बाबतींत १४३७ ते १७७९, प्रथम आर्यसिद्धांताच्या बाबतींत ४८६ ते १७६५, द्वितीय आर्यसिद्धांताच्या बाबतींत ४१३ ते १७७८ आणि ब्रह्मसिद्धांत व सिद्धांतशिरोमणि यांच्या बाबतींत ४८६ ते १७६४ पर्यंतच्या अशा नोंदी स्पष्टमान आणि मध्यम व स्पष्ट मेष-संक्रांतीच्याही आहेत. एका नोंदीचे दोन भाग असतील तेथें पूर्वभाग स्पष्टमान मध्यम मेषसंक्रांतीच्या गणिताचा व उत्तरभाग स्पष्टमान स्पष्ट मेषसंक्रातीच्या गणिताचा समजावा. शिवाय अशा नोंदींतील सामान्यतः पूर्वभाग मध्यम मान मध्यम मेषसंक्रातीचा आहे. फक्त द्वितीय आर्यसिद्धांताच्या यादींत उत्तर-भाग मध्यममान मध्यम मेषसंक्रांतीच्या हिशेबाचा आहे. (५) मूल सूर्यसिद्धांतांत सर्व मान मध्यम आहे. (६) याच यादीवरून येथें अनिर्दिष्ट अशा गत शकवर्षांशीं जुळतें संवत्सरनाम सहज काढतां येईल. उदा. गत शक ८०० शीं जुळतें मूल सूर्यसिद्धांतानुसारी संवत्सरनाम कोणतें येईल हें काढा-वयाचें. श. ७४६ = ३७ शोभनाचा क्षय; म्हणून ७४६ = ३८ क्रोधी; ७४६ + ५४ = ८००; ३८ + ५४ = ९२; ९२ – ६० = ३२ विलंबी हें उत्तर.

निरनिराळे सिद्धांत व मानें यांच्या अनुरोधानें विशिष्ट कालमर्यादेंतील क्षय संवत्सरें कां दिलीं हें समजण्यास उपयोगी पडणारी आवश्यक माहिती येथें देतों. हे सिद्धांत, त्यांचे कर्ते, त्यांचे काल व त्यांचीं एकमेकांशीं नातीं अशीं—(१) मूलसूर्यसिद्धांत—?–?–?, (२) मूल–प्रथम आर्यसिद्धांत—?–श. ४२१–?, (३) ब्रह्मसिद्धांत–ब्रह्मगुप्त–श. सु. ५५०–?, (४) बीजयुक्त आर्यसिद्धांत–लल्ल–श. सु. ५६०–?, (५) महा–द्वितीय–आर्यसिद्धांत–?–श. सु. ८७२–?, (६) सूर्यसिद्धांत–?–?. सु. श. ९२२=सु. इ. १००० वर्षा-नंतर (१)ला मागें टाकिलें, (७) राजमृगांक–?–श. ९६४–ब्रह्मसिद्धांताचा अनुयायी, (८) करणप्रकाश = लल्लटीका–?–श. १०१४–?, (९) सिद्धांत

शिरोमणि–भास्कराचार्य–श. १०७२–ब्रह्मसिद्धांतानुयायी (थोड्या फरकानें), (१०) सूर्यसिद्धांत (सबीज)–?–?–?.

हे सिद्धांत व यांचीं कोणतीं मानें केव्हां चालत याची ढोबळ माहिती अशी– (१) श. ९७२ पूर्वी सामान्यतः सर्वत्र मध्यम मान व नंतर कांहीं वर्षे कोठें मध्यम तर कोठें स्पष्ट मान; (२) श. ४२१–५५० प्रथम आर्यसिद्धांताचा प्रचार, श. ५५०–९२२ आर्य व ब्रह्म सिद्धांतांचा प्रचार; (३) श. ९२२ ते १०७२ पर्यंत आर्य, ब्रह्म व सूर्य या तिन्ही सिद्धांतांचा व दोन्ही मानांचा प्रचार; (४) श. १०७२ नंतर कांहीं वर्षे आर्य व सूर्य हे सिद्धांत व सिद्धांत-शिरोमणि यांच्या दोन्ही मानांचा प्रचार; श. १३०० नंतर सर्वत्र मुख्यतः स्पष्टमानाचा प्रचार; (५) श. १३६२ पासून बीजयुक्त सूर्यसिद्धांताचा प्रचार; (६) श. १६०० नंतर बीजरहित सूर्यसिद्धांत व मूल सूर्यसिद्धांत दोहोंचाही प्रचार बंद पडतो. पुढें दिलेलीं अधिक मासांचीं कोष्टकें वरील गोष्टी गृहीत धरून दिलेलीं आहेत.

सूर्यसिद्धांत (बीजरहित): –२३ = ४० पराभव; ६३ = ६ अंगिराः; १४८ = ३२ विलंब, १४९ = ३३ विकारी; २३४ = ५९ क्रोधन; ३१९ = २५ खर, ३२० = २६ नंदन; ४०४ = ५१ पिंगल, ४०५ = ५२ कालयुक्त; ४९० = १८ तारण; ५७५ = ४४ साधारण, ५७६ = ४५ विरोधकृत्; ६६० = १० धाता, ६६१ = ११ ईश्वर; ७४६ = ३७ शोभन; ८३१ = ३ शुक्ल; ९१६ = २९ मन्मथ, ९१७ = ३० दुर्मुख; १००२ = ५६ दुंदुभि; १०८७ = २२ सर्वधारी; ११७२ = ४८ आनंद, ११७३ = ४९ राक्षस; १२५८ = १५ वृष; १३४३ = ४१ प्लवंग; १४२८ = ७ श्रीमुख, १४२९ = ८ भाव; १५१३ = ३३ विकारी, १५१४ = ३४ शार्वरी; १५९९ = ६० क्षय.

सूर्यसिद्धांत (सबीज): –१४३७ = १६ चित्रभानु; १५२२ = ४२ कीलक, १५२३ = ४३ सौम्य; १६०८ = ९ युवा; १६९३ = ३५ प्लव, १६९४ = ३६ शुभकृत्; १७७९ = २ विभव; १८६४ = २८ जय; १९५० = ५५ दुर्मति.

सूर्यसिद्धांत (मूल): –२३ = ४० पराभव; ६३ = ६ अंगिराः; १४९ = ३३ विकारी; २३४ = ५९ क्रोधन; ३१९ = २५ खर; ४०५ = ५२ कालयुक्त; ४९० = १८ तारण; ५७५ = ४४ साधारण; ६६० = १० धाता;

७४६ = ३७ शोभन; ८३१ = ३ शुक्र; ९१६ = २९ मन्मथ; १००२ = ५६ दुंदुभि; १०८७ = २२ सर्वधारी; ११७२ = ४८ आनंद; १२५८ = १५ वृष; १३४३ = ४१ प्लवंग; १४२८ = ७ श्रीमुख; १५१४ = ३४ शार्वरी; १५९९ = ६० क्षय.

आर्यसिद्धांत (प्रथम): −२६ = ३७ शोभन; ६० = ३ शुक्र; १४५ = २९ मन्मथ; २३१ = ५६ दुंदुभि; ३१६ = २२ सर्वधारी; ४०१ = ४८ आनंद; ४८६ = १४ विक्रम, ४८७ = १५ वृष; ५७२ = ४१ प्लवंग; ६५७ = ७ श्रीमुख; ७४२ = ३३ विकारी; ८२७ = ५९ क्रोधन, ८२८ = ६० क्षय; ९१२ = २५ खर, ९१३ = २६ नंदन; ९९८ = ५२ कालयुक्त; १०८३ = १८ तारण; ११६८ = ४४ साधारण, ११६९ = ४५ विरोधकृत; १२५३ = १० धाता, १२५४ = ११ ईश्वर; १३३९ = ३७ शोभन; १४२४ = ३ शुक्र; १५०९ = २९ मन्मथ, १५१० = ३० दुर्मुख; १५९४ = ५५ दुर्मति, १५९५ = ५६ दुंदुभि; १६७९ = २१ सर्वजित्, १६८० = २२ सर्वधारी; १७६४ = ४७ प्रमादी, १७६५ = ४८ आनंद; १८५० = १४ विक्रम; १९३५ = ४० पराभव.

आर्यसिद्धांत (द्वितीय): −१५ = ४८ आनंद, −१४ = ४९ राक्षस; ७२ = १५ वृष; १५७ = ४१ प्लवंग; २४२ = ७ श्रीमुख, २४३ = ८ भाव; ३२८ = ३४ शार्वरी; ४१३ = ६० क्षय; ४९८ = २६ नंदन; ५८४ = ५३ सिद्धार्थी; ६६९ = १९ पार्थिव; ७५४ = ४५ विरोधकृत्, ७५५ = ४६ परिधावी; ८३९ = ११ ईश्वर, ८४० = १२ बहुधान्य; ९२५ = ३८ क्रोधी; १०१० = ४ प्रमोद, १०११ = ५ प्रजापति; १०९५ = ३० दुर्मुख, १०९६ = ३१ हेमलंब; ११८१ = ५७ रुधिरोद्गारी; १२६६ = २३ विरोधी, १२६७ = २४ विकृति; १३५१ = ४९ राक्षस, १३५२ = ५० नल; १४३७ = १६ चित्रभानु; १५२२ = ४२ कीलक; १६०७ = ८ भाव, १६०८ = ९ युवा; १६९३ = ३५ प्लव; १७७८ = १ प्रभव; १८६४ = २८ जय; १९४९ = ५४ रौद्र.

ब्रह्मसिद्धांत व सिद्धांतशिरोमणिः −२६ = ३७ शोभन; ६० = ३ शुक्र; १४५ = २९ मन्मथ; २३० = ५५ दुर्मति; ३१५ = २१ सर्वजित्; ४०० = ४७ प्रमादी; ४८६ = १४ विक्रम; ५७१ = ४० पराभव; ६५६ = ६

अंगिरा, ६५७ = ७ श्रीमुख; ७४१ = ३२ विलम्ब, ७४२ = ३३ विकारी; ८२६ = ५८ रक्ताक्ष, ८२७ = ५९ क्रोधन; ९१२ = २५ खर; ९९७ = ५१ पिंगल; १०८२ = १७ सुभानु; ११६७ = ४३ सौम्य, ११६८ = ४४ साधारण; १२५२ = ९ युवा, १२५३ = १० धाता; १३३७ = ३५ प्लव, १३३८ = ३६ शुभकृत्; १४२३ = २ विभव; १५०८ = २८ जय; १५९३ = ५४ रौद्र, १५९४ = ५५ दुर्मति; १६७८ = २० व्यय, १६७९ = २१ सर्वजित्; १७६३ = ४६ परिधावी, १७६४ = ४७ प्रमादी; १८४९ = १३ प्रमाथी; १९३४ = ३९ विश्वावसु.

हीं संवत्सरनामें शकविक्रमादि कालांशीं केव्हां जोडूं लागले याविषयीं निश्चय नाहीं. उत्तरेच्या मानानें दक्षिणेंत त्यांचा अगोदर प्रचार झाला असावा. श. २७२ च्या सुमारास यांचा हिंदू ज्योतिषांत समावेश झाला असें डॉ. बर्जेस यांचें मत आहे. पण इ. ४७५, ४८२ व ५१० च्या गुप्तवंशी लेखांत महा-वैशाख, महाआश्विन व महाचैत्र या द्वादशवर्षीय संवत्सरनामांचा निर्देश आहे. वराहमिहिरानें (इ. ५८७) साठ संवत्सरनामांचें परिगणन केलें आहे. तथापि नागद ताम्रपटांत आलेला ‘ पञ्चशतिके काळे सप्तसप्तत्यधिके आनंदेब्दे ’ हा माझ्या माहितीप्रमाणें लेखनिविष्ट प्राचीनतम निर्देश असावा.

बुद्धनिर्वाण

बुद्धाच्या निर्वाणापासून हा काल सुरू झाला असें समजतात. हा बौद्धग्रंथ व अगदीं क्वचित् शिलालेख यांत निर्देशिलेला आढळतो. पण बुद्धनिर्वाण इसवी सनापूर्वी केव्हां झालें यासंबंधीं अतिशय मतभेद असल्यानें याच्या आरंभवर्षा-विषयींही मतभेद आहे. सिलोन, ब्रह्मदेश, सयाम, या देशांत व आसामचे राजगुरु ५४४, डॉ. भगवानलाल इंद्रजी व चिनी लोक ६३८, चिनी प्रवासी फाहियान सुमारें १०९७, युआनच्वांग सुमारें ३५०, डॉ. बूल्हर ४८३–२ व ४७२–१ यांमध्यें केव्हां तरी, कर्न ३८८, फर्ग्यूसन ४८१, कनिंगहॅम ४७८, मॅक्समूलर व मिस डफ ४७७, डॉ. बार्नेट ४८३, जैन परंपरेप्रमाणें ५४१, डॉ. फ्लीट ४८२, आणि स्मिथ ४८७ अगर ४८६ या इसवीपूर्व वर्षी बुद्धनिर्वाण झालें असें समजतात. बुद्धनिर्वाण कालाचा उल्लेख असणारा आजवर सारा एकच लेख सांपडला असून त्यांतही कालनिश्चितीचें गमक नसल्यामुळें निर्वाणकालाचा निश्चय होऊं शकत नाहीं. इ. पू. ४८७ हें साल त्यांतल्या त्यांत ठीक आहे.

भाटिक

या कालाचे फक्त दोनच उल्लेख आणि तेही जेसलमीर गांवीं अनुक्रमें वैष्णव व शैव मंदिरांत मिळाले आहेत. पैकीं एकांत विक्रम संवत् १४९४ च्या जोडीनें ८१३ भाटिक आणि दुसऱ्यांत १६७३ विक्रमाच्या संगतीनें ९९३ भाटिक व १५३८ शक असे दोन काल दिले आहेत. यावरून सहज निष्पन्न होतें कीं, भाटिक वर्षांत ६८० किंवा ६८१ मिळविल्यानें विक्रमकाल, ५४५ मिळविल्यानें शककाल आणि ६२३ किंवा ६२४ मिळविल्यानें इसवी सन येतो. जेसलमीरच्या राजांचा भट्टि किंवा भट्टिक (भाटी) नांवाचा एक पूर्वज होऊन गेला असून त्याच्या नांवावरून हें नांव प्रचलित झालें असा तर्क आहे.

मगी

हा बंगाली सनाप्रमाणेंच आहे. पण अंतर इतकेंच कीं, हा तदनंतर ४५ वर्षांनीं सुरू झाला असें समजतात. यामुळें यांत ६३८-६३९ मिळविल्यानें इ. स. येतो. याचा प्रचार बंगालच्या चितगांव जिल्ह्यांत आहे. याला हें नांव कां मिळालें याचें कारण नीट समजत नाहीं. पण इ. स. ९ व्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंत चितगावच्या आसपासचे प्रदेशावर आराकानी किंवा मगी राजांचा अमल असल्यामुळें यास कदाचित् मगी हें नांव पडलें असेल.

मव्लूदी

टिपूची नवनव्या कल्पना काढून त्या प्रसृत करण्याबद्दल प्रसिद्धि होती. तिचें उत्तम उदाहरण म्हणजे त्याची उपर्युक्त कालगणना होय. ही हिंदू पद्धति व त्याच्या नवीन कल्पना यांचें गंगाजमनी मिश्रणच आहे. टिपू हि. ११९७ जमादिलाखर १ (ता. ४ मे १७८३) रोजीं गादीवर बसला. तेव्हांपासून त्याचा जुलूस (राज्याभिषेक वर्ष) सुरू झालाच, पण शिवाय त्या वेळीं षष्टिसंवत्सर-चक्रापैकीं सदतिसावें शोभन संवत्सर चालू होतें. टिपूनें संवत्सरचक्र व महिने (अधिकासह) हिंदू पद्धतीचे घेतले, पण त्यांचीं नांवें बदलून टाकिलीं. हि. ११९७, ११९८, ११९९ व १२०० या वर्षांशीं जुळणारे संवत्सर क्रमांक ३७, ३८, ३९ व ४० यांना याच संख्या ज्यांनीं व्यक्त होतील असे अब्जद पद्धतीचे झकी इ. शब्द शोधून काढून किंवा बनवून तेच त्या संवत्सरांचीं नांवें

म्हणून उपयोगांत आणले. महिन्यांसाठीं असे शब्द शोधून काढले कीं, त्यांच्या पहिल्या एक किंवा दोन अक्षरांचीं अब्जद पद्धतीनें एक ते बारा किंमत असेल. ते शब्दच महिन्यांचीं नावें बनले. हि. १२०० हें साल ता. २३ आक्टोबर १७८६ रोजीं संपलें. या सुमारास त्याच्या डोक्यांत आणखी कांहीं नवीन कल्पना आल्या. हिजरत याचा मूळ अर्थ जरी निष्क्रमण असला तरी कालांतरानें त्यावर पलायन असा अर्थ लादला गेला. अर्थात् हिजरी सन म्हणजे मुहम्मदानें मर्दानेस केलेल्या पलायनापासून सुरू झालेला काळ असा अर्थ सर्वसामान्य लोक करूं लागले. टिपूला हें आवडेना; म्हणून त्यानें मुहम्मदाच्या जन्मापासून आरंभ झालेल्या कालाची कल्पना केली व त्यास मव्लूदी (जन्मासंबंधीं) हें नांव दिलें. मुहम्मदाचा जन्म इ. ५७२ किंवा श. ४९४ मध्यें झाला असें धरलें म्हणजे तेव्हां-पासून हि. १२०० किंवा इ. १७८६ पर्यंत चांद्रसौरमानाचीं १२१४ वर्षें गेलीं असें होईल. १२१५ वें वर्ष किंवा ४१ वें संवत्सर ता. २० मार्च १७८७ रोजीं सुरू व्हावयाचें होतें. ता. २४ आक्टोबर १७८६ ते ता. १९ मार्च १७८७ च्या दरम्यान हि. १२०१ किंवा ४० वें वर्ष चालू होतें तें त्यानें तसेंच चालूं ठेविलें; पण ता. २० मार्च १७८७ पासून ४१ वें संवत्सर चालू होत असल्यानें त्या दिवसापासून मव्लूदी १२१५ साल सुरू केलें. मव्लूदी काल मात्र चांद्रसौर मानाचा धरल्यामुळें मव्लूदी वर्ष व शकसंवत्सरवर्ष बरोबरच चालू होऊन संपूं लागलीं. या वेळीं त्याच्या डोक्यांत आणखी एक कल्पना उद्भवली. अब्जद पद्धति हिब्रू वर्णानुक्रमावर आधारलेली असल्यानें तिचा त्याग करून अरबी वर्णानुक्रमावर आधारलेली नवी अब्तस पद्धति अमलांत आणावी असें त्यानें ठरविलें. म्हणून संवत्सरसंख्या व महिने यांसाठीं त्या पद्धतीशीं जुळणारीं नवीं नांवें तयार करण्यांत आलीं. त्यांचा प्रयोग त्याच्या मृत्यूपर्यंत (ता. ४ मे १७९९) चालू होता. एव्हां टिपूस असेंही वाटलें कीं, आपण फार्सी अंक डावी-कडून उजवीकडे लिहीत जातों हें बरें नव्हें. म्हणून त्यानें फार्सी अंक उजवी-कडून डावीकडे लिहिण्यास सुरवात केली. नाण्यांवर ही पद्धत पहावयास सांपडते. टिपूनें नाण्यांच्या बाबतींत म. १२२४ पासून आणखी एक शक्कल काढिली. म. १२२४ ते १२२७ या चार सालांसाठीं त्यानें अरबी वर्ण-मालेंतील अलिफ, बे, ते, से अशीं पहिलीं चार अक्षरें उपयोगांत आणिलीं.

टिपूनें केलेले हे उपक्रम त्याचीं नाणीं व त्याचे कागदपत्र यांत चांगल्या

तऱ्हेनें प्रतिबिंबित झाले आहेत. हीं नाणीं व कागदपत्र महाराष्ट्रांत–विशेषतः कर्नाटकांत–पुष्कळ आढळतात. शेकडों पत्रें मोडी लिपी व मराठी भाषा यांत लिहिलेलीं मीं पाहिलीं आहेत. म्हणून येथें या पद्धतीचा प्रपंच करावा लागला.

आतां सांगितलेला विषय स्पष्टतेसाठीं कोष्टकरूपानें मांडून दाखवितों.

टि॰नाम[1]	शक	संवत्सर नांव व संख्या		जु.	हि. व म.	इ.
झकी	१७०५	शोभन	३७	१	हि. ११९७	इ. १७८२ डि ७
अझल	१७०६	क्रोधी	३८	२	हि. ११९८	इ. १७८३ नो २६
जलव	१७०७	विश्वावसु	३९	३	हि. ११९९	इ. १७८४ नो १४
दलव	१७०८	पराभव	४०	४	हि. १२००	इ. १७८५ नो ४
					हि. १२०१	इ. १७८६ ऑ २४
शा	१७०९	प्लवंग	४१	५	म. १२१५	इ. १७८७ मा २०
सारा	१७१०	कीलक	४२	६	म. १२१६	इ. १७८८ ए ७
सराब	१७११	सौम्य	४३	७	म. १२१७	इ. १७८९ मा २७
शिता	१७१२	साधारण	४४	८	म. १२१८	इ. १७९० मा १६
झबरजद	१७१३	विरोधी–धकृत्	४५	९	म. १२१९	इ. १७९१ ए ४
सहर	१७१४	परिधावी	४६	१०	म. १२२०	इ. १७९२ मा २३
साहिर	१७१५	प्रमादी	४७	११	म. १२२१	इ. १७९३ मा १३
रासिख	१७१६	आनंद	४८	१२	म. १२२२	इ. १७९४ ए १
शाद	१७१७	राक्षस	४९	१३	म. १२२३	इ. १७९५ मा २१
हिरासत	१७१८	नल–अनल	५०	१४	म. १२२४	इ. १७९६ ए ८
साझ	१७१९	पिंगल	५१	१५	म. १२२५	इ. १७९७ मा २९
शादाब	१७२०	कालयुक्त	५२	१६	म. १२२६	इ. १७९८ मा १८
बारिश	१७२१	सिद्धार्थी	५३	१७	म. १२२७	इ. १७९९ ए ६

---

१ यांतील पहिलीं चार नांवें अब्जद पद्धतीचीं असून बाकीचीं अब्तस पद्धतीचीं आहेत. या शिवाय ३७ व्या संवत्सरांत राज्याभिषेक झाला हें दाखविण्यासाठीं त्यानें पांचव्या वर्षापासून سرو सरव हें अब्तस पद्धतीचें संवत्सरनाम निदान नाण्यांवर प्रयोजिलेलें दिसतें. यांचे फार्सी अक्षरविन्यास असेः

زکی ازل جلو دلو شا سارا سراب شتا زبرجد سحر

ساحر راسخ شاد حراست ساز شاداب بارش

अब्जद (डावी बाजू) व अब्तस (उजवी बाजू) पद्धतींतील महिने असे—

१ احمدی अहमदी (ا = १)	احمدی अहमदी (ا = १)
२ بہاری बहारी (ب = २)	بہاری बहारी (ب = २)
३ جعفری जअफरी (ج = ३)	تقی तकी (ت = ३)
४ دارای दाराई (د = ४)	ثمری समरी (ث = ४)
५ هاشمی हाशिमी (ه = ५)	جعفری जअफरी (ج = ५)
६ واسعی वासई (و = ६)	حیدری हैदरी (ح = ६)
७ زبرجدی झबरजदी (ز = ७)	خسروی खुस्रवी (خ = ७)
८ حیدری हैदरी (ح = ८)	دینی दीनी (د = ८)
९ طلوی तुलूई (ط = ९)	ذاکری जाकिरी (ذ = ९)
१० یوسفی यूसुफी (ي = १०)	رحمانی रहमानी (ر = १०)
११ ایزدی ईझदी (ا + ي = १ + १० = ११)	رازی राझी (ر + ا = १० + १ = ११)
१२ بیاضي बयाझी (ب + ی = २ + १० = १२)	ربانی रब्बानी (ر + ب = १० + २ = १२)

या पद्धतींचें विस्तारभयास्तव फक्त एकच उदाहरण येथें नमूद करतों. होदिगेरे (चन्नगिरी—शिमोगा) येथील काजी अब्दुर्रझाक यानें मजकडे इ. १९४० मध्यें टिपू सुलतानानें दिलेली एक मराठी—मोडी सनद आणिली होती. तीमध्यें अखेरीस कालाचा उल्लेख ' छ १४ माहे तकी साल साहेर सन १२२१ ' असा होता. मव्लूदी गणना व अब्तस पद्धत यांच्या अनुरोधानें १२२१ शीं जुळतें शकवर्ष १७१५ व ४७ वें संवत्सर प्रमादी येत असून प्रमादीशीं जुळतें अब्तस पद्धतींतील नांव साहिर हें आहे. तकी हें अब्तस पद्धतींत तिसऱ्या म्हणजे ज्येष्ठ महिन्याचें नांव आहे. याच पत्रांत 'सदरहू जमीन प्रमादीची सवछर छ गुरे अहमदीपासून जारी करू देणे' असाही उल्लेख आहे. येथें अहमदी हें अब्जद व अब्तस या दोन्ही पद्धतींप्रमाणें पहिल्या अर्थात् चैत्र महिन्याचें नांव आहे. पण येथें मात्र अब्तस पद्धतीनें घ्यावयाचें आहे.

मौर्य

खारवेलाच्या हाथीगुंफा लेखांतच काय तो याचा उल्लेख असून तोही खरोखर कालोल्लेख आहे कीं नाहीं याविषयीं मतभेद आहेत. तेथें ' मुरिय-

काल १६५ ' असा निर्देश असल्यास तो काल बहुधा अशोकाच्या राज्याधिष्ठानापासून चालू झाला असें धरलें पाहिजे. अशोकाचा राज्याभिषेक इ. पू. ३२१ च्या सुमारास झाला असल्यानें या कालाचा आरंभही तेव्हांच झाला असें समजण्यास हरकत नाहीं.

राज्याभिषेक

महाराष्ट्रावर अव्याहत ३०० वर्षें राज्य करणाऱ्या निरनिराळ्या मुसलमानी सत्तांशीं सुमारें ३० वर्षें झगडून शिवाजी महाराजांनीं स्वतःचें आणि पर्यायानें मराठ्यांचें किंवा हिंदूंचें राज्य स्थापिलें. तें कोणत्याही संकटाची पर्वा न करतां टिकेल एवढेंच नव्हे तर वाढेल अशी खात्री पटल्यावर वस्तुस्थिति जगजाहीर करण्यासाठीं त्यांनीं स्वतःस राज्याभिषेक करून घेतला आणि तत्स्मरणार्थ पारंपरिक माहितीप्रमाणें विक्रम, शालिवाहन, चालुक्य विक्रमादित्य, अकबर इत्यादींच्या पावलावर पाऊल ठेवून स्वतःचा राज्याभिषेक काल चालू केला. श. १५९६ आनंद संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १३ या दिवशीं राज्याभिषेक झाल्यामुळें त्या दिवसापासून राज्याभिषेक वर्ष १ सुरू झालें. अर्थात् हें वर्तमान वर्ष आहे हें उघड ठरलें. याचें शकांत रूपांतर करावयाचें असल्यास यांत चैत्र शुद्ध प्रतिपदेपर्यंत १५९५ व तिथून ज्येष्ठ शुद्ध १२ पर्यंत १५९६ मिळवावे लागतात. याच्या प्रत्येक निर्देशांत संवत्सराच्या नामाचाही समावेश होत असल्यामुळें याचें रूपांतर करण्यास अडचण पडत नाहीं. हा चालू करण्यामध्यें यापूर्वी लोक उपयोगांत आणीत असलेल्या शुहूर, हिजरी वगैरे यावनी गणना मागें पडाव्या असाही हेतू असेल. पण तो मात्र सिद्धीस गेलेला दिसत नाहीं. शिवाजी महाराज निग्रही असल्यामुळें त्यांनीं आपल्या हयातीपर्यंत या गणनेचा प्रायः सर्वत्र प्रयोग केला. पण संभाजीपासूनच ती प्रथा सुटली आणि केवळ छत्रपतींनीं दिलेलीं दानपत्रें, इनामपत्रें व तदनंतर पेशवे वगैरे दुय्यम अधिकाऱ्यांनीं दिलेलीं संमतिपत्रें यांत मात्र ही गणना तग धरून राहिली. उपर्युक्त मर्यादेंत ही पेशव्यांचें राज्य जाऊन छत्रपति प्रतापसिंह पदच्युत होईतों कायम राहिली.

लक्ष्मणसेन

हा काल बंगालच्या सेन वंशांतील राजा बल्लाळसेन याचा मुलगा लक्ष्मणसेन

याच्या राज्याभिषेकापासून सुरू झाला असें सामान्यतः समजतात. अबुल फज्लनें अक्बरनाम्यांत एके ठिकाणीं नमूद केलें आहे कीं, हा काल लक्ष्मण-सेनाच्या राज्यारंभापासून मोजला जातो व सध्या याचीं ४६५ वर्षें झालीं आहेत. याच वेळीं शकाचीं १५०६ व विक्रमाचीं १६४१ वर्षें झाल्याचेंही त्यानें सांगितलें आहे. अर्थात् शक व लक्ष्मणसेन या कालांतील अंतर १०४१ वर्षें येतें. स्मृतितत्वामृत व नरपतिजयचर्येवरील एक टीका यांच्या एकेका हस्तलिखित प्रतीच्या शेवटीं लक्ष्मणसेन व शक या कालांचे अनुक्रमें ५०५ व १५४६ आणि ४९४ व १५३६ असे जोड उल्लेख आहेत. पैकीं दुसऱ्या निर्देशांतील शक वर्तमान धरला तर या दोन्ही निर्देशांत शक व लक्ष्मणसेन या कालांतील अंतर १०४१ येवढेंच येतें. उलट तिरहूतमधील एका राजाच्या एका खोट्या ताम्रपटांत लक्ष्मणसेन, संवत्, शक व हिजरी यांच्या एकाच सालाचे २९३,१४५५,१३२१ व ८०१ असे आंकडे दिले आहेत. यावरून शक व लक्ष्मणसेन या कालांतील अंतर १०२८ येतें. शिवाय लक्ष्मणसेन श. १०२८ मध्यें गादीवर आला अशी पारंपरिक माहिती आहे. म्हणून डॉ. किल्हार्न यांनीं या गणनेंतील सर्व कालनिर्देश तपासून पाहिले तेव्हां सर्व उल्लेखांचा नीट मेळ बसण्यासाठीं श. १०४१ कार्तिक शुद्ध १ किंवा इ. १११९ आक्टोबर ७ हा या कालाचा आरंभदिन धरला पाहिजे असें त्यांस आढळून आलें. अर्थात् लक्ष्मणसेन कालांत १११८ किंवा १११९ मिळविले असतां इसवी सन येईल हें स्पष्ट झालें. आरंभीं ही गणना बंगाल, मिथिला व बिहार यांमध्यें प्रचलित होती. आतां फक्त मिथिलेंत हिचा थोडासा प्रसार आहे व तेथें हिचा आरंभदिन माघ शुद्ध १ हा समजतात. हिचा निर्देश करणारे फक्त चार लेख उपलब्ध आहेत (लिस्ट १४६७–१४७०).

विक्रम

या कालाचा प्रारंभ कलियुगाचीं ३०४४ वर्षें क्रमल्यानंतर झाला अशी कल्पना केली गेली आहे. याच्या नव्या वर्षाचा आरंभ सध्या उत्तरेंत चैत्र शुक्ल १ (चैत्रादि) व दक्षिणेंत कार्तिक शुद्ध १ (कार्तिकादि) या मितीस होत असला तरी उत्तरेंतील इ. स. १२ व्या शतकापर्यंतच्या लेखांत याचे कार्तिकादि निर्देश अधिकतर येतात, तर १६ व्या शतकापर्यंतच्या लेखांत चैत्रादि निर्देश बहुसंख्य आहेत. चैत्रादि पद्धतीमुळें उत्तरी विक्रम संवत् दक्षिणेंतील

विक्रमसंवतापेक्षां सात महिने अगोदर सुरू होतो. शकांत १३५ मिळविले असतां चैत्रादि विक्रम आणि १३४ अगर १३५ मिळविले असतां कार्तिकादि विक्रम येतो. या कालाचे दक्षिणेंतील महिने अमान्त व उत्तरेंतील पूर्णिमान्त आहेत. काठेवाड, गुजरात व राजपुतान्याचा कांहीं भाग यांत या कालाचा आरंभ आषाढ शुद्ध १ पासून आणि उदेपूर इत्यादि राजपुतान्यांतील संस्थानांत राजकीय व्यवहारांत तर हा संवत् पूर्णिमांत श्रावणादि धरतात. पैकीं आषाढादि विक्रमाचे उल्लेख शिलालेख व जुने ग्रंथ यांतही आढळतात.

ही गणना प्रथम कोणी सुरू केली, तिचे उल्लेख कसे केले आहेत, तीस विक्रम नांव केव्हां व कसें मिळालें इत्यादि प्रश्न विचारणीय आहेत. ११ व १२ या शतकांतील विक्रम संवत् निर्दिष्ट असलेल्या शेकडा १५ लेखांत या संवताशीं विक्रम शब्दाची जोड दिली आहे. बाकीचे कालोल्लेख विक्रम शब्दविरहित आहेत. या कालाचा उल्लेख असलेले दहाव्या शतकांतील ३४ लेख असून त्यांपैकीं फक्त एकांत ‘ विक्रमकाल ’ असा स्पष्ट निर्देश व दुसऱ्यांत मालवकाल असा पर्यायशब्द प्रयुक्त केला आहे. उरलेल्या लेखांत संवत् शब्दावरच काम भागविलें आहे. विक्रमसंवताचे नवव्या शतमानांतील दहा लेख उपलब्ध असून त्यांपैकीं फक्त एकांत ‘ विक्रमाख्य काल ’ असा स्पष्ट निर्देश आहे. बाकीच्यांत नाहीं. केवळ संवत् अथवा संवत्सर येवढाच उल्लेख आहे. आठव्या शताब्दीमधल्या काठेवाडांतील एका ताम्रलेखांत विक्रमसंवत्सर असा निर्देश आहे. पण तो ताम्रपट बनावट असल्याचें सिद्ध झालें आहे. या पूर्वींच्या लेखांत या संवताचा निर्देश निराळ्याच शब्दांनीं केला आहे. उदाहरणार्थ कणस्वा येथील संवत् ७९५ च्या लेखांत ‘ मालवेशानां ’ शब्दानें विक्रम संवताचा निर्देश आहे. मंदसौर येथील संवत् ५८९, ४९३ व ४६१ च्या तीन लेखांत या संवताचा अभिप्राय मालवगणस्थिति, मालवानां गणस्थित्या व मालवगणाम्नाते या शब्दांनीं आणि नगरी येथील ४८१ च्या लेखांत हाच अभिप्राय ‘ मालवपूर्वायां ’ शब्दानें व्यक्त केला आहे. उपर्युक्त नगरी लेखांत तसेंच गंगधार (४८०), विजयगड (४२८), बर्नाला (३३५, २८४), बडवा (२९५), आणि नांदसा (२८२) या गांवीं मिळालेल्या व कंसस्थित कालोल्लेख असलेल्या लेखांत या संवताचा निर्देश ‘ कृत ’ शब्दानें केला आहे.

या सर्व निर्देशांवरून ध्यानांत येईल कीं, या गणनेचे प्राचीनतम निर्देश

'कृत' शब्दानें, प्राचीनतर निर्देश 'मालव' शब्दानें व प्राचीन उल्लेख विक्रम शब्दानें केले आहेत. जयपूर संस्थानांतील नगर गांवीं मिळालेल्या कांहीं नाण्यांवर 'मालवानां जयः' असा लेख असून त्यांचा काल इ. पू. २५० ते इ. २५० पर्यंत केव्हांही असूं शकेल. इ. पू. ६० च्या सुमारास शकांनीं उज्जयिनी हस्तगत केली असतां लवकर त्यांना ती सोडावी लागली असें इतिहास सांगतो.

या सर्वांचा निष्कर्ष असा काढण्यांत येतो कीं, इ. पू. ५७ या वर्षी मालव जातींतील कृत नांवाच्या महायोद्धयानें स्वपराक्रमानें शकांचा पराभव करून त्यांना उज्जयिनींतून हाकून लावलें. या प्रसंगाच्या स्मरणार्थ हा काल सुरू करण्यांत आला. यामुळें त्यास प्रथम कृत, नंतर मालव व अगदीं अखेरीस विक्रम हें नांव मिळालें (नागरी प्रचारिणी पत्रिका विक्रमांक वर्ष४८, अं.१–४).

वीरनिर्वाण

तित्थोगाली पइन्नय, जिनसेनाचें हरिवंशपुराण, मेघनंदीचा श्रावकाचार, नेमिचंद्राचें तिलोयसार, आणखी एका नेमिचंद्राचें महावीरचरिय, यतिवृषभाची तिलोयपण्णत्ति, स्थविरावली, जिनप्रभसूरींचा पावापुरीकल्प या सर्व ग्रंथांत आलेल्या माहितीचें सार असें कीं, महावीराच्या निर्वाणानंतर सहाशें पांच वर्षे व पांच महिने येवढ्या अवधीनंतर शक राजा झाला किंवा होणार आहे. मेरुतुंगाच्या विचारश्रेणि ग्रंथांत वीरनिर्वाण व विक्रम या संवतांमधील अंतर ४७० वर्षे सांगितलें आहे. अर्थात् शक वर्षांत ६०५ मिळविले म्हणजे वीरनिर्वाण संवत् येतो. याचा प्रयोग मुख्यतः जैन ग्रंथांत आढळत असला तरी कधीं कधीं शिलालेखांतही याचा निर्देश असतो (नागरी प्रचारिणी पत्रिका नवीन संस्करण भाग १०, अं. ४).

शक

कलियुगाचीं ३१७९ वर्षे झाल्यावर हा सुरू झाला असें सध्या समजतात. मलबार व तिनेवेल्लि जिल्हा सोडल्यास साऱ्या दक्षिणेंत व अंशतः उत्तरेंतही याचा प्रचार आहे. महाराष्ट्रांत याची गतवर्षसंख्या व तमिळ प्रदेशांत याचें चालू वर्ष सांगण्याचा प्रघात असल्यामुळें तमिळ प्रदेशांतील याची वर्षसंख्या महाराष्ट्रांतील वर्षसंख्येपेक्षा एक वर्षानें पुढें असते. उदा. महाराष्ट्रांतील शक १८६९ ला तमिळ प्रदेशांत १८७० म्हणतात. यामध्यें ७८ किंवा ७९

मिळविले म्हणजे इ. सन येतो व १३४ किंवा १३५ मिळविले म्हणजे विक्रम संवत् येतो. याचा आरंभ सामान्यतः चैत्र शुद्ध प्रतिपदेस होत असला तरी केवल सौर मान चालणाऱ्या प्रदेशांत याचा आरंभ मेषसंक्रांतीच्या आरंभापासून धरतात. दक्षिणेंत याचे महिने अमान्त असले तरी उत्तरेंत पूर्णिमान्त असतात. दक्षिणेंतील शिलालेख-ताम्रपट, पोथ्या-पुस्तकें व कागदपत्र यांत प्रायः याचाच निर्देश आढळतो. येवढेंच नव्हे तर पंचांगें तयार करणारे ज्योतिषी, करणग्रंथांत मुख्यतः याच्याच पायावर ग्रहगणिताची उभारणी केली असल्यानें, आपल्या पंचांगांत याचा उपयोग करतात; यामुळें उत्तरेंतही याचा पुष्कळ प्रचार आहे. जन्मपत्रिका, वर्षफलें, इत्यादींत याचा प्रयोग करतातच; पण शेकडों उत्तरी ऐतिहासिक लेखांतही याचा निर्देश आहे. जुन्या साधनांत प्रायः याच्या गतवर्षांचा उल्लेख असतो; पण कधीं कधीं वर्तमान वर्षाचाही प्रयोग आढळतो.

हा काल कोणीं, केव्हां व कसा सुरू केला, त्याशीं शक, शकनृप किंवा शालिवाहन यांचा संबंध केव्हां व कसा जोडला गेला इत्यादि प्रश्न विचारणीय आहेत. या कालाचा शालिवाहन राजाशीं जोडलेला संबंध फार प्राचीन नाहीं. अशा संबंधाचा सर्वप्रथम उल्लेख विजयनगरच्या बुक्क राजाच्या शक १२७६ च्या दानपत्रांत येतो. त्या पूर्वीच्या ताम्रशिलाशासनांत शक–शकनृप–शकनृपति–काल–संवत्–वर्ष–वत्सर इत्यादि प्रकारें या कालाचा निर्देश आढळतो. पैकीं श. ५५६ व ५०० या कालच्या बदामी चालुक्यांच्या लेखांत 'शकानामपि भूभुजां समासु' व 'शकनृपतिराज्याभिषेकसंवत्सरेषु' असे उल्लेख आहेत. यापूर्वीच्या कालनिर्देशाचे 'शकनृपति' शब्दाशीं संबंध असलेले सर्व लेख बनावट असल्यामुळें त्यांचा येथें विचार करतां येत नाहीं. सुमारें श. ५०० मध्यें रचिलेल्या वराहमिहिराच्या पंचसिद्धांतिका ग्रंथात '४२७ शक काल' असा निर्देश आहे. या पूर्वीचा असा एकही ग्रंथ किंवा लेख आढळत नाहीं कीं, जो प्रामाणिक असूनही ज्यांतील निर्दिष्ट कालाशीं 'शक–शकनृप' शब्दांचा संबंध जोडला आहे. परंतु क्षत्रप, महाक्षत्रप व कुषण वंशीय राजे यांचे असे कांहीं लेख व नाणीं मिळतात कीं, ज्यांवर एका विशिष्ट कालगणनेचे नुसते आंकडे (उ. नाणीं) किंवा 'वर्ष' शब्दासह आंकडे घातले आहेत. प्रस्तुतचे आंकडे राज्याभिषेक वर्षाचे नव्हत हें त्या निर्देशांतील संख्या ३ पासून ३१० पर्यंत वाढत गेल्या आहेत यावरून स्पष्ट होतें. हे सर्व आंकडे

एकाच विशिष्ट कालगणनेंतलि आहेत असें धरलें तरच सर्व लेख व नाणीं यांचा मेळ बसतो. क्षत्रप व महाक्षत्रप हे शक होते, पण सार्वभौम नव्हते. तेव्हां त्यांनीं हा काल सुरू केला असणें संभवत नाहीं. उलट कुषणवंशीय कनिष्क, हुविष्क व वासुदेव हे महापराक्रमी असून सार्वभौमही होते. शिवाय त्यांचे अनुक्रमें ३ ते २४, २८ ते ६० व ७४ ते ९८ पर्यंतचे कालनिर्देश असणारे लेख सांपडतात. या तिहींपैकीं कनिष्क महाप्रतापी असून त्याच्याच लेखांत प्राचीनतम कालनिर्देश आहेत. तेव्हां ही कालगणना कनिष्कानेंच सुरू केली असावी. शक व कुषण हे सामान्यतः एकाच काळीं हिंदुस्थानांत आले व त्यांचीं मूळ वसतिस्थानेंही जवळ जवळ होतीं. यामुळें त्या सर्वांना शक नांवानें संबोधिलें असण्याचा संभव आहे. कांहीं शतकें गेल्यानंतर या गणनेस शक काल, शकनृपतिकाल, इत्यादि नावें मिळालीं. आपण विक्रम संवताविषयीं पाहिलेंच आहे कीं, प्रथम त्यास कृत, नंतर मालव व फार उशीरा विक्रम हें विशेषण लावलं गेलें. विशेषतः विक्रमाचा संबंध त्या संवताशीं जोडला गेल्याचें पाहिल्यावर दक्षिणेंतील लोकांनाही शककालाचें नातें कोणत्या तरी राजाशीं जोडावें असें वाटून त्यांनीं शालिवाहन राजाशीं त्याचा संबंध जोडिला असावा (सह्याद्रि फेब्रु. १९४४).

शुहूर

यास सुहूर, सूर किंवा अरबी सन अथवा मृगसाल म्हणतात. याच्या नांवाची व्युत्पत्ति निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण अरबी भाषेंत शुहूर हें शहर या मासवाची शब्दाचें बहुवचन आहे. तेव्हां त्याचा यौगिक अर्थ महिन्यांचें (महिन्यांस महत्त्व असलेलें) वर्ष असा होईल. पण व्यवहारांत तसें दिसत नाहीं. उलट यांत महिन्यांस मुळींच महत्त्व नाहीं. हें वर्ष सौरमानाचें अर्थात् ३६५ दिवसांचें असून याचा आरंभ दर वर्षीं सूर्य मृगनक्षत्रांत शिरतांना होतो (जुनी पद्धत २३,२४ किंवा २५ मे, नवी पद्धत ५,६ किंवा ७ जून). यांतील माहिने हिजरी गणनेंतील अर्थात् चांद्र किंवा मोहरमादि असल्यानें याचा प्रत्येक नवीन वर्षारंभ हिजरी तारखांच्या दृष्टीनें १०,११ किंवा १२ दिवस उशीरा होतो. उदाहरणार्थ, एक सुहूर वर्ष मोहरम पहिलीस सुरू झालें तर त्यापुढचें सुहूर वर्ष ११,१२ किंवा १३ मोहरमला सुरू होईल. अशा तऱ्हेनें कोणतेंही सुहूर वर्ष घेतलें तरी त्याच्या आरंभीं आलेल्या पहिल्या दहा

बारा तारखा पुन्हा त्याच वर्षाच्या शेवटीं येतात. अशा वेळीं संशय राहूं नये म्हणून आरंभींच्या तारखांपुढें अव्वल साल व शेवटच्या तारखांपुढें अखेर साल अशी शब्दयोजना सामान्यतः करीत. असा विशेष उल्लेख नसेल तेथें तारखा आरंभींच्या कीं अखेरच्या हें संदर्भावरून ठरवावें लागतें आणि अन्य गमकें न मिळाल्यास तारखा वर्षारंभींच्या कीं वर्षांतींच्या हें अनिर्णित राहतें.

ही कालगणना कोणीं व केव्हां सुरू केली याविषयीं निश्चित माहिती नाहीं. पण हिचा आरंभ फसली गणनेच्या तत्त्वावरच झाला असल्यास हिचें पहिलें वर्ष हि. ७४४ मोहरम १ अर्थात् २६ मे १३४३ रोजीं मृगनक्षत्रावर सुरू झालें असलें पाहिजे. मात्र या वेळीं हिचेंही ७४४ वें वर्ष सुरू झालें असें गृहीत धरल्यानें हिचें इसवीमध्यें रूपांतर करतांना हिच्या वर्षांत ५९९ किंवा ६०० मिळवावे लागतात. या वेळीं मुहम्मद तुघ्लुक दिल्लीस राज्य करीत होता व त्याचा निदान नामधारी अमल दक्षिणेवर चालू होता. इकडे अला-उद्दीन हसन बहमनी स्वतंत्र होण्याची खटपट करीत होता. तेव्हां फसली वर्ष ज्याकरितां पुढें सुरू करण्यांत आलें त्यासाठींच दक्षिणेंत सुहूर सन सुरू झाला असावा.

आतां यापुढें प्रथम सुहूर सनाचा उल्लेख करण्यासाठीं ज्या अरबी अंक-वाचक शब्दांचा प्रयोग करतात ते वर्णानुक्रमानें देऊन नंतर याच्या विशिष्ट प्रयोगांविषयीं चर्चा करतो.

अर्बा ४	खम्स ५	सबैन ७०
अर्बैन ४०	खम्सैन ५०	सलास ३
अलफ १०००	तिसा ९	सलासीन ३०
अशर १०	तिसैन ९०	समान ८
अशरीन २०	मया-मिअत् १००	समानीन ८०
इसने-इसनैन[1] २	मया-मिअतैन २००	सित्त ६
इहिदे १	सबा ७	सित्तैन ६०

पत्रांमधून या सनाचा आंकड्यांत उल्लेख क्वचितच येत असेल. असा निश्चित उल्लेख माझ्या तरी आढळण्यांत आलेला नाहीं. सामान्यतः याचा उल्लेख वर

१ हें रूप अगदीं क्वचित् फर्मानें व नाणीं यांवर आढळून येतें.

दिलेल्या अंकवाची अरबी शब्दांनीं केला जातो. तो करतांना 'अंकानां वामतो गतिः' हा नियम गेल्या चार-पांचशें वर्षांत हिंदुस्थानामध्यें सांपडलेल्या कागदपत्रांतून आलेल्या उल्लेखांत सर्वत्र पाळला गेला आहे. प्रथम अंत्य(एक)-स्थानीय आंकडा, मग उपांत्य(दशक)स्थानीय आंकडा, नंतर तिसरा शत-स्थानीय आंकडा, मग चौथा सहस्रस्थानीय आंकडा अशा क्रमानें आंकड्यांचा निर्देश होतो. उदाहरणार्थ १३४५ हें साल सांगावयाचें असेल तर खमस व अर्बेन व सलास मया व अलिफ असा उल्लेख करतील. मराठी व फार्सी कागदपत्रांतील शेकडों उल्लेख अशा तऱ्हेनें केले आहेत. पण प्राचीन कालीं याच्या उलट स्थिति असावी. तेव्हां 'अंकानां सव्यतो गतिः' हा नियम अमलांत होता. उदाहरणार्थ, अरेबियन नाइट्सचें अरबी नांव १००१ रात्री (अलिफ लैला व लैला) असें आहे.

याचा उपयोग जुन्या साधनांपैकीं आदिलशाही, निजामशाही व थोड्या फरकानें फारूकी, फार्सी व मराठी फर्मानें, खुर्दखतें व मिसली यांत सरसहा केलेला आढळतो. विशेषतः जमीनींचें इनाम, नोकरांचें वेतन व बदली, द्रव्य गोळा करण्याचे हक्क इत्यादि बाबतींत अर्थात् जमिनीचें पीक व त्यापासून मिळणारा पैसा यांचा जेथें जेथें संबंध तेथें तेथें या सनाचा हटकून उपयोग केला आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर लश्करी हालचालींव्यतिरिक्त सर्व प्रकरणीं याचा निर्देश आढळतो. याचा उल्लेख करण्याचा मूळ व खरा हेतु वर सांगितलेले व्यवहार, शेवटच्या पिकांची काढणी-मळणी, फाळाभरणी इत्यादि झाल्यावर चालू व्हावे अर्थात् जमीन लागणीच्या दृष्टीनें नव्या वर्षापासून सुरू व्हावे हा होता. यामुळेंच फर्मानांतून याच्या प्रयोगाची सुरवात 'अझ शुहूर सनह' अशा शब्दांनीं करून अरबी अंकवाची शब्दांत त्याचा निर्देश करतात. पुढें या प्रयोगास मामुली स्वरूप येऊन सुहूर सनाचा उल्लेख करणें ही एक रूढीच होऊन बसली. पण याचा महसुलाशीं घनिष्ठ संबंध आहे हें एका फारूकी फर्मानांतील 'शुहूर सनह अलफुल्महसूलियह' या प्रयोगा-वरून स्पष्ट होतें.

उपर्युक्त फर्मानांच्या अखेरीस हिजरी सन, तारीख व महिना यांचा उल्लेख असतो. बहुतेक ठिकाणीं शुहूर व हिजरी यांचा मेळ बसतो. पण कांहीं ठिकाणीं असें आढळलें आहे कीं, दोघांचा मेळ न बसतां हिजरी सन एक

किंवा अधिक वर्षांनीं पुढें असतो किंवा सुहूर सन हिजरीच्या मागें असतो. उदाहरणार्थ, शिवचरित्रसाहित्य खंड २, ले. २६७ मध्यें सुहूर सन १०४२ व हिजरी सन १०५२ जमादिलावल १७ असे कालोल्लेख आहेत. सु. १०४२ च्या जमादिलावल महिन्यास हिजरी साल १०५१ येतें आणि हिजरी १०५२ सालच्या जमादिलावल महिन्यास सुहूर १०४३ येतो. मुधोळच्या घोरपडे घराण्याचा इतिहास या ग्रंथाचे शेवटीं छापलेल्या क्र. १४ ते १९ पर्यंतच्या फर्मानांत सुहूर १०६८ आणि हिजरी १०८१ जमादिलाखर १५ असे कालोल्लेख आहेत. सुहूर १०६८ जमादिलाखर १५ शीं जुळता हिजरी सन १०७८ येतो आणि हिजरी १०८१ जमादिलाखर १५ शीं जुळणारा सुहूर सन १०७१ येतो. या फरकाचा अर्थ येवढाच करतां येण्यासारखा आहे कीं, हिजरी कालोल्लेख फर्मान केव्हां सुटलें हें सांगतो, तर सुहूर कालोल्लेख त्यांतील आर्थिक किवा वतनी व्यवहार केव्हां घडला म्हणून धरायाचें तें दर्शवितो. तात्पर्य सुहूर व हिजरी अशा दोन्ही सनांचा कागदांत उल्लेख असल्यास त्याच्या कालनिश्चितीसाठीं सुहूर सनाचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं.

शिवचरित्रसाहित्य (शिचसा) खंड ४, ले. ६९२ मध्यें सुा (सुहूर) सन १०८६ व शके १५९८ असा उल्लेख आहे. अशा तऱ्हेनें प्रथम सुहूर सन व हजार असे शब्द घालून पुढें वर्षसंख्या दिल्याचे निर्देश पुष्कळ आढळतात. कधीं त्याच्या जोडीस वरच्याप्रमाणें आणखी एखाद्या कालाची वर्षसंख्या असेल तर कधीं शिचसा खंड ४, ले. ६९३ प्रमाणें नसेल. अशा प्रत्येक ठिकाणीं सुहूर सन असा प्रयोग असला तरी पुढील आकडा फसली वर्षाचा असतो हें निश्चित झालें आहे. एरवीं जोड उल्लेखांची संगति लागत नाहीं. वरच्याच उल्लेखांत श. १५९८ शीं जुळतें सुहूर वर्ष १०७७, पण फसली साल मात्र १०८६ येतें. म्हणून अशा निर्देशांतील आकडा फसली वर्षाचाच धरावा लागतो. शिचसा खंड ४, ले. ६९४, पृ. ४५ वर ' सुा सन हजार १०९४ सन २८ जुलूस वाला ' असा उल्लेख आहे. येथें २८ जुलूस अर्थात् औरंगजेबाचें २८ वें राज्यवर्ष सांगितलें आहे. याशीं जुळता इसवी सन १६८४–८५ येतो व फसली सन १०९४ येतो. तेव्हां येथें फसली सनच विवक्षित आहे. शिचसा खंड ४, ले. ६९५ व ले. ६९७ यामध्यें तर अनुक्रमें सुा सन हजार ११११० फसली लो ईल व

सुा सन ११३५ फसली असे उलेख असल्यानें तेथें फसली वर्षे विवक्षित असल्याविषयीं शंका राहात नाहीं. पहिल्या उल्लेखांत लो ईल असा तुर्की वर्षाचा उल्लेख आहे. या वर्षाशीं जुळणारें इसवी वर्ष १७०० हें येतें व त्याशीं जुळणारें फसली वर्ष १११० येतें. तात्पर्य अशा उल्लेखांत सुहूर हा शब्द असला तरी वर्षसंख्या आंकड्यांत सांगितली असल्यानें तो आंकडा फसली वर्ष दाखवितो हें निश्चित समजावें.

शिचसा खंड ४, ले. ७०९ मध्यें ‘ सुा आर्बैन सन १०४९ ’ असा उल्लेख असून असे शेकडो निर्देश इतरत्र आले आहेत. येथील आंकडा फसली सनाचा आहे हें पाठीमागील विवेचनावरून तर निश्चितच ठरतें. या वेळीं सुहूर सन १०४० चालू असल्यामुळें आर्बैन हा शब्द सुहूर सनाचे शेवटचे दोन आंकडे दर्शवितो असें धरलें पाहिजे. अर्थात् या पत्राच्या इंग्रजी तारखेंत मुद्रणदोष झाला असून मागील दोन पत्रांच्या तारखांचे शक व इसवी यांतील रूपांतरेंही चुकलीं आहेत. शिचसा खंड ४, ले. ६९१ मध्यें ‘ सुा सला[सी]न सन हजार ३९ ’ असा उल्लेख आहे. येथेंही हजार ३९ या निर्देशानें फसली सनच गृहीत धरला पाहिजे. त्या वेळीं त्याशीं मिळता सुहूर सन १०३० येतो. म्हणून येथें सलासीन शब्दानें सुहूर सनाचे शेवटचे दोन आंकडे विवक्षित आहेत. याच पद्धतीनें विचार केला म्हणजे भा. इ. सं. मंडळ इतिवृत्त श. १८३४, पृ. १३९ वर आलेला ‘ १५५(४)९ क्षय सुा सन समान सन १०३७ ’ असा कालनिर्देश आला आहे त्यांत समान हा शब्द सुहूर १०२८ चा शेवटचा आंकडा दर्शवितो आणि १०३७ हा फसली सनाचा उल्लेख आहे हें स्पष्ट होतें. श. १५४९ क्षयशीं जुळणारा फसली १०३७ आहे.

शिचसा खं. ४, ले. ७३० मध्यें कालाचे दोन निर्देश आहेत. पैकीं शेवटच्या उल्लेखांत वर्षाचा निर्देश सन १०७१ असा आहे. हा निर्देश हिजरी सनाचा आहे असें नेहमींच्या अशा प्रकारच्या उल्लेखांच्या परिपाठावरून धरण्यास हरकत नाहीं. आरंभींचा कालनिर्देश ‘ सुा अर्बा सन हजार १०७१ ’ असा आहे. पुणें, सातारा किंवा कोंकण या बाजूंस मिळालेल्या कागदांत असा उल्लेख आला म्हणजे अर्बा शब्द सुहूर सनाच्या उल्लेखांतील शेवटचा आंकडा व ‘ सन हजार १०७१ ’ हा निर्देश फसली सन दाखवितो असें आपण मानतों. म्हणजे या ठिकाणीं सुहूर सन १०६४ व फसली

सन १०७१ आहे असें आपण समजतों. पण त्या समजुतीप्रमाणें या निर्देशाचा विचार करूं लागलों तर एक अडचण येते. महाराष्ट्रांत चालू असलेल्या सुहूर व फसली या दोन सनांत ९ वर्षांचें अंतर असतें. येथें तर ७ वर्षांचें अंतर आहे. तेव्हां सुहूर सनाचा उल्लेख बरोबर आहे असें धरलें तर फसली सन १०७३ असा लिहावयास पाहिजे होता. पण पत्रांत दोन्ही ठिकाणीं १०७१ असाच फसली सनाचा उल्लेख आहे. तेव्हां सुहूरचा 'इसने' असा उल्लेख करावयास पाहिजे होता असें म्हणावें लागेल. एवंच मामुली पद्धतीप्रमाणें विचार केल्यावर दोन उल्लेखांपैकीं कोणत्या तरी एका सनाचा उल्लेख चुकला असें म्हटलें पाहिजे. उत्तरेंतील फसली दक्षिणेंतील फसलीपेक्षां दोन वर्षांनीं लहान आहे. या पत्रांतील फसली सनाचा उल्लेख उत्तरी पद्धतीचा आहे असें मानलें तर दोन्ही उल्लेख एकमेकांशीं जुळते आहेत असें ठरेल. कारण उत्तरेंतील फसली व दक्षिणेंतील सुहूर यांमध्यें ७ वर्षांचें अंतर पडतें व तितकेंच अंतर या पत्रांतील सुहूर सन व फसली सन यांत आहे.

या युक्तीनें या पत्राचा निकाल लागून कालनिर्देशांत विरुद्धता नाहीं असें ठरेल; पण दुसऱ्या एका पत्रांतील कालनिर्देशांचा विचार केला तर वरील युक्ति चूक आहे असें दिसून येईल. ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १, ले. ३ यांत कालाचे दोन निर्देश आहेत. पैकीं आरंभीं 'शुहूर सनह अलफुल्–महसूलियह' असा उल्लेख असून शेवटीं 'सनह सित्त व अलफुल्–हिजरिय्यतुल्–मुस्तफविय्यह सनह १००६' असा अक्षरीं व आंकड्यांत दुहेरी निर्देश आहे. पहिला उल्लेख सुहूर सनाचा व दुसरा हिजरीचा आहे हें उघड आहे. हिजरी सन कोठेंही एकच प्रकारचा आहे हें सांगावयास नकोच. हि. १००६ ला जुळता असा सुहूर सन आपल्या पद्धतीप्रमाणें ९९८ हा येतो. पण प्रस्तुत पत्रांत १००० असा अक्षरीं उल्लेख आहे. हिजरी १००६ ला जुळता दक्षिणी फसली सन १००७ व उत्तरी १००५ येतो. दक्षिणी फसली व येथील सुहूर सन यांत ७ वर्षांचें अंतर येतें. पूर्वोक्त पत्रांतही सुहूर व फसली यांमध्यें ७ वर्षांचेंच अंतर पडतें. तेव्हां या पत्रांतील सुहूर व पूर्वोक्त पत्रांतील सुहूर हे एकाच प्रकारचे असावेत. या दोन पत्रांतील फसली मात्र दक्षिणेंतील फसलीच धरला पाहिजे. एरवीं दोन्ही पत्रांतील सुहूर सनांच्या उल्लेखांचा मेळ बसवितां येत नाहीं. उत्तरोक्त पत्रांत 'महसुलाचा' असें एक विशेषण

सुहूर सनाला लावलेलें आहे. या विशेषणाचा अर्थ येवढाच दिसतो कीं, हा सुहूर महसुलाच्या सोयीसाठीं सुरू केला असावा. हा सुहूर खानदेशांतील फारूकी सुलतानांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांत चालत असावा असें प्रकाशित दुसऱ्या पत्रावरून निश्चयानें म्हणतां येतें. पहिल्या पत्रावरून निश्चयानें म्हणतां येणार नाहीं. कारण पहिलें प्रकाशित पत्र खास फारूकी राजवटींतील नाहीं. तें राज्य बुडाल्यानंतर सुमारें ६० वर्षांनीं लिहिलेलें आहे. सारांश फारूकी अमदानींत एक निराळा व नवीन सुहूर सन चालू होता असा तर्क करतां येतो. या तर्काला पुष्टि देणारें असें आणखी एक पत्र श्री. रावेरकर राजे देशमूख यांच्या संग्रहांत (क्र. ९५) आहे. सबंध पत्र महत्त्वाचें नसल्यानें जरूर तेवढा भागच येथें देतों. 'राजीनामा बेस्मी मोकदमानी व रयान देहाये प्रा रावेरी सुबे खानदेस सूर सन सलास सन १०७० कारने लेहोन दिधला यैसा जे' येथें १०७० हा फसली व सलास (= १०६३) हा सुहूर आहे हें मागील दोन पत्रांच्या आधारानें सांगतां येतें.

या तीन पत्रांतील सुहूर सन फारूकी सुलतानांनीं आपल्या राज्यांत सुरू केला असल्यास तो केव्हां हा पुढील प्रश्न आहे. दक्षिणेंतील सुहूर सन हि. ७४४ मोहरम १ किंवा इ. १३४३ मे २६ या दिवशीं म्हणजे मुहम्मद तुघ्लुकानें देवगिरी राजधानी करण्याच्या सुमारास सुरू झाला असावा असा माझा तर्क आहे आणि ७४५ हें सुहूर सनाचें आरंभवर्ष म्हणून धरलें होतें असा समज आहे. हि. ८११ हें साल असें आहे कीं, याचा आरंभ इ. १४०८ मे २७ ला म्हणजे सुमारें ६५ सौर वर्षांनीं किंवा ६७ चांद्र वर्षांनीं होत आहे. या सालीं या पत्रांत आलेला फारूकी सुहूर सन चालू झाला असें मानून त्याचें साल ८११ हेंच धरलें गेलें असें समजलें तर दक्षिणेंतील सुहूरचें साल या वेळीं ८०९ हें येत असल्यानें फारूकी सुहूर दक्षिणी सुहूरपेक्षां २ वर्षांनीं मोठा ठरेल.

या वर्षी खानदेशांत नवीन सुहूर गणना सुरू करण्यास कांहीं कारण घडलें आहे कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. हि. ८११ (इ. १४०८) च्या सुमारास दक्षिणेंतील १२ वर्षांचा दुर्गादेवीचा दुष्काळ नुकताच संपला होता, त्यानंतरचें हें पहिलेंच साल होतें असें म्हणतां येतें. या सालीं नव्यानेंच वसुली करावयास सुरवात झाली असणें शक्य आहे. पहिल्या वर्षी कांहीं सारा वसूल केला असेल व महसुलाचें वर्षही नव्यानें सुरू केलें असेल. तेव्हां

हि. ८११ मध्यें फारूकी सुलतानांनीं एक नवीन सुहूर सन सुरू केला असें सध्या गृहीत धरण्यास हरकत दिसत नाहीं.

दिल्लीचे सुलतान, मुघल सम्राट् हुमायून, अकबर व जहांगीर, तत्समकालीन बंगाल, सिंध, काश्मीर आणि दक्षिणेंतील निजामशाही सुलतान यांपैकीं कांहींच्या कांहीं नाण्यांवर फी शुहूर सनह असे शब्द घालून पुढें आकड्यांत किंवा अरबी शब्दांत नाणें पाडल्याचा काल दिलेला असतो.[१] येथें शुहूर सन म्हणजे हिजरी सन असेंच सर्व विद्वानांनीं गृहीत धरलें आहे. ज्या वेळीं या सुलतानांपैकीं एखाद्याचें नाणें हिजरी सनाच्या दृष्टीनें तो मेल्या नंतरच्या काळांत पडतें तेव्हां त्यास मृत्यूत्तरचें नाणें म्हणण्याचा प्रघात आहे. या 'शुहूर सनह' शब्दांचा शुहूर कालगणनेशीं कोणीही संबंध जोडलेला नाहीं. पण निजामशाही सुलतानांच्या नाण्यांवर आलेले उपर्युक्त शब्द, निजामशाही प्रदेशांत सुहूर सनास असलेलें महत्त्व लक्षांत घेतां, शुहूर कालगणनाच दर्शवीत असावे असा माझा कयास आहे. मात्र येथील शुहूर सनाची संख्या आंकड्यांत दर्शविलेली असते.

सप्तर्षि

याचा सप्तर्षींशीं लावलेला संबंध, शतकांचे आंकडे सोडून फक्त शेवटचे दोन आंकडे लिहिण्याची पद्धत, ज्योतिषशास्त्रांत येणारे याचे उल्लेख, काश्मीर व पंजाबांतील पहाडी मुलूख यांत याचा असलेला प्रचार इत्यादि कारणांवरून यास सप्तर्षि, लौकिक, शास्त्र, पहाडी किंवा कच्चा संवत् अगर काल अशीं नावें मिळालीं आहेत. भागवत, विष्णु इत्यादि पुराणें व बृहत्संहितादि ज्योतिष-ग्रंथ यांत अशी कल्पना सांगितली आहे कीं, आकाशांतील सप्तर्षि तारकापुंज एकेका नक्षत्रांत एकेक शतक राहून २७०० वर्षांत एक नक्षत्रचक्र पुरें करतो व दुसऱ्या चक्रभ्रमणास सुरवात होते. वस्तुतः सप्तर्षींना अशा प्रकारची गति

---

१ मला पुढील सुलतानांच्या नाण्यांवर हे शब्द आढळले. दिल्ली = मुहम्मद बिन साम १ ला, शम्सुद्दीन ईल्तुत्मिश, रुक्नुद्दीन फीरूझ, रझिय्या, अलाउद्दीन मस्ऊद, नासिरुद्दीन महमूद, मुहम्मद तुघ्लुक; बंगाल = घियासुद्दीन इवझ; सिंध = सैफुद्दीन अल्हसन कर्लघ; काश्मीर = झैनुल आबिदीन, हैदरशाह, हसनशाह, मुहम्मदशाह, फतहशाह; अहमदनगर (दक्षिण) = बुर्हान, मुर्तजा.

नाहीं हें कमलाकर भट्टादि कित्येक जुन्या विद्वानांनीं नमूद करून ठेविलें असलें तरी या कालाचा प्रचार अजूनही चालू आहे. व्यवहारांत विशिष्ट शतकांतील कितवें वर्ष चालू आहे येवढेंच नमूद करीत असले तरी ग्रंथांतरीं विशेषतः उत्तरीय पंचांगांत याचीं आरंभापासून विशिष्ट कालापर्यंत किती वर्षें झालीं हें सांगण्याचा प्रघात आहे. काश्मीरमध्यें याचा प्रारंभ कलियुग संवतानंतर २५ वर्षांनीं झाला असें मानीत असले तरी पुराण व ज्योतिष ग्रंथांत याची सुरवात कलियुग संवतापूर्वी झाली असल्याचें सांगितलें आहे. विक्रमसंवत् १८५० च्या पंचांगांत वि. सं १८५०, शक १७१५ आणि सप्तर्षि संवत् ४८६९ असे आंकडे दिले आहेत. अर्थात् सप्तर्षि संवतांतून ३१५४ उणे केले असतां शकवर्ष येतें. सप्तर्षि संवताचे फक्त दोनच आंकडे सांगितले असल्यास त्यांतून ५४ उणे केले किंवा ४६ मिळविले म्हणजे शकाचे दोन किंवा तीन आंकडे मिळतील उ. सै (चंबा पंजाब) येथें मिळालेल्या लेखांत कलियुग ४२७० व शास्त्र वर्ष ४५ असे उल्लेख आहेत. ४२७०–३१७९=१०९१ शक आणि ४५ मधून ५४ उणे केले किंवा त्यांत ४६ मिळविले म्हणजे शेवटचे दोन आकडे ९१ होतात (लिस्ट १४५०). याचा वर्षारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस होतो व महिने पूर्णिमांत असतात. याचें वर्ष बहुधा वर्तमान व क्वचित् गत असतें. हल्लीं याचा प्रचार काश्मीर व त्याच्या आसपासचा डोंगराळ प्रदेश यांतच आणि त्यांतही ज्योतिषशास्त्रांत आढळतो. अल्बीरुनीच्या वेळीं याचा प्रचार मुलतानपर्यंत झाला होता असें दिसतें. या कालाचा उल्लेख असलेले लेख काश्मीर, चंबा व मंडी हीं संस्थानें आणि पंजाबमधील कांगडा जिल्हा यांत सांपडले आहेत.

सिंह

हा संवत् कोणीं चालू केला याचा नीट पत्ता लागत नाहीं. त्याविषयीं केलेल्या कल्पना तर्कशुद्ध नाहींत. फार तर एवढेंच निश्चयानें म्हणतां येईल कीं, कोणी तरी सिंह नामधारी राजानें हा सुरू केला. हा काल व त्याच्या जोडीनें इतर काल यांचा निर्देश करणारे फक्त चार लेख मिळाले असले तरी एकांतील निर्देशांत कांहीं तरी चूक झाली असल्यामुळें तो निकामी झाला आहे (लिस्ट १३८१). बाकीच्या तीन लेखांत अनुक्रमें विक्रम १२०२ व सिंह ३२ आश्विन वद्य १३ सोमवार, विक्रम १२६६ व सिंह ९६ मार्ग-

शीर्ष शुद्ध १४ गुरुवार आणि विक्रम १३२० हिजरी ६६२, वलभी ९४५ व सिंह १५१ आषाढ वद्य १३ रविवार असे उल्लेख आले आहेत. तिसऱ्या निर्देशांतील विक्रमवर्ष कार्तिकादि धरलें तर चैत्रादि किंवा आषाढादि विक्रम १३२१ येईल आणि तिन्ही निर्देशांतील विक्रमकाल व सिंह वर्ष यांमधील अंतर ११७० होईल. अर्थात् सिंह वर्ष अधिक ११७० म्हणजे चैत्रादि विक्रम काल आणि सिंह वर्ष अधिक १०३५ म्हणजे शक काल येईल. याचा प्रारंभ आषाढ शुद्ध १ या दिवशीं होत असावा. याचा प्रचार फक्त काठेवाडांत आणि तोहि थोड्या प्रमाणांत होता. याचा निर्देश असलेले फक्त सात लेख उपलब्ध असून पैकीं तिहींवर सिंह संवत् असा स्पष्ट निर्देशही नाहीं. याचा सर्व प्रथम निर्देश ३१ व्या सालचा व अखेरचा १५१ व्या वर्षाचा आढळतो (लिस्ट १४६० व १४६६).

सेल्युकिडि

इ. पू. ३२३ मध्यें अलेक्झांडर मेल्यानंतर त्याच्या सेनापतींमध्यें अधिकाराविषयीं भांडण झालें व सेल्युकस निकेटॉर यानें सीरिया, बॅक्ट्रिया इत्यादि पूर्वेकडील प्रदेशांत आपलें राज्य स्थापून इ. पू. ता. १ आक्टोबर ३१२ या वर्षी आपला स्वतंत्र काल चालू केला. हा बॅक्ट्रियांत सुरू होता व तेथील ग्रीकांची सत्ता काबूल, पंजाब इत्यादि प्रदेशांवर चालत असल्यानें त्या प्रदेशांत उपर्युक्त कालाचा प्रचार झाला असणें संभवनीय आहे. विदेशी सत्ताधाऱ्यांचे असे कित्येक खरोष्ठी लेख आहेत कीं, ज्यांत एका अनोळखी कालाचा उल्लेख असून सेल्युकिडि गणनेंतील महिने निर्देशिले आहेत. अर्थात् कालही विदेशी असला पाहिजे. मग तो सेल्युकिडि असेल किंवा आणखी कोणता असेल.

हर्ष

हा ठाणेश्वर येथील बैस वंशी महापराक्रमी राजा श्रीहर्ष यानें सुरू केला असें समजतात. पण ज्या लेखांत या संवताचा निर्देश आहे असें म्हटलें जातें त्यांपैकीं एकांतही कालोल्लेखाशीं हर्षाचें नांव निगडित केल्याचें आढळत नाहीं. असें असलें तरी अल्बीरूनी विक्रमादित्यानंतर ६६४ वर्षांनीं हर्ष झाला असें आपण एका काश्मीरी पंचांगांत वाचल्याचें सांगतो. नेपाळचा राजा अंशुवर्मन् याच्या एका लेखांत 'संवत् ३४ प्रथम पौष शुक्ल २' असा कालनिर्देश आला आहे.

अल्बीरूनीच्या मताप्रमाणें वर्तमान वि. ६६४ किंवा इ. ६०६ मध्यें खरोखरच हर्ष शक सुरू झाला असें गृहीत धरून उपर्युक्त कालनिर्देश हर्षकालाचा आहे असें मानलें आणि ब्रह्मसिद्धांताप्रमाणें गणित करून पाहिलें असतां इ. ६४० मध्यें पौष मास अधिक पडतो असें दिसून आलें. तेव्हां इ. ६०६ = ० हर्ष काल हें समीकरण बसलें. अर्थात् हर्ष कालांत ६०६ मिळविले असतां इसवी येतो हें उघड झालें. याचा सर्वप्रथम उल्लेख बंसखेडा येथील लेखांत संवत् २२ असा आला असून अखेरचा उल्लेख पंजौर लेखांत संवत् ५६३ किंवा ५६२ असा केला आहे (लिस्ट १३८५, १४२१). तेव्हां याचा साडेपांचशेंहून थोडीं अधिक वर्षें उपयोग चालू होता असें दिसतें. याचा प्रसार नेपाळ, युक्त प्रांत, पंजाब, बुंदेलखंड, बिहार व ओडीसा, राजपुताना, मद्रास इलाख्याचे उत्तरेकडील जिल्हे व बंगाल येवढ्या मोठ्या प्रदेशांत झाला होता असें त्या त्या प्रदेशांत मिळालेल्या लेखांवरून म्हणतां येतें.

हिजरी

हिजरत या शब्दाचा अरबीमध्यें 'निष्क्रमण' असा अर्थ आहे. ज्या दिवशीं मुहम्मद पैगंबरानें शत्रुभयानें मक्केतून मदिनेस निष्क्रमण केलें त्या दिवसापासून या कालाची गणना सुरू झाली असें समजत असल्यानें यास हिजरत, हिजरिय्यह इ. म्हणतात. या प्रसंगाची गणितागत तारीख १५ जुलै ६२२ इ. ही असून परंपरागत तारीख १६ जुलै ६२२ इ. ही येते. याचें वर्ष पूर्णपणें चांद्रमानाचें असल्यानें एक वर्ष कधीं ३५४ तर कधीं ३५५ दिवसांचें होतें. याच्या ३० वर्षांचें एक चक्र कल्पिलें असून त्यांपैकीं २. ५, ७ किंवा ८, १०, १३, १५ किंवा १६, १८ किंवा १९, २१, २४, २६ किंवा २७, २९ या वर्षांचे प्रत्येकीं ३५५ दिवस व बाकीच्या वर्षांचे प्रत्येकीं ३५४ दिवस धरीत असल्यानें याच्या त्रिंशद्वर्षीय एका चक्रांत (३५४ × ३० + ११) = १०६३१ दिवस अर्थात् याच्या मध्यम मानाच्या एका वर्षांत ३५४$\frac{११}{३०}$ इतके दिवस होतात. या गणनेंतील व बहुतेक हिंदू कालगणनांतील महिने सामान्यतः चांद्रमानाचे असल्यानें ते एकमेकांशीं जवळ जवळ जुळते अससात. पण हा काल पूर्णपणें चांद्रमानी असल्यानें यांत अधिक मास नाहीं. उलट बहुतेक हिंदू काल चांद्रसौरमानी असल्यानें त्यांत अधिक मास आहे. याचा परिणाम असा होतो कीं, दर तिसरे किंवा चौथे वर्षीं हिजरींतील महिना हिंदू महिन्याच्या मागें

येतो. अशा प्रकारें बत्तीस किंवा तेहतीस वर्षांत हिजरी महिना बारा महिने मागें गेल्यानें पुनः आरंभींच्या हिंदू महिन्यांत येऊन पडतो आणि ३२ किंवा ३३ वर्षांचें एक चक्र पुरें होतें. उदाहरणार्थ श. १५६४ व १५६५ या दोन वर्षीं चैत्र व मोहरम हे महिने एकमेकांशीं जुळते होते; तर श. १५६६–१५६८ या तीन सालांत चैत्र व सफर हे महिने एकमेकांशीं जुळते होते. अशा तऱ्हेनें मोहरम महिना मागें जात जात श.१५९६ सालीं म्हणजे ३३ व्या वर्षी पुन्हा चैत्र महिन्याबरोबर आला आणि नंतर पुन्हा श. १६२९ मध्यें अर्थात् ३४ व्या वर्षीं चैत्र महिन्याबरोबर आला. या सर्वांचा निष्कर्ष असा कीं, एखाद्या हिजरी वर्षाशीं जुळतें शक किंवा इसवी वर्ष अंदाजानें सांगणें शक्य होत नाहीं. त्यासाठीं गणितच करावें लागतें. हिजरी वर्षाशीं जुळतें इसवी वर्ष काढण्याच्या दोन रीती आहेत. दिलेल्या हिजरी वर्षांतून त्याचा $\frac{३}{१००}$ उणे करून बाकींत ६२१·५४ मिळविले असतां हिजरी वर्षाशीं जुळतें इसवी वर्ष येईल. उदाहरणार्थ, १३१८ हिजरीशीं जुळतें इसवी वर्ष ($\frac{१३१८}{१} - \frac{१३१८ \times ३}{१००} + ६२१ \cdot ५४ = \frac{१३१८}{१} + ६२१ \cdot ५४ - ३९ \cdot ५४ = १९३९ \cdot ५४ - ३९ \cdot ५४ =$) १९०० हें येतें. पण ही ढोबळ रीत झाली. अधिक सूक्ष्म रीत अशीः– हिजरी वर्ष, महिने व दिवस यांस दशांश अपूर्णांकाचें रूप देऊन त्यास ·९७०२२५ नीं गुणावें व गुणाकारांत ६२१·५४ ही संख्या मिळविली असतां इसवी वर्ष, महिने व दिवस येतील.

पुढें हिजरी वर्षारंभाशीं जुळत्या इंग्रजी तारखांचें कोष्टक दिलें आहे. त्यावरून कोणत्याही हिजरी तारखेस इंग्रजी तारीख कोणती येते हें काढणें फार सोपें जातें. उदाहरणार्थ हि. १३११ रजब ९ शीं जुळती इसवी तारीख कोष्टकांच्या साह्यानें काढतां येते ती अशीः–हि. १३११ साल इ. १८९३ जुलै १५ ला सुरू होतें. १५ जुलैला १८९३ इसवी वर्षारंभापासून (१८१ + १४ =) १९५ दिवस होतात. ९ रजबला हि. १३११ च्या वर्षारंभापासून (१७७ + ९ =) १८६ दिवस पूर्ण होतात. अर्थात् इ. १८९३ जानेवारी १ पासून हि. १३११ रजब ९ पर्यंत १९५ + १८६ = ३८१ दिवस होतात. यांतून इ. १८९३ चे ३६५ दिवस उणे केले म्हणजे खालीं १६ दिवस राहतात. म्हणून १६ जानेवारी १८९४ ही इष्ट इसवी तारीख आली.

पुढें दिलेल्या तक्त्याच्या साह्यानें इष्ट वार काढणें असेंच सोपें जातें. कसें तें पहा. १३११ मधून ३० नीं भाग जाणारी सर्वांत मोठी संख्या १२९० ही उणे केली म्हणजे खालीं २१ उरतात. १२९० व २१ यांना सामान्य अक्षर क असून रजब व क यांना सामान्य अशा दुसऱ्या रकान्याच्या वारनिदर्शक भागांत मंगळवारासमोर २, ९, १६, २३ इ. तारखा येतात. तेव्हां ९ रजबला मंगळवार आला.

हिजरी सनांतील तारखेस इसवी सनाची कोणती तारीख येईल तें काढण्याची पद्धति वर दिली. पण या सनांतील तारखेशीं जुळणारी हिंदू मिति काढणें इतकें सोपें नाहीं. त्यासाठीं मोठा हिशेब करावा लागेल. पण ढोबळ मानानें कशी काढतां येईल तें येथें विशद करतों. समजा आपणांस हि. १०९२ शव्वाल १२ ला हिंदू मिति कोणती असेल हें काढावयाचें आहे. हिजरी वर्षारंभदिनांच्या कोष्टकाप्रमाणें १०९२ हिजरी साल (= हि. १०९२ मोहरम १) इ. १६८१ जानेवारी ११ ला सुरू होतें. या इंग्रजी सनाशीं जुळतें शक वर्ष १६०२ येऊन महिना पौष व माघ या दोहोंपैकीं एक येतो. पण शव्वाल मोहरमपासून दहावा महिना असल्यानें शव्वाल महिना चालू असण्याच्या वेळीं श.१६०३ हें वर्ष येईल. सोबत दिलेल्या कोष्टकांत श. १६०३ सालीं चैत्राशीं जुळता मुसलमानी महिना रबिलावल येतो. पण पुढल्या म्हणजे श. १६०४ सालीं चैत्राशीं जुळणारा महिना रबिलाखर येत असल्यानें श. १६०३ मध्यें किंवा १६०४ च्या आरंभीं अधिक मास आला असला पाहिजे. अधिक मासाच्या कोष्टकाप्रमाणें श. १६०४ त चैत्र महिना अधिक येत आहे; येवढेंच नव्हे तर श. १६०३ मध्यें आश्विन अधिक असून पौषाचा क्षय आहे. तेव्हां आपलें काम येवढेंच उरलें कीं रबिलावलशीं जुळता चैत्र असेल तर शव्वालशीं जुळता महिना कोणता येईल तें काढावयाचें. रबिलावलपासून आठवा महिना शव्वाल येतो आणि चैत्रापासून आठवा निज आश्विन येतो. तेव्हां हि. १०९२ शव्वालशीं जुळता काळ शक १६०३ आश्विन असा झाला. मुसलमानी महिन्याची तारीख सामान्यतः एक दिवस, क्वचित् दोन व अगदीं क्वचित् तीन दिवस हिंदू मितींच्या मागें किंवा त्याच दिवशीं असते. तेव्हां शव्वाल १२ ला बहुधा शु. १३, क्वचित् शु. १४ आणि अगदीं क्वचित् शु. १५ किंवा शु. १२ च येईल. जंत्रीप्रमाणें शुद्ध १३ येत आहे.

शिचसा खं. ५, ले. ९१८ व आणखी दोन अप्रकाशित पत्रें यांत पुढील कालोल्लेख आहेत.

	पत्राच्या आरंभीं	पत्राच्या शेवटीं
(१)	सुा सलास सन हजार १०१९	१ मोहरम सन हजार येकूनीस१०१९
(२)	,, सलास सन हजार १०२९	५ जिल्काद सन हजार १०२९
(३)	,, सबा सन हजार १०३३	———————

प्रत्येक उल्लेखाच्या पूर्वार्धांत आल्यासारखा निर्देश एखाद्या कागदांत येतो तेव्हां त्यांतील आकडा दक्षिणी फसली सनाचा व आरंभींचा संख्यावाचक अरबी शब्द दक्षिणी सुहूर सनाच्या अखेरचे आकड्याचा निदर्शक असतो असा सामान्य नियम आहे. पण येथें दक्षिणी व उत्तरी फसली आणि दक्षिणी व खानदेशी किंवा फारूकी सुहूर यांपैकीं कोणतीही जोडी घेतली तरी ती विवक्षित नाहीं असें दिसतें. कारण त्यांमधील अंतरें अशीं आहेत—
दक्षिणी फसली–दक्षिणी सुहूर = ९; उत्तरी फसली–दक्षिणी सुहूर = ११; दक्षिणी फसली–खानदेशी सुहूर = ७; उत्तरी फसली–खानदेशी सुहूर = ९.

पण वर कालोल्लेख दिले आहेत त्यांत सहा वर्षांचें अंतर येतें. तेव्हां येथें फसली सन विवक्षित नाहीं एवढें निश्चित. राहतां राहिला हिजरी सन. तो येथें विवक्षित आहे असें धरल्यास पत्रांच्या मराठी इंग्रजी तारखा अशा येतात—

(१) श. १५३२ चैत्र शुद्ध ११२ = इ. १६१० मार्च १६
(२) श. १५४२ आश्विन शुद्ध ७ = इ. १६२० सप्टेंबर २२
(३) श. १५४५।४६ = इ. १६२३।२४.

हीं पत्रें खानदेशांतील आहेत. तिकडे खानदेशी अथवा फारूकी सुहूर सन प्रचलित होता. येथेंही तोच विवक्षित असेल असें गृहीत धरलें तर वरील तारखांशीं जुळते खानदेशी किंवा फारूकी सुहूर सन अनुक्रमें १०१३, १०२३ व १०२६।२७ असे येतील. यांचे शेवटचे आकडे दाखविणारे अरबी शब्द अनुक्रमें सलास, सलास व सबा हे असल्यानें येथें फारूकी सुहूर व हिजरी असे दोन सन जोडीनें विवक्षित आहेत असें समजलें पाहिजे. अर्थात येथें 'सन हजार' या शब्दांनीं आरंभ होणारा कालोल्लेख हिजरीचाच आहे, सामान्यतः समजतो त्याप्रमाणें फसलीचा नाहीं असें धरण्यास हरकत नाहीं.

आतां येथें हिजरी वर्षारंभीं असलेल्या इंग्रजी तारखांचें कोष्टक देतों व या कोष्टकांतील नोंदींचा अर्थ कसा करावयाचा तें दोन उदाहरणें देऊन स्पष्ट करतों. ७ वी नोंद १७=६३८ जा २३,१२,२ अशी आहे. हिचा अर्थ असा कीं, हिजरी १७,१८,१९ हीं सालें अनुक्रमें इ. ६३८,६३९,६४० या वर्षी जानेवारी २३,१२,२ या तारखांस सुरू झालीं. ८ व्या नोंदीचा अर्थ असा कीं, २० व २१ हिजरी वर्षें इ. ६४० व ६४१ डिसेंबर २१ व १० ला सुरू झालीं. सर्व नोंदींचा उलगडा असाच करून घ्यावयाचा आहे.

१=६२२ जु १६,५	६२=६८१ स २०,१०
३=६२४ जू २४,१३,२	६४=६८३ आ ३०,१८,८
६=६२७ मे २३,११,१	६७=६८६ जु २८;१८,६
९=६३० ए २०,९	७०=६८९ जू २५,१५,४
११=६३२ मा २९,१८,७	७३=६९२ मे २३,१३,२
१४=६३५ फे २५,१४,२	७६=६९५ ए २१,१०
१७=६३८ जा २३,१२,२	७८=६९७ मा ३०,२०,९
२०=६४० डि २१,१०	८१=७०० फे २६,१५,४
२२=६४२ नो ३०,१९,७	८४=७०३ जा २४,१४,२
२५=६४५ ऑ २८,१७,७	८७=७०५ डि २३,१२,१
२८=६४८ स २५,१४,४	९०=७०८ नो २०,९
३१=६५१ आ २४,१२,२	९२=७१० ऑ २९,१९,७
३४=६५४ जु २२,११	९५=७१३ स २६,१६,५
३६=६५६ जू ३०,१९,९	९८=७१६ आ २५,१४,३
३९=६५९ मे २९,१७,७	१०१=७१९ जु २४,१२,१
४२=६६२ ए २६,१५,४	१०४=७२२ जू २१,१०
४५=६६५ मा २४,१३,३	१०६=७२४ मे २९,१९,८
४८=६६८ फे २०,९	१०९=७२७ ए २८,१६,५
५०=६७० जा २९,१८,८	११२=७३० मा २६,१५,३
५३=६७२ डि २७,१६,६	११५=७३३ फे २१,१०
५६=६७५ नो २५,१४,३	११७=७३५ जा ३१,२०,८
५९=६७८ ऑ २३,१३,१	१२०=७३७ डि २९,१८,७

१२३=७४० नो २६,१५,४
१२६=७४३ ऑ २५,१३,२
१२९=७४६ स २२,११
१३१=७४८ आ ३१,२०,९
१३४=७५१ जु ३०,१८,७
१३७=७५४ जू २७,१६,५
१४०=७५७ मे २५,१४,४
१४३=७६० ए २२,११,१
१४६=७६३ मा २१,१०
१४८=७६५ फे २७,१६,६
१५१=७६८ जा २६,१४,४
१५४=७७० डि २४,१३,२
१५७=७७३ नो २१,११
१५९=७७५ ऑ ३१,१९,९
१६२=७७८ स २८,१७,६
१६५=७८१ आ २६,१५,५
१६८=७८४ जु २४,१४,३
१७१=७८७ जू २२,११
१७३=७८९ मे ३१,२०,१०
१७६=७९२ ए २८,१८,७
१७९=७९५ मा २७,१६,५
१८२=७९८ फे २२,१२,१
१८५=८०१ जा २०,१०
१८७=८०२ डि ३०,२०,८
१९०=८०५ नो २७,१७,६
१९३=८०८ ऑ २५,१५,४
१९६=८११ स २३,१२,१
१९९=८१४ आ २२,११
२०१=८१६ जु ३०,२०,९

२०४=८१९ जू २८,१७,६
२०७=८२२ मे २७,१६,४
२१०=८२५ ए २४,१३,२
२१३=८२८ मा २२,११
२१५=८३० फे २८,१८,७
२१८=८३३ जा २७,१६,५
२२१=८३५ डि २६,१४,३
२२४=८३८ नो २३,१२
२२६=८४० ऑ ३१,२१,१०
२२९=८४३ स ३०,१८,७
२३२=८४६ आ २८,१७,५
२३५=८४९ जु २६,१५,५
२३८=८५२ जू २३,१२,२
२४१=८५५ मे २२,१०
२४३=८५७ ए ३०,१९,८
२४६=८६० मा २८,१७,७
२४९=८६३ फे २४,१३,२
२५२=८६६ जा २२,११,१
२५५=८६८ डि २०,९
२५७=८७० नो २९,१८,७
२६०=८७३ ऑ २७,१६,६
२६३=८७६ स २४,१३,३
२६६=८७९ आ २३,१२,१
२६९=८८२ जु २१,११
२७१=८८४ जू २९,१८,८
२७४=८८७ मे २८,१६,६
२७७=८९० ए २५,१५,३
२८०=८९३ मा २३,१३,२
२८३=८९६ फे १९,८

२८५=८९८ जा २८,१७,७
२८८=९०० डि २६,१६,५
२९१=९०३ नो २४,१३,२
२९४=९०६ ऑ २२,१२
२९६=९०८ स ३०,२०,९
२९९=९११ आ २९,१८,७
३०२=९१४ जु २७,१७,५
३०५=९१७ जू २४,१४,३
३०८=९२० मे २३,१२,१
३११=९२३ ए २१,९
३१३=९२५ मा २९,१९,८
३१६=९२८ फे २५,१४,३
३१९=९३१ जा २४,१३,१
३२२=९३३ डि २२,११
३२४=९३५ नो ३०,१९,८
३२७=९३८ ऑ २९,१८,६
३३०=९४१ स २६,१५,४
३३३=९४४ आ २४,१३,२
३३६=९४७ जु २३,११,१
३३९=९५० जू २०,९
३४१=९५२ मे २९,१८,७
३४४=९५५ ए २७,१५,४
३४७=९५८ मा २५,१४,३
३५०=९६१ फे २०,९
३५२=९६३ जा ३०,१९;७
३५५=९६५ डि २८,१७;७
३५८=९६८ नो २५,१४,४
३६१=९७१ ऑ २४,१२,२
३६४=९७४ स २१,१०

३६६=९७६ आ ३०,१९,९
३६९=९७९ जु २९,१७;७
३७२=९८२ जू २६;१५,४
३७५=९८५ मे २४,१३,३
३७८=९८८ ए २१,११
३८०=९९० मा ३१,२०,९
३८३=९९३ फे २६,१५,५
३८६=९९६ जा २५,१४,३
३८९=९९८ डि २३,१३,१
३९२=१००१ नो २०,१०
३९४=१००३ ऑ ३०,१८,८
३९७=१००६ स २७,१७,५
४००=१००९ आ २५,१५;४
४०३=१०१२ जु २३,१३,२
४०६=१०१५ जू २१,१०
४०८=१०१७ मे ३०,२०,९
४११=१०२० ए २७,१७,६
४१४=१०२३ मा २६,१५,४
४१७=१०२६ फे २२,११
४१९=१०२८ जा ३१,२०,९
४२२=१०३० डि २९,१९,७
४२५=१०३३ नो २६,१६,५
४२८=१०३६ ऑ २५,१४,३
४३१=१०३९ स २३,११
४३३=१०४१ आ ३१,२१,१०
४३६=१०४४ जु २९,१९,८
४३९=१०४७ जू २८,१६,५
४४२=१०५० मे २६,१५,३
४४५=१०५३ ए २३;१२,२

४४८=१०५६ मा २१;१०

४५०=१०५८ फे २८,१७,६

४५३=१०६१ जा २६,१५,४

४५६=१०६३ डि २५,१३,३

४५९=१०६६ नो २२,११

४६१=१०६८ ऑ ३१,२०,९

४६४=१०७१ स २९,१७,६

४६७=१०७४ आ २७,१६,५

४७०=१०७७ जु २५,१४, ४

४७३=१०८० जू २२,११,१

४७६=१०८३ मे २१,१०

४७८=१०८५ ए २९,१८,८

४८१=१०८८ मा २७,१६,६

४८४=१०९१ फे २३,१२;१

४८७=१०९४ जा २१;११

४८९=१०९५ डि ३१,१९,९

४९२=१०९८ नो २८,१७,६

४९५=११०१ ऑ २६,१५;५

४९८=११०४ स २३;१३,२

५०१=११०७ आ २२,११

५०३=११०९ जु ३१,२०,१०

५०६=१११२ जू २८,१८,७

५०९=१११५ मे २७,१६,५

५१२=१११८ ए २४,१४,२

५१५=११२१ मा २२,१२,१

५१८=११२४ फे १९,७

५२०=११२६ जा २७,१७,६

५२३=११२८ डि २५,१५,४

५२६=११३१ नो २३,१२,१

५२९=११३४ ऑ २२,११

५३१=११३६ स २९,१९,८

५३४=११३९ आ २८,१७,६

५३७=११४२ जु २७,१६, ४

५४०=११४५ जू २४,१३,२

५४३=११४८ मे २२,११

५४५=११५० ए ३०,२०,८

५४८=११५३ मा २९,१८,७

५५१=११५६ फे २५,१३,२

५५४=११५९ जा २३,१२

५५६=११६० डि ३१,२१,१०

५५९=११६३ नो ३०,१८,७

५६२=११६६ ऑ २८,१७,५

५६५=११६९ स २५,१४,४

५६८=११७२ आ २३,१२,२

५७१=११७५ जु २२,१०

५७३=११७७ जू ३०,१९,८

५७६=११८० मे २८,१७,७

५७९=११८३ ए २६,१४,४

५८२=११८६ मा २४,१३,२

५८५=११८९ फे १९,८

५८७=११९१ जा २९,१८,७

५९०=११९३ डि २७;१६,६

५९३=११९६ नो २४,१३,३

५९६=११९९ ऑ २३,१२,१

५९९=१२०२ स २०,१०

६०१=१२०४ आ २९,१८,८

६०४=१२०७ जु २८,१६,६

६०७=१२१० जू २५,१५,३

६१०=१२१३ मे २३,१३,२
६१३=१२१६ ए २०,१०
६१५=१२१८ मा ३०,१९,८
६१८=१२२१ फे २५,१५, ४
६२१=१२२४ जा २४,१३,२
६२४=१२२६ डि २२,१२
६२६=१२२८ नो ३०,२०,९
६२९=१२३१ ऑ २९,१८,७
६३२=१२३४ स २६,१६,४
६३५=१२३७ आ २४,१४,३
६३८=१२४० जु २३,१२,१
६४१=१२४३ जू २१,९
६४३=१२४५ मे २९,१९,८
६४६=१२४८ ए २६,१६,५
६४९=१२५१ मा २६,१४,३
६५२=१२५४ फे २१, १०
६५४=१२५६ जा ३०,१९,८
६५७=१२५८ डि २९,१८,६
६६०=१२६१ नो २६,१५,४
६६३=१२६४ ऑ २४,१३,२
६६६=१२६७ स २२,१०
६६८=१२६९ आ ३१,२०,९
६७१=१२७२ जु २९,१८,७
६७४=१२७५ जू २७,१५,४
६७७=१२७८ मे २५,१४,३
६८०=१२८१ ए २२,११,१
६८३=१२८४ मा २०,९
६८५=१२८६ फे २७,१६,६
६८८=१२८९ जा २५,१४,४

६९१=१२९१ डि २४,१२,२
६९४=१२९४ नो २१,१०
६९६=१२९६ ऑ ३०,१९,९
६९९=१२९९ स २८,१६,६
७०२=१३०२ आ २६,१५,४
७०५=१३०६ जु २४,१३,३
७०८=१३०८ जू २१,११
७१०=१३१० मे ३१,२०,९
७१३=१३१३ ए २८,१७,७
७१६=१३१६ मा २६,१६,५
७१९=१३१९ फे २२,१२
७२१=१३२१ जा ३१,२०,१०
७२४=१३२३ डि ३०,१८,८
७२७=१३२६ नो २७,१७,५
७३०=१३२९ ऑ २५,१५, ४
७३३=१३३२ स २२,१२,१
७३६=१३३५ आ २१,१०
७३८=१३३७ जु ३०,२०,९
७४१=१३४० जू २७,१७,६
७४४=१३४३ मे २६,१५,४
७४७=१३४६ ए २४,१३,१
७५०=१३४९ मा २२,११
७५२=१३५१ फे २८,१८,६
७५५=१३५४ जा २६,१६,५
७५८=१३५६ डि २५,१४,३
७६१=१३५९ नो २३,११
७६३=१३६१ ऑ ३१,२१,१०
७६६=१३६४ स २८,१८,७
७६९=१३६७ आ २८,१६,५

७७२=१३७० जु २६,१५,३
७७५=१३७३ जू २३,१२,२
७७८=१३७६ मे २१,१०,
७८०=१३७८ ए ३०,१९,७
७८३=१३८१ मा २८,१७,६
७८६=१३८४ फे २४,१२,२
७८९=१३८७ जा २२,११
७९१=१३८८ डि ३१,२०,९
७९४=१३९१ नो २९,१७,६
७९७=१३९४ ऑ २७,१६,५
८००=१३९७ स २४,१३,३
८०३=१४०० आ २२,११,१
८०६=१४०३ जु २१,१०,
८०८=१४०५ जू २९,१८,८
८११=१४०८ मे २७,१६,६
८१४=१४११ ए २५,१३,३
८१७=१४१४ मा २३,१३,१
८२०=१४१७ फे १८,८
८२२=१४१९ जा २८,१७,६
८२५=१४२१ डि २६,१५,५
८२८=१४२४ नो २३,१३,२
८३१=१४२७ ऑ २२,११
८३३=१४२९ स ३०,१९,९
८३६=१४३२ आ २८,१८,७
८३९=१४३५ जु २७,१६,५
८४२=१४३८ जू २४,१४,२
८४५=१४४१ मे २२,१२,१
८४८=१४४४ ए २०,९
८५०=१४४६ मा २९,१९,७

८५३=१४४९ फे २४,१४,३
८५६=१४५२ जा २३,१२,१
८५९=१४५४ डि २२,११
८६१=१४५६ नो २९,१९,८
८६४=१४५९ ऑ २८,१७,६
८६७=१४६२ स २६,१५,३
८७०=१४६५ आ २४,१३,२
८७३=१४६८ जु २२,११
८७५=१४७० जू ३०,२०,८
८७८=१४७३ मे २९,१८,७
८८१=१४७६ ए २६,१५,४
८८४=१४७९ मा २५,१३,२
८८७=१४८२ फ २०,९
८८९=१४८४ जा ३०,१८,७
८९२=१४८६ डि २८,१७,५
८९५=१४८९ नो २५,१४,४
८९८=१४९२ ऑ २३,१२,२
९०१=१४९५ स २१,९
९०३=१४९७ आ ३०,१९,८
९०६=१५०० जु २८,१७,७
९०९=१५०३ जू २६,१४,४
९१२=१५०६ मे २४,१३,२
९१५=१५०९ ए २१,१०
९१७=१५११ मा ३१,१९,९
९२०=१५१४ फे २६,१५,५
९२३=१५१७ जा २४,१३,३
९२६=१५१९ डि २३,१२,१
९२९=१५२२ नो २०,१०
९३१=१५२४ ऑ २९,१८,८

९३४=१५२७ स २७,१५,५
९३७=१५३० आ २५,१५,३
९४०=१५३३ जु २३,१३,२
९४३=१५३६ जू २०,१०
९४५=१५३८ मे ३०,१९,८
९४८=१५४१ ए २७,१७,६
९५१=१५४४ मा २५,१५,४
९५४=१५४७ फे २१,११
९५६=१५४९ जा ३०,२०,९
९५९=१५५१ डि २९,१८,७
९६२=१५५४ नो २६,१६,४
९६५=१५५७ ऑ २४,१४,३
९६८=१५६० स २२,११
९७०=१५६२ आ ३१,२१,९
९७३=१५६५ जु २९,१९,८
९७६=१५६८ जू २६,१६,५
९७९=१५७१ मे २६,१४,३
९८२=१५७४ ए २३,१२
९८४=१५७६ मा ३१,२१, १०
९८७=१५७९ फे २८,१७,५
९९०=१५८२ जा २६,१५,४
९९३=१५८४ डि २४, १३,२
९९६=१५८७ नो २२,१०
९९८=१५८९ ऑ ३१,२०,९
१००१=१५९२ स २८,१७,६
१००४=१५९५ आ २७,१५,४
१००७=१५९८ जु २५,१४,३
१०१०=१६०१ जू २२,११,१
१०१३=१६०४ मे २०,९
१०१५=१६०६ ए २९,१८,७
१०१८=१६०९ मा २७,१६,६
१०२१=१६१२ फे २३,११,१
१०२४=१६१५ जा २१,१०
१०२६=१६१६ डि ३०,१९,९
१०२९=१६१९ नो २८,१६,६
१०३२=१६२२ ऑ २६,१५,४
१०३५=१६२५ स २३,१२,२
१०३८=१६२८ आ २१,११
१०४०=१६३० जु ३१,२०,९
१०४३=१६३३ जू २८,१७,७
१०४६=१६३६ मे २६,१६,५
१०४९=१६३९ ए २४,१३,२
१०५२=१६४२ मा २२,१२
१०५४=१६४४ फे २९,१७,७
१०५७=१६४७ जा २७,१७,५
१०६०=१६४९ डि २५,१५,४
१०६३=१६५२ नो २२,१२,१
१०६६=१६५५ ऑ २१,१०
१०६८=१६५७ स २९.१९,८
१०७१=१६६० आ २७,१७,६
१०७४=१६६३ जु २६,१५,४
१०७७=१६६६ जू २४,१३,१
१०८०=१६६९ मे २२,११
१०८२=१६७१ ए ३०,१९,८
१०८५=१६७४ मा २८,१८,६
१०८८=१६७७ फे २४,१३,२
१०९१=१६८० जा २३,११
१०९३=१६८१ डि ३१,२१,१०

१०९६=१६८४ नो २८,१८,७

१०९९=१६८७ ऑ २८,१६,५

११०२=१६९० स २५,१४,२

११०५=१६९३ आ २३,१२,२

११०८=१६९६ जु २१,१०

१११०=१६९८ जू ३०,१९,७

१११३=१७०१ मे २८,१७,६

१११६=१७०४ ए २५,१४,४

१११९=१७०७ मा २४,१२,२

११२२=१७१० फे १९,८

११२४=१७१२ जा २९,१७,६

११२७=१७१४ डि २७,१६,५

११३०=१७१७ नो २४,१३,३

११३३=१७२० ऑ २२,११,१

११३६=१७२३ स २०,९

११३८=१७२५ आ २९,१८,८

११४१=१७२८ जु २७,१६,६

११४४=१७३१ जू २५,१३,३

११४७=१७३४ मे २३,१३,१

११५०=१७३७ ए २०,१०

११५२=१७३९ मा ३०,१८,८

११५५=१७४२ फे २५,१४,४

११५८=१७४५ जा २३,१३,२

११६१=१७४७ डि २२,११

११६३=१७४९ नो ३०,१९,९,८

११६७=१७५३ ऑ १९,१८,७

११७०=१७५६ स २६,१५,४

११७३=१७५९ आ २५,१३,२

११७६=१७६२ जु २३,१२,१

११७९=१७६५ जू २०,९

११८१=१७६७ मे ३०,१८,७

११८४=१७७० ए २७,१६,४

११८७=१७७३ मा २५,१४,४

११९०=१७७६ फे २१, ९

११९२=१७७८ जा ३०,१९,८

११९५=१७८० डि २८,१७,७

११९८=१७८३ नो २६,१४,४

१२०१=१७८६ ऑ २४,१३,२

१२०४=१७८९ स २१,१०

१२०६=१७९१ आ ३१,१९,९

१२०९=१७९४ जु २९,१८,७

१२१२=१७९७ जू २६,१५,५

१२१५=१८०० मे २५,१४,४

१२१८=१८०३ ए २३,१२,१

१२२१=१८०६ मा २१,११

१२२३=१८०८ फे २८,१६,६

१२२६=१८११ जा २६,१६,४

१२२९=१८१३ डि २४,१४,३

१२३२=१८१६ नो २१,११

१२३४=१८१८ आ ३१,२०,९

१२३७=१८२१ स २८,१८,७

१२४०=१८२४ आ २६,१६,५

१२४३=१८२७ जु २५,१४,३

१२४६=१८३० जू २२,१२

१२४८=१८३२ मे ३१,२१,१०

१२५१=१८३५ ए २९,१८,७

१२५४=१८३८ मा २७,१७,५

१२५७=१८४१ फे २३,१२,१

१२६०=१८४४ जा २२,१०
१२६२=१८४५ डि ३०,२०,९
१२६५=१८४८ नो २७,१७,६
१२६८=१८५१ ऑ २७,१५,४
१२७१=१८५४ स २४,१३,१
१२७४=१८५७ आ २२,११
१२७६=१८५९ जु ३१,२०,९
१२७९=१८६२ जू २९,१८,६
१२८२=१८६५ मे २७,१६,५
१२८५=१८६८ ए २४,१३,३
१२८८=१८७१ मा २३,११,१
१२९१=१८७४ फे १८,७
१२९३=१८७६ जा २८,१६,५
१२९६=१८७८ डि २६,१५,४
१२९९=१८८१ नो २३,१२,२
१३०२=१८८४ ऑ २१,१०
१३०४=१८८६ स ३०,१९,७
१३०७=१८८९ आ २८,१७,७
१३१०=१८९२ जु २६,१५,५
१३१३=१८९५ जू २४,१२,२
१३१६=१८९८ मे २२,१२,१
१३१९=१९०१ ए २०,१०
१३२१=१९०३ मा ३०,१८,८
१३२४=१९०६ फे २५, १४,४
१३२७=१९०९ जा २३,१३,२
१३३०=१९११ डि २२,११
१३३२=१९१३ नो ३०,१९,९
१३३५=१९१६ ऑ २८,१७,७
१३३८=१९१९ स २६,१५,४

१३४१=१९२२ आ २४,१४,२
१३४४=१९२५ जु २२,१२,१
१३४७=१९२८ जू २०,९
१३४९=१९३० मे २९,१९,७
१३५२=१९३३ ए २६,१६,५
१३५५=१९३६ मा २४,१४,३
१३५८=१९३९ फे २१,१०
१३६०=१९४१ जा २९,१९,८
१३६३=१९४३ डि २८,१७,६
१३६६=१९४६ नो २५,१५,३
१३६९=१९४९ ऑ २४,१३,२
१३७२=१९५२ स २१,१०
१३७४=१९५४ आ ३०,२०,८
१३७७=१९५७ जु २९,१८,७
१३८०=१९६० जू २६,१५,४
१३८३=१९६३ मे २५,१३,२
१३८६=१९६६ ए २२,११
१३८८=१९६८ मा ३१,२०,९
१३९१=१९७१ फे २७,१६,४
१३९४=१९७४ जा २५,१४,३
१३९७=१९७६ डि २३,१२,२
१४००=१९७९ नो २१,११
१४०२=१९८१ ऑ ३०,१९,८
१४०५=१९८४ स २७,१६,६
१४०८=१९८७ आ २६,१४,४
१४११=१९९० जु २४,१३,२
१४१४=१९९३ जू २१,१०
१४१६=१९९५ मे ३१,१९,९
१४१९=१९९८ ए २८,१७,६

							०	३०	६०	९०	१२०	१५०	१८०
							२१०	२४०	२७०	३००	३३०	३६०	३९०
							४२०	४५०	४८०	५१०	५४०	५७०	६००
							६३०	६६०	६९०	७२०	७५०	७८०	८१०
							८४०	८७०	९००	९३०	९६०	९९०	१०२०
							१०५०	१०८०	१११०	११४०	११७०	१२००	१२३०
							१२६०	१२९०	१३२०	१३५०	१३८०	१४१०	१४४०
०	५*	८	१३		२१	२२	य	क	ट	प	अ	च	त
१		९		१७		२५	च	त	य	क	ट	प	अ
२		१०		१८		२६	प	अ	च	त	य	क	ट
३		११	१६	१९	२४	२७	अ	च	त	य	क	ट	प
४		१२		२०		२८	ट	प	अ	च	त	य	क
	६		१४		२२		क	ट	प	अ	च	त	य
	७		१५		२३		त	य	क	ट	प	अ	च

*जाड खिळ्याच्या वर्षी जिल्हेजचे तीस दिवस होते. तक्त्यांच्या खुलाशासाठीं पृ. १२२ पहावें.

मोहरम, शव्वाल	अ	य	प	त	ट	च	क
सफर, रजब	च	क	अ	य	प	त	ट
रबिलावल, जिल्हेज	ट	च	क	अ	य	प	त
रबिलाखर, रमजान	प	त	ट	च	क	अ	य
जमादिलावल	य	प	त	ट	च	क	अ
जमादिलाखर, जिल्काद	क	अ	य	प	त	ट	च
शाबान	त	ट	च	क	अ	य	प
१ ८ १५ २२ २९	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
२ ९ १६ २३ ३०	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
३ १० १७ २४	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	सोम
४ ११ १८ २५	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	सोम	मंगळ
५ १२ १९ २६	गुरु	शुक्र	शनि	रवि	सोम	मंगळ	बुध
६ १३ २० २७	शुक्र	शनि	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु
७ १४ २१ २८	शनि	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र

हिंदू चैत्र व त्याशीं जुळते मुसलमानी महिने*

चैत्र-मोहरम : ५५५,८८; ६२०,५३,८५; ७१८,५०,८३; ८१५,४८,८१; ९१३,४६,७८; १०११,४३,७६; ११०८,४१,७३; १२०६,३८,७१; १३०४,३६,६९; १४०१,३४,६६,९९; १५३१,६४,९६; १६२९,६१,९४; १७२६,५९,९२; १८२४,५७,८९; १९२२. **चैत्र-सफर :** ५५८,९०; ६२३,५५,८८, ७२१,५३,८६; ८१८,५१,८३; ९१६,४८,८१; १०१३,४६,७८; ११११,४४,७६; १२०९,४१,७४; १३०६,३९,७१; १४०४,३६,६९; १५०१,३४,६६,९९; १६३२,६४,९७; १७२९,६२,९४; १८२७,५९,९२. **चैत्र-रबिलावल :** ५६१,९३; ६२६,५८,९१; ७२३,५६,८८; ८२१,५३,८६; ९१८,५१,८४; १०१६,४९,८१; १११४,४६,७९; १२११;४४,७६;

---

*या व अधिकमासनिदर्शक याद्यांत दुसऱ्या शतकापासून पुढील शतकांतील आंकडे देतांना प्रथमचा आंकडा पूर्ण देऊन नंतरच्या आंकड्यांतील शत व सहस्र स्थानीय आंकडे काटकसरीसाठीं गाळले आहेत. आंकडे शकवर्षांचे आहेत.

१३०९,४१,७४; १४०६,३९,७२; १५०४,३७,६९; १६०२,३४,६७,९९; १७३२,६४,९७; १८२९,६२,९५. **चैत्र-रबिलाखर**: ५६३,९६; ६२८, ६१,९३; ७२६,५८,९१; ८२४,५६,८९; ९२१,५४,८६; १०१९,५१,८४; १११६,४९,८१; १२१४,४७,७९; १३१२,४४,७७; १४०९,४२,७४; १५०७, ३९,७२; १६०४,३७,६९; १७०२,३५,६७; १८००,३२,६५,९७. **चैत्र-जमादिलावल**: ५६६,९९; ६३१,६४,९६; ७२९,६१,९४; ८२६,५९, ९१; ९२४,५६,८९; १०२२,५४,८७; १११९,५२,८४; १२१७,४९,८२; १३१४,४७,७९; १४१२,४४,७७; १५१०,४२,७५; १६०७,४०,७२; १७०५, ३७,७०; १८०२,३५,६७; १९००. **चैत्र-जमादिलाखर**: ५६९; ६०१, ३४,६६,९९; ७३१,६४,९६; ८२९,६२,९४; ९२७,५९,९२; १०२४,५७, ८९; ११२२,५४,८७; १२१९,५२,८५; १३१७,५०,८२; १४१५,४७,८०; १५१२,४५,७७; १६१०,४२,७५; १७०७,४०,७३; १८०५,३८,७०; १९०३. **चैत्र-रजब**: ५७१; ६०४,३६,६९; ७०१,३४,६७,९९; ८३२,६४,९७; ९२९,६२,९४; १०२७,५९,९२; ११२५,५७,९०; १२२२,५५,८७; १३२०, ५२,८५; १४१७,५०,८२; १५१५,४७,८०; १६१३,४५,७८; १७१०,४३, ७५; १८०८,४०,७३; १९०५. **चैत्र-शाबान**: ५७४; ६०७,३९,७२; ७०४,३७,६९; ८०२,३४,६७,९९; ९३२,६५,९७; १०३०,६२,९५, ११२७, ६०,९२; १२२५,५७,९०; १३२२,५५,८७; १४२०,५३,८५; १५१८,५०, ८३; १६१५,४८,८०; १७१३,४५,७८; १८१०,४३,७६; १९०८. **चैत्र-रमजान**: ५४४,७७; ६०९,४२,७४; ७०७,४०,७२; ८०५,३७,७०; ९०२, ३५,६७; १०००,३२,६५,९७; ११३०,६३,९५; १२२८,६०,९३; १३२५, ५८,९०; १४२३,५५,८८; १५२०,५३,८५; १६१८,५१,८३; १७१६,४८, ८१; १८१३,४६,७८; १९११. **चैत्र-शव्वाल**: ५४७,८०; ६१२,४५, ७७; ७१०,४२,७५; ८०७,४०,७२; ९०५,३७,७०; १००३,३५,६८; ११००,३३,६५,९८; १२३०,६३,९५; १३२८,६०,९३; १४२५,५८,९१; १५२३,५६,८८; १६२१,५३,८६; १७१८,५१,८३; १८१६,४८,८१; १९१४. **चैत्र-जिल्काद**: ५५०,८२; ६१५,४७,८०; ७१२,४५,७७; ८१०,४३,७५; ९०८,४०,७३; १००५,३८,७०; ११०३,३५,६८; १२००, ३३,६६,९८; १३३१,६३,९६; १४२८,६१,९३; १५२६,५८,९१; १६२३,

५६,८८; १७२१,५४,८६; १८१९,५१,८४; १९१६. **चैत्र-जिल्हेज :**
५५२,८५; ६१७,५०,८३; ७१५,४८,८०; ८१३,४५,७८; ९१०,४३,७५;
१००८,४०,७३; ११०६,३८,७१; १२०३,३६,६८; १३०१,३३,६६,९८;
१४३१,६३,९६; १५२८,६१,९४; १६२६,५९,९१; १७२४,५६,८९; १८२१,
५४,८६; १९१९.

महिने, ऋतु, वार, तिथि, इत्यादि.

महिने

चैत्रादि चांद्र महिने प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पर्यायनामांचाही एक संच आहे. हीं पर्यायनामें व यांचीं सहज लक्षांत न येणारीं कांहीं अपभ्रष्ट नांवें जुन्या पोथ्या व ताम्रपट-शिलालेख यांत आढळतात तीं अशीं—१ **चैत्र**-मधु. २ **वैशाख**-माधव. ३ **ज्येष्ठ**-श-शुक्र. ४ **आषाढ**-शुचि. ५ **श्रावण**-नभस्; सावन. ६ **भाद्रपद**-नभस्य; प्रौष्ठपद, भादो, कौर. ७ **आश्विन**-इष; आश्वयुज, आसोज, कुवार, अशेअश. ८ **कार्तिक**-ऊर्ज. ९ **मार्गशीर्ष**-सहस्; आग्रयण, आग्रहायणिक, अगहन, अग्रण. १० **पौष**-सहस्य; तिष्य. ११ **माघ**-तपस्; माह. १२ **फाल्गुन**-तपस्य; फागन. याशिवाय चांद्र व सौर वर्षांचा मेळ घालण्यासाठीं सुमारें तीन वर्षांनीं जो तेरावा महिना येतो त्यास अधि, अधिक, प्रथम, मल अथवा धोंडा मास म्हणतात व त्यापुढील महिन्यास द्वितीय किंवा निज मास ही संज्ञा आहे.

तमिळ प्रदेशांत अनेक ठिकाणीं सौर महिने चालू असतांही कांहीं ठिकाणीं त्यांस मेषादि राशींचीं व कांहीं ठिकाणीं अपभ्रष्ट रूपांत चैत्रादि नांवें देतात व बंगाल्यांत एक महिना पुढचीं म्हणजे वैशाखादि नांवें देतात. दोन्ही गोष्टींचा उलगडा होण्यासाठीं येथें कोष्टकच देतों—

मेष (मेडम्), शि-चित्तिरै, वैशाख
वृषभ (एडवम्), वैका-गा-याशि, ज्येष्ठ
मिथुन (मिदुनम्), आनि, आषाढ
कर्क (कर्कडकम्), आडि, श्रावण
सिंह (चिंगम्), आवणि, भाद्रपद
कन्या (कन्नि), पुरट्टादि-शि, आश्विन
तुला (तुलम्), अर्प्पिशि-अप्पिशि ऐप्पशि, कार्तिक
वृश्चिक (वृश्चिकम्), कार्त्तिगै,मार्गशीर्ष
धनुस् (धनु), मार्गाळि, पौष
मकर (मकरम्), तै, माघ
कुंभ (कुंभम्), माशि, फाल्गुन
मीन (मीनम्), पंगुनि, चैत्र

उत्तरेंत व दक्षिणेंत चैत्रादि चांद्र महिनेच प्रचारांत असले तरी दक्षिणेंतील महिने अमांत, तर उत्तरेंतील पूर्णिमांत असतात. यामुळें प्रत्येक महिन्याचा शुद्ध पक्ष दोन्हीकडे सारखाच राहिला तरी वद्य पक्षांत फरक पडतो. दक्षिणेंतील चैत्रादि महिन्यांचे वद्य पक्ष उत्तरेंत अनुक्रमें वैशाखादि महिन्यांचे बनतात. मध्य युगामध्यें हिंदुस्थानांत बहुधा सर्वत्र दोन्ही पद्धति विकल्पानें चालत. अर्वाचीन कालीं उत्तरेंत वावरणाऱ्या मराठ्यांनींही कधीं कधीं महिन्यांचा उल्लेख करतांना उत्तरी पद्धतीचा अवलंब केल्याचें आढळलें आहे. म्हणून कोणत्याही लेखांतील कालनिर्देशाचा विचार करतांना महिन्याचा उल्लेख कोणत्या पद्धतीचा आहे हें अवश्य पहावें लागतें. उत्तरी व दक्षिणी महिन्यांच्या वद्य पक्षांत कसा फरक पडतो व शुद्ध पक्ष कसा एकच राहतो, हें खालील तक्त्यावरून नीट ध्यानांत येईल.

अमांत	पक्ष	पौर्णिमांत	अमांत	पक्ष	पौर्णिमांत
फाल्गुन	शुद्ध		भाद्रपद	शुद्ध	भाद्रपद
	वद्य	चैत्र		वद्य	आश्विन
चैत्र	शुद्ध		आश्विन	शुद्ध	
	वद्य	वैशाख		वद्य	कार्तिक
वैशाख	शुद्ध		कार्तिक	शुद्ध	
	वद्य	ज्येष्ठ		वद्य	मार्गशीर्ष
ज्येष्ठ	शुद्ध		मार्गशीर्ष	शुद्ध	
	वद्य	आषाढ		वद्य	पौष
आषाढ	शुद्ध		पौष	शुद्ध	
	वद्य	श्रावण		वद्य	माघ
श्रावण	शुद्ध		माघ	शुद्ध	
	वद्य	भाद्रपद		वद्य	फाल्गुन
भाद्रपद	शुद्ध		फाल्गुन	शुद्ध	
	वद्य	आश्विन		वद्य	चैत्र

राजपुतान्यांत सांपडलेल्या शिवाजीच्या एका जन्मटिपणांत प्रतिकारानें फाल्गुन वद्य ३ ही मिति जशीच्या तशी घेतली, तर दुसऱ्या एका टिपणांत प्रतिकारानें फाल्गुन वद्याऐवजीं उत्तरी पद्धतीप्रमाणें चैत्र वद्य घातला आहे.

या पद्धतीचा स्वीकार केल्यावर असा एक प्रश्न येतो कीं, वद्य पक्षांतील उपवास (उ. महाशिवरात्रि), धार्मिक विधि (उ. महालय) व उत्सव (उ.

गोकुळ अष्टमी), हे पूर्णिमांत व अमांत महिने पाळणाऱ्यांमध्यें निरनिराळ्या दिवशीं होतात कीं कसें ? याचें उत्तर 'नाहीं' असें आहे. उ० पितृ पंधरवडा अमांत मासपंथी भाद्रपदांत तर पूर्णिमांत मासपंथी आश्विनांत धरतात. तद्वतच इतरांविषयीं समजावें. दुसरा प्रश्न असा कीं, पूर्णिमांत मासपंथी अधिकाच्या प्रश्नाचा निकाल कसा लावतात ? त्याचें उत्तर असेंः–समजा कीं, शक १८६७ सालीं खरोखरच अधिक चैत्र आला होता. श० १८६६ च्या फाल्गुन वद्य प्रतिपदेस पूर्णिमांत-मासपंथियांचा फाल्गुन संपून चैत्र सुरू झाला तो अमावास्येपर्यंत चालला. अधिक महिना दोन लागोपाठच्या संक्रातींमधील दोन अमावास्यांनीं मर्यादित दिवसांचा असतो. नंतर चैत्र वद्य पक्ष अर्थात् अर्धा चैत्र संपल्यावर प्रथम शुद्ध व नंतर वद्य पक्ष यांनीं युक्त अधिक चैत्र आणि नंतर पुन्हा चैत्र शुद्ध अर्थात् बाकीचा अर्धा चैत्र घेतला. सामान्यतः ही पद्धति अंगिकारीत असले तरी कांहीं ठिकाणीं अगदींच ढोबळ मान धरतात. अर्थात् वरील उदाहरणांत पूर्णिमांत फाल्गुन संपल्यानंतर पूर्णिमांत अधिक चैत्र आणि नंतर पूर्णिमांत निज चैत्र असा हिशेब करतात.

अधिक व क्षय मास

गणित ज्योतिषांत अधिक व क्षय महिने हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. हे निरनिराळ्या सिद्धांतग्रंथांप्रमाणें तर निरनिराळे येतातच, पण एकाच सिद्धांतग्रंथांत दिलेल्या सूर्याच्या स्पष्ट व मध्यम अशा दोन मानांच्या गतींनीं गणित केलें असतां निरनिराळे अधिक मास येऊं शकतात. अधिक किंवा क्षय मासाचें गणित करणें जिकीरीचें असलें तरी ते कसे येतात हें वर्णन करणें सोपें आहे. हल्लींच्या खगोलविद्येप्रमाणें पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते हें सिद्ध झालें असलें तरी आपल्या जुन्या ज्योतिषग्रंथांत पृथ्वीभोंवतीं सूर्य फिरतो किंवा आकाशांतील नक्षत्रवर्तुळांतून फिरतो असें गृहीत धरलें आहे. सूर्याला हें नक्षत्रचक्र हिंडून पुरें करण्यासाठीं जो वेळ लागतो त्यास सौर वर्ष म्हणतात आणि नक्षत्रचक्राचा बारावा हिस्सा म्हणजे एक रास चालून जाण्यास जो वेळ लागतो त्यास सौर मास अशी संज्ञा आहे. सूर्य ज्या क्षणीं एका राशींतून दुसऱ्या राशींत प्रवेश करतो त्या क्षणास संक्रान्ति किंवा संक्रमणसमय म्हणतात. अर्थात् दोन संक्रमणसमयांमधील अंतर म्हणजेच सौर मास होय. चंद्रास पृथ्वीभोंवतीं १२ फेऱ्या करण्यासाठीं लागणाऱ्या कालास चांद्र वर्ष

म्हणतात व १ फेरी करण्यासाठीं लागणारा काल चांद्र मास होय. शुद्ध किंवा वद्य प्रतिपदेपासून अमावास्या किंवा पौर्णिमा संपेतोंचा काल अर्थात् चांद्र मास होतो. सौर वर्ष चांद्र वर्षाहून मोठें असल्यानें सौर मासही चांद्र मासाहून सामान्यतः मोठा आहे. सूर्यसिद्धांताप्रमाणें सौर मास २९ दि. ७ ता. ३८ मि. ते ३१८१५८२८ इतके आणि चांद्र मास २९८७८२० ते २९८१९८३० इतके दिवस असतो. म्हणजे अगदीं क्वचित् सौर मास चांद्र मासाहून लहान होतो. सामान्यतः एका चांद्र मासांत एकच संक्रांति येते; पण सुमारें तीन वर्षांनीं असा प्रसंग येतो कीं, पुढील आकृतीप्रमाणें एक संक्रांति, एका चांद्र मासाच्या शेवटीं शेवटीं येते आणि तिजपुढील संक्रांति, मध्यें एक चांद्र मास जाऊन नंतर येणाऱ्या चांद्र मासाच्या अगदीं आरंभीं आरंभीं येते. संक्रांतिविरहित असा जो चांद्र मास त्यास अधिक मास संबोधून त्यास सामान्यतः पुढील महिन्याचें नांव देतात. उलट कांहीं वर्षांनीं असा प्रसंग येतो कीं, पुढील आकृतीप्रमाणें एक संक्रांति एका चांद्र मासाच्या अगदीं आरंभीं येऊन दुसरी संक्रांति त्याच चांद्र मासाच्या अगदीं शेवटीं येते. अशा वेळीं त्या चांद्र मासाचा क्षय झाला असें समजतात.

क्षय मास येतो तेव्हां त्याच्या मागें व पुढें थोडक्याच अवधींत एकेक अधिक मास येतो; मार्गशीर्ष, पौष व माघ यांखेरीज इतर कोणत्याही महिन्याचा क्षय होत नाहीं; उलट स्पष्ट मानाच्या गणितांत वरील तीन महिने सहसा अधिक येत नाहींत; मध्यम मानांत सौर व चांद्र मासांची लांबी ठरीव (अर्थात् सौर मास चांद्र मासापेक्षां नेहमींच मोठा) असल्यानें क्षय मास येत नाहींत; फक्त अधिकच येतात इत्यादि मुद्दे लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

अधिक किंवा क्षय महिना दोन किंवा अधिक सिद्धांतांप्रमाणें एकाच वेळीं आला तरी महिन्यांना नांवें देण्याच्या पद्धतींतील भिन्नतेमुळें एकाच महिन्यास लगतच्या दोन महिन्यांचीं नांवें येऊं शकतात. कशीं तें दोन्ही नामकरणपद्धति देऊन विशद करतों. (१) मीनादि राशींत जे महिने सुरू होतील त्यांस चैत्रादि नांवें द्यावीं, (२) मेषादि राशींमध्यें जे महिने संपतील त्यांस चैत्रादि नांवें द्यावीं, ह्या त्या दोन पद्धति. यांची कोष्टकरूपानें मांडणी करतां येईल ती अशी—

मासारंभीं रास	मास	मासांतीं रास	मासारंभीं रास	मास	मासांतीं रास
१ मीन	चैत्र	मेष	७ कन्या	आश्विन	तुला
२ मेष	वैशाख	वृषभ	८ तुला	कार्तिक	वृश्चिक
३ वृषभ	ज्येष्ठ	मिथुन	९ वृश्चिक	मार्गशीर्ष	धनुस्
४ मिथुन	आषाढ	कर्क	१० धनुस्	पौष	मकर
५ कर्क	श्रावण	सिंह	११ मकर	माघ	कुंभ
६ सिंह	भाद्रपद	कन्या	१२ कुंभ	फाल्गुन	मीन

या पद्धतींमुळें अधिक व क्षय मासांच्या नांवांत कसा फरक पडतो तें पहा–अशी कल्पना करूं कीं, एका वर्षी ळ महिन्याच्या अमावास्येस मेष सौर महिना व पुढील महिन्याच्या म्हणजे क्ष महिन्याच्या अमावास्येसही तोच मेष सौर महिना चालू राहून तिसऱ्या ज्ञ महिन्याच्या सुरवातीनंतर तो संपतो. पहिल्या पद्धतीप्रमाणें मेष रास चालू असतांच क्ष व ज्ञ हे दोन महिने चालू झाले म्हणून त्यांस वैशाख हें नांव येईल, उलट दुसऱ्या पद्धतीप्रमाणें मेष रास सुरू असतांच ळ व क्ष हे महिने संपतात. म्हणून त्यांस चैत्र हें नांव मिळेल. अर्थात् एकाच क्ष या अधिक महिन्यास पद्धत्यनुसार वैशाख व चैत्र हीं नांवें मिळतील. क्षय महिन्याचेंही असेंच आहे. समजा, क्ष महिना चालू असतांच वृश्चिक रास संपली, धनही लागून संपली आणि मकर लागल्या-वर क्ष महिना संपला. पहिल्या पद्धतीप्रमाणें ज्ञ महिना मकर राशींत सुरू होत असल्यानें त्यास माघ हें नाव मिळेल आणि क्ष महिना वृश्चिकेंत सुरू होत असल्यानें त्यास मार्गशीर्ष हें नाव मिळेल. अर्थात् येथें पौषाचा क्षय झाला असें होईल. उलट दुसऱ्या पद्धतीप्रमाणें मकर चालू असतां क्ष महिना संपत असल्यानें त्यास पौष हें नांव मिळेल. आणि वृश्चिक चालू असतां ळ महिना संपत असल्यानें त्यास कार्तिक हें नांव मिळेल. अर्थात् मार्गशीर्ष क्षय समजला जाईल. याचा अर्थ असा कीं, एकाच क्ष महिन्यास पद्धत्यनुसार अनुक्रमें मार्गशीर्ष व पौष हीं नांवें मिळून क्षय महिन्यास पौष व मार्गशीर्ष हीं नांवें मिळतील. आज सर्वत्र सामान्यतः पहिली पद्धत प्रचारांत आहे. पण ब्रह्मसिद्धांत व तदनुयायी भास्कराचार्य यांनीं दुसऱ्या पद्धतीचा पुरस्कार केला आहे. तेव्हां ते प्रथम निज व नंतर अधिक मानीत होते कीं काय, तें पाहिलें पाहिजे. ताम्रशिलाशासनांत अधिक किंवा क्षय महिन्याचा निर्देश

आला असेल तर त्याचा मेळ आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं निरनिराळे सिद्धांत ग्रंथ, त्यांचीं स्पष्ट व मध्यम मानें आणि नामकरणाच्या दोन पद्धति या सर्वांचा विचार केला पाहिजे. दोन्ही पद्धतींच्या अधिक व क्षय महिन्यांच्या आकृति अशा काढतां येतील.

अधिक मास

१ ली पद्धत		२ री पद्धत
	मीन	
चैत्र = ळ		ळ = चैत्र
	ल ल	
वैशाख = क्ष	मेष	क्ष = चैत्र
	व व	
वैशाख = ज्ञ		ज्ञ = वैशाख
	वृषभ	

क्षय मास

१ ली पद्धत		२ री पद्धत
कार्तिक = ळ		ळ = कार्तिक
	वृश्चिक	
ल		ल
मार्गशीर्ष = क्ष	धन	क्ष = पौष
व		व
	मकर	
माघ = ज्ञ		ज्ञ = माघ

अधिक मासाचें परिगणन करण्याच्या पद्धतीचा निर्देश वेदांगज्योतिषांत आहे. सूर्यचंद्रांच्या गतींचीं स्पष्ट व मध्यम मानें इ. स. सुमारें ५०० पासून ज्योतिषांत माहीत आहेत. पण अधिक व क्षय मासांच्या निश्चितीसाठीं स्पष्ट मानाचा उपयोग ११ व्या शतकापर्यंत करीत होते कीं नव्हते याविषयीं शंका आहे. श्रीपति (श. ९६२) व भास्कराचार्य (श. १०२५) मात्र क्षय मासांचे निश्चित उल्लेख करतात. तेव्हां शकाच्या दहाव्या शतकांत ते प्रचलित झाले असें समजण्यास हरकत नाहीं. श. ९७४ च्या देवळाली (अप्रसिद्ध) ताम्रपटांत त्या वर्षी स्पष्ट मानानें पौष क्षय असतांही त्याचा उल्लेख आहे.

आतां विविध सिद्धांतांप्रमाणें येणाऱ्या अधिक व क्षय महिन्यांच्या याद्या

पुढें देतों. या वापरतांना पुढील मुद्दे अवश्य लक्षांत ठेवावे. (१) साठ वर्षांचें बार्हस्पत्य वर्षचक्र सदराखालील सिद्धांतांविषयीं दिलेली माहिती नेहमीं विचारांत घ्यावी. (२) मध्यम मानाच्या गणितांत क्षय महिने नसतात (३) सिद्धांतशिरोमणि थोड्या फरकानें ब्रह्मसिद्धांताचा अनुयायी असल्यानें दोघांच्या याद्या एकत्र केल्या आहेत. ब्रह्माची यादी श. ११२२ ला संपते आणि शिरोमणीची यादी १०२१ पासून सुरू होते. अर्थात् १०२१ ते ११२२ च्या दरम्यानच्या संख्या दोन्ही ग्रंथांप्रमाणें आहेत. या कालांत फक्त श. १०६९ सालीं ब्रह्मानुसार मार्गशीर्ष व शिरोमणीप्रमाणें पौष क्षय येवढाच फरक आहे.

चैत्र : –७८,–१३, ७, २६, ४५, ६४; १२९,४८,६७,८६; २०५,७०; ३४६; ४११; ५५२; ६१७,३६,५५,७४,९३; ७५८,७७,९६; ८१५,३४,९९; ९१८,३७,५६,७५; १०४०,५९,७८,९७; १११६,८१; १३२२,87; १४०६, 25,६३; १५२८,४७,६६,८५; १६०४,२३,६९,८८; १७०७,२६,४५,६४; १८१०,२९,४८,६७,८६. **वैशाख :** –७०,–५१,–३२, १५, ३४,५३, ७२, ९१; ११०,५६,७५,९४; २१३,३२,५१,९७; ३१६,३५,५४,७३,९२; ४३८, ५७,७६,९५; ५०३,१४,२२,३३,४१,६०,७९,९८; ६४४,६३,८२; ७०१, २०,३९,८५; ८०४,२३,४२,६१,८०; ९२६,४५,६४,८३; १००२,२१,६७, ८६; ११०५,२४,४३,६२; १२०८,२७,४६,६५,७३,८४,92; १३०३,30, ४९,६८,८७; १४१४,२५,३३,४४,५२, ७१, ९०; १५०९, ५५, ७४, ९३; १६१२,३१,५०,९६; १७१५, 34, ५३, ७२, ९१; १८३७, ५६, ७५, ९४; १९१३. **ज्येष्ठ :** –६२,–४३,–२४,–५, ४, २३,४२,६१,६९,८०, ८८, ९९; १०७,१८,२६,३७,४५,६४,८३; २०२,१०,२१,२९,४०,४८,५९, ६७, ७८; ८६; ३०५,२४,४३,५१,६२,७०,८१,८९; ४००,०८,१९,२७,४६,६५,८४; ५११,३०,४९,६८,८७; ६०६,२५,५२,७१,९०; ७०९,२८,४७,६६,९३; ८१२,३१,५०,५८,६९,७७,८८,96; ९०७,१५,३४,५३,७२,80,९१, ९९; १०१०,१८,२९,३७,४८,५६,७५,९४; १११३,३२,४०,५१, ५९, ७०, ७८, ८९,९७; १२१६,३५,५४,८१,९२; १३००,११,१९,३०,३८,५७,७६,९५; १४२२,४१,६०,७९,९८; १५१७,३६,६३,८२; १६०१,२०,28,३९,47, ५८,७७,85; १७०४,२३,४२,६१,६९,८०,८८,९९; १८०७,१८,२६,४५, ६४,८३; १९०२,१०,२१. **आषाढ :** –७३,–६५,–५४,–४६,–३५,–२७,

−१६,−८, १२, ३१, ४४, ५०,७७, ९६; ११५,३४,५३,७२,९१; २१८,३७, ५६,७५,८३,९४; ३०२,१३,२१,३२,४०,५९,७८,९७; ४१६,२४,३५,४३, ५४,६२,७३,८१,९२; ५००,१९,३८,५७,६५,७६,८४,९५; ६०३,१४,२२, ३३,४१,६०,७९,९८; ७०६,१७,२५,३६,४४,५५,६३,७४,८२; ८०१,२०, ३९,४७,६६,८५,९६; ९०४,२३,४२,६१,८०,८८; १००७,२६, ४५, 53, ६४,72,८३; ११०२,२१,२९,४८,६७,८६,९४; १२०५,१३,२४,३२,४३, ५१,६२,७०,८९; १३०८,२७,३५,४६,५४,६५,७३,८४,९२; १४०३,११, ३०,४९,६८,७६,८७,९५; १५०६,१४,२५,३३,४४,५२,७१,९०; १६०९, १७,२८,३६,४७,५५,६६,७४,८५, ९३; १७१२, ३१, ५०, ५८, ७७, ९६; १८१५,३४,५३,७२,९१,९९; १९१८. **श्रावण :** −७६,−५७,−३८,−१९, −११, १, ९, २०, २८, ३९, ४७, ५८, ६६, ८५; १०४,२३,३१,४२,५०, ६१,६९,८०,८८,९९; २०७,२६,४५,६४,९१; ३१०,२९,४८,६७,८६; ४०५,३२,५१,७०,८९; ५०८,२७,४६,५४,७३,९२; ६११,१९,३०,३८,४९, ५७,६८,७६,८७,९५; ७१४,३३,५२,६०,७१,७९,९०,९८; ८०९,१७,२८, ३६,५५,७४,९३; 901,१२,२०,३१,३९,५०,५८,६९,७७,९६; १०१५,२६, ३४,५३,६१,७२,८०,९१,९९; १११०,१८,३७,५६,७५; १२०२,२१,४०, ५९,७८,९७; १३१६,४३,६२,८१; १४००,08,१९,27,३८,५७,65,८४; १५०३,२२,४१,४९,६०,६८,७९,८७,९८; १६०६,२५,४४,६३,८२,९०; १७०१,०९,२०,२८,३९,४७,६६,८५; १८०४,२३,३१,४२,५०,६१,६९,८०, ८८; १९०७. **भाद्रपद :** −६८,−४९,−३०, १७, ३६, ५५, ७४, ९३; ११२,५८,७७,९६; २१५,३४,५३,७२,९९; ३१८,३७,५६,६४,७५,८३, ९४; ४१३,४०,५९,७८,९७; ५०५,१६,२४,३५,४३,६२,८१; ६००,४६, ६५,८४; ७०३,२२,४१,८७; ८०६,२५,४४,६३,८२; ९०१,२८,४७,६६, ८५; १००४,२३,४२,६१,८८; ११०७,२६,४५,६४,८३; १२१०,२९,४८, ६७,75,८६,९४; १३०५,13,२४,32,५१,७०,८९; १४०८,१६,२७,३५, ४६,५४,६५,७३,९२; १५११,३०,५७,७६,९५; १६१४,३३,५२,७१,98; १७१७,३६,५५,७४,९३; १८१२,३९,५८,७७,९६; १९१५. **आश्विन :** −७९,−६०,−४१,−२२,−३, ६३, ८२; १०१,२०,३९; २०४,२३,४२,६१, ८०; ३४५; ४०२,२१,८६; ५५१; ६२७,९२; ७११,३०,४९,६८; ८३३,

५२,७१,९०; ९०९,७४,९३; १०१२,३१,५०; १११५,३४,५३,७२,९१; १२५६,७५; १३१३,३२; १३९७; १४६२,81; 1500,19,३८; १६०३, २२,४१,६०,७९,९८; १७४४, ६३, ८२; १८०१, २०, ८५; १९०४. **कार्तिक**: १८५; ३२६; ४१०,२९,४८,६७; ५३२,७०,८९; ६०८,७३; ८१४; ११८०,99; 1237; 1302,२१,४०,५९,७८; 1443,८१; १५००, १९. **मार्गशीर्ष (क्षय)**: ४४, ६३; १८५; २०४; ३२६; ५३२; ६७३; ८१४; ११९९ (अधिक); १२१८ (अधिक),37; 1302; 1443; **पौष (क्षय)**: –७९; ३४५; ४१०,४८,६७,८६; ५५१; ६९२; ८३३; ९७४; १११५,८०,९९; 1218,५६; १३२१,७८,९७; १४६२; १६०३; १७४४; १८८५. **माघ (क्षय)**: ४२९; ११३४; १२७५; १३४०,९७; १४८१, १६२२; १७६३; १९०४. **फाल्गुन**: २८८; ३०७,२६; ४२९,४८,६७, ८६; १०७७; ११३४,९९; १२१८,३७,५६,७५; १३४०,७८,९७; १४८१; १९०४.

ही यादी मुख्यतः दि. ब. स्वामिकन्नू पिल्ले यांच्या इंडियन क्रॉनॉलॉजीमधील दहाव्या कोष्टकांतून उद्धृत केली आहे आणि दीक्षित व सेवेलकृत इंडियन कॅलेंडरमधील पहिल्या कोष्टकाशीं पडताळून पाहिली, तेव्हां थोडा फरक आढळला. उत्तरोक्तांत ४२९ व ६७३ या शकवर्षी कार्तिक अधिक आणि अनुक्रमें माघ व मार्गशीर्ष हे महिने क्षय नाहींत. ही यादी सध्याच्या सूर्यसिद्धांताच्या स्पष्टमानानें येणारी आहे. प्रथम आर्यसिद्धांताच्या स्पष्ट मानानें येणाऱ्या पण या यादींत नसणाऱ्या अधिक मासांचीं वर्षें जाड खिळ्यांनीं आणि यादींत असणारीं पण या सिद्धांतानें न येणारीं अधिक मासवर्षें इंग्रजी खिळ्यांनीं दाखविलीं आहेत. उपर्युक्त सिद्धांत व मान यांचीं श. ८२१ ते १८२२ पर्यंतचींच कोष्टकें पहावयास मिळालीं (सिइर्क कोष्टक ६१, पृ.२५४).

मूळ व सध्याचा सूर्यसिद्धांत, प्रथम आर्यसिद्धांत (मध्यम मान).

चैत्र: २४०,५९; ३२४,४३,६२,८१; ४४६,६५,८४; ५०३,८७; ६०६, २५,४४; ७०९,२८,४७,६६; ८५०,६९,८८; ९०७,७२,९१; १०१०,२९; १११३,३२,५१,७०; १२३५,५४,७३,९२. **वैशाख**: २४८,६७,८६; ३०५, ७०,८९; ४०८,२७; ५११,३०,४९,६८; ६३३,५२,७१,९०; ७७४,९३; ८१२,३१,९६; ९१५,३४,५३; १०१८,३७,५६,७५,९४; ११५९,७८,९७;

१२१६; १३००,१९. ज्येष्ठ: २२९,९४; ३१३,३२,५१; ४३५,५४,७३, ९२; ५५७,७६,९५; ६१४,९८; ७१७,३६,५५; ८२०,३९,५८,७७; ९४२, ६१,८०,९९; १०१८,८३; ११०२,२१,४०; १२२४,४३,६२,८१. आषाढ: २३७,५६,७५; ३५९,७८,९७; ४१६,८१; ५००,१९,३८; ६२२,४१,६०, ७९; ७४४,६३,८२; ८०१,६ ,८५; ९०४,२३,42; १००७,२६,४५,६४; ११४८,६७,८६; १२०५,७०,८९; १३०८. श्रावण: २८३; ३०२,२१, ४०; ४०५,२४,४३,६२; ५४६,६५,८४; ६०३,६८,८७; ७०६,२५,९०; ८०९,२८,४७,66; ९३१,५०,६९,८८; १०७२,९१; १११०,२९,९४; १२१३,३२,५१. भाद्रपद: २२६,४५,६४; ३२९,४८,६७,८६; ४७०,८९; ५०८,२७,९२; ६११,३०,४९; ७१४,३३,५२,७१,90; ८५५,७४,९३; ९१२,७७,९६; १०१५,३४,५३; १११८,३७,५६,७५; १२५९,७८,९७; १३१६. आश्विन: २५३,७२,९१; ३१०,९४; ४१३,३२,५१; ५१६,३५, ५४,७३; ६३८,५७,७६,९५; 714,७९,९८; ८१७,३६; ९०१,२०,३९, ५८,77; १०४२,६१,८०,९९; ११६४,८३; १२०२,२१,४०; १३०५. कार्तिक: २३४; ३१८,३७,५६,७५; ४४०,५९,७८,९७; ५८१; ६००, १९,38; ७०३,२२,४१,६०; ८२५,४४,६३,८२; 901,६६,८५; १००४, २३,८८; ११०७,२६,४५; १२९९,४८,६७,८६. मार्गशीर्ष: २४२,६१, ८०,९९; ३६४,८३; ४०२,२१; ५०५,२४,४३,६२; ६२७,४६,६५,८४; ७४९,६८,८७; ८०६,25,९०; ९०९,२८,४७; १०१२,३१,५०,६९; ११५३, ७२,९१; १२१०,७५,९४; १३१३. पौष: २२३,८८; ३०७,२६,४५; ४२९,४८,६७,८६; ५५१,७०,८९; ६०८,७३,९२; ७११,३०,49; ८१४, ३३,५२,७१; ९३६,५५,७४,९३; १०७७,९६; १११५,३४,९९; १२१८, ३७,५६. माघ: २३१,५०,६९; ३५३,७२,९१; ४१०,७५,९४; ५१३, ३२,९७; ६१६,३५,५४; ७३८,५७,७६,९५; ८६०,७९,९८; ९१७; १००१, २०,३९,५८; ११२३,४२,६१,८०; १२६४,८३; १३०२,२१. फाल्गुन: २७७,९६; ३१५,३४,९९; ४१८,३७,५६; ५२१,४०,५९,७८; ६६२,८१; ७००,१९,८४; ८०३,२२,४१; ९२५,४४,६३,८२; १०४७,६६,८५; ११०४, ८८; १२०७,२६,४५; १३१०.

ही यादी मुख्यतः इर्क कोष्टक १ वरून तयार केली आणि सिइर्के

कोष्टक ७६ वरून वाढविली आहे. हीमर्धाल ४२१ पूर्वीचे आणि १०२० नंतरचे आंकडे अनुक्रमें पूर्वोक्त व उत्तरोक्त ग्रंथांतून घेतले आहेत. मधले आंकडे सामान्यतः दोन्ही ग्रंथांत आहेत; पण केवळ पूर्वोक्त ग्रंथांतील आंकडे जाड खिळ्यांनीं आणि केवळ उत्तरोक्त ग्रंथांतील आंकडे इंग्रजी खिळ्यांनीं दाखविले आहेत. उत्तरोक्त ग्रंथांतील सर्व आंकडे प्रथम आर्यसिद्धांताचे आहेत.

ब्रह्मसिद्धांत व सिद्धांतशिरोमणि (स्पष्टमान) [सिइकॅ कोष्टकें ८२ व ६०; पृ. ४५६ व १६४]. **चैत्र** : ५२५,९०; ६०९,२८,४७,६६; ७३१,५०,६९,८८; ८०७,७२; ९१०,२९,४८; १०१३; ११५४; १२३८,९५; १३६०,७९,९८; १४१७,३६; १५०१,२०,३९,५८,७७,९६; १६४२,६१,८०,९९; १७१८,३७; १८०२,२१. **वैशाख** : ५३३,५२,७१,९८; ६१७,३६,५५,७४,९३; ७१२,५८,७७,९६; ८१५,३४,५३,९९; ९१८,३७,५६,७५,९४; १०४०,५९,७८,९७; ११०५,१६,३५,८१; १२००,१९,४६,५७,६५,७६,८४; १३०३,२२,४१,८७; १४०६,२५,४४,६३,८२; १५२८,४७,६६,८५; १६०४,२३,६९,८८; १७०७,२६,४५,६४,८३; १८१०. **ज्येष्ठ** : ५२२,४१,६०,७९; ६०६,२५,४४,६३,७१,८२,९०; ७०१,०९,२०,२८,३९,४७,६६,८५; ८०४,१२,२३,३१,४२,५०,६१,६९,८०,८८; ९०७,२६,४५,५३,६४,७२,८३,९१; १००२,१०,२१,२९,४८,६७,८६; १११३,२४,३२,४३,५१,६२,७०,८९; १२०८,२७,५४,७३,९२; १३११,३०,४९,६८,९५; १४१४,३३,५२,७१,९०; १५०९,३६,५५,७४,९३; १६०१,१२,२०; ३१,५०,७७,९६; १७१५,३४,४२,५३,६१,७२,८०,९१,९९; १८१८. **आषाढ** : ५३०,३८,४९,५७,६८,७६,८७,९५; ६१४, ३३, ५२, ७९, ९८; ७१७,३६,५५,७४,९३; ८२०,३९,५८,७७,८५,९६; ९०४,१५;३४,६१,८०,९९; १०१८,२६,३७,४५,५६,६४,७५,८३,९४; ११०२,२१,४०,५९,६७,७८,८६,९७; १२०५,१६,२४,३५,४३,६२,८१; १३००,०८,१९,२७,३८,४६,५७,६५,७६,८४; १४०३,२२,४१,४९,६०,६८,७९,८७,९८; १५०६,१७,२५,४४,६३,८२,९०; १६०९,२८,३९,४७,५८,६६,८५; १७०४,२३,३१,५०,६९,८८; १८०७. **श्रावण** : ५२७,४६,६५,८४,९२; ६०३,११,२२,३०,४१,४९,६०,६८, ८७; ७०६,२५,३३,४४,५२,६३,७१,८२,९०;

८०१,०९,२८,४७,६६,७४,९३; ९१२,२३,३१,४२,५०,६९,८८; १००७, ३४,५३,७२,९१; १११०,२९,४८,५६,७५,९४; १२१३,३२,५१,७०,८९; १३१६,३५,५४,७३,८१,९२; १४००,११,१९,३०,३८,५७,७६,९५; १५१४, २२,३३,४१,५२,६०,७१,७९,९८; १६१७,३६, ५५, ६३, ७४, ८२, ९३; १७०१,१२,२०,३९,५८,७७,९६; १८०४,१५. **भाद्रपद** : ५३५,५४,७३; ६१९,३८,५७,७६,९५; ७१४,६०,७९,९८; ८१७,३६,५५; ९०१,२०,३९, ५८,७७,९६; १०१५, ४२, ६१, ८०, ९९; ११०७,१८,२६,३७,४५,८३; १२०२,२१,४०,४८,५९,६७, ७८, ८६, ९७; १३०५, २४, ४३, ६२, ८९; १४०८,२७,४६,६५,८४; १५०३,३०,४९,६८,८७; १६०६,२५,४४,७१, ९०; १७०९,२८,४७,६६,८५. **आश्विन** : ५२४,४३,६२,८१; ६००,४६, ६५,८४; ७०३,२२,४१,८७; ८०६,२५,४४,६३,८२; ९४७,६६,८५; १००४, २३,८८; ११६४; १२२९,९४; १३१३,७०; १४३५,५४,७३, ९२; १५११,७६,९५; १६१४,३३,५२; १७१७,३६,५५,७४,९३; १८१२. **कार्तिक** : ९२८,९३; १०१२,३१,६९; ११३४,५३,७२,९१; १२१०,७५; १३३२,५१. **मार्गशीर्ष (क्षय)** : ६४६; ७८७; ९१८,९३; १०६९; ११३४; १२७५. **पौष (क्षय)** : ८०६; ९४७; १०१२,३१,६९,८८; ११५३; १२९४; १४३५; १५७६; १७१७. **माघ (क्षय)** : ५२४; ६६५; १२२९; १५९५; १७३६. **फाल्गुन** : ८९०; १०३१,५०,६९,८८; १२२९.

ब्रह्मसिद्धांत (मध्यममान) [सिइर्क्के कोष्टक ९०, पृ. ५२४]. **चैत्र** : ५४१,६०,७९,९८; ६६३,८२; ७०१,२०; ८०४,२३,४२,६१; ९२६,४५,६४,८३; १०६७,८६; ११०५,२४,८९; १२०८,२७,४६. **वैशाख** : ५२२,८७; ६०६,२५,४४; ७२८,४७,६६,८५; ८५०,६९,८८; ९०७,९१; १०१०,२९,४८; १११३,३२,५१,७०; १२५४,७३,९२; १३११. **ज्येष्ठ** : ५३०,४९,६८; ६५२,७१,९०; ७०९,७४,९३; ८१२,३१; ९१५, ३४,५३,७२; १०३७,५६,७५,९४; ११७८,९७; १२१६,३५; १३००,१९; **आषाढ** : ५७६,९५; ६१४,३३,९८; ७१७,३६,५५; ८३९,५८,७७,९६; ९६१,८०,९९; १०१८; ११०२,२१,४०, ५९; १२२४, ४३, ६२, ८१. **श्रावण** : ५३८,५७; ६२२,४१,६०,७९; ७६३,८२; ८०१,२०,८५; ९०४, २३,४२; १०२६,४५,६४,८३; ११४८,६७,८६; १२०५,८९; १३०८.

भाद्रपद : ५४६,६५,८४; ६०३,६८,८७; ७०६,२५,४४; ८०९,२८,४७, ६६; ९५०,६९,८८; १००७,७२,९१; १११०,२९; १२१३,३२,५१,७०; **आश्विन** : ५२७,९२; ६११,३०,४९; ७३३,५२,७१,९०; ८५५,७४,९३; ९१२,३१,९६; १०१५,३४,५३; ११३७,५६,७५,९४; १२५९,७८,९७; १३१६. **कार्तिक** : ५३५,५४,७३; ६५७,७६,९५; ७१४,७९,९८; ८१७, ३६; ९२०,३९,५८,७७; १०४२,६१,८०,९९; १११८,८३; १२०२,२१,४०; **मार्गशीर्ष** : ५८१; ६००,१९,३८; ७०३,२२,४१,६०; ८४४,६३,८२; ९०१,६६,८५; १००४,२३; ११०७,२६,४५,६४; १२४८,६७,८६; १३०५. **पौष** : ५२४,४३,६२; ६२७,४६,६५,८४; ७६८,८७; ८०६,२५,९०; ९०९,२८,४७; १०३१,५०,६९,८८; ११५३,७२,९१; १२१०,२९,९४; १३१३. **माघ** : ५५१,७०,८९; ६०८,९२; ७११,३०,४९; ८१४,३३,५२, ७१; ९५५,७४,९३; १०१२,७७,९६; १११५,३४; १२१८,३७,५६,७५. **फाल्गुन** : ५३२; ६१६,३५,५४,७३; ७३८,५७,७६,९५; ८७९,९८; ९१७,३६; १००१,२०,३९,५८; ११४२,६१,८०,९९; १२६४,८३; १३०२,२१.

इंग्रजी महिने सर्वांच्या परिचयाचे आहेत. पण प्रत्येक महिन्याच्या आरंभीं वर्षारंभापासून किती दिवस झाले हें समजणें रूपांतरासाठीं आवश्यक असल्यानें त्यांचें कोष्टक पुढें देतों. लीप वर्षांत फेब्रुवारीनंतर प्रत्येक वेळीं एक दिवस अधिक घ्यावा.

जानेवारी ३१	(०)	मे ३१	(१२०)	सप्टेंबर ३०	(२४३)
फेब्रुवारी २८	(३१)	जून ३०	(१५१)	ऑक्टोबर ३१	(२७३)
मार्च ३१	(५९)	जुलै ३१	(१८१)	नोव्हेंबर ३०	(३०४)
एप्रिल ३०	(९०)	ऑगस्ट ३१	(२१२)	डिसेंबर ३१	(३३४)

मुसलमानांत चांद्र व सौर अशा दोन प्रकारच्या महिन्यांचा प्रचार आहे. पैकीं चांद्र महिन्यांचीं मराठींतील अपभ्रष्ट रूपें, त्यांचीं शुद्ध अरबी रूपें, त्यांस कागदपत्रांतून लावलेलीं विशेषणें, त्यांचे सामान्यतः धरले जाणारे व वर्षारंभापासून त्या त्या महिन्याच्या आरंभापर्यंतचे दिवस, यांचें कोष्टक येथें देतों.

१ मोहरम	३०	(०)	محرم	الحرام
२ सफर	२९	(३०)	صفر	المظفر ختم بالخير و الظفر

३ रबिलावल	३०	(५९)	ربيع الاول	مرجب
४ रबिलाखर	२९	(८९)	ربيع الاخر - الثانی	—
५ जमादिलावल	३०	(११८)	جماد - دی - الاول	—
६ जमादिलाखर	२९	(१४८)	جماد - دی الاخر - الثانی	—
७ रज्जब	३०	(१७७)	رجب	المرجب
८ साबान	२९	(२०७)	شعبان	المعظم
९ रमजान	३०	(२३६)	رمضان	المبارک
१० सव्वाल	२९	(२६६)	شوال	المکرم
११ जिल्काद	३०	(२९५)	ذی - ذو - القعدہ - قعدہ	
१२ जिल्हेज	२९,३०	(३२५)	ذی - ذو - الحجہ - حجہ	الحرام

वर मुसलमानी महिन्यांत सामान्यतः किती दिवस असतील हें दिलें आहे. पण तो नियम नव्हे. हे महिने चांद्र आहेत व यांची सुरुवात अमावास्येनंतर चंद्रदर्शन ज्या दिवशीं होईल त्या दिवसापासून धरतात. हें चंद्रदर्शन निरनिराळ्या ठिकाणीं व परिस्थितींत निरनिराळ्या दिवशीं होणें शक्य असल्यानें हरएक महिन्याचे दिवस कमीजास्त होतात. म्हणून निरनिराळ्या गणितावर आधारलेल्या जंत्र्या व पंचांगें आणि कागदपत्रांतील उल्लेख यांचा कधीं कधीं आपसांत व परस्परांशीं मेळ नसतो, एक दिवसाचा फरक पडतो. कधीं कधीं या चांद्र महिन्यांतील शेवटच्या तारखेचा उल्लेख शेवटवाची सल्ख (سلخ) या शब्दानें केलेला आढळतो. अशा वेळीं शेवटची तारीख २९ कीं ३० हें ठरवावें लागतें.

चांद्र वर्षाप्रमाणें चांद्र महिन्यामुळेंही व्यवहारांत घोटाळे होऊं लागल्यानें त्यांचा त्याग करून सौर वर्ष व सौर महिने मुसलमानी देशांत प्रचारांत आले. त्या महिन्यांचीं नावें, त्यांचे दिवस व वर्षारंभापासूनचे दिवस असे—

१ फर्वर्दीन فروردین	३१	(०)
२ अर्दी-उर्दीबहिश्त اردیبہشت	३१	(३०)
३ खुर्दाद خورداد	३२	(६२)
४ तीर تیر	३१	(९४)
५ अमर्दाद, मुर्दाद امرداد - مرداد	३१	(१२५)
६ शह्रियूर-रीवर شہریور	३१	(१५६)
७ मिह्र مہر	३०	(१८७)

८ आबान آبان	३० (२१७)	११ बहमन بهمن	३० (३०५)
९ आदर-जर آذر-ذر	२९ (२४७)	१२ इस्फन्दार्मुज़ اسفندارمذ	३० (३३५)
१० दय دی	२९ (२७६)		

इराणी सौर वर्षांत प्रत्येक महिन्यास तीस दिवस धरून शेवटीं पांच दिवस अधिक धरीत. अकबरानें सुरू केलेल्या इलाही महिन्यांत २९ ते ३२ दिवस धरीत. तरीहा कोणत्या महिन्याचे किती दिवस धरावयाचे हें अकबरनामा व आईन-इ-अकबरी या दोन्ही ग्रंथांत नमूद नाहीं. पण घियासुल्लुघातमध्यें पुढील चरणद्वय दिलें असून त्यावरून या प्रश्नाचा उलगडा होतो.

لا و لا لب لا و لا لا شش مه است
३१३१ ३१३२३१ ३१
لل کط و کط لل شهور کوتر است
३०३०२९ २९३०३०

प्रत्येक इलाही अर्थात् सौर महिन्याचे दिवस किती धरावयाचे हें यांत अब्जद पद्धतीनें सांगितलें असून मीं तें खालीं आकडे घालून दर्शविलें आहे.

या महिन्यांचा उपयोग मुघल कारकिर्दींत नेहमीं करीत. अजूनही कित्येक स्वतंत्र मुसलमानी राष्ट्रें व हिंदुस्थानांतील संस्थानें यांत हे महिने उपयोगांत आणतात. मुघली इतिहास, कागदपत्र व नाणीं यांवरही यांचे उल्लेख सांपडतात. उदाहरणार्थ, आलमगीरनाम्यांत शायिस्तेखानानें शिवाजीच्या ताब्यांत असलेल्या चाकण किल्ल्यास सुरुंग लावल्याची तारीख १७ जिल्हेज व ३ शहरियूर अशी दिली आहे. अधिक ग्रांथिक उल्लेखासाठीं मुघल न्यूमिस्मॅटिक्स २५२-२८९ हीं पृष्ठें पहावीं.

याशिवाय हिंदुस्थानांत प्राचीन काळीं परकीय सत्तांनीं जम बसविला होता. यामुळें त्यांच्या अनेक लेखांतून आणखी एक प्रकारचे महिने निर्देशिलेले आढळतात ते असे. हे महिने मॅसिडोनियन कालगणनेंतील आहेत.

१ Hyperberetaeus	५ Peritius	९ Daesius
२ Dius	६ Dystrus	१० Panemus
३ Apellaeus	७ Xanthicus	११ Lous
४ Audynaeus	८ Artemisius	१२ Gorpiaeus

हे सामान्यतः हल्लींच्या इंग्रजी ऑक्टोबर ते सप्टेंबर महिन्यांशीं अनुक्रमें जुळतात. अफगाणिस्थान व पंजाब यांत मिळालेल्या शक व कुषणवंशीय राजांच्या खरोष्ठी लेखांतून यांचे उल्लेख आहेत.

ऋतु

दोन दोन महिन्यांचा एकेक ऋतु होत असून त्यांचींही परिचित व अपरिचित अशीं दोन प्रकारचीं नांवें आहेत तीं अशीं—

१ वसंत–मधु; चैत्र-वैशाख. **२ ग्रीष्म**–शुचि; ज्येष्ठ-आषाढ. **३ वर्षा**–नभस्; श्रावण-भाद्रपद. **४ शरद्**– ? ; आश्विन-कार्तिक. **५ हेमंत**–सहस्; मार्गशीर्ष-पौष. **६ शिशिर**–तपस्; माघ-फाल्गुन.

वर ऋतूंचीं जीं पर्यायनामें दिलीं आहेत तीं खरोखर महिन्यांच्या पर्यायनामांचे जोड्यांपैकीं आद्यनामेंच आहेत. पण यांत दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. ग्रीष्म ऋतूस शुचि हें पर्यायनाम आलें आहे. शुचि हें सामान्यतः आषाढ महिन्याचें पर्यायनाम आहे. परंतु ज्या काळीं ऋतूंचीं प्रस्तुत पर्यायनामें प्रचारांत आलीं तेव्हां शुचि हें ज्येष्ठ महिन्याचेंही पर्यायनाम असावें. महाभारतांत तशा अर्थानें याचा प्रयोगही केला आहे (८।७९।७८). तसेंच शरद् ऋतूस इष हे पर्यायनाम यावयास पाहिजे. पण शरद् ऋतूसाठीं इष किंवा आणखी कोणतेंही पर्यायनाम आढळलें नाहीं. या पर्यायनामांचें अमरकोशांत परिगणन नाहीं. हें प्रथम शाश्वत कोशांत केलेलें मला आढळलें.

वार

हिंदू, हिंदी मुसलमान व युरोपीय अशा तिन्ही संस्कृतींत वारांचा प्रचार आहे आणि तिन्ही संस्कृतींतील वारांची संख्या तर जुळतेच; पण हिंदू व युरोपीय संस्कृतींतील वारांचीं नांवेंही जुळतीं असल्यानें परस्परांत उसनवारी झाली असली पाहिजे किंवा दोघांचें मूळ एकच असलें पाहिजे हें उघड ठरतें. सध्या ज्योतिर्विदांचा कयास असा आहे कीं, वार युरोपीयांकडून हिंदुस्थानांत आले. इराणी व अरबी संस्कृतींत ग्रहांवरून वारांचीं नावें न बनवितां मुख्यतः एक दोन इत्यादि आंकड्यांनीं तयार केलीं आहेत. तेव्हां असें वाटतें कीं, त्या संस्कृतींत वारांचें बीज नीट रुजलें नाहीं. श. ६१४ मधील सोरब ताम्रलेखांत शनैश्चरवारे असा वाराचा सर्वप्राचीन निर्देश आला आहे (किल्हॉर्न, २ री लिस्ट क्र. २९). येथें वारांचीं तिन्ही संस्कृतींतील नांवें देतों.

हिंदू	इंग्रजी	फार्सी		हिंदी	मुसलमानी
१ रविवार	Sunday	यक शन्बह	يک شنبه	इतवार	اتوار
२ सोमवार	Monday	दू शन्बह	دو شنبه	सोम, पीर	سوموار/پیر
३ मंगळवार	Tuesday	सह शन्बह	سه شنبه	मंगल	منگل
४ बुधवार	Wednesday	चहार शन्बह	چهار شنبه	बुध	بده
५ गुरुवार	Thursday	पन्ज शन्बह	پنج شنبه	जुम्अरात	جمعرات
६ शुक्रवार	Friday	आदीनह	آدینه	जुम्अह	جمعه
७ शनिवार	Saturday	शन्बह, हफ्तह	شنبه/هفته	शनीचर	شنیچر

संस्कृत-प्राकृत शिलालेख-ताम्रपट व पोथ्या यांतून हिंदू वारांसाठीं त्यांचीं पर्यायनामेंही उपयोजितात. उदाहरणार्थ, या वारांबद्दलच (१) भानु, अर्क, आदि, आदित्य; (२) अब्ज, चंद्र, इन्दु; (३) कुज, अंगारक, भौम; (४) सौम्य, विद्; (५) बृहस्पति, आंगिरस्; (६) भृगु, उशनस्; (७) मन्द, पंगु इत्यादि नांवेंही येतात. हिंदी मुसलमान वापरत असलेल्या वारनामांपैकीं इतवार, मंगल, बुध, शन्चर हे तर संस्कृतोद्भवच आहेत. शुक्रवार प्रार्थनेचा किंवा महत्त्वाचा दिवस आहे म्हणून त्यास प्रार्थनेचा (जुम्अह्) दिवस म्हटलें असावें. मुसलमानी अहोरात्र रोज सायंकाळीं सुरू होतो. गुरुवारचा रात्र मुसलमानी कल्पनेप्रमाणें शुक्रवारांत मोडते. अर्थात् त्यांचा शुक्रवार हिंदू गुरुवारच्या रात्रीं सुरू होतो. म्हणून हिंदू गुरुवारच्या रात्रीसाठीं (पर्यायाने संपूर्ण गुरुवारास) जुम्अरात (शुक्रवारची रात्र) हा शब्द प्रचारांत आला. फार्सीमध्यें प्रत्येक वारास स्वतंत्र नांव नाहीं. शनिवारासाठीं प्रथम शन्बह हा शब्द वापरला आणि नंतर रविवार तें गुरुवारासाठीं अनुक्रमें यक शन्बह, दू शन्बह, सह शन्बह, चहार शन्बह, पन्ज शन्बह असे शब्द तयार केले. शुक्रवारसाठीं आदीनह असा व शनिवारसाठीं हफ्तह असा आणखी एक एक शब्द बनविला.

अरबीमध्येंही वारांना ग्रहांवरून तयार झालेले शब्द नाहींत. तीमध्यें रविवार तें शनिवार यासाठीं अनुक्रमें पहिला दिवस, दुसरा दिवस इत्यादि अर्थाचे यौमुल-अहद, यौमुल-अस्नीन, यौमुस-सुल्स, यौमुल-अर्बअ, यौमुल-खामिस, यौमुज-जुम्अत्, यौमुस-सबत् असे शब्द उपयोजितात.

याशिवाय मराठी कागदपत्रांतून रविवारसाठीं रोझ-अल्-फतह روز الفتح

असा शब्द वापरलेला आढळतो. त्याचा अर्थ उघडण्याचा दिवस; काय. तर आठवडा. रविवार नवीन आठवडा उघडतो किंवा सुरू करतो म्हणून रविवारकरितां वरील शब्द वापरलेला असावा.

तिथि

हिंदू पद्धतींत महिन्याचे दिवस मोजण्यासाठीं प्रथम त्याचे दोन सारखे भाग किंवा पक्ष करून त्यांस अनुक्रमें शुद्ध, शुक्ल, सित आणि वद्य, कृष्ण, बहुल इत्यादि नांवें दिलीं. पुढें प्रत्येक पक्षांतील १ ते १४ दिवसांस अनुक्रमें प्रतिपदा, द्वितीया इत्यादि संख्याक्रमवाचक नावें ठेविलीं. शुद्ध पक्षांतील पंधराव्या दिवशीं पूर्ण चंद्र असल्यानें त्यास पूर्णमासी, पौर्णिमा इत्यादि नांवें देऊन वद्य पक्षांतील पंधरावे दिवशीं चंद्र व सूर्य एकाच वेळीं उगवून मावळत असल्यानें अर्थात् चंद्राचा सूर्याबरोबर(= अमा) वास होत असल्यानें त्या दिवसास अमावासी हें नांव ठेविलें. सारांश, हिंदू पद्धतींत प्रत्येक महिन्यास दोन पक्ष व प्रत्येक पक्षांत सामान्यतः पंधरा दिवस अथवा तिथि असतात. तिथि म्हणजे चंद्र व सूर्य यांमध्यें १२ अंश अंतर पडण्यास लागणारा काळ. हा कधीं साठ घटका किंवा २४ तास अर्थात् एक दिवस, कधीं यापेक्षां अधिक, तर कधीं कमी असतो. यामुळें कधीं दोन दिवशीं एकच तिथि येते, तर कधीं एकाच दिवशीं दोन तिथि येतात. अशा वेळीं पहिल्या प्रकारांत तिथीची वृद्धि झाली आणि दुसऱ्या प्रकारांत दुसऱ्या तिथीचा क्षय झाला असें मानतात. यामुळें पक्षांतील तिथींची संख्या कमीजास्त होते.

हिंदी मुसलमानात महिन्याच्या दिवसांस स्वतंत्र नांवें नाहींत, इंग्रजी पद्धतीप्रमाणें पहिली तारीख, दुसरी तारीख असें किंवा मराठी कागदपत्रांतून चंद्र अथवा छ १, २ असें संबोधतात. तारखांना क्षयवृद्धीचा संस्कार नसतो. एक ते २९ किंवा ३० पर्यंत क्रमानें वाढत्या तारखा मोजावयाच्या असतात. पण अमावास्येनंतरच्या प्रथम चंद्रदर्शनाचे दिवशीं नवीन महिन्याची पहिली तारीख धरीत असल्यानें हिंदू तिथी सामान्यतः एक दिवसानें तरी मुसलमानी तारखेच्या पुढें असते.

इराणी लोकांमध्यें महिन्यांतील दिवसांपैकीं प्रत्येकाला स्वतंत्र नांव असून निदान अकबर व जहांगीर यांच्या कारकिर्दीतील दरबारी कागदपत्रांत इराणी महिन्यांप्रमाणें इराणी दिननामेंही निर्दिष्ट होत असल्यानें त्यांची यादी तीं

दाखवीत असलेल्या तारखांसह पुढें देतों. इराणी महिन्यांत तीसच दिवस असतात. पण इलाही कालगणनेंतील महिन्यांत एकुणतीसपासून बत्तीस दिवस असल्यानें ३१ व ३२ या तारखांस नवीन नांवें ठेवणें आवश्यक झालें. तेव्हां रोझ् (= दिवस) व शब् (= रात्र) अशीं दोन नांवें योजून तो प्रश्न निकालीं काढण्यांत आला. दिननामें अशीं—

१	उर्मझ्-उर्मज्द्	اُرمز-اُرمزد	१७	सरूश्	سروش
२	बहमन्	بهمن	१८	रश्न्	رشن
३	अर्दी-उर्दीबहिश्त्	اُردیبهشت	१९	फर्वर्दीन्	فروردین
४	शहरियूर्	شهریور	२०	बहराम्	بهرام
५	इस्फन्दार्मुज्	اسفندارمذ	२१	राम्	رام
६	खुर्दाद्	خورداد	२२	बाद्	باد
७	मुर्दाद्	مرداد	२३	दय् बादय्न्	دی بادین
८	दय् बाज़र्	دی باذر	२४	दय्न्	دین
९	आज़र्	آذر	२५	आराद्	آراد
१०	आबान्	آبان	२६	आश्ताद्	آشتاد
११	खुर्शीद्	خورشید	२७	आस्मान्	آسمان
१२	माह्	ماه	२८	झमियाद्	زمیاد
१३	तीर्	تیر	२९	मारिस्फन्द्	مارسفند
१४	गूश्	گوش	३०	अनीरान्	انیران
१५	दय् बमिहर्	دی بمهر	३१	रोझ्	روز
१६	मिहर्	مهر	३२	शब्	شب

मी ही यादी अकबरनाम्यावरून (मूळ खंड २, पृ. १०, भाषांतर खंड २, पृ. १६) घेतली आहे. पण तसें करतांना मी पुढील फेरफार केले.

दिन क्र.	अकबरनाम्यांतील पाठ	अवेस्ती पाठ[१]	मी स्वीकारलेला पाठ
८,१५,	दय् (دی)	दीन (دین),	सध्याच्या उच्चाराशीं
२३	प्रथम पद	दय् (دی)	जुळता दय् (دی)
११	रश्न (رشن)	ख्वूर्शेत्	खुर्शीद (خورشید)

---

१ *Zoroastrtan Studies* by A. V. Williams Jackson ; New York, 1928, p. 126.

१४	कूश (كوش)	गोश्	गोश् (كوش)
१५	ख़ूर् (خور) असाही पाठ	आधार नाहीं	त्याग केला
१६	मिहिरकान् (مهركان)	,,	,,
२९	मिहिरिस्फन्द् (مهر اسفند) ,,	,,	,,

मुसलमानी नवा दिवस सायंकाळीं सुरू होतो हें लक्षांत घेतां रोझ् व शब् (३१, ३२) ऐवजीं शब् व रोझ् असा क्रम असणें शक्य आहे. पण मी अकबरनाम्यामध्यें दिलेला रोझ् व शब् असा क्रम स्वीकारला आहे.

जुन्या साधनांतून राशींचा वारंवार उल्लेख येत असल्यानें त्यांचे पर्याय शब्द येथें देतों.

संस्कृत	इंग्रजी	अरबी		फार्सी	
१ मेष	Aries	हमल	حمل[1]	बर्‌ह्	بره[2]
२ वृषभ	Taurus	सौर	ثور	गाव्	گاو
३ मिथुन	Gemini	जव्झअ	جوزء	दू पैकर	دو پیکر
४ कर्क	Cancer	सर्तान	سرطان	खर्चन्ग	خرچنگ
५ सिंह	Leo	असद	اسد	शेर	شیر
६ कन्या	Virgo	सुन्बुलह[3]	سنبله	ख्कशाह-ख़ूशह[4]	خوشه
७ तुला	Libra	मीझान	میزان	तराझू	ترازو
८ वृश्चिक	Scorpio	अक्रब	عقرب	गझ्दुम-कज्दुम	گژدم - کژدم
९ धनुस्	Sagittarius	कौस	قوس	कमान	کمان
१० मकर	Capricornus	जदी[5]	جدی	बुझ-इ-कोही[6]	بز کوهی
११ कुंभ	Aquarius	दलव[7]	دلو	दवल-इ-आसियाब	دول اسیاب
१२ मीन	Pisces	हूत	حوت	माही	ماهی

---

१ = मेंढा. २ = मेंढरू. ३ = धान्याचें कणीस. ४ = गहू किंवा यव यांचें कणीस अथवा द्राक्षांचा घड. ५ = बकरा. ६ = रान बकरा. ७ बादली.

ग्रह

राशीप्रमाणें ग्रहांचे उल्लेखही वारंवार येत असल्यानें त्यांचीं नांवेंही येथें देतों.

१ रवि–शम्स–شمس–Sun
२ सोम–कम्र–قمر–Moon
३ मंगळ–मिरीख–مریخ–Marse
४ बुध–उतारिद–عطارد–Mercury
५ गुरु–मुश्तरी–مشتری–Jupitor
६ शुक्र–झुहरह–زهره–Venus
७ शनि–झुहल–زحل–Saturn

नक्षत्रें

नक्षत्र म्हणजे आकाशाच्या साधारणतः पूर्वपश्चिम परिघावर एकामागून एक येणारे तारकापुंज. हे २७ आहेत अशी कल्पना केली आहे. दिसणाऱ्या नक्षत्रांची लांबी तारकापुंजाप्रमाणें कमी अधिक असते. म्हणून गणितागत नक्षत्रांची कल्पना केली. खगोलाच्या उपर्युक्त परिघाचे २७ सारखे भाग करून त्यास एकेक नक्षत्र म्हटलें. हे भाग व तारकापुंज साधारणतः मिळते–जुळते आहेत. पंचांगांतील एक अंग नक्षत्र म्हणजे चंद्रास या खगोलाचा १/२७ भाग चालण्यास लागणारा वेळ. हा वेळ चंद्राच्या गतीप्रमाणें कमी जास्त असूं शकतो. सवा दोन नक्षत्रांची एक राशि होते. नक्षत्रांचीं नांवें अशीं– १ अश्विनी, २ भरणी, ३ कृत्तिका, ४ रोहिणी, ५ मृग–शीर्ष, ६ आर्द्रा, ७ पुनर्वसु, ८ पुष्य, तिष्य, ९ आश्लेषा, १० मघा, ११ पूर्वा,–र्वफल्गुनी, १२ उत्तरा,–रफल्गुनी, १३ हस्त, १४ चित्रा, १५ स्वाति, १६ विशाखा, १७ अनुराधा, १८ ज्येष्ठा, १९ मूल, २० पूर्षाषाढा, २१ उत्तराषाढा, २२ श्रवण, २३ धनिष्ठा, श्रविष्ठा, २४ शतभिषज, शततारका, २५ पूर्वा भाद्रपदा, २६ उत्तरा भाद्रपदा, २७ रेवती.

याशिवाय सूर्यास एक नक्षत्रविभाग क्रमण्यास जो वेळ लागतो त्यास सौर नक्षत्राचा काल किंवा नुसतें सौर नक्षत्र म्हणतात. पंचांगांत हीं नक्षत्रेंही दिलेलीं असतात. पैकीं मृग ते हस्त हीं नक्षत्रें पावसाचीं म्हणून समजलीं जातात. सुहूर, फसली इत्यादि गणनांच्या नवीन वर्षाचा आरंभ सामान्यतः सूर्याच्या मृगप्रवेशाच्या वेळीं होतो.

योग

सूर्य व चंद्र यांच्या एकत्रित गतीच्या १३ अंश, २० कला इतक्या भागास योग असें नांव आहे. याचें नैसर्गिक अस्तित्व कसें संभवतें हें समजत नाहीं.

पण याला ज्योतिषांत व पंचांगांत स्थान मिळालें आहे येवढें निश्चित. वि. स. ८९८ मधील धोलपूर लेखांत शोभन हें योगनाम आलें असून तोच यांचा पहिला लेखनिविष्ट निर्देश असावा (लिस्ट२७). योगांचीं नावें अशीं–१ विष्कंभ, २ प्रीति, ३ आयुष्मत्, ४ सौभाग्य, ५ शोभन, ६ अतिगंड, ७ सुकर्मन्, ८ धृति, ९ शूल, १० गंड, ११ वृद्धि, १२ ध्रुव, १३ व्याघात, १४ हर्षण, १५ वज्र, १६ सिद्धि, असृज, १७ व्यतीपात, १८ वरीयस् १९ परिघ, २० शिव, २१ सिद्ध, २२ साध्य, २३ शुभ, २४ शुक्ल, २५ ब्रह्मन्, २६ ऐंद्र, २७ वैधृति.

करण

करण म्हणजे अर्धी तिथि; अर्थात् ३० तिथींचीं ६० करणें होतात. पण त्या प्रत्येकास स्वतंत्र नांव नाहीं. सात करणांचें एक चक्र असून अशीं आठ पूर्ण चक्रें ३० तिथींत होतात आणि चार करणें शिल्लक राहतात. चक्रांतील सात व बाकींचीं चार यांचीं नावें व क्रम असा–शुक्ल प्रतिपदेचा पूर्वार्ध १ लें करण किंस्तुघ्न किंवा किंतुघ्न; नंतर ५७ व्या करणापर्यंत अनुक्रमें १ बव, २ बालव, ३ कौलव, ४ तैतिल, ५ गर, ६ वणिज, ७ विष्टि, कल्याणी किंवा भद्रा, या ७ करणांचीं ८ चक्रें; वद्य चतुर्दशी उत्तरार्ध = ५८ शकुनि, वद्य अमावास्या पूर्वार्ध = ५९ चतुष्पद, वद्य अमावास्या उत्तरार्ध = ६० नाग.

कालादर्श

आतांपर्यंत वर्णिलेल्या कालांचें एकसमयावच्छेदें व एकाच्या तुलनेनें ज्ञान व्हावें म्हणून सर्व कालांची यादी त्यांच्या इसवी सनाशीं असलेल्या नात्यांसह पुढें देतों. जेथें केवळ महिना, नक्षत्र किंवा राशि यांचा निर्देश आहे तेथें स्थानभेदानुसार त्यांचा आरंभ किंवा अंत असा अर्थ करावयाचा आहे आणि समतेच्या चिन्हापुढील आकडा मूळ सनांत मिळविला असतां इसवी सन येतो असें दाखवितो.

अमली : भाद्रपद शुद्ध १२ ते डिसेंबर = ५९२; जानेवारी ते भाद्रपद शुद्ध ११ = ५९३.

इलाही : मार्च १०–१२ ते डिसेंबर = १५५५; जानेवारी ते मार्च ९–११ = १५५६.

कटकी = अमली.

कलचुरि : कार्तिक ते डिसेंबर = २४८; जानेवारी ते आश्विन = २४९.

कलियुग : चैत्र–मेष ते डिसेंबर = –३१०१; जानेवारी ते फाल्गून–मीन = –३१००.

कोल्लम् : सिंह–कन्या ते डिसेंबर = ८२४; जानेवारी ते कर्क–सिंह = ८२५.

गांगेय : ? ते डिसेंबर = ४९४; जानेवारी ते ? = ४९५.

गुप्त : चैत्र ते डिसेंबर = ३१९; जानेवारी ते फाल्गून = ३२०.

नेवार : कार्तिक ते डिसेंबर = ८७८; जानेवारी ते आश्विन = ८७९.

पुदुवैप्पु : मेष ते डिसेंबर = १३४०; जानेवारी ते मीन = १३४१.

फसली (उत्तरी) : सौर मृग ते डिसेंबर = ५९२; जानेवारी ते सौर रोहिणी = ५९३.

फसली (दक्षिणी) : सौर मृग ते डिसेंबर = ५९०; जानेवारी ते सौर रोहिणी = ५९१.

बंगाली : मेष ते डिसेंबर = ५९३; जानेवारी ते मीन = ५९४.

बुद्धनिर्वाण : –४८७ (?)

भाटिक : चैत्र ते डिसेंबर = ६२३; जानेवारी ते फाल्गून = ६२४.

मगी : मेष ते डिसेंबर = ६३८; जानेवारी ते मीन = ६३९.

मव्लूदी : चैत्र–अहमदी ते डिसेंबर = ५७२; जानेवारी ते फाल्गून–रब्बानी = ५७३.

मौर्य : = –३२० (?)

राज्याभिषेक : ज्येष्ठ शुद्ध १३ ते डिसेंबर = १६७३; जानेवारी ते ज्येष्ठ शुद्ध १२ = १६७४.

लक्ष्मणसेन : कार्तिक ते डिसेंबर = १११८; जानेवारी ते आश्विन = १११९.

विक्रम : चैत्र–आषाढ–कार्तिक ते डिसेंबर = –५७; जानेवारी ते फाल्गून–ज्येष्ठ–आश्विन = –५६.

विक्रम (चालुक्य) : चैत्र ते डिसेंबर = १०७५; जानेवारी ते फाल्गून = १०७६.

विलायती : कन्या ते डिसेंबर = ५९२; जानेवारी ते सिंह = ५९३.

वीरनिर्वाण : चैत्र ते डिसेंबर = –५२७; जानेवारी ते फाल्गून = –५२६.

शक : चैत्र ते डिसेंबर = ७८; जानेवारी ते फाल्गुन = ७९.

शुहूर (दक्षिणी) : मृग ते डिसेंबर = ५९९; जानेवारी ते रोहिणी = ६००.

शुहूर (फारूकी) : मृग ते डिसेंबर = ५९७; जानेवारी ते रोहिणी = ५९८.

सिंह : चैत्र-आषाढ ते डिसेंबर = १११३; जानेवारी ते फाल्गून -ज्येष्ठ = १११४.

सेल्युकिडि : ऑक्टोबर ते डिसेंबर = -३१२; जानेवारी ते सप्टेंबर = -३११.

हर्ष : ६०६ - ६०७

सुहूर सनाचें परिशिष्ट

नवीन सुहूर वर्ष लागतांना कोणत्या मुसलमानी महिन्याची कोणती तारीख होती याचें कोष्टक येथें देतों. त्यावरून कागदांत केवळ सुहूर सन व तारीख आली असतां त्याच्या इंग्रजी तारखेचा अंदाज बांधतां येईल.

७४४=७४४ मुम १,१०,२१	७८५=७८६ रर २,१३,२३
७४७=७४७ सर १,१२,२४	७८८=७८९ जल ५,१७,२७
७५०=७५० रल ५,१६,२७	७९१=७९२ जर ८,१९
७५३=७५३ रर ८,१९	७९३=७९४ रब १,१२,२३
७५५=७५५ जल १,११,२३	७९६=७९७ शा ३,१५,२५
७५८=७५८ जर ३,१४,२५	७९९=८०० रम ८,१८,२९
७६१=७६१ रब ७,१८,२९	८०२=८०३ शल १०,२१
७६४=७६४ शा ९,२१	८०४=८०५ जिद २,१४,२४
७६६=७६६ रम ३,१३,२४	८०७=८०८ जिज ५,१६,२७
७६९=७६९ शल ५,१६,२७	८१०=८१२ मुम ९,१९,३०
७७२=७७२ जिद ८,२०	८१३=८१५ सर १२,२२
७७४=७७४ जिज १,११,२२	८१५=८१७ रल ४,१४,२६
७७७=७७८ मुम ४,१५,२५	८१८=८२० रर ७,१७,२८
७८०=७८१ सर ६,१८,२८	८२१=८२३ जल ११,२१
७८३=७८४ रल १०,२१	८२३=८२५ जर २,१३,२४

८२६=८२८ रब ६,१६,२७
८२९=८३१ शा ९,१९
८३१=८३३ रम १,१२,२३
८३४=८३६ शल ४,१४,२५
८३७=८३९ जिद ८,१७,२९
८४०=८४२ जिज १०,२१
८४२=८४५ मुम ३,१३,२४
८४५=८४८ सर ५,१६,२७
८४८=८५१ रल ८,२०
८५०=८५३ रर १,११,२२
८५३=८५६ जल ५,१५,२६
८५६=८५९ जर ६,१८,२९
८५९=८६२ रब १०,२१
८६१=८६४ शा ३,१३,२४
८६४=८६७ रम ५,१७,२८
८६७=८७० शल ८,१९
८६९=८७२ जिद २,१२,२३
८७२=८७५ जिज ४,१५,२६
८७५=८७९ मुम ७,१८,२९
८७८=८८२ सर १०,२१
८८०=८८४ रल २,१४,२५
८८३=८८७ रर ५,१६,२७
८८६=८९० जल ९,२०,३०
८८९=८९३ जर १२,२३
८९१=८९५ रब ४,१५,२६
८९४=८९८ शा ७,१८,२८
८९७=९०१ रम ११,२२
८९९=९०३ शल २,१३,२५
९०२=९०६ जिद ६,१७,२७
९०५=९०९ जिज ९,२०
९०७=९१२ मुम १,१२,२३
९१०=९१५ सर ४,१५,२५
९१३=९१८ रल ८,१८,२९
९१६=९२१ रर १०,२१
९१८=९२३ जल ३,१४,२४
९२१=९२६ जर ६,१६,२७
९२४=९२९ रब ९,२०
९२६=९३१ शा १,१२,२२
९२९=९३४ रम ५,१६,२६
९३२=९३७ शल ७,१८,२९
९३५=९४० जिद ११,२१
९३७=९४२ जिज ३,१४,२४
९४०=९४६ मुम ६,१७,२८
९४३=९४९ सर ८,१९
९४५=९५१ रल २,१२,२३
९४८=९५४ रर ४,१५,२६
९५१=९५७ जल ७,१८,३०
९५४=९६० जर १०,२१
९५६=९६२ रब ३,१४,२५
९५९=९६५ शा ६,१६,२८
९६२=९६८ रम ९,२०
९६४=९७० शल १,१२,२३
९६७=९७३ जिद ५,१५,२७
९७०=९७६ जिज ८,१८,२९
९७३=९८० मुम ११,२२
९७५=९८२ सर २,१३,२५
९७८=९८५ रल ६,१७,२७
९८१=९८८ रर ९,२०

९८३=९९० जल १,१२,२४
९८६=९९३ जर ४,१५,२६
९८९=९९६ रब ८,१९,२९
९९२=९९९ शा १०,२२
९९४=१००१ रम ३,१४,२५
९९७=१००४ शल ६,१७,२८
१०००=१००७ जिद ९,२१
१००२=१००९ जिज १,१२,२३
१००५=१०१३ मुम ५,१६,२६
१००८=१०१६ सर ७,१८,२९
१०११=१०१९ रल ११,२१
१०१३=१०२१ रर ३,१४,२४
१०१६=१०२४ जल ६,१८,२८
१०१९=१०२७ जर ९,१९
१०२१=१०२९ रब २,१३,२३
१०२४=१०३२ शा ४,१६,२६
१०२७=१०३५ रम ८,१९,३०
१०३०=१०३८ शल १०,२१
१०३२=१०४० जिद २,१४,२५
१०३५=१०४३ जिज ६,१७,२८
१०३८=१०४७ मुम ९,१९
१०४०=१०४९ सर १,१२,२३
१०४३=१०५२ रल ४,१५,२७
१०४६=१०५५ रर ८,१८,२८
१०४९=१०५८ जल १०,२१
१०५१=१०६० जर ३,१४,२५
१०५४=१०६३ रब ६,१७,२७
१०५७=१०६६ शा ९,२०
१०५९=१०६८ रम १,१२,२४
१०६२=१०७१ शल ५,१५,२६
१०६५=१०७४ जिद ८,१८,२९
१०६८=१०७७ जिज १०,२२
१०७०=१०८० मुम ३,१४,२४
१०७३=१०८३ सर ६,१७,२७
१०७६=१०८६ रल ८,२०
१०७८=१०८८ रर १,१२,२३
१०८१=१०९१ जल ५,१५,२६
१०८४=१०९४ जर ७,१८,२९
१०८७=१०९७ रब ११,२२
१०८९=१०९९ शा ४,१४,२४
१०९२=११०२ रम ५,१७,२८
१०९५=११०५ शल ८,२०
१०९७=११०७ जिद २,१३,२३
११००=१११० जिज ४,१५,२६
११०३=१११४ मुम ७,१८,३०
११०६=१११७ सर ११,२२
११०८=१११९ रल ३,१३,२४
११११=११२२ रर ६,१६,२८
१११४=११२५ जल १०,२०
१११६=११२७ जर १,१३,२३
१११९=११३० रब ४,१५,२७
११२२=११३३ शा ८,१९,२९
११२५=११३६ रम ११,२२
११२७=११३८ शल ३,१३,२५
११३०=११४१ जिद ७,१८,२९
११३३=११४४ जिज ११,२१
११३५=११४७ मुम ३,१३,२४
११३८=११५० सर ६,१६,२७
११४१=११५३ रल ९,२०
११४३=११५५ रर १,११,२२

११४६=११५८ जल ४,१५,२५
११४९=११६१ जर ७,१९,२९
११५२=११६४ रब १०,२०
११५४=११६६ शा ३,१३,२४
११५७=११६९ रम ५,१७,२८
११६०=११७२ शल ९,१९
११६२=११७४ जिद १,११,२१
११६५=११७७ जिज ३,१५,२६
११६८=११८१ मुम ७,१८,२९
११७१=११८४ सर १०,२०
११७३=११८६ रल २,१३,२४
११७६=११८९ रर ६,१६,२८
११७९=११९२ जल ९,१९,३०
११८२=११९५ जर १२,२३
११८४=११९७ रब ४,१५,२६
११८७=१२०० शा ८,१८,२८
११९०=१२०३ रम १०,२१
११९२=१२०५ शल २,१३,२५
११९५=१२०८ जिद ६,१७,२७
११९८=१२११ जिज ९,१९,३०
१२०१=१२१५ मुम ११,२२
१२०३=१२१७ सर ५,१५,२६
१२०६=१२२० रल ८,१८,२८
१२०९=१२२३ रर १०,२२
१२११=१२२५ जल ३,१४,२४
१२१४=१२२८ जर ६,१७,२७
१२१७=१२३१ रब ८,२०
१२१९=१२३३ शा १,१२,२४
१२२२=१२३६ रम ५,१५,२६
१२२५=१२३९ शल ७,१८,२९
१२२८=१२४२ जिद १०,२१

१२३०=१२४४ जिज ३,१४,२४
१२३३=१२४८ मुम ५,१७,२७
१२३६=१२५१ सर ८,१९
१२३८=१२५३ रल २,१२,२३
१२४१=१२५६ रर ४,१५,२६
१२४४=१२५९ जल ७,१८,३०
१२४७=१२६२ जर ११,२२
१२४९=१२६४ रब ३,१४,२४
१२५२=१२६७ शा ५,१६,२७
१२५५=१२७० रम ९,२०
१२५७=१२७२ शल १,१२,२३
१२६०=१२७५ जिद ४,१४,२५
१२६३=१२७८ जिज ७,१८,२९
१२६६=१२८२ मुम १०,२२
१२६८=१२८४ सर ३,१३,२४
१२७१=१२८७ रल ५,१७,२७
१२७४=१२९० रर ९,२०
१२७६=१२९२ जल १,१२,२२
१२७९=१२९५ जर ४,१५,२६
१२८२=१२९८ रब ८,१९,२९
१२८५=१३०१ शा १०,२२
१२८७=१३०३ रम ३,१३,२४
१२९०=१३०६ शल ६,१७,२८
१२९३=१३०९ जिद ९,२०,३०
१२९६=१३१२ जिज ११,२२
१२९८=१३१५ मुम ४,१४,२५
१३०१=१३१८ सर ८,१९,२९
१३०४=१३२१ रल ९,२०
१३०६=१३२३ रर ३,१४,२४
१३०९=१३२६ जल ७,१८,२८
१३१२=१३२९ जर ९,२०,३०

राजशकाचें परिशिष्ट

राजशकाशीं जुळतीं शालिवाहन शकाचीं वर्षें येथें देतों. यांवरून कोणत्याहि राजशकाशीं जुळतें शालिवाहन शकाचें वर्ष तात्काळ समजून येईल. हें कोष्टक पाहतांना एकच काळजी घ्यावयाची आहे. तपासावयाच्या कालोल्लेखांत राजशक, मास व तिथि येवढा तपशील दिला असल्यास चैत्र शुद्ध प्रतिपदा ते ज्येष्ठ शुद्ध द्वादशीपर्यंत आलेल्या राजशकाशीं येथें दिलेला शालिवाहन शकाचा आंकडा न जुळतां त्या पुढील जुळेल. जसें राजशक १५ ज्येष्ठ शुद्ध १२ शीं जुळता शालिवाहन शक १६१० न येतां १६११ येईल.

१=१५९६	२२=१६१७	४३=१६३८	६४=१६५९
२=१५९७	२३=१६१८	४४=१६३९	६५=१६६०
३=१५९८	२४=१६१९	४५=१६४०	६६=१६६१
४=१५९९	२५=१६२०	४६=१६४१	६७=१६६२
५=१६००	२६=१६२१	४७=१६४२	६८=१६६३
६=१६०१	२७=१६२२	४८=१६४३	६९=१६६४
७=१६०२	२८=१६२३	४९=१६४४	७०=१६६५
८=१६०३	२९=१६२४	५०=१६४५	७१=१६६६
९=१६०४	३०=१६२५	५१=१६४६	७२=१६६७
१०=१६०५	३१=१६२६	५२=१६४७	७३=१६६८
११=१६०६	३२=१६२७	५३=१६४८	७४=१६६९
१२=१६०७	३३=१६२८	५४=१६४९	७५=१६७०
१३=१६०८	३४=१६२९	५५=१६५०	७६=१६७१
१४=१६०९	३५=१६३०	५६=१६५१	७७=१६७२
१५=१६१०	३६=१६३१	५७=१६५२	७८=१६७३
१६=१६११	३७=१६३२	५८=१६५३	७९=१६७४
१७=१६१२	३८=१६३३	५९=१६५४	८०=१६७५
१८=१६१३	३९=१६३४	६०=१६५५	८१=१६७६
१९=१६१४	४०=१६३५	६१=१६५६	८२=१६७७
२०=१६१५	४१=१६३६	६२=१६५७	८३=१६७८
२१=१६१६	४२=१६३७	६३=१६५८	८४=१६७९

८५=१६८०	११४=१७०९	१४३=१७३८	१७२=१७६७
८६=१६८१	११५=१७१०	१४४=१७३९	१७३=१७६८
८७=१६८२	११६=१७११	१४५=१७४०	१७४=१७६९
८८=१६८३	११७=१७१२	१४६=१७४१	१७५=१७७०
८९=१६८४	११८=१७१३	१४७=१७४२	१७६=१७७१
९०=१६८५	११९=१७१४	१४८=१७४३	१७७=१७७२
९१=१६८६	१२०=१७१५	१४९=१७४४	१७८=१७७३
९२=१६८७	१२१=१७१६	१५०=१७४५	१७९=१७७४
९३=१६८८	१२२=१७१७	१५१=१७४६	१८०=१७७५
९४=१६८९	१२३=१७१८	१५२=१७४७	१८१=१७७६
९५=१६९०	१२४=१७१९	१५३=१७४८	१८२=१७७७
९६=१६९१	१२५=१७२०	१५४=१७४९	१८३=१७७८
९७=१६९२	१२६=१७२१	१५५=१७५०	१८४=१७७९
९८=१६९३	१२७=१७२२	१५६=१७५१	१८५=१७८०
९९=१६९४	१२८=१७२३	१५७=१७५२	१८६=१७८१
१००=१६९५	१२९=१७२४	१५८=१७५३	१८७=१७८२
१०१=१६९६	१३०=१७२५	१५९=१७५४	१८८=१७८३
१०२=१६९७	१३१=१७२६	१६०=१७५५	१८९=१७८४
१०३=१६९८	१३२=१७२७	१६१=१७५६	१९०=१७८५
१०४=१६९९	१३३=१७२८	१६२=१७५७	१९१=१७८६
१०५=१७००	१३४=१७२९	१६३=१७५८	१९२=१७८७
१०६=१७०१	१३५=१७३०	१६४=१७५९	१९३=१७८८
१०७=१७०२	१३६=१७३१	१६५=१७६०	१९४=१७८९
१०८=१७०३	१३७=१७३२	१६६=१७६१	१९५=१७९०
१०९=१७०४	१३८=१७३३	१६७=१७६२	१९६=१७९१
११०=१७०५	१३९=१७३४	१६८=१७६३	१९७=१७९२
१११=१७०६	१४०=१७३५	१६९=१७६४	१९८=१७९३
११२=१७०७	१४१=१७३६	१७०=१७६५	१९९=१७९४
११३=१७०८	१४२=१७३७	१७१=१७६६	२००=१७९५

२०१=१७९६	२२७=१८२२	२५३=१८४८	२७९=१८७४
२०२=१७९७	२२८=१८२३	२५४=१८४९	२८०=१८७५
२०३=१७९८	२२९=१८२४	२५५=१८५०	२८१=१८७६
२०४=१७९९	२३०=१८२५	२५६=१८५१	२८२=१८७७
२०५=१८००	२३१=१८२६	२५७=१८५२	२८३=१८७८
२०६=१८०१	२३२=१८२७	२५८=१८५३	२८४=१८७९
२०७=१८०२	२३३=१८२८	२५९=१८५४	२८५=१८८०
२०८=१८०३	२३४=१८२९	२६०=१८५५	२८६=१८८१
२०९=१८०४	२३५=१८३०	२६१=१८५६	२८७=१८८२
२१०=१८०५	२३६=१८३१	२६२=१८५७	२८८=१८८३
२११=१८०६	२३७=१८३२	२६३=१८५८	२८९=१८८४
२१२=१८०७	२३८=१८३३	२६४=१८५९	२९०=१८८५
२१३=१८०८	२३९=१८३४	२६५=१८६०	२९१=१८८६
२१४=१८०९	२४०=१८३५	२६६=१८६१	२९२=१८८७
२१५=१८१०	२४१=१८३६	२६७=१८६२	२९३=१८८८
२१६=१८११	२४२=१८३७	२६८=१८६३	२९४=१८८९
२१७=१८१२	२४३=१८३८	२६९=१८६४	२९५=१८९०
२१८=१८१३	२४४=१८३९	२७०=१८६५	२९६=१८९१
२१९=१८१४	२४५=१८४०	२७१=१८६६	२९७=१८९२
२२०=१८१५	२४६=१८४१	२७२=१८६७	२९८=१८९३
२२१=१८१६	२४७=१८४२	२७३=१८६८	२९९=१८९४
२२२=१८१७	२४८=१८४३	२७४=१८६९	३००=१८९५
२२३=१८१८	२४९=१८४४	२७५=१८७०	३०१=१८९६
२२४=१८१९	२५०=१८४५	२७६=१८७१	३०२=१८९७
२२५=१८२०	२५१=१८४६	२७७=१८७२	३०३=१८९८
२२६=१८२१	२५२=१८४७	२७८=१८७३	३०४=१८९९
			३०५=१९००

जुळत्या हिंदू-मुसलमानी महिन्यांचें कोष्टक

हिंदू महिने व त्यांशीं जुळते मुसलमानी महिने यांचा वारंवार विचार करावा लागतो. त्या विचारास सोपेपणा यावा म्हणून येथें जुळत्या मुसल्मानी व हिंदू महिन्यांचें कोष्टक दिलें आहे. अधिक महिना पडेल तेव्हां त्या पुढील हिंदू महिन्यांसाठीं एक महिन्यानें पुढचा मुसलमानी महिना घ्यावा लागेल. उ० श. १६०३ मध्यें चैत्राशीं जुळणारा मुसलमानी महिना रबिलावल येतो. पण आश्विन महिना अधिक येऊन पौष क्षय येतो. यामुळें त्या वर्षी हिंदू व मुसल्मानी महिन्यांचा पुढीलप्रमाणें मेळ बसेल. चैत्र–रबिलावल, वैशाख–रबिलाखर, ज्येष्ठ–जमादिलावल, आषाढ–जमादिलाखर, श्रावण–रजब, भाद्रपद–साबान, अधिक आश्विन–रमजान, आश्विन–शव्वाल, कार्तिक–जिल्काद, मार्गशीर्ष–जिल्हेज, पौष–क्षय, माघ–मोहरम, फाल्गून–सफर.

चैत्र	वैशा.	ज्येष्ठ	आषा.	श्राव.	भाद्र.	आ.	कार्ति.	मार्ग.	पौष	माघ	फा.
मुम	सर	रल	रर	जल	जर	रब	शा	रम	शल	जिद	जिज
सर	रल	रर	जल	जर	रब	शा	रम	शल	जिद	जिज	मुम
रल	रर	जल	जर	रब	शा	रम	शल	जिद	जिज	मुम	सर
रर	जल	जर	रब	शा	रम	शल	जिद	जिज	मुम	सर	रल
जल	जर	रब	शा	रम	शल	जिद	जिज	मुम	सर	रल	रर
जर	रब	शा	रम	शल	जिद	जिज	मुम	सर	रल	रर	जल
रब	शा	रम	शल	जिद	जिज	मुम	सर	रल	रर	जल	जर
शा	रम	शल	जिद	जिज	मुम	सर	रल	रर	जल	जर	रब
रम	शल	जिद	जिज	मुम	सर	रल	रर	जल	जर	रब	शा
शल	जिद	जिज	मुम	सर	रल	रर	जल	जर	रब	शा	रम
जिद	जिज	मुम	सर	रल	रर	जल	जर	रब	शा	रम	शल
जिज	मुम	सर	रल	रर	जल	जर	रब	शा	रम	शल	जिद

संक्षेपांचा खुलासा असा—मुम–मोहरम, सर–सफर, रल–रबिलावल, रर–रबिलाखर, जल–जमादिलावल, जर–जमादिलाखर, रब–रजब, शा–शाबान, रम–रमजान, शल–शव्वाल, जिद–जिल्काद, जिज–जिल्हेज.

---

७. मूर्तिपरिचय

प्रस्ताव

मूर्तीचा परिचय करून घेतांना प्रथम ती स्त्री किंवा पुरुष आहे हें पहावें लागतें. स्त्रीमूर्ति उन्नत स्तन, केशबंध, कृश पोट, वस्त्रें, लठ्ठ ढुंगण, विशिष्ट दागिने इत्यादि चिन्हांवरून सहज ओळखूं येते. विशेषतः प्राचीन व मध्ययुगीन कालांतील स्त्रीमूर्तींच्या ओळखणीचें उन्नतस्तनत्व हें एक महत्त्वाचें गमक आहे. अर्वाचीन मूर्तींमध्यें मात्र त्याचें परिणामकारी अस्तित्व दिसून येत नाहीं. लांछन किवा वाहन हें मूर्तिनिश्चयांतील पुढचें महत्त्वाचें गमक आहे. अतिशय प्राचीन मूर्तींच्या बाबतींत लांछनें अजीबात नव्हतीं किंवा निश्चित ठरावयाचीं होतीं. उदा० इ. सनाच्या आरंभींच्या, पूर्वींच्या आणि नंतरच्या सुमारें दोनशें वर्षांत घडलेल्या जैन तीर्थंकरांच्या मूर्तींना लांछनें दाखविलेलीं नाहींत किंवा अनेकांना एकच लांछन दाखविलेलें आहे. तेव्हां अशा कालांतील मूर्ति कोणत्या तीर्थंकराची आहे हें बहुधा तीविषयीं कोरीव लेख असल्याखेरीज समजत नाहीं. पण पुढें पुढें ही स्थिति पालटून लांछनें निश्चित झालीं आणि त्यांतील कांहीं आयुधें तर कांहीं वाहनें बनलीं. मध्ययुगीन व अर्वाचीन मूर्ति ओळखण्यास या दोहोंचा विशेषतः वाहनांचा फार उपयोग होतो. अनेक देवतांच्या हातांत आयुधें तीं तींच असण्याचा संभव आहे. पण वाहनांच्या बाबतींत असे प्रकार थोडे आहेत. विशेषतः एकधर्मीय मूर्तिकांडांत एकच वाहन असलेल्या निरनिराळ्या देवता फार थोड्या असतात. विधर्मीयांच्या देवता ओळखूं येण्यास अन्य साधनें आहेत.

येथें वाहन व आयुधें यांविषयीं माझी कल्पना थोडक्यांत स्पष्ट मांडतों. हीं दोन्ही मूलतः विशिष्ट देवतेचे गुणदोष, स्वभावधर्म, शुभाशुभ कार्यकलाप यांचीं प्रतीकरूप चिन्हें अथवा लांछनें होतीं. उदाहरणार्थ, गरुत्मन् अथवा सुपर्ण अर्थात् सूर्य हें प्रकाशरूप विष्णुदेवतेचें चिन्ह आहे. पक्ष्यांप्रमाणें सूर्य आकाशांत सर्वांत उंच व जास्त चालतो किंवा उडतो म्हणून त्यास गरुत्मन् किंवा सुपर्ण व पक्षांचा राजा म्हटलें. सूर्य चक्राकार असल्यानें सूर्यचक्र हेंही विष्णूचें चिन्हच म्हटलें पाहिजे. हळूहळू पक्षांचा राजा पक्षिवर्गांतीलच पाहिजे म्हणून एका विशिष्ट पक्षाला गरुड म्हणूं लागले. विष्णूला मनुष्यरूप दिल्यावर

गरुडाला त्याचें वाहन बनविलें व सूर्यचक्राचें नुसतें चक्र होऊन तें विष्णूचें आयुध झालें. पशुपतीचें चिन्ह रेड्यापेक्षां बैल म्हणणेंच जास्त चांगलें; पण तोच बैल पशुपतीस मानवरूप दिल्यावर त्याचें वाहन बनला. पार्वती पर्वतसंबद्ध आहे हें समजण्यास वन्य पशूंचा राजा सिंह याच्या इतकें चांगलें चिन्ह दुसरें नाहीं. तेव्हां पार्वतीस मानवी रूप प्राप्त झाल्यावर सिंह हा तिचें वाहन बनणें ओघानेंच आलें. ब्रह्माचें शुद्ध स्वरूप लक्षांत घेऊन हंस तितकाच शुभ्र व स्वच्छ असल्यानें त्याचें चिन्ह ठरविलें. पण ब्रह्म अथवा ब्रह्मा याला मानुष रूप मिळाल्यावर हंस साहजिकच त्याचें वाहन बनला. गणपति ही मूलतः विघ्नदेवता होती. अन्न, वस्त्र व घर या मनुष्याच्या अगदीं प्राथमिक गरजा आहेत. पैकीं अन्नास सर्वाधिक महत्व आहे. तें अन्न पिकांच्या रूपानें शेतांत उभें असतां आणि घरांत भरून ठेवल्यानंतरही उंदीर, चिचोंद्री व घूस त्याचा अतिशय नाश करतात. घूस तर घरांचीहि नासधूस करते. तेव्हां हे प्राणि मनुष्याच्या सर्वप्रथम गरजांचे भयंकर शत्रू ठरले. विघ्नदेवता दिसत नव्हती पण तिचीं चिन्हें मात्र पदोपदीं दिसत. म्हणून उंदराला त्या विघ्नदेवतेचें प्रथम लांछन बनविलें आणि नंतर त्याचें वाहनांत रूपांतर झालें. विघ्नदेवतेचें उंदीर लांछन ठरवितांना प्लेग अस्तित्वांत होता कीं नाहीं हें ठाऊक नाहीं, पण आज प्लेगाच्या प्रादुर्भावाचा विचार करतां उंदीर विघ्नदेवतेचें वाहन असण्यांत अधिकच सार्थकता आहे. हिंदुस्थानांत लक्ष्मी ही ऐश्वर्याची देवता समजली जाते तरी तिच्या हातांत, ऐश्वर्याचें प्राचीन काळचें एक लक्षण जें धान्याची विपुलता तद्दर्शक धान्याचें कणीस दाखविण्याची पद्धत सामान्यतः नाहीं. पण जावासुमात्रांत लक्ष्मीच्या मूर्ती सांपडल्या असून त्यांच्या हातांत बहुधा धान्याचें कणीस दाखविलेलें असतें. येथें कणीस हें लक्ष्मीचें-ऐश्वर्याचें प्रतीक असतांना आयुध बनलें. तें सजीव असतें तर वाहनच बनतें. यज्ञकर्मास वैदिक संस्कृतींत फार महत्त्वाचें स्थान आहे. अग्नि यज्ञकर्मांतील मुख्य देवता असून मेषबलि हें यज्ञांतील कार्याचें मुख्य लक्षण आहे. तेव्हां मेष अग्नीचें वाहन बनविला गेला. कुबेर म्हणजे ज्याचें शरीर वाईट, कुत्सित, कुष्ठित आहे तो. त्याचें लक्षण कुरूपता. गाढवाच्या ठिकाणची कुरूपता काय विचारावी! तेव्हां कुबेरास खरवाहन बनविलें. त्यास सामान्यतः नरवाहन म्हणतात; पण इसवी सनाच्या सहाव्या शतकांतील प्रख्यात ग्रंथकार वराहमिहिर याच्या बृहत्संहितें-

तील ‘ नरवाहनः कुबेरः ’ या पदांचा खुलासा करतांना नवव्या शतकांतील टीकाकार भट्ट उत्पल यानें ‘ खरवाहनः ’ असाहि पाठ कित्येक घेतात म्हणून सांगितलें आहे. जलदेवता वरुण ही अव्यक्त आहे. तिच्या अशिव स्वरूपाचा प्रत्यय मनुष्यें व जनावरें खोल पाण्यांत सुसरींकडून ओढलीं जात असतां अगर होड्या उलटून पाण्यांत पडून बुडतांना किंवा वाहून मेलीं म्हणजे येतो. सुसरीचें भय तर नित्याचेंच आहे. तेव्हां नक्र, मकर किंवा मगर हेंच वरुणाचें प्रथम लांछन व नंतर वाहन बनविलें. ओढलें जाण्याची क्रिया दाखविण्यासाठीं पाश हें आयुध वरुणाच्या हातांत दिलें. अशा पद्धतीनें देवदेवतांच्या अनेक वाहनलांछनांचा छडा थोड्याशा विचारानें आपणांस लावतां येईल. चिन्हें किंवा लांछनें यांचीं वाहनें बनण्याची प्रक्रिया जैन तीर्थंकरांच्या मूर्तीवरूनहि चांगली ध्यानांत येते. प्रथम प्रथम जैन तीर्थंकरांना कोणतींच विशिष्ट लांछनें नव्हतीं. पुढें अनेक तीर्थंकर मूर्तींना तींच तीं एक किंवा दोन लांछनें दाखवूं लागले. पुढें तीं लांछनें बैठकीवर काढूं लागले. कांहीं तीर्थंकरांचीं लांछनें प्राणी असल्यामुळें व ते बैठकीवर कोरल्यामुळें त्यांना अज्ञानी लोक वाहनेंच म्हणूं लागले आणि हल्लींही म्हणतात. पण चंद्र, धर्मचक्र इ. वाहनें बनणें शक्य नसल्यानें या वस्तू पाहिल्या म्हणजे इतर प्राणीहि वाहनें नसून चिन्हें अथवा लांछनें आहेत ही गोष्ट मनास तात्काळ पटते. सुपार्श्व आणि पार्श्व या तीर्थंकरांच्या डोक्यांवर नेहमीं पांच किंवा सात फणा असलेल्या नागाचें छत्र असतें. हें वास्तविक त्यांचें लांछन; पण एका चितार्‍यानें हा नाग जणूं वाहन असें समजून एका चित्रांत पार्श्वनाथाच्या बैठकीवरच काढला आहे.

वाहनांविषयीं आणखी एक मुद्दा लक्षांत ठेवला पाहिजे. सामान्यतः पुरुषदेवतेचें जें वाहन तेंच त्याच्या स्त्रीचें किंवा शक्तीचें असतें. उदाहरणार्थ विष्णूचें वाहन गरुड आहे तर लक्ष्मी व वैष्णवी यांचें वाहनहि गरुड आहे. ब्रह्मा आणि ब्राह्मी व सरस्वती या तिघांचेंहि वाहन हंस आहे. स्कंद व स्कांदी या दोघांचेंहि वाहन मोर हेंच आहे. पण या नियमास अपवाद आहेत. उदाहरणार्थ शंकराचें वाहन बैल आहे तर पार्वतीचें कधीं सिंह तर कधीं गोधा (घोरपड) असून रुद्राणीचें वाहन मात्र नंदी आहे. सरस्वतीचें वाहन, हंस व मोर यांमधील लक्षणभेद ध्यानांत न राहिल्यामुळें, अलीकडे मोर बनलें आहे. नरवाहन या शब्दांतील नर शब्दाचे मनुष्य व घोडा असे दोन अर्थ

असल्यामुळें कुबेर कधीं घोड्यावर तर कधीं मनुष्याबर आरूढ असलेला दाखविला जातो.

मूर्तिनिश्चयांतील पुढली गोष्ट म्हणजे तिचा शिल्पपंथ ठरविणें ही होय. मनुष्याला आपल्या सुखमय जीवनासाठीं आपलें कुटुंब, नातेवाईक, जात, गांव, समाज, राष्ट्र व जग यांच्या संबंधांवर उण्याअधिक प्रमाणांत अवलंबून राहावें लागतें. ज्यांशीं आपला संबंध येतो ते विचार, उच्चार, आचार, पोषाख, चालीरीती, खाद्यपेय, भाषा, धर्म, समजुती, इत्यादि अनेक बाबतींत किंवा थोडक्यांत सांगावयाचें तर संस्कृतीनें आपल्या सारखेच असतील अशी अपेक्षा तर धरतां येणार नाहींच; पण उलट ‘ पिंडे पिंडे मतिर्भिन्ना’ किवा ‘भिन्नरुचिर्हि लोकः’ या न्यायांनीं आपल्याहून भिन्न असण्याचा संभवच जास्त. यामुळें दोन माणसांचा संबंध आला म्हणजे चांगुलपणा, आवश्यकता, नाविन्यामुळें उत्पन्न होणारा मोह, आंगिक मोहकता, सुखाधिक्य, इत्यादि अनेक मुद्यांवर आचारादि बाबतींत त्यांमध्यें देवघेव सुरू होते; ती टाळणें अगदीं अशक्य आहे. देवघेव सुरू झाली म्हणजे एकजिनसीपणा मोडून मिश्रण बनतें. मिश्रणाच्या प्रमाणावर नामरूपांत बदल होतो. यामुळें जगांतील कोणतीहि संस्कृति घेतली तरी ती आज शुद्ध स्वरूपांत म्हणजे एकजिनसी सापडणें प्रायः अशक्य आहे. तींत भेसळ झालेली असणारच. ह्या भेसळीचें प्रमाण कमीजास्त झाल्यानें, भेसळीस फार काल लोटल्यामुळें आलेल्या विस्मृतीनें किंवा भेसळ बेमालूम झाल्यानें अडाणी लोकांमध्यें एकजिनसीपणाविषयीं वृथा भ्रम व तज्जन्य अभिमान उत्पन्न होतो. सूक्ष्मदर्शी ज्ञान्याच्या हें लक्षांत आल्यामुळें त्याचा सारा दुरभिमान गळून जाऊन त्याचें मन उदार, सहिष्णु, सर्वसंग्राही, परिवर्तनशील असें आणि दृष्टि विशाल बनते.

आपल्या तत्त्वज्ञानांत जगन्मिथ्या असें सांगितलें असून त्याचा अर्थ हें जग नश्वर अथवा नाश पावतें किंवा एकसारखें बदलतें असा आहे. कोणतीहि वस्तु किंवा कल्पना घेतली तरी तिच्या रूपांत व रूपामुळें नामांत एकसारखा बदल होत असतो. हाच नियम समाज व त्याचीं विविध अंगें यांसही लागू आहे आपण एखाद्या अशा समाजाची कल्पना करूं या कीं, ज्याचा अंशतःहि तद्भिन्न अशा समाजाशीं यत्किंचित् संबंध येत नाहीं. पण असा हा समाज स्थिर

राहील अशी कल्पना केली तर ती निखालस चुकीची ठरेल. मनुष्यमात्राच्या ठिकाणचे आंगिक स्वतंत्र विचार व विकार आणि जुन्याचा कंटाळा यांचा परिणाम होऊन अशा समाजांतहि बदल होत जाईल. फार तर तो मंदगतिक असेल. पण बदल न होणें अशक्यच आहे.

सारांश, समाजाच्या आयुष्यांत आंगिक किंवा आगंतुक कोणत्याहि कारणांनीं कां होईना पण सतत एकसारखा बदल होत असतो. हा फरक सुरवातीस इतका उठून दिसत नाहीं. पण काल अधिकाधिक लोटेल तसतसा हा भेद सुव्यक्त होऊन त्या भेदास निराळें नांव ठेवणें प्राप्त होतें. असें स्वतंत्र नांव मिळाल्यावरहि तो बदल कांहीं दिवस चालू राहून नंतर त्यास मरण येतें, त्याची जागा दुसरा बदल घेतो व त्यास नवें नांव मिळतें. नामरूपांचा बदल होण्याची अशी ही अखंड परंपरा चालू आहे.

हा बदल किंवा हें मिश्रण संस्कृतिनिदर्शक सर्व अंगोपांगांत होत असल्यानें शिल्पांतहि होणें क्रमप्राप्त आहे. हिंदुस्थानांतील शिल्पांतहि असें मिश्रण झालें असलें पाहिजे. आणि वस्तुस्थिति तशीच आहे. अतिशय प्राचीन शिल्पावरहि परकीय शिल्पाचा परिणाम झाल्यामुळें त्यास निर्भेळ आर्य शिल्प म्हणणें शास्त्रतः योग्य नव्हे. पण हे संस्कार अत्यल्प असल्यामुळें त्यास शुद्ध आर्यशिल्प (Indiginous Indian sculpture) म्हणतात. याचे नमुने बिहारमधील अशोकपूर्व यक्षयक्षी, तीर्थंकर, अशोकस्तंभ व त्यांच्या वेदी, भरहूत व सांची येथील स्तूपांचें बरेचसें काम, ओडिसा, महाराष्ट्र, द्रवीड इत्यादि देशांतील गुहा व त्यांतील शिल्पें, भुवनेश्वराजवळचा शिशुपालगढ यांमध्यें पहावयास सांपडतात. इ. पू. ३२७ मध्यें अलेक्झांडर हिंदुस्थानांत आल्यानंतर परकीय संस्कृतीचा आर्यसंस्कृतीशीं अधिक संबंध येऊन मिश्रणें कसकशीं होत गेलीं याचा कांहींसा सुसंगत इतिहास सांगतां येतो. तेव्हांपासून मुख्यतः इराणी, ग्रीक व रूमी शिल्पांचे येथील शिल्पावर परिणाम होऊं लागले. हे परिणाम उत्तरेंत सर्वांआधीं व विशेषत्वानें दृग्गोचर होतात. दक्षिणेंत ते थोडे उशीरा व बऱ्याच कमी प्रमाणांत दिसतात. हें मिश्रण वास्तु, मूर्ति, नाणीं, इत्यादि बाबींत विशेष दिसून येतें. हें पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत यांत इतकें झालें होतें कीं, ग्रेको-बुद्धिस्ट किंवा गांधार हेंच नांव तेथील मूर्तिशिल्पाच्या पंथास द्यावें लागलें. हा पंथ इ. स. पूर्व २०० ते

इ. स. उत्तर ३०० पर्यंत सामान्यतः चालू होता. यांत सामान्यतः बुद्धजीवन व बौद्ध जातकें हीं चित्रित केलीं असून त्यांतील मुख्यतः अंगयष्टी, पोशाक इत्यादींवर ग्रीक छाया स्पष्ट आहे. मथुरा पंथांत मूल आर्यशिल्प आणि गांधार व कुषण शिल्प यांची मिसळ असली तरी आर्यशिल्पाचा अंश बलवत्तर आहे. या तीन पंथांतून गुप्त शिल्पपंथाचा उदय झाला असून त्यावर या तिहींची बरीच छाप पडली आहे. राजपुताना, मध्यहिंदुस्थान, संयुक्त प्रांत यांत एकच शिल्पपंथ चालू होता. बंगाल, बिहार व आसाम यांमध्यें पाल व सेन राजवटींत एक स्वतंत्र शिल्पपंथ उदयास आला असून त्यास पूर्वभारत शिल्पपंथ हें नांव सध्या देण्यांत आलें आहे. ओडिसामध्येंहि एक शिल्पपंथ होताच. महाराष्ट्र व कर्नाटक यांत शातवाहन, राष्ट्रकूट, बदामी चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याण चालुक्य, कळचुर्य व यादव या संस्कृतिदृष्ट्या मिश्रित अशा राजघराण्यांचा अमल सुमारें हजार पंधराशें वर्षें झाला असल्यानें या दोन देशांतील शिल्पांत फारसा फरक नाहीं. येवढेंच नव्हे तर या घराण्यांपैकीं कांहीं(चालुक्य, राष्ट्रकूट)च्या उपशाखांनीं दक्षिण गुजरातेवर राज्य केल्यामुळें त्या भागांतील कित्येक शिल्पेंहि प्रायः महाराष्ट्रकर्नाटकां-सारखींच आहेत. यांत कालकृत भेद मात्र भरपूर आहे. उदाहरणार्थ, बदामी शिल्पें हीं वेगळीं काढलींच पाहिजेत, इतकें त्यांचें वैशिष्ट्य आहे. म्हैसूरमध्यें फार पूर्वीपासून स्वतंत्र गंगराज्य व तें संपतांच होयसळांचें राज्य सुरू झाल्यानें तेथें सामान्यतः प्रथमपासून पण विशेषतः होयसळ राजवटीपासून एक स्वतंत्र पंथच उदयास आला. त्यांत पुन्हां पूर्व व उत्तर होयसळ असे दोन भेद पडतात. मद्रास प्रांतांत पल्लवपूर्व, पल्लव, चोलपांड्य असे शिल्पपंथ आहेत. तेराव्या शतकापासून मुसलमानी राज्यें आपल्या भारतांत होऊं लागलीं. मुहम्मदी राज्यकर्ते, सेनापति, अधिकारी, साधू, या सर्वांचीं देवळें व मूर्ति फोडणें हें पुण्यकर्म आहे अशी दृढ समजूत असल्यानें ते जेथें गेले तेथें सर्वप्रकारच्या हिंदू शिल्पाचा नाश होऊन सर्व शिल्पपंथ मरून गेले. फक्त राजपुतान्यांत व दक्षिणेंत मुसलमानी राज्य-कर्त्यांना विरोध करणाऱ्या सत्ता कायम राहिल्यानें आणि सुमारें दोनशें वर्षांनंतर त्या सत्ता प्रायः विलीन झाल्या तरी मराठी सत्तेच्या उदयामुळें मुसलमानी अमल ढिला झाल्याकारणानें या दोन प्रदेशांत शिल्पकला

कशीबशी टिकाव धरून राहिली येवढेंच! तीमधील सौंदर्य, बारकावा, ठोसरपणा, अनुकूलपरिणामकारित्व इत्यादि सारे गुण मात्र मृतवत् झाले. महाराष्ट्रांत स्वराज्याचा उदय झाला तरी तत्पूर्वी तीनशें वर्षांच्या मुसलमानी अमदानींत हिंदू वास्तु व मूर्ति, अशा दोन्ही शिल्पाची जी ससेहोलपट झाली तीमुळें स्वराज्यांतहि तिचें पुनरुज्जीवन होऊं शकलें नाहीं. पेशवाईत शिल्पकलेसाठीं जयपूर, म्हैसूर इत्यादि संस्थानांकडे पहावें लागलें हें त्याचेंच गमक आहे.

ही शिल्पपंथाविषयीं सामान्य माहिती सांगितली. पण तीवरून शिल्पपंथ ओळखतां येणार नाहीं. त्यासाठीं मूर्तींच्या रूप, काल, स्थल, विषय, आश्रय, वास्तु, आंगलट, पोषाक, अलंकार, केशरचना, आयुधें, आसपासचीं झाडें, प्राणी, पार्श्वभूमि इत्यादींचा साकल्यानें विचार करावा लागतो.

पैकीं मूर्तींचा काल ठरविणें ही मूर्तींच्या परीक्षणांतील एक महत्त्वाची बाब आहे. काल ठरविण्याचें सर्वोत्कृष्ट गमक कालनिर्देशयुक्त प्रामाणिक लेख हें होय. लेखामुळें मूर्ति लेखकालानंतरची प्रायः असूं शकणार नाहीं हें निश्चित होतें. लेख सामान्यतः मूर्ति तयार करतांना किंवा तिची प्रतिष्ठा करतांना खोदतात. क्वचित् प्रसंगीं जीर्णोद्धार करतांनाहि लेख खोदला जाण्याचा संभव आहे. पण मूर्ति घडविली त्या कालापेक्षांहि ती प्राचीनतर आहे असें भासविण्यासाठीं खोदलेल्या अर्थात् बनावटी लेखाची मूर्ति क्वचितच असेल. सारांश, कालनिर्देशयुक्त लेख हें कालनिर्णयाचें सर्वोत्तम गमक होय. कालनिर्देशविरहित लेख असल्यास अक्षरवटिकेवरून लेखाचा काल ठरवितां येतो. पण लेख लहान असल्यास अक्षरवटिकेचा नीट अभ्यास करतां येणार नाहीं आणि आला तरी त्यावरून लेखाचा काल फक्त अंदाजानें व्यक्त होतो. अंदाज व वस्तुस्थिति यांत शंभर सवाशें वर्षांचा फरक पडणें शक्य आहे. पण मूर्तीवर कोणताच लेख नसला तर विशिष्ट मूर्तींच्या साहचर्यानें सांपडलेल्या इतर मूर्ति किंवा वस्तु, मूर्तीचें स्थान, मूर्तींचा तौलनिक अभ्यास इत्यादींच्या साह्यानें तिचा कालनिर्णय करावा लागतो.

प्रत्येक देवतेविषयीं कांहींना कांहीं कथा आहेत. त्या कथांप्रमाणें प्रत्येक देवतेवर विशिष्ट गुण व कार्य यांचा आरोप केला जातो. या गुणकार्यानुरूप देवतेचें रूप, आयुधें, वाहन, इत्यादींत, आसन, मुद्रा, स्थान, आयुधधारणपद्धति, वाहनदर्शनप्रकार, इत्यादींच्या बाबत बदल होत असतो. या सर्वांना

कांहींना कांहीं कालानुपूर्वी असते. म्हणून देवतेचें विशिष्ट रूप, आयुधें व तीं धारण करण्याच्या पद्धति, वाहनें व त्यांचा आविष्कार, आसनमुद्रादि, या सर्वांवरून मूर्तींच्या कालाचा अंदाजी बोध होऊं शकतो. त्यांतहि सामान्यतः कोणतीहि मूर्ति उत्तरेंत प्रथम आणि दक्षिणेंत नंतर प्रचारांत आली आहे. उलट क्रमानें प्रचारांत आलेल्या मूर्ति अगदीं थोड्या आहेत. उदाहरणार्थ, विष्णु ही देवता पुष्कळ प्राचीन म्हणजे वैदिक आहे. पण तिचे रामकृष्णादि अवतार किंवा तिचे केशवादि चोवीस प्रकार, अगर तिचें कमल हें आयुध व इतर आयुधें धारण करण्याच्या पद्धति, आयुधांचीं रूपें यांच्या घडणीचा काल सांगणें शक्य आहे. सरस्वतीचें वाहन मूलतः हंस असतांना अलीकडे चुकीच्या समजुतीनें मोर झालें आहे.

कालाप्रमाणें शिल्पपंथास स्थलाची किंवा प्रदेशाची मर्यादा पडते. कोणताहि पंथ घेतला तरी तो कोठल्या प्रदेशांत सुरू झाला, कोठवर पसरला व त्याचें मरण कुठून सुरू झालें हें अभ्यासानें सांगणें शक्य असतें. ही क्षेत्रमर्यादा ठरविण्यासाठीं प्रथम त्या शिल्पपंथाचीं लक्षणें स्पष्ट व्हावीं लागतात. तीं लक्षणें जेवढ्या मोठ्या सलग प्रदेशांतील शिल्पांत सांपडतील तेवढा प्रदेश त्या शिल्पाची वास्तव्यभूमि होय. मूर्तिशिल्पें उचलून नेतां येत असल्यानें तीं वास्तव्यभूमीशीं असंबद्ध अशा प्रदेशांतहि सांपडणें शक्य आहे, नव्हे सांपडतात. पण असंबद्ध स्थानीं सांपडलेल्या अशा शिल्पांवरून त्यांच्या शिल्पपंथाच्या क्षेत्राची मर्यादा नीट समजूं शकणार नाहीं. त्यासाठीं सलग प्रदेश हेंच महत्त्वाचें गमक आहे. फुटकळ प्रदेशावरून विशिष्ट शिल्प-पंथाचा प्रभाव कुठवर पडला येवढेंच फार तर समजून येईल.

कोणताहि शिल्पपंथ घेतला तरी त्याचीं आंगिक लक्षणें हींच त्याच्या अभ्यासाचा गाभा होत. पैकीं पहिला मुद्दा त्यांतील शिल्पें कोणत्या वस्तूपासून बनविलीं हा होय. शिल्पें अनेक पदार्थांचीं करीत असले तरी विशिष्ट पंथांत विशिष्ट पदार्थास महत्वाचें स्थान असतें. उदाहरणार्थ, गांधार शिल्पें सुधालिप्त कंजूर दगड किंवा स्लेट दगड यांचींच मुख्यतः बनविलीं आहेत. तर मथुरा शिल्पासाठीं पांढऱ्या ठिपक्यांचा तांबडा कुरुंद वापरलेला आढळतो. महा-राष्ट्रांतील शिल्पें मुख्यतः काळ्या दगडाचीं आहेत. मूर्ति धातू, रत्नें, पोवळीं इत्यादींच्याहि बनवीत असले तरी त्यांचा वापर दगडाच्या मानानें फारच

कमी असतो. शिल्पासाठीं वापरलेला पदार्थ तें शिल्प ज्या पंथांतील आहे तो पंथ ज्या प्रदेशांत फोफावला तेथें विपुल प्रमाणांत सांपडत असला पाहिजे. अबूवर विस्तृत संगमरवरी जैन मंदिरें झालीं याचें कारण त्या पहाडांत तो दगड विपुल आहे हेंच होय.

असें असलें तरी विलग प्रदेशांत तदन्यदेशीय शिल्पपंथाच्या मूर्ति मिळण्याचीं दोन प्रमुख कारणें संभवतात. शिल्पाचें स्थलांतर हें एक कारण असून कारागीराचें स्थलांतर दुसरें कारण आहे. काम करतां करतां आलेला अनुभव व बनलेल्या समजुती यांवर आधारलेले कांहीं ग्रह बरोबर घेऊन कारागीर स्थलांतर करतो. तो स्वदेशाहून निराळ्या देशांत गेला तर केवळ नाइलाजानें नवीन प्रदेशांतील पदार्थांचा उपयोग करील. पण ज्या पदार्थावर त्याचा हात अनेक वर्षांच्या संवयीनें बसला असेल त्या पदार्थावर काम करणेंच त्याला आवडतें व सुलभ जातें. म्हणून कारागीर स्थलांतर केल्यावरही संवयीचा कच्चा माल वापरण्याचा प्रयत्न करतो.

दुसरा मुद्दा शिल्पपंथांत कोणत्या मुख्य व पोट धर्मांतील कल्पनांचा आविष्कार झाला आहे हा होय. गांधार पंथांत प्रायः बौद्धधर्मीय कल्पनाच व्यक्त झाल्या आहेत. महाराष्ट्रांतील शिल्पांत मुख्यतः वैदिक व जैन धर्मी कल्पनांसच स्थान आहे. पूर्वभारती शिल्पांत बौद्ध, जैन व वैदिक अशा तिन्ही धर्मांतील कल्पनांचा समावेश आहे.

तिसरा मुद्दा शिल्पें कोणाचीं असतात हा आहे. हीं विशिष्ट धर्मांतील केवळ देवता किंवा त्यांतील महापुरुष, देवतांतील महापुरुषांशीं संबद्ध कथांतील प्रसंग, त्यांना अनुरूप अशा पार्श्वभूमि यांचीं असतात. यांत धर्मपरत्वें कांहीं विशिष्ट मूर्ति, आयुधें, लांछनें, शुभ चिन्हें, आकृति यांचा प्रवेश झालेला असतो.

विशिष्ट पंथाचीं आंगिक लक्षणें समजण्यासाठीं त्यांतील व्यक्ति, त्यांचे भाऊबंद व नातलग, शिष्यवृंद व भक्तगण, चाकर व परिवार, मित्र व शत्रु यांचे चेहरे व आंगलटी, त्यांची मुखचर्या व त्यांचे हावभाव, त्यांचीं आयुधें व वाहनें, त्यांच्या पायांचीं आसनें व हातांच्या मुद्रा, या सर्वांकडून व्यक्त होणाऱ्या कृति व कल्पना, कथा व समजुती, परंपरा व नावीन्यें यांत एकतानता आहे कीं विसंवाद आहे हें पहावें लागतें. विसंवाद असल्यास

तो उत्पन्न होण्याचीं कारणें शोधावीं लागतात. कारणांच्या शोधांत कल्पना व प्रत्यक्षता यांची आनुपूर्वी, आत्मीयता व परकीपणा यांतील भेद, कथा, परंपरा, समजुती, कल्पना, आचार, इत्यादींत होत असलेले बदल यांची नीट कल्पना येऊन एखाद्या पंथाचीं नित्य व नैमित्तिक लक्षणें कोणतीं याचा निश्चय होतो.

शिल्प कोणत्या धर्माचें आहे हें समजणें त्याच्या सम्यक् ज्ञानाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. उत्तरेंत कोणत्याहि प्राचीन स्थानीं सामान्यतः वैदिक, जैन व बौद्ध अशा तिन्ही धर्मांच्या मूर्ती सांपडतात; तर दक्षिणेंत प्रायः वैदिक व जैन अशा दोनच धर्मांच्या मूर्ति मिळतात. सर्वांत प्रथम कोणत्या धर्मांत मूर्ती तयार झाल्या हें सांगणें फार कठीण आहे. कदाचित् प्रथम जैन, नंतर बौद्ध व शेवटीं वैदिक धर्म असा क्रम लावावा लागेल. तो क्रम कसाही असला तरी वैदिक मूर्तींची भिन्नता प्राचीन कालींहि चटकन् ध्यानांत येई. पण जैन व बौद्ध धर्मांत निराळी परिस्थिति होती. त्यांतूनही उभ्या मूर्तींचा निराळेपणा सहज उमगे; पण बैठ्या मूर्तींविषयीं तसें नाहीं. विशेषतः ध्यानी बुद्ध व ध्यानी तीर्थंकर यांच्या मूर्ती इतक्या एकरूप असतात कीं, तीर्थंकर आहे कीं बुद्ध आहे हें समजणें कित्येक प्रसंगीं अगदीं अशक्य होऊन जातें. दोघांनींहि परिग्रहाचा त्याग केलेला असल्यानें दोघेही बव्हंशीं वस्त्ररहित असतात. उत्तरीय तर नसतेंच. अधरीय आहे कीं नाहीं हें मेखलेवरूनच समजूं शकतें. पण तीही खोदली नसली तर मूर्ति नग्न आहे कीं नाहीं हें समजणें प्रायः अशक्य होतें. मेखला असली तर तीवरून मूर्ति दिगंबर पंथाची नाहीं येवढेंच सिद्ध होईल. पण मग ती श्वेतांबरी असेल किंवा बुद्धाचीहि असूं शकेल. दोघांच्याही डोक्यांवर कुरळे केस किंवा आंखूड केसांच्या वर्तुळाकार बटा, कपाळावर ऊर्णा (भिवयांमधील भोवरेदार केशतिलक) व छातीवर श्रीवत्स (एक आकृति) काढीत असल्यानें मूर्ति जिनाची कीं बुद्धाची हें नीट ओळखतां येत नाहीं. अशा वेळीं लांछन पहावें लागतें. हें मूर्तींच्या बैठकीवर किंवा डोक्यावर अंतराळीं दाखविलेलें असतें. उदाहरणार्थ, सुपार्श्व किंवा पार्श्व यांचें लांछन म्हणजे यांच्या डोक्यांवर अनुक्रमें पांच व सात फण्यांच्या नागाचें छत्र दाखवितात; तर इतर तीर्थंकरांचीं लांछनें त्यांच्या बैठकीवर खोदतात. पण हीं लांछनें अतिप्राचीन मूर्ति

घडविल्या गेल्या तेव्हां अस्तित्वांत नव्हतीं आणि तीं क्रमानें अस्तित्वांत आलीं तेव्हां तीं एका विशिष्ट तीर्थंकराचीं म्हणून ठरलेलीं नव्हतीं. यामुळें अतिप्राचीन मूर्तींच्या बाबतींत ती जैन कीं बौद्ध हें ठरविणें कठीण जातेंच; पण मूर्ति तीर्थंकराची आहे असें ठरलें तरी कोणत्या तीर्थंकराची हा प्रश्न शिल्लक राहतोच. कारण लांछनाचा अभाव तरी असतो किंवा लांछनाचा नियम तरी नसतो. लांछन उपयोगी पडत नसल्यानें यक्ष, यक्षी अथवा शासनदेवता आहेत कीं नाहींत हें पहावें तर लांछनाप्रमाणें त्यांचीही कल्पना फार पूर्वी अस्तित्वांत नव्हती. आणि त्यांची कल्पना व योजना केली गेल्यावरहि प्रत्येक शिल्पांत त्या तीर्थंकराबरोबर दाखविल्या गेल्या आहेतच असें नाहीं. यामुळें प्राचीनतम मूर्तींच्या निश्चयाचें बाबतींत शासनदेवतांची कसोटीही निरुपयोगी ठरते. मूर्तींच्या बैठकीवर, पाठीवर, प्रभावळीवर किंवा अन्यत्र लेख सांपडला तर आपला प्रश्न चटकन् सुटण्यास मदत होते. पण असा लेख नेहमीं असतोच असें नाहीं. आणि असला तरी त्यांत निर्णय करतां येण्यासारखा पुरावा नसला तर काय करावयाचें हा प्रश्न पडतो. अशा वेळीं ज्या ठिकाणीं मूर्ति सांपडली त्याचा परिसर व तें गांव यांची तपासणी करणें आवश्यक ठरतें. परिसरांत केवळ वैदिक, जैन किंवा बौद्ध धर्मांचींच गमकें मिळाल्यास मूर्तिनिर्णयाचा प्रश्न तात्काल सुटतो हें खरें असलें तरी असें सहसा होत नाहीं. महाराष्ट्रांत तरी शेंकडों गांवें व परिसर असे आहेत कीं, तेथें बव्हंशीं वैदिक व जैन आणि क्वचित् बौद्ध अवशेष एकत्र आढळतात. अशा वेळीं विशिष्ट मूर्ति कोणत्या धर्मांतील हें सांगण्यास कठीण जातें. विशेषतः वास्तूविषयीं तर प्रायः निर्णयच करतां येत नाहीं. अतिशय सूक्ष्म अभ्यासकालाही अनेक पुरावे ध्यानांत घेऊन निर्णय द्यावा लागतो.

वैदिक व बौद्ध मूर्तींच्या बाबतींतहि अनेक वेळां असेच घोटाळे होतात. अगदीं प्राचीन काळीं बुद्धाच्या चरित्रांतील चार मुख्य आणि चार गौण असे आठ प्रसंग किंवा बौद्ध जातकांतील एखादा प्रसंग यांचीं शिल्पें खोदीत किंवा चित्रें रंगवीत. पैकीं आठ प्रसंग सहज ध्यानांत राहिल्यानें त्यांच्या चित्रणांवरून धर्म तेव्हांच लक्षांत येतो. पण जातकांतील एखादा प्रसंग खोदल्यास तो प्रसंग बौद्ध आहे कीं जैन आहे कीं वैदिक आहे हें समजणें कठीण जातें. कारण बौद्ध जातकांप्रमाणें जैन जातकें आणि पौराणिक

कथा आहेतच; पण त्याशिवाय वैदिक धर्मीयांच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त कथांचा समुद्रच आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, कित्येक ठिकाणीं चितारलेले किंवा खोदलेले प्रसंग अजून अज्ञात राहिले आहेत. ही झाली चित्रित किंवा खोदलेल्या प्रसंगांविषयीं परिस्थिति. मूर्तीविषयीं परिस्थिति याहून अधिक घोटाळ्याची आहे. प्राचीनतम कालीं कोणत्याच धर्मांत मूर्तींचें प्राबल्य नव्हतें. पण हळूहळू सर्वच धर्मांत मूर्तींना महत्त्व येऊन हजारों मूर्ती अस्तित्वांत आल्या. आणि वैदिक व बौद्ध धर्मीयांत तर त्यांच्या वैविध्याविषयीं जणूं कांहीं अहमहमिकाच लागून राहिल्याचा भास व्हावा एवढीं मोठीं मूर्तिकांडें बनलेलीं आहेत. हें वैविध्य मस्तक, डोळे, हात, पाय इत्यादि अवयवांची संख्या वाढविणें, हातांमध्यें निरनिराळीं आयुधें देणें, पायांचीं तऱ्हतऱ्हेचीं आसनें बनविणें अशा अनेक पद्धतींनीं साधलेलें आहे. या सर्वांचा आमूलाग्र अभ्यास केल्याशिवाय सूक्ष्म भेद समजत नाहींत व मूर्तिनिश्चय होत नाहीं.

दगड, माती, धातू, चुना, लाकूड, रत्नें इत्यादि अनेक पदार्थांच्या मूर्ती करीत असले तरी रत्नांच्या मूर्ती संख्येनें अगदीं थोड्या असून शिवाय लक्षाधीश, राजेरजवाडे अशांकडेच असतात. त्यामुळें सामान्य लोकांस त्या पहावयास मिळण्याचा संभव फारच कमी असतो. मातीच्या मूर्ती एक तर नैमित्तिक अर्थात् तात्पुरत्या किंवा जेथें दगड मिळणें अशक्य अशा प्रदेशांत असतात. महाराष्ट्रांत बैल, नाग, शिराळशेट, गौरी, गणपति वगैरे मातीचेच बनवितात, तरी त्या मूर्ती तात्पुरत्याच असतात. नाळंदास केवळ मातीचीच एक राक्षसी बुद्ध मूर्ति आहे. पण अशा मूर्ती फार काल टिकणें शक्य नसल्यानें संख्येनें थोड्याच झाल्या असतील. मातीच्या विटांकौलांप्रमाणें भाजलेल्या मूर्ती असतात. पण त्या महाराष्ट्रांत फार सांपडत नाहींत आणि उत्तरेंत सांपडल्या तरी मूळांत त्या वैयक्तिक पूजा, खेळ इत्यादि कारणां-साठीं केल्या गेल्यानें सामान्यतः खेळांतील बाहुल्यांहून फारशा मोठ्या नसतात. फक्त ग्वालेर व लखनौ म्यूझियममध्येंच असलीं थोडीं मोठीं शिल्पें आहेत. या प्रकारांत देवदेवतांच्या मूर्ती एकंदरींत कमीच. पोटांत खडे, विटकराचे तुकडे, विटकरी दगड इत्यादि सामुग्री आणि वर चुन्याचा जाड गिलावा किंवा लेप अशा प्रकारें सुबक बनविलेल्या (stucco) शेंकडों

मूर्ती उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. यांचा उपासनेपेक्षां देवळें, गोपुरें, शिखरें, स्तूप, वगैरेंचा दर्शनी भाग सजविण्यासाठींच अधिक उपयोग करतात. सीमा प्रांतांतील कित्येक स्तूप आणि दक्षिणेंतील शेंकडों देवळांचीं शिखरें व गोपुरें याच पद्धतीच्या मूर्ती, नक्षीचें काम, इत्यादींनीं शृंगारिलेलीं आहेत. दगडाचे काळा, संगमरवर, कुरुंद, कथली, पाटी, कन्जूर इत्यादि अनेक प्रकार असून एकेकाचे आणखीहि उपप्रकार आहेत. उदाहरणार्थ, कुरुंदी दगड, तांबडा, पांढरा, खाकी, निळसर, ठिपकी तांबडा अशा अनेक प्रकारचा आहे. सध्या कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियममध्यें असलेल्या व ओडिसा प्रांतांतून आणलेल्या कित्येक मूर्तींचा दगड भुरा पण पिवळे ठिपके असलेला असा आढळला. तर ओडिसांतील दुसऱ्या कित्येक मूर्ती निव्वळ लाल दगडाच्याहि आहेत.

आपल्याकडे मूर्ती मुख्यतः उपासनेसाठीं बनविल्या गेल्या असल्यानें उपासक ज्या हेतूनें उपासनेसाठीं मूर्ति बनवितो त्यावरून मूर्तींचे १ योग, २ भोग, ३ वीर व ४ अभिचारक असे चार प्रकार केले आहेत किंवा १ सात्त्विक, २ राजस व ३ तामस असे तीन प्रकार कल्पितां येतील. केवळ ज्ञान किंवा भक्ति मनांत धरून घडविलेली मूर्ति योगिक म्हणावी. भोगसामर्थ्य कमाविण्याच्या हेतूनें केलेली मूर्ति भोगिक, वीर्यशौर्यवर्धनाच्या हेतूनें उपासनेसाठीं बनविलेली मूर्ति वीरमूर्ति होते आणि जारणमारणादि दुष्ट हेतूनें तयार केलेली मूर्ति अभिचारक समजावी. मूर्तींच्या स्थितिगतिमत्त्वावरून तिचे १ यानक (चालती), २ स्थानक (उभी), ३ आसीन (बैठी) व ४ शयान (निजती) असेहि चार प्रकार होतात; अगर चल, अचल किंवा चलाचल असेही तीन प्रकार संभवतात. पैकीं चलामध्यें नित्यपूजेच्या पण छोट्या, उत्सव व मिरवणुकी यासाठींच असलेल्या, बलिसाठीं नियोजित केलेल्या अगर स्नानविधीसाठीं बनविलेल्या मूर्तींचा समावेश होतो. कायम, एके जागीं बसविलेल्या, मोठ्या, अतएव सहज न हालवितां येणाऱ्या मूर्ती अचल सदरांत पडतात. त्यांस मूलविग्रह अथवा ध्रुवबेरहि म्हणतात. ज्या चल व अचल अशा दोन्ही वर्गांत पडतील त्या चलाचल होत. मूर्तींचा कितवा व कोणता हिस्सा दिसतो त्यावरूनहि त्यांचें वर्गीकरण होतें. जिचा प्रत्येक अवयव सुटा व पूर्ण दिसतो (round)

ती चित्रमूर्ति. जिचे अवयव अर्धवट दिसतात तिला अर्धचित्र म्हणतात (High-low relief). जिचें चित्रण फक्त रेषांनींच दाखविलें जातें ती चित्राभास होय (Two dimensions). मूर्ति पूर्ण असल्यास ती व्यक्त, फक्त ऊर्ध्वांगी असल्यास व्यक्ताव्यक्त आणि शालिग्रामादींनीं प्रतीत होत असल्यास अव्यक्त असेंहि मूर्तींचे प्रकार करतात. दिसावयास भयंकर किंवा दुष्ट हेतुप्राप्तीसाठीं केलेल्या मूर्ती उग्र किंवा रौद्र आणि आल्हाद-दायक किंवा शांतिहेतूस्तव बनविलेल्या त्या सौम्य किंवा शांत असेंहि मूर्तींचे दोन प्रकार होतात. मूर्ति एकटी किंवा शक्तिसहित, असण्यावरून तिचे केवल व शक्तिसहित असे दोन प्रकार करतात आणि शक्तिसहिताचा आलिंगन हा उपप्रकार होतो. परिवारावरून मूर्तींचे उत्तम (सर्वाधिक परिवारी), मध्यम (मध्यम परिवारी), अधम (ईषत् परिवारी) असे तीन प्रकार करतात. मूर्ति कोणत्याहि देवतेची असली तरी हे प्रकार संभवतात.

हातांच्या मुद्रा व पायांचीं आसनें यांनाही मूर्तिनिश्चयांत महत्त्व आहे. ध्यानासन व ध्यानमुद्रा असलेली मूर्ति क्वचित् विष्णूची तर बहुधा तीर्थंकर किंवा बुद्ध यांची असते. त्यांतूनहि एक हात भूमिस्पर्श मुद्रेचा असेल तर ती निश्चयानें बुद्धाचीच ठरते. उभी पण कायोत्सर्ग मुद्रेची मूर्ति प्रायः दिगंबरपंथी जैन तीर्थंकराची असते याविषयीं शंका नाहीं. त्रिविक्रमाचा एक पाय आकाशावर ठेवण्यासाठीं म्हणून इतका उंच नेलेला असतो कीं, तसा त्याचा पाय पाहिला असतां ती मूर्ति त्रिविक्रमाशिवाय इतर कोणाची असूंच शकणार नाहीं ही खात्री बाळगावी. पाय फाकून उलट्या सुलट्या पवित्र्यांत उभ्या असलेल्या मूर्ती बहुधा बौद्ध वर्गांतील असतात. यबयुम (संगमोत्सुक आलिंगनी) मूर्तींहि बौद्ध वर्गांतच मोडतात. उलट सामान्य आलिंगनी मूर्ति बहुधा शिव, गणपति व विष्णु या वर्गांत पडतात. मारुतीची चपेटदान मुद्रा प्रसिद्ध आहे. पण मारुतीच्या इतर खुणा नसल्यास मूर्ति बहुधा बौद्ध असते.

अलंकार, आयुधें व चिन्हें सामान्यतः सर्व देवदेवतांवर दिसत असलीं तरी अनेकदां केवळ अलंकारांवरूनहि मूर्ति ओळखणें शक्य असतें. उदाहरणार्थ, अहिकुंडलें शिवाच्या तर मकरकुंडलें विष्णूच्या कानांत असतात. उलट नग्न, उभी व अलंकारहीन मूर्ति बहुधा जैन तीर्थंकराची असते. शंकरहि

नग्न असूं शकतो. पण बहुधा बैठी व ऊर्ध्वलिंग मूर्ति लकुलीशाची ठरते. ऊर्णा व उष्णीष हीं शरीरचिन्हें असलेली मूर्ति तीर्थंकर किंवा बुद्ध यांपैकीं कोणाची तरी असते. शंख, चक्र, गदा, पद्म, धारण करणारी मूर्ति विष्णूची असते तर बौद्ध मूर्तींत वज्राचें बाहुल्य आढळतें.

जैन व बौद्ध धर्मीयांनीं आपल्या देवदेवतांचें श्रेष्ठत्व दाखविण्यासाठीं कित्येक वैदिक देवतांना आपल्या देवतांच्या परिवारदेवता, चाकर व वाहनें बनविलेलें आढळतें. पैकीं वाहन बनविलें असल्यास त्या वाहनावर आरूढ होणारी देवता कोणत्या धर्मांतील आहे हें सहज ओळखूं येतें. पण जेव्हां इंद्र, गणेश, इत्यादि देवता परिवारांत सामील केलेल्या असतात तेव्हां त्यांचें गौणत्व चटकन् ध्यानांत येत नाहीं. वैदिक धर्मीयांनीं मात्र असें केलेलें दिसत नाहीं. उलट इतर धर्मीय देवतांचा वैदिकधर्मीय देवतांमध्यें समावेश करतांना त्यांचा योग्य मान राखला आहे. उदाहरणार्थ, बुद्ध व आदिजिन तीर्थंकर ऋषभ यांचा समावेश विष्णूच्या अवतारांत केला आहे.

मूर्तींविषयीं येवढी सामान्य माहिती दिल्यानंतर आतां प्रत्येक धर्मांतील मूर्तींचें थोड्याशा प्रस्तावासह परिगणन करतों.

वैदिकधर्मी मूर्ति

वेदकालांत वैदिक वाङ्मयांत उल्लेखिलेल्या देवता पूजिल्या जात असतील यांत शंका नाहीं. फक्त पूजनाचा प्रकार हल्लींहून प्रायः निराळा असावा. तो काळ संपल्यावर स्मृतिकाळ सुरू झाला. त्या काळांत वैदिक पूजापद्धतीची जागा हळूहळू पुराणोक्त पूजापद्धतीनें घेतली आणि इ. स. च्या आगेंमागें पुराणोक्त पूजापद्धति सार्वत्रिक झाली. तीमध्यें आवाहनादि उपचार उत्पन्न होऊन त्यांसाठीं मूर्तींची आवश्यकता उत्पन्न झाली किंवा मूर्तींमुळें उपचार उत्पन्न झाले. कालक्रमानें वैदिक पूजेच्या पद्धतीबरोबर वैदिक देवतांचाही लोप होत जाऊन त्यांची जागा मुख्यतः स्मार्त व पौराणिक देवतांनीं घेतली व वैदिक देवतांना दुय्यम महत्त्व आलें. तोच काळ आजवर चालू असल्यानें गेल्या दोन हजार वर्षांतील वैदिक मूर्तींकडे पाहिल्यास त्यांत ब्रह्मा, विष्णु, शिव, गणेश, स्कंद, सूर्य, महिषमर्दिनी, या देवतांच्या उपासकावलंबी व अवतारनिमित्त रूपांस महत्त्व आलेलें दिसतें. इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, कुबेर, ईशान या वैदिक देवतांस दुय्यम म्हणजे अष्टदिक्पालांचें स्थान

मिळालें. तशाच ब्राह्मयादि नवीन स्त्रीदेवता उत्पन्न होऊन त्यांसही दुय्यम देवतांचा दर्जा प्राप्त झाला. येवढेंच नव्हे तर जैन व बौद्ध देवतांपैकीं ऋषभ व बुद्ध यांस प्रथम श्रेणींत जागा मिळून इतर कित्येक देवतांस दुसरा वर्ग मिळाला. वैदिक मूर्तिकांडांत देवतेचें रूप कोणतेंही असलें तरी तिचें वाहन सहसा बदलत नसल्यानें तीस ओळखणें कठीण जात नाहीं. उदाहरणार्थ, शंकराचें कोणतेंही रूप घेतलें तरी बैलाच्या सांनिध्यावरून त्याचा मुख्य वर्ग तात्काळ समजतो. तो चंद्रशेखर आहे कीं महेश्वर आहे किंवा अंधकासुरमर्दन आहे, हें समजावून घेणें अधिक अभ्यासाचें व तपशीलांत शिरावयाचें काम आहे. गरुडामुळें विष्णूची ओळख चटकन् पटते: तो लक्ष्मीकेशव आहे कीं विठ्ठल आहे ही अधिक तपशीलाची बाब आहे. तीसाठीं खास वैदिकधर्मी मूर्तीविषयीं पुस्तकें पाहिलीं पाहिजेत. येथें प्रत्येक मूर्तीचें असें तपशीलवार वर्णन देण्यास अवकाश नसल्यानें फक्त त्यांचें, वैविध्य व वाहनभेद यांसह, परिगणन करितों. कित्येकांचीं नावेंच त्या मूर्तीचीं रूपें कशीं आहेत हें दाखवितात. उदाहरणार्थ, महिषमर्दिनी, गंगाधर, अर्धनारीश्वर, लक्ष्मीनारायण, हयग्रीव इत्यादि. कंसांत मुख्यतः वाहन दिलें आहे.

१ ब्रह्मा (हंस) : (आयुधभेदानें) १ ब्रह्मा, २ पितामह, ३ कमलासन, ४ विश्वकर्मा. **२ विष्णु** (गरूड) : १ केशवादि चतुर्विंशति, २ अवतार, ३ संकीर्ण. १ **केशवादि** (शंखादि आयुधधारणभेदानें) २४ : १ केशव, २ नारायण, ३ माधव, ४ गोविंद, ५ विष्णु, ६ मधुसूदन, ७ त्रिविक्रम, ८ वामन, ९ श्रीधर, १० हृषीकेश, ११ पद्मनाभ, १२ दामोदर, १३ वासुदेव, १४ संकर्षण, १५ प्रद्युम्न, १६ अनिरुद्ध, १७ पुरुषोत्तम, १८ अधोक्षज, १९ नारसिंह, २० अच्युत, २१ उपेंद्र, २२ जनार्दन, २३ हरि, २४ कृष्ण. २ **अवतार** : १ ऋषभ, २ कपिल, ३ कल्कि, ४ कुमार, ५ कूर्म, ६ कृष्ण, ७ त्रिविक्रम, ८ दत्तात्रय, ९ धन्वंतरी, १० नर-नारायण, ११ नरसिंह, १२ नारद, १३ परशुराम, १४ पृथु, १५ बलराम, १६ बुद्ध, १७ मत्स्य, १८ मोहिनी, १९ यज्ञ-सुयज्ञ, २० राम (मारुति), २१ वरदराज, २२ वराह, २३ वामन, २४ विठ्ठल, २५ व्यंकटेश, २६ व्यास, २७ हयग्रीव, २८ हंस. ३ **संकीर्ण** : १–४ चतुर्मुख (१ अनंत, २ त्रैलोक्यमोहन, ३ विश्वरूप, ४ वैकुंठ), ५ जलशायी (शेषशायी), ६ धर्म, ७ योगीश्वर, ८ लक्ष्मीकेशवादि,

९-१३ वासुदेवपंचक (१ वासुदेव, २ संकर्षण, ३ प्रद्युम्न, ४ अनिरुद्ध, ५ सांब), १४ श्रीनिवास, १५ साधारण (विशेषनामरहित) २, ४, ६, ८, हातांच्या. **३ शिव** : १ लिंग, २ विशेष मूर्ति, ३ सामान्य मूर्ति. **१ लिंग** : १ स्वयंभू, २ कृत्रिम (१ एक, २ अष्टोतरशत, ३ सहस्र, ४ धारा किंवा नलिका, ५ एकमुख, ६ द्विमुख, ७ त्रिमुख, ८ चतुर्मुख, ९ पंचमुख, १० एककाय, ११ द्विकाय, १२ त्रिकाय, १३ चतुष्काय, १४ अष्टकाय), ३ लिंगोद्भव. **२ विशेष मूर्ति** : १-३ अनुग्रह (१ अर्जुनानुग्रह, २ रावणानुग्रह, ३ विष्णवनुग्रह), ४ अन्धकासुरमर्दन, ५ अर्धनारीश्वर, ६ उमामहेश्वर, ७ कंकाल, ८ कल्याणसुंदर, ९ गंगाधर, १० गजासुरमर्दन, ११ चंद्रशेखर, १२ त्रिपुरांतक, १३-१६ दक्षिणामूर्ति (१ वीणाधर, २ योग, ३ ज्ञान, ४ व्याख्यान), १७ नटराज, १८-२२ पंचब्रह्म (१ तत्पुरुष, २ अघोर, ३ सद्योजात, ४ वामदेव, ५ ईशान), २३ भिक्षाटन, २४-३७ भैरव [(कुत्रा-विंचू) : १ चंड, २ बटुक, ३ सामान्य, ४ स्वच्छंद, ५ स्वर्णाकर्षण, ६ क्षेत्रपाल, ७ असितांगादि ८, ८ रुर्वादि ८, ९ चंडादि ८, १० क्रोधादि ८, ११ उन्मत्तादि ८, १२ कापालादि ८, १३ भीषणादि ८, १४ संहारादि ८)], ३८ महाकाल ३९ महासदाशिव, ४० महेश्वर, ४१ रुद्र (७,८,११,१२), ४२ लकुलीश, ४३ वीरभद्र, ४४ वृषवाहन, ४५ शरभ, ४६ सदाशिव, ४७ हरिहर. **४ सूर्य व ८ ग्रह** : १-१२ **रवि** [(१,२,४,७ अश्व-तद्युक्त एकचक्र रथ, सार्धे किंवा रक्त कमल, पर्जन्य) : १ धाता, २ मित्र, ३ अर्यमन्, ४ रुद्र-इंद्र, ५ वरुण, ६ सूर्य-अंश, ७ भग, ८ विवस्वान्, ९ पूषन्, १० सवितृ, ११ त्वष्टा, १२ विष्णु]; १३ **सोम** (श्वेत अश्व, दशश्वेताश्व दुचाकी रथ, सिंह); १४ **मंगळ** (बकरा, अष्टाश्वसुवर्णरथ, अष्टमेषरथ); १५ **बुध** (सिंह, सर्प, अष्टाश्वसुवर्णरथ, चतुःसिंहरथ); १६ **गुरु** (हंस, अष्टाश्वसुवर्णरथ, अष्टाश्वरथ); १७ **शुक्र** (भेक = बेडूक, दशाश्वरौप्यरथ, अष्टश्वेताश्वरथ); १८ **शनि** (गिधाड, रेडा, अष्टाश्वलोहरथ, निळ्या आठ गिधाडांचा रथ); १९ **राहु** (सिंह, कुंड, अष्टाश्वरौप्यरथ, नील सिंह, तद्युक्त रथ); २० **केतु** (गिधाड, दशाश्वरथ, पारवा, तद्युक्त रथ). **५ स्कंद** (कोंबडा-मोर) : १ शक्तिधर, २ स्कंद, ३ सेनापति, ४ सुब्रह्मण्य, ५ गजवाहन (गज), ६ शरवणभव (सिंह), ७ कार्त्तिकेय, ८ कुमार, ९ षण्मुख, १० तारकारि (गज), ११ सेनानी,

१२ ब्रह्मशास्ता, १३ वल्लीकल्याणसुंदर, १४ बालस्वामी, १५ क्रौंचभेत्ता, १६ शिखिवाहन (इंद्रनीलरथ), किंवा १, ३–५, १२–१४ या साता-ऐवजीं ज्ञानशक्ति, अग्निजात, सौरभेय, गांगेय (मकर), गुह, ब्रह्मचारी, देशिक, वेलायुध हे आठ. ६ **गणेश** (उंदीर) : १ उच्छिष्ट, २ उद्दंड, ३ उन्मत्त, ४ ऊर्ध्व, ५ ऋणमोचक, ६ एकदंत, ७ एकाक्षर, ८ क्षिप्र, ९ क्षिप्र-प्रसाद, १० गजानन, ११ ढुंढि, १२ तरुण, १३ त्रिमुख, १४ त्र्यक्षर, १५ दुर्गा, १६ द्विज (ध्वज ?), १७ ध्वज–नृत्त, १८ पिंगल (सिद्ध), १९ प्रसन्न, २० बाल, २१ बीज (एकाक्षर ?–क्षिप्रप्रसाद ?), २२ भक्त, २३ भुवनेश (विघ्न ?), २४ महा, २५ योग, २६ लक्ष्मी, २७ वक्रतुंड, २८ वर, २९ विघ्न (विजय ?), ३० विजय, ३१ वीर, ३२ शक्ति, ३३ संकष्टहर, ३४ सिद्ध, ३५ सिंह, ३६ सृष्टि, ३७ हरिद्रा, ३८ हेरंब (सिंह). ७ **जोडदेव** : १ कृष्णकार्तिकेय, २ चंद्रार्कपितामह, ३ त्रिमूर्ति (ब्रह्मेशानजनार्दन), ४ ब्रह्मेशानजनार्दनार्क (कमळ). ८ **देवी** : १ **दुर्गा** : **विशेष** : [**नवदुर्गा** (महिष) : १ रुद्रचंडा, २ प्रचंडा, ३ चंडोग्रा, ४ चंड–नायिका, ५ चंडा, ६ चंडवती, ७ चंडरूपा, ८ अतिचंडिका, ९ उग्रचंडा; किंवा १ महालक्ष्मी–नीलकंठी, २ नंदा, ३ क्षेमंकरी, ४ सर्वती, ५ महारंडा, ६ भ्रमणी, ७ सर्वमंगला, ८ रेवती, ९ हरसिद्धि; किंवा १ महालक्ष्मी–नीलकंठी, २ क्षेमंकरी, ३ हरसिद्धि, ४ रुद्रांशदुर्गा (सिंह), ५ वनदुर्गा, ६ अग्निदुर्गा, ७ जयदुर्गा (सिंह), ८ विंध्यवासिनी, ९ रिपुमारिणी; किंवा १ शैलपुत्री (बैल), २ ब्रह्मचारिणी, ३ चंडखंड दुर्गा (अंडज), ४ स्कंददुर्गा, ५ कूष्मांडदुर्गा, ६ कात्यायनी (सिंह, वाघ), ७ कालरात्री, ८ महागौरी (पांढरा हत्ती), ९ सिद्धिदायिनी. **सामान्य** : [१ अंबिका (सिंह), २ चंडिका (सिंह-कमल-महिषमस्तक), ३ दुर्गा (सिंह), ४ ललिता (महिष-मस्तक), ५ सर्वमंगला (सिंह)]. २ **पार्वती–गौरी** : (सामान्यतः गोधा किंवा) १ अंबा (बैल), २ उमा (घोडा, बैल), ३ कृष्णा (घोडा), ४ गौरी (घोडा, बैल), ५ तोतला (घोडा), ६ त्रिखंडा (घोडा), ७ त्रिपुरा (घोडा), ८ पार्वती (घोडा, बैल), ९ मनोन्मनी, १० रंभा (हत्ती), ११ ललिता (घोडा), १२ शिवा, १३ श्रिया (घोडा), १४ सावित्री (घोडा), १५ हिमवंती (घोडा). ३ **भू** (दिग्गज ?), ४ **महालक्ष्मी** (गरुड, सिंह),

५ **माहिषमर्दिनी** = महालक्ष्मी (सिंह-महिषमस्तक), ६ **लक्ष्मी** (गरूड), ७ **श्री** (कमल), ८ **सरस्वती** (हंस-मोर) : १ महाविद्या, २ महावाणी, ३ भारती, ४ सरस्वती, ५ आर्या, ६ ब्रह्माणी, ७ महाधेनु, ८ वेदगर्भा, ९ ईश्वरी, १० महालक्ष्मी, ११ महाकाली, १२ महासरस्वती. **९ माता** : सामान्यतः १ ब्राह्मी (हंस), २ माहेश्वरी (बैल), ३ कौमारी (मोर), ४ वैष्णवी (गरुड), ५ वाराही (रेडा), ६ इंद्राणी (हत्ती), ७ चामुंडा (प्रेत), या सात; पण विविध ग्रंथमतें एकंदर सुमारें २५०. **१० अष्ट दिक्पाल** : १ इंद्र (हत्ती), २ अग्नि (मेष), ३ यम (रेडा), ४ निर्ऋति (राक्षस), ५ वरुण (मकर), ६ वायु (हरिण), ७ कुबेर (मनुष्य-घोडा-गाढव), ८ ईशान (बैल).

जैन मूर्ति

वैदिक धर्माचे तुलनेनें जैन धर्म जरी बराच अर्वाचीन असला तरी मूर्तीच्या बाबतींत कदाचित् तो सर्वप्राचीन ठरण्याचा संभव आहे. यांत आरंभीं मूर्तिपूजा नव्हती. पण कालांतरानें इतर धर्मांप्रमाणें यांतहि मूर्तिपूजेस महत्त्व आलें. मात्र यांत कित्येक शतकांतील वाढीनंतरहि २४ तीर्थंकर, २४ यक्ष, २४ यक्षी, १६ विद्यादेवता आणि आदिनाथोद्भव बाहुबलि व भरत येवढेंच मूर्तिकांड तयार झालें. त्यांतहि विद्यादेवतांचा प्रायः यक्षींतच समावेश होतो. पण पंथभेदानें विद्यादेवता व यक्षयक्षी यांची संख्या वाढत असल्यानें सामान्यतः यांतील मूर्तींची संख्या फार फार तर सव्वाशेंपर्यंत जाईल येवढेंच. या धर्मांत श्वेतांबर व दिगंबर हे दोन मुख्य पंथ आहेत. श्वेतांबरी मूर्ती सवस्त्र, सालंकार व बहुधा ध्यान किंवा समाधि या मुद्रांच्या व बैठ्या, तर दिगंबर मूर्ति नग्न, अलंकाररहित आणि कायोत्सर्गमुद्रेच्या(दक्ष किंवा हुशार पवित्र्याच्या) उभ्या किंवा उपर्युक्त मुद्रांच्या बैठ्या, अशा दोन्ही प्रकारच्या आढळतात. पंथभेदानें तीर्थंकरांचीं लांछनें आणि यक्षयक्षी व विद्यादेवता यांचीं लक्षणें यांत फरक पडला आहे. पण तो इतका थोडा आहे कीं, त्यामुळें मूर्तिनिश्चयाचे बाबतींत फार अडचण पडत नाहीं. उत्तरेंत श्वेतांबरी व दक्षिणेंत दिगंबरी मताचा विशेष प्रभाव आहे. श्वेतांबरी मूर्ति श्रीमंत दिसतात तर दिगंबरी भव्य असतात.

आतां तीर्थंकर, त्यांचे वर्ण, त्यांचीं लांछनें, वाहनासह त्यांचे यक्ष व त्यांच्या यक्षी, यांचें क्रमानें वर्णन करतों. तीर्थंकराचें नांव जाड खिळ्यानें

दाखविलें असून अर्धविरामापुढील पहिला शब्द यक्ष किंवा यक्षी याचें नांव आहे. दिगंबरमतानें पडणारा प्रत्येक फरक कंसांत नोंदला आहे. विकल्प रेखांशानें व्यक्त केला आहे.

१ **ऋषभ–आदि** : सोनेरी, बैल; गोमुख, बैल (हत्ती); चक्रेश्वरी, गरुड. २ **अजित** : सोनेरी, हत्ती; महायक्ष, हत्ती; अजितबला-अपराजिता (रोहिणी), घोरपड (घडवंची). ३ **संभव** : सोनेरी, घोडा; त्रिमुख, मोर; दुरितारि (प्रज्ञप्ति), रेडा-मयूर ? (हंस-बदक). ४ **अभिनंदन** : सोनेरी, वानर; नायक–ईश्वर (यक्षेश्वर), हत्ती; कालिका (वज्रशृंखला), कमळ (हंस). ५ **सुमति** : तांबडा, क्रौंच (धर्मचक्र ?); तुंबुरु, गरुड; महाकाली (पुरुषदत्ता); कमळ (हत्ती-म्हैस ?). ६ **पद्मप्रभ** : तांबडा, कमल (कमलकलिका); कुसुम, हरिण (बैल); श्यामा (मनोवेगा–गुप्ती), नर-घोडा ? (घोडा). ७ **सुपार्श्व** : सोनेरी, स्वस्तिक (५ फण्यांचा नाग); मातंग (वरनंदि), हत्ती (सिंह); शांता (काली), हत्ती (बैल–कमळ). ८ **चंद्रप्रभ** : शुभ्र, चंद्र; विजय (श्याम–विजय), हंस; भृकुटी (ज्वाला-ज्वालामालिनी), सिंह (बैल-मांजर). ९ **पुष्पदंत–सुविधि** : शुभ्र, मकर (खेकडा); अजित, कासव; सुतारका (महाकाली–अजिता), बैल (?). १० **शीतल** : सोनेरी, श्रीवत्स ? (श्रीवृक्ष–धर्मचक्र); ब्रह्मा (ब्रह्मेश्वर), कमळ (कमलकलिका); अशोका (मानवी), कमळ (?). ११ **श्रेयांस** : सोनेरी, गेंडा (हरिण); यक्ष-यक्षेट (ईश्वर), बैल; मानवी (गौरी), सिंह (बैल–घोरपड). १२ **वासुपूज्य** : तांबडा, रेडा (बैल); कुमार, हंस (मोर); चंडा-प्रचंडा (गांधारी), घोडा (सर्प). १३ **विमल** : सोनेरी, डुक्कर, षण्मुख, मोर (कोंबडा); विदिता (वैरोटी-ख्या), कमळ (सर्प). १४ **अनंत** : सोनेरी, ससाणा (अस्वल); पाताल, मकर (नक्र); अंकुशा–शी (अनंतमती), कमळ (हंस). १५ **धर्म** : सोनेरी, वज्र; किन्नर कासव (मासा); कंदर्पा (मानसी), घोडा (सिंह, हंस). १६ **शांति** : सोनेरी, हरिण (कासव); गरुड (किंपुरुष), डुक्कर (बैल); निर्वाणी (महामानसी), कमळ (मोर–सिंह). १७ **कुंथु** : सोनेरी, बकरा; गंधर्व, हंस (हरिण); बला (जया–विजया), मोर. १८ **अर** : सोनेरी, नंद्यावर्त (हरिण); यक्षेट (केंद्र), शंख (मोर);

धना-धारिणी (अजिता), कमळ (हंस, लोहपीठ). **१९ मल्लि :** निळा, घट; कुबेर, हत्ती; धरणीप्रिया (अपराजिता), कमळ (हंस). **२० मुनिसुव्रत :** काळा, कासव; वरुण, बैल (?); नरदत्ता (बहुरूपिणी), सिंह (सर्प). **२१ नमि :** सोनेरी, नील कमल (अशोक वृक्ष), भृकुटी, तुष ? (बैल); गंधारी-सुगंधारी (चामुंडा-डी), हंस ? (सुसर). **२२ नेमि :** काळा, शंख; गोमेध (सर्वाह्न), नर-घोडा ? (देवालय); अंबिका (कूष्मांडिणी), सिंह. **२३ पार्श्व :** निळा, सर्प-सात फण्यांचा नाग; पार्श्वयक्ष-धरणेंद्र, कासव; पद्मावती (पद्मावती-वैरोटी), कोंबडा (हंस). **२४ महावीर-वर्धमान :** सोनेरी, सिंह; मातंग, हत्ती; सिद्धायिका-सिद्धायिनी, सिंह (हंस). **बाहुबलि-गोम्मट :** नग्न, वेलींवेष्टित.

बौद्ध मूर्ति

बौद्ध धर्मांत प्रथम हीनयान व त्याचा धाकटा भाऊ महायान असे दोन पंथ उत्पन्न झाले. पैकीं हीनयानांत मूर्तिपूजा सामान्यतः नव्हती. हीनयानी स्तूपांची पूजा करीत. प्रथम हे स्तूप अगदीं साधे, लहान किंवा अजस्र लिंगाकार, हर्मिकायुक्त किंवा विरहित असत. हळूहळू त्यांवर, त्यांभोंवतीं असलेल्या वेदिकेवर आणि दरवाजांवर, बुद्धजीवनांतील चार मुख्य व चार गौण व इतर, तसेंच बौद्ध जातकांतील प्रसंग चिन्हांनीं किंवा मूर्ति खोदून दाखवूं लागले. पण पूजा त्यांतील बुद्धदर्शक चिन्हें किंवा आकृति यांचीच होई. पुढेंपुढें बुद्धाला देवत्व आलें आणि महायान पंथ व त्याचे उपपंथ मंत्र-तंत्र-वज्रयान हे उत्पन्न होऊन त्यांत एका बुद्धापासून शेंकडों देव, देवी व त्यांची प्रजा असा देवतासंभार उत्पन्न झाला. यांचा तपशील संक्षेपानें येथें देतों. बुद्धजीवनांत जन्म, ज्ञान, उपदेश व निर्वाण हे चार मुख्य आणि मायास्वप्न, महाभिनिष्क्रमण, मारधर्षण व नाळागिरिदमन हे चार गौण मिळून आठ प्रसंगांना महत्त्व दिलें गेलें. पैकीं चार मुख्य प्रसंगांसाठीं अनुक्रमें उत्फुल्ल कमल, बोधिवृक्ष, धर्मचक्र व पादुका आणि चार गौण प्रसंगांसाठीं हत्ती, घोडा, इत्यादि चिन्हें दाखवीत असत. मात्र प्रत्यक्ष बुद्ध मूर्ति दाखविली नाहीं तरी बुद्धाच्या पूर्व व प्रस्तुत जन्मांतील गोष्टी शिल्परूपानें चित्रित करीत. अशीं शिल्पें मुख्यतः बारहट व सांची येथील स्तूपांच्या वेदिका व दरवाजे यांवर आढळतात. पुढें प्रथम गांधार

शिल्पपंथांत बुद्धमूर्ति तयार झाली आणि मथुरा शिल्पपंथांत तिचें अनुकरण झालें. महायान पंथांत बुद्धास देवत्व येऊन त्यास वज्रधर किंवा आदि बुद्ध म्हणूं लागले. त्यापासून प्रत्येकीं सहा दिव्य किंवा ध्यानी आणि सात मानुषी बुद्ध, त्यांच्या बुद्धशक्ति व दोघांचीं मुलें बोधिसत्त्व निर्माण झाल्याचें दाखविलें आहे. फक्त मानुषी बुद्ध आठ समजले जातात. नंतर अमिताभ, अक्षोभ्य अथवा पहिले पांच ध्यानी बुद्ध यांपासून झालेले किंवा स्वतंत्र चौदा मन्जुश्री नांवाचे देव कल्पिले गेले. तद्वत् अमिताभ हा दिव्य बुद्ध व पांडरा ही बुद्धशक्ति यांपासून पंधरा अवलोकितेश्वर झाल्याचें मानलें. प्रत्येक दिव्य बुद्ध आणि त्यांपैकीं चार किवा पांच यांचा समूह यांपासूनहि कांहीं देवदेवी उत्पन्न झाल्याची कल्पना केली गेली. याशिवाय ज्यांचा उपर्युक्त कोणत्याहि देवदेवतेशीं संबंध नाहीं अशाहि कांहीं देवता आहेत. अशा तऱ्हेनें हें मूर्तिकांड बरेंच विस्तृत झालें आहे. या प्रत्येक देवतेस तिची ओळख पटण्याजोगीं वाहन, आयुधें, मुख, हात, पाय, मुद्रा, इत्यादि साधनें तर आहेतच; पण प्रत्येक देवता कोणत्या बुद्धापासून झाली हें समजण्यासाठीं देवतेच्या मुकुटावर तदुत्पादक बुद्धमूर्ति बहुधा दाखविलेली असते. येवढ्यावरूनहि या कांडांतील मूर्ति चटकन् ओळखूं येतील असें नाहीं. पण मूर्ति वैदिक किंवा जैन नाहीं येवढें समजलें तर राहिलेली मूर्ति बौद्ध आहे हें तेव्हांच ताडतां येईल. बुद्ध, बुद्धशक्ति, बोधिसत्व, लोकेश्वर, अवलोकितेश्वर, मंजुश्री किंवा मञ्जु, तारा व वज्र हीं पदें असलेलीं नावें यांवरून ही मूर्ति बौद्ध आहे हें तात्काल समजतें. शिल्पांत शक्तिसह किंवा विरहित ब्रह्मा, विष्णु, शिव, गणेश, इंद्र इत्यादींपैकीं एखाद्या वैदिक देवतेस सेवक किंवा वाहन किंवा मर्द्य व्यक्ति बनविलें असल्यास तें शिल्प बहुधा बौद्ध किंवा क्वचित् जैन असतें. शिवाय बौद्ध देवतामूर्तींत मुख, चक्षु, पाणि व पाद यांचें निसर्गापेक्षां बहुधा आधिक्य आढळून येतें. कित्येक बौद्धशिल्पांत देव व त्याची शक्ति यांचें संगमोत्सुक आलिंगनहि दाखवितात. त्यास यबयुम संज्ञा आहे.

बौद्ध मूर्तिकांडाची येवढी सर्वसाधारण माहिती दिल्यावर आतां त्यांतील देवताप्रकरण येथें देतों. अगोदर महाराष्ट्रांत बौद्ध मूर्ती कमी; त्यांतून आहेत त्या बहुधा बुद्ध किंवा बोधिसत्व यांचे विविध प्रकार असल्यानें वरील

मूर्तिकांड बारकाईनें समजावून घेण्याची आवश्यकता नाहीं. म्हणून येथें मी मूर्तींचीं वाहनें देण्याचें प्रायः टाळलें आहे.

१ आदि बुद्ध–वज्रधर>६ दिव्य–ध्यानी बुद्ध : १ अमिताभ (२मोर), २ अक्षोभ्य (२ हत्ती), ३ वैरोचन (२ सपक्ष सर्प), ४ अमोघसिद्धि (२ गरुड), ५ रत्नसंभव (२ सिंह), ६ (कधीं कधीं) वज्रसत्व (वज्र, घंटा). **६ दिव्य बुद्धशक्ति :** १ पांडरा, २ लोचना, ३ वज्रधात्वीश्वरी, ४ आर्यतारा, ५ मामकी, ६ वज्रसत्वात्मिका (सर्वांचीं वाहनें त्या त्या दिव्य बुद्धांप्रमाणें). **६ दिव्य बोधिसत्व :** १ सामन्तभद्र, २ वज्रपाणि, ३ रत्न-पाणि, ४ पद्मपाणि, ५ विश्वपाणि, ६ घंटापाणि (अनुक्रमें कमल, वज्र, चक्र, विश्ववज्र, सिंह आणि वज्र-घंटाधारी कमल हीं लांछनें). **८ मानुषी बुद्ध :** १ विपश्यिन्, २ शिखिन्, ३ विश्वभू, ४ क्रकुच्छंद, ५ कनकमुनि, ६ कश्यप, ७ शाक्यसिंह–गौतम बुद्ध, ८ मैत्रेय (यांतील फरक ओळखण्यास रंग व सामूहिक अस्तित्व यांशिवाय इतर साधन नाहीं; गौतमबुद्धाच्या मूर्ति सर्व-प्रसिद्ध आहेत). **७ मानुषी बुद्धशक्ति :** १ विपश्यंती, २ शिखिमालिनी, ३ विश्वधारा, ४ ककुद्वती, ५ कंठमालिनी, ६ महीधरा, ७ यशोधरा. **७ मानुषी बोधिसत्त्व :** १ महामति, २ रत्नधर, ३ आकाशगंज, ४ शक-मंगल, ५ कनकराज, ६ धर्मधर, ७ आनंद (मानुषी बुद्धशक्ति व बोधिसत्व यांच्या प्रतिकृति आढळत नाहींत). **१४ मंजुश्री :** अमिताभ> १ वाक्, २ धर्मधातुवागीश्वर; अक्षोभ्य> ३ मंजुघोष, ४ सिद्धैकवीर, ५ वज्रानंग, ६ नामसंगीति; पंच ध्यानी बुद्ध> ७ वागीश्वर, ८ मंजुवर, ९ मंजुवज्र, १० मंजुकुमार; आणि स्वतंत्र ११ अरपचन, १२ स्थिरचक्र, १३ वादिराट्, १४ मंजुनाथ. **१५ लोकेश्वर** अथवा **अवलोकितेश्वर :** अमिताभ व पांडरा> १ षडक्षरी, २ सिंहनाद, ३ खसर्पण, ४ लोकनाथ, ५ हालाहल, ६ तीन प्रकारचे पद्मनर्तेश्वर, ७ हरिहरिवाहनोद्भव, ८ त्रैलोक्यवशंकर, ९ दोन प्रकारचे रक्त लोकेश्वर, १० मायाजालक्रम, ११ नीलकंठ, १२ सुगतिसंदर्शन, १३ प्रेतसंतर्पित, १४ सुखावती, १५ वज्रधर्म. **देवदेवी : अमिताभ>** महाबल व सप्तशतिक हयग्रीव हे देव + (शुक्ल, तारोद्भव, ओड्डियान व अष्टभुज) कुरुकुल्ला, भृकुटी व महासितवती ह्या देवी. **अक्षोभ्य>** चंडरोषण, (त्रिविध) हेरुक, बुद्धकपाल, (संवर, सप्ताक्षर व महामाया हे)

वज्रडाक, हयग्रीव, (रक्त व ३ कृष्ण असा द्विविध) यमारि, यबयुम व उच्छुष्म असे दोन जंभल हे देव + महाचीन तारा, त्रिविध जांगुली, विद्यु-ज्ज्वालाकराली व आणखी तीन प्रकार मिळून चतुर्विध एकजटा, पर्णशबरी, (सित व पीत अशी द्विविध)प्रज्ञापारमिता, वज्रचर्चिका, महामंत्रा-नुसारिणी, महाप्रत्यंगिरा, (द्विविध)ध्वजाग्रकेयूरा, वसुधारा, नैरात्मा ह्या देवी. **वैरोचन**> (अशोककांता, आर्य, पिचुआ–अष्टभुजपीत–संक्षिप्त, उभयवराहानन, दशभुजसित, वज्रधात्वीश्वरी अशी षड्विध) मारीची, उष्णीषविजया, सितातपत्रा अपराजिता, महासहस्रप्रमर्दिनी, (आर्य व आणखी दोन मिळून त्रिविध) वज्रवाराही या देवी. **अमोघसिद्धि**> (खदिरवनी, वश्य, षड्भुजसित, धनद अशी चतुर्विध) तारा, (पिशाची–सर्वमारिप्रशमनी) पर्णशबरी, महामायूरी, वज्रशृंखला या देवी. **रत्नसंभव**> सामान्य व उच्छुष्म, जंभल हे देव + द्विविध महाप्रतिसरा व वसुधारा या देवी. **पंच ध्यानी बुद्ध**> जंभल व महाकाल हे देव + वज्रतारा, प्रज्ञापारमिता, मायाजालक्रम कुरुकुल्ला व सिततारा ह्या देवी. **रत्नसंभवविरहित चार ध्यानी बुद्ध**> वज्रतारा देवी. **वज्रसत्व**> जंभल व चुंडा देवदेवी. **पंचरक्षा-मंडलांत** महाप्रतिसरा, महासहस्रप्रमर्दिनी, महामायूरी, महामंत्रानुसारिणी व महासितवती ह्या देवी. **सामान्य तारां**मध्यें (खदिरवनी, वश्य, आर्य, महत्तरी व वरद अशा पांच) हरित् आणि (अष्टमहाभय व मृत्युवंचन अशा दोन शुभ्र) तारा; तसेंच **विशेष तारां**मध्यें (दुर्गोत्तारिणी, धनद, जांगुली, पर्णशबरी अशा चार) हरित्, (चतुर्भुजा, षड्भुजा, विश्वमाता, कुरुकुल्ला व जांगुली अशा पांच) शुभ्र, (वज्र, जांगुली, पर्णशबरी, भृकुटी व प्रसन्न अशा पांच) पीत, (एकजटा व महाचीन अशा दोन) नील आणि (कुरुकुल्ला ही) रक्त तारा. शिवाय **स्वतंत्र देव** : गणपति, विघ्नांतक, वज्रहुंकार, भूतडामर, वज्रज्वालानलार्क, त्रैलोक्यविजय, परमाश्व व नामसंगीति. **स्वतंत्र देवी** : (महा, वज्रवीणा, वज्रशारदा, आर्या व वज्र अशा पांच) सरस्वती, अपराजिता, वज्रगांधारी, वज्रयोगिनी, ग्रहमातृका, गणपतिहृदया, वज्रविदारिणी. याखेरीज **१०८ लोकेश्वर.**

---

८. वंशावळी

प्रस्ताव

कागदपत्र, बखरी, ताम्रपट-शिलालेख, नाणीं इत्यादि साधनांचा अभ्यास करीत असतांना इतर अनेक प्रकारच्या माहितीप्रमाणें अत्यंत प्रामाणिक वंशावळी जवळ असणें जरूर आहे. अशा वंशावळींमुळें कर्त्या पुरुषांचीं एकमेकांशीं असलेलीं नातीं व त्या नात्यांचे त्यांच्या हालचाली व धोरणें यांवर होणारे परिणाम याविषयीं नीट कल्पना येऊं शकते. राज्याविषयींचे अधिकार व तत्संबंधीं प्रयत्नांतील न्यायीपणा दोन्ही चांगले उमगतात. मुत्सद्यांमधील परस्परांविषयीं मत्सर, स्पर्धा वगैरेवरही उत्तम प्रकाश पडतो. येवढेंच नव्हे तर कालनिश्चिति करण्यासही फार उपयोग होतो. म्हणून या ठिकाणीं आवश्यक वंशावळी दिल्या आहेत.

सामान्यतः ज्या घराण्यांचीं नाणीं महाराष्ट्रांतही सांपडतात, किंवा ज्या घराण्यांतील व्यक्तींचा महाराष्ट्र व भारत यांच्या प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन व आधुनिक इतिहासांत वारंवार निर्देश येतो, अगर महाराष्ट्रांतील ज्या घराण्यांचे महाराष्ट्राजवळच्या घराण्यांशीं संबंध आले अथवा ज्या घराण्यांच्या वंशावळींसाठीं अनेक पुस्तकें पहावीं लागतात व तीं पाहूनही मेळ घालतां न आल्यामुळें गोंधळ उडतो अशा वंशावळींची निवड येथें करण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ मराठेशाहीच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांस येथें दिलेल्या कित्येक वंशावळींची जरूर लागणार नाहीं हें जसें खरें, तद्वत् प्राचीन इतिहासाच्या अभ्यासूंनाही येथील कित्येक वंशावळींची आवश्यकता वाटणार नाहीं हेंही खरें. उलट दोघांनाही आणखी कित्येक वंशावळींची येथें उणीव भासत राहणार हेंहि खोटें नाहीं. परंतु अशा सर्व वंशावळी येथें देतों तर प्रायः या पुस्तकाचीं सर्व पानें वंशावळींसाठींच खर्चीं घालावीं लागतीं आणि इतकें करूनही वंशावळींची संख्या पुरी झाली नसती. म्हणून येथें निवड करावी लागली. या वंशावळींत मुख्यतः पुरुषव्यक्ति आल्या आहेत; पण कांहीं ठिकाणीं स्त्रिया व मुली आणि सासरे व जावई यांची त्यांच्या कुलांसह नोंद केली आहे. या वंशावळी शक्य तितक्या ताज्या शोधांनीं युक्त अशा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठीं अगदीं अलीकडे तयार

झालेलीं पुस्तकें उपयोगांत आणलीं, तरीही या सुधारण्यास अवकाश आहेच. उ० गुजरात सुलतानांची वंशावळ अगदीं अलीकडच्या पुस्तकांतही तीन प्रकारांनीं दिल्याचें आढळलें. पैकीं एका पुस्तकांत आलेली मीं ग्राह्य धरून पुढें दिली आहे. तेव्हां येथील वंशावळी निःसंशय मतभेदातीत आहेत असें समजूं नये. वंशावळी मांडण्याची उत्कृष्ट रीत म्हणजे मूळ पुरुषापासून सुरवात करून प्रत्येक पिढींतील व्यक्ति एकाच ओळींत दाखविणें, फक्त गादीवर आलेल्यांचे मागें क्रमांक घालणें आणि प्रत्येक व्यक्तीचा राज्यकाल, पदव्या व बायका येवढा तपशील तेथल्या तेथें दाखविणें ही होय. पण अशा पद्धतीनें जेथल्या तेथें खुलासा दिला तर जागा फार अडते. म्हणून सध्या फक्त वंशावळ एकीकडे देऊन राज्यकाल वारसांच्या अनुक्रमानें दुसरीकडे देतात. पण मला येवढेंही करण्याइतका पृष्ठांचा अवकाश नव्हता. म्हणून मीं थोडी निराळी पद्धति अनुसरली आहे. तींत उलगडा होण्यास किंचित् वेळ लागतो किंवा संवय झाली पाहिजे. पण अगदीं थोड्या जागेंत मला पुष्कळ वंशावळी देतां आल्या हा माझ्या पद्धतीचा फायदा आहे.

माझी पद्धत अशी—मीं प्रथम घराण्याचें नांव देऊन पुढें तें ज्या स्थलीं किंवा प्रदेशांत नांदलें त्याचा क्वचित् निर्देश केला आहे. नंतर त्या घराण्यांतील व्यक्तींचा राज्यवारस बनण्याचा क्रम त्यांचे वंशावळींतील क्रमांक देऊन दर्शित केला आहे. जेथें असा क्रम नोंदलेला नाहीं तेथें जन्म व वारसा यांच्या क्रमांत फरक नाहीं किंवा मला तो मिळाला नाहीं अगर तो कळून घेण्याची आवश्यकता नाहीं असें समजावें. पुढें क्रमानें वंशावळींतील एकेका पिढीच्या व्यक्ति, त्यांचीं वैकल्पिक नांवें, पदव्या, बायका अगर नवरे व राज्यकाल यांसह नमूद केल्या आहेत. हें करतांना पुढील चिन्हें व संक्षेप यांचा प्रयोग केला आहे. + एकाच बापाचीं अपत्यें; –विकल्प; × पतिपत्नी नातें; > बापापासून मुलगा किंवा मुलगी; क–कन्या; खू–खून; चु–चुलत; च्यु–पदच्युत; जा–जावई; द–दत्तक; न–नवरा; ब–बहीण; प–पत्नी; भा–भाऊ; मु–मुलगा; ले–लेकवळा–ळी. सामान्यतः राज्यकालारंभ नमूद केला आहे; पण जाड खिळ्यांचे आंकडे मृत्युकाल दाखवितात. नांवापुढें एकच संख्या असेल तर ती इसवी सन व्यक्त करते आणि दुहेरी असेल तर दुसरी संख्या इसवी आणि पहिली संदर्भानुसार विक्रम, शक किंवा हिजरी काल दाखविते.

अयोध्या-नबाब: (१-८,१०,९,११,१३,१४): १ मीर्झा मीर मुहम्मद नासिर-नसीर> क × जाफरबेगखान>सफ्दरजंग; १>२ मीर मुहम्मद अमीन-सआदतखान-बुर्हानुल्मुल्क ११३२।१७२०>सद्रुन्निसा बेगम × ३ मीर्झा मुहम्मद मुकीम-अबुल्मन्सूरखान-सफ्दरजंग ११५२।१७३९ > ४ शुजाउद्दौला-जलालुद्दीन हैदर ११६७।१७५४> ५ आसफुद्दौला ११८९।१७७५>६ वझीर अली १२१२।१७९७ + ७ सआदत अली १२१३। १७९८>८ गाझीउद्दीन हैदर १२३०।१८१४ + ९ मुहम्मद अली शाह १२५३।१८३७; ८>१० नासिरुद्दीन हैदर १२४३।१८२७;९> ११ अमजद अली १२५८।१८४२; १०>१२ मूनाजान १२५३।१८३७; ११>१३ वाजिद अली शाह १२६४।१८४७>१४ ब्रिजीस कद्र-नवाब वझीर १२७३।१८५६ + १५ खदीजा + १६ नौशीरवान जाह + १७ मीर्झा यूसुफ.

अर्काट-नबाब (१,२,४, ६, ११, १५, १८, २०, २४, २७-२९): १ जुल्फिकारअलीखान ११०२।१६९०; २ दाऊदखान १११५।१७०३; ३ अगीबक्ति मुहम्मदखान>४ सआदतुल्लाहखान १:११२२।१७१० + ५ घुलाम अलीखान>६ दोस्त अलीखान ११४५।१७३२ + ७ बकीर अली ११४५।१७३२ + ८ सआदत अली + ९ अकबर मुहम्मद; ६>१० हुसैन + ११ सफ्दर अली ११५३।१७४० + १२ क × मुहम्मद घुलाम मुर्तजा अली + १३ क × मुहम्मद तकी साहिब + १४ क × चंदासाहिब-हुसैन दोस्तखान ११६२-६५।१७४९-५२; ११>१५ सआदतुल्लाहखान २:११५५।१७४२; १२>१६ साहिबझादा; १४>१७ राजा साहिब ११७३।१७५९; १८ अन्वरुद्दीन मुहम्मद ११५७।१७४४>१९ महफूझखान + २० मुहम्मद अली ११६३।१७४९ + २१ अब्दुर्रहीम + २२ अब्दुल्वह्हाब + २३ नजीबुल्लाह; २०>२४ उम्दतुल्-उमरा १२१०।१७९५ + २५ अमीरुल्-उमरा; २४> २६ अली हुसैन; २५>२७ अजीमुद्दौला १२१६।१८०१>२८ अअजमजाह १२३५-४१।१८१९-२५ + २९ अजीमजाह बहादुर १२८४-९१।१८६७-७४.

अर्घून: १ मीर्झा शाह बेग ९२७।१५२१; २ मीर्झा हुसैन ९३१।१५२४.

अर्घून तर्खान: १ मीर्झा मुहम्मद ईसा ९६४।१५५६; २ मीर्झा मुहम्मद बाकी ९७५।१५६७; ३ मीर्झा जानीबेग ९९३-१००१।१५८५-९१

आदिलशाही (१-४,८,११,१४-१६): १ यूसुफ ८९५।१४९०>

२ इस्माईल ९१६।१५१०>३ मल्लू ९४१।१५३४ + ४ इब्राहीम १: ९४१। १५३४ + ५ अब्दुल्लाह + ६ अली-अल्लू-अन्नू; ४>७ इस्माईल + ८ अली १:९६५।१५५८ + ९ तहमास्प + १० अहमद; ९>११ इब्राहीम २:९८८। १५८०>१२ दर्वीश + १३ सुलैमान + १४ मुहम्मद १०३७।१६२७> १५ अली २: १०६७।१६५६>१६ सिकंदर १०८३-९७।१६७२-८६.

आंध्र-शातवाहन : १ शिमुक – शिशुक – सिप्रक – सिंधुक – शातकर्णि इपू २२० + २ कन्ह–कृष्ण १९७; ३ यज्ञश्री शातकर्णि–श्रीमल्लकर्णि–शांतकर्ण १७९; ४ पूर्णोत्संग १६९; ५ शातकर्णि १५१; ६ लंबोदर १११; ७ अपीटक–अपिलक–इर्वालक ९३; ८ संघ–मेघस्वाति ८१; ९ शातकर्णि–शातस्वाति ६३; १० स्कंदस्वाति–स्कंदशातकर्णि ४५; ११ मृगेंद्र–महेंद्र शातकर्णि ३८; १२ कुंतल शातकर्णि–स्वातिकर्ण ३५; १३ शात शातकर्णि–स्वातिकर्णि–स्वातिषेण २७; १४ पुलुमायि १–पुलोमावि–पटुमावि–पटुमत् २६; १५ मेघ शातकर्णि इ. ६; १६ अरिष्ट शातकर्णि–अरिष्टकर्णि–नेमिकृष्ण–गौरकृष्ण–गौरक्षाश्वश्री ४४; १७ हाल–हालेय ६९; १८ मंडलक–मंटलक–पट्टलक ७४; १९ पुरींद्रसेन–पुरीषसेन–प्रविलसेन ७९; २० सुंदर शातकर्णि ८४; २१ विलिवायकुर १–वासिष्ठीपुत्र–चकोर–राजद शातकर्णि ८५; २२ शिवाळकुर–माढरीपुत्र–शकसेन–शिवस्वाति शातकर्णि × बालश्री ८५; २३ विलिवायकुर २–गौतमीपुत्र श्रीशातकर्णि ११३; २४ पुलुमायि २–वासिष्ठीपुत्र–पुलोमत्–पुडुमायि × दक्षमित्रा < क्षत्रप रुद्रदामन् १: १३८; २५ शिवश्री–वासिष्ठीपुत्र–अविशातकर्णि १७०; २६ शिवस्कंद शातकर्णि–स्कंदस्वाति १७७; २७ यज्ञश्री गौतमीपुत्र १८४; २८ विजयश्री शातकर्णि २१३; २९ वदश्री–चंद्रविज्ञ–वासिष्ठीपुत्र चंद्रश्री–शातकर्णि २१९; ३० पुलुमायि ३–पुलोमावि–पुलोमर्चिस् २२९–३६.

इमादशाही : १ फतहुल्लाह ८९५।१४९०>२ अलाउद्दीन ९१०। १५०४>३ दर्या ९३७।१५२९>४ बुर्हान ९७०–८२।१५६२–७४ + ५ दौलतशाह; ६ तुफालखान–राज्यबळकाऊ

कछवाह–जयपूर (१,२,५,७, ९, १०, १२–२२): १ भारमल्ल १५६९>२ भग–वंत–वानदास १५८९ + ३ जगत्सिंह + ४ क × अकबर; ३>५ मानसिंह = २ दमु १६१४>६ जगत्सिंह १ + ७ भाऊसिंह १६२०;

६> ८ महासिंह> ९ जयसिंह १६१७-६७> १० रामसिंह १६७७> ११ कृष्णसिंह> १२ विष्णुसिंह १७००>१३ सवाई जयसिंह १७४३> १४ ईश्वरसिंह १७५० + १५ माधोसिंह १७६३>१६ पृथ्वीसिंह २: १७७८ + १७ प्रतापसिंह १८०३; १८ जगत्सिंह २: १८१८; १९ मोहनसिंह १८१९; २० जयसिंह ३: १८३५; २१ रामसिंह २: १८८०; २२ माधोसिंह.

कण्व: १ वासुदेव इपू ७२>२ भूमिमित्र ६३>३ नारायण ४९> ४ सुशर्मन् ३७-२७.

कदंब-गोवें (१-९,१०=११,१२,१४,१५): १ कंटकाचार्य-षष्ठदेव १ × नायव्यदेवी>२ नागवर्मन् × मालव्यदेवी>३ गूहल्ल १ × गौरव्यदेवी>४ षष्ठदेव २ × (अक्कादेवी चालुक्य ? + २ कुंदलादेवी शिलाहार ?) ९२९।१००७>५ गूहल्ल २:९६०।१०३८>६ जयकेशिन् १:९७४।१०५२> ७ गूहल्ल ३: १०२०।१०९८ + ८ विजयादित्य १ × चट्टलदेवी>९ जयकेशिन् २ × मैळलदेवी<चालुक्य विक्रमादित्य ६: १०४१।१११९>१० शिवचित्त पेर्माडि × कामलादेवी<काम १०६९-११०९।११४७-८७ + ११ विजयादित्य २-विष्णुचित्त × लक्ष्मीदेवी १०६९-९३।११४७-७१>१२ जयकेशिन् ३ × महादेवी ११०९।११८७> १३ शिवचित्त वज्रदेव + १४ त्रिभुवनमल्ल सोवदेव × मागिकादेवी>१५ षष्ठदेव ३-शिवचित्त-चट्टय्य ११६८-७९।१२४६-५७ + १६ क × कामदेव.

कदंब-वनवासी (१-६,८,९,१२,१६,१७): १ मयूरशर्मन् २६२।३४०> २ कंगवर्मन् २८२।३६०> ३ भगीरथ ३०७।३८५> ४ रघु ३३२।४१० + ५ ककुत्स्थवर्मन् ३४७।४२५ >६ शांतिवर्मन् ३७२।४५० + ७ कृष्णवर्मन् १ × केकेयकन्या; ६ > ८ मृगेशवर्मन्-विजयशिव × केकेय प्रभावती ३९७।४७५ + ९ मांधातृवर्मन् ४१०।४८८; ७ >१० विष्णुवर्मन्-विष्णुदास + ११ देववर्मन्-शिवानन्दवर्मन्; ८>१२ रविवर्मन् ४२२।५०० + १३ भानुवर्मन् + १४ शिवरथ ४६३।५४१; १० >१५ सिंहवर्मन्; १२> १६ हरिवर्मन् ४५९।५३७; १५>१७ कृष्णवर्मन् ४७२।५५० + १८ क × गंग माधव २; १७>१९ अजवर्मन् >२० भोगिवर्मन् >२१ विष्णुवर्मन् २; २२ अय्यवर्मन् ८३३।९११; २३ आर्यवर्मन् ९०९।९८७>२४ आदित्यवर्मन् ९१४।९९२; २५ चावुंडराज ९७०।१०४८; २६ अरिकेसरिन् ९७७।

१०५५; २७ तोयिम < अक्का ९८६-८९।१०६४-६७; २८ शांतिवर्मन् ९९६।१०७४; २९ कोंडिम ११०९।११८७.

कदंब-हानगल (१-१४,१८,२२,१९,२३-२८, ३१): १ मयूर-वर्मन् १ > २ कृष्णवर्मन् > ३ नागवर्मन् १ > ४ विष्णुवर्मन् > ५ मृगवर्मन् > ६ सत्यवर्मन् > ७ विजयवर्मन् > ८ जयवर्मन् १ > ९ नागवर्मन् २ > १० शांति-वर्मन् १ > ११ कीर्तिवर्मन् १ > १२ आदित्यवर्मन् > १३ चट्टय ८९४।९७२ > १४ जयवर्मन् २-जयसिंह सु. ९५२।१०३० + १५ ? सत्याश्रय + १६ ? खेतमल्ल; १४ > १७ मावुलिदेव-मयूरवर्मन् ९५६।१०३४ + १८ तैलप × चावुंडला सु. ९७२।१०५० + १९ शांतिवर्मन् २-शांतय्य × पाड्य सिरिया-देवी १०१०।१०८८ + २० चो-जोकिदेव + २१ विक्रम-मांक; १८ > २२ कीर्तिवर्मन् २-तैलन सिंग ९९०।१०६८; १९ > २३ तैल २ × (१ पांड्य बाचला + २ चामला) १०२१।१०९९ > २४ मयूरवर्मन् २ : १०५३। ११३१ + २५ मल्लिकार्जुन १०५४।११३२ + २६ तैलम-मावुलि तैल १०६९।११४७ > २७ कीर्तिवर्मन् ३ : १०९४।११७२ + २८ कामदेव × केतला ११०३।११८१ > २९ बर्म + ३० सोम + ३१ मल्ल ११४०।१२१८ + ? ३२ राम; ३१ > ? ३३ कामदेव; ३४ पुरंदरराय.

कळचुर्य (१): १ कृष्णराज > २ शंकरगण ५९६ > ३ बुद्धराज ६०९; ४ दुर्गगण ६८९.

कळचुर्य (२)-कल्याण: १ कन्नम-कर्ण-कृष्ण ९६४।१०४२ > २ बिज्जल १ + ३ राज-राजल > ४ अम्मुगि + ५ संकम + ६ कन्नर + ७ जोगम १०००।१०७८ > ८ पेर्माडि-हेम्माडि १०५०।११२८ > ९ बिज्जल-त्रिभुवन-मल्ल-निःशंकमल्ल १०६७।११४५ + १० मैलुगि; ९ > ११ सोमेश्वर-सोयि-सोविदेव-रायमुरारि × सावळदेवी १०८९।११६७ + १२ शंखवर्ण-संकम-निःशंकमल्ल १०९७।११७५ + १३ आहवमल्ल-अप्रतिमल्ल-राय-वीरनारायण १०८३।११६१ + १४ सिंघण ११०५-६।११८३-४ + १५ वज्र + १६ सिरिया देवी × सिंद चावुंड २.

काशी-राजे: १ मनसाराम १७३९ > २ बलवंत-वंडसिंघ १७७० > ३ मुगरसिंग + ४ चेतसिंग १८१० + ५ क × दुर्विजयसिंग > महीप-

नारायण; ४>६ बलचंद्रसिंघ>७ चक्रसिंग>८ बिजेबहादुर + ९ बलभद्रसिंग>१० चिंतामण + ११ शंकर + १२ जगत्नारायण + १३ राज.

काश्मीर-सुल्तान (१-५,८,१०,११,१४,१७,२१,१६,२५,२०,२६, २३,२४,२७): १ शाह मीर्झा शम्सुद्दीन १: ७४७।१३४६>२ जम्शीद ७५०। १३४९ + ३ अली शेर-अलाउद्दीन ७५१।१३५० + ४ शीरा शामक-शिहाबुद्दीन ७६०।१३५९ + ५ हिंदाल-कुत्बुद्दीन ७८०।१३७८; ४>६ हसनखान + ७ अलीखान; ५>८ सिकंदर बुतशिकन ७९६।१३९३ + ९ हैबतखान; ८>१० मीरखान-अलीशाह ८१९।१४१६ + ११ शाहीखान-झैनुल्आबिदीन ८२३।१४२० + १२ मुहम्मदखान; ११>१३ आदमखान + १४ हाजीखान-हैदरशाह ८७५।१४७० + १५ बहरामखान; १३>१६ फतहशाह ८९४।१४८९, ९०३।१४९८; १४>१७ हसनशाह ८७६।१४७२; १५>१८ यूसुफखान; १६>१९ इस्कंदरखान + २० नाझुकशाह ९३३। १५२७, ९४७।१५४०, ९५८।१५५१; १७>२१ मुहम्मदशाह ८९४। १४८९, ९०३।१४९७, ९०४।१४९९, ९३५।१५२९ + २२ हुसैनखान; २०>२३ इब्राहीम २: ९५९।१५५२ + २४ इस्माईल ९६२।१५५५; २१>२५ इब्राहीम १: ९३२।१५२६ + २६ शम्सुद्दीन २: ९४१।१५३४; २४>२७ हबीब ९६४-६८।१५५७-६१; मीर्झा हैदर-राज्य बळकाऊ ९४७। १५४९ = २० नाझुकशाह कारकिर्द.

कुत्बशाही (१,४,८,७,११,१४-१६): १ सुल्तान कुली ९१८।१५१२ >२ हैदर कुली + ३ कुत्बुद्दीन + ४ जम्शीद ९५०।१५४३ + ५ अब्दुल करीम + ६ दौलतखान + ७ इब्राहीम ९५७।१५५०; ४> ८ सुब्हान कुली ९५७।१५५०; ७>९ अब्दुल कादिर + १० हुसैन कुली + ११ मुहम्मद कुली ९८८।१५८० + १२ मुहम्मद अमीन; ११>१३ हयातबख्श बेगम; १२>१४ मुहम्मद १०२०।१६१२ × ११ क>१५ अब्दुल्लाह १०३५। १६२६>क × १६ अबुल हसन १०८३-९८।१६७२-८७.

कुषाण: १ वाझेष्क>२ कनिष्क ८३-११९; ३ वासिष्क १०२-६; ४ हुविष्क १११-३८; ५ वासुदेव १५२-७६.

क्षत्रप-महाक्षत्रप (१): १ भूमक; २ नहपान १२४>३ दक्षमित्रा × उषवदात<दीनीक. (२) (१-५,८,६,९,१२,१०,११,१३-२१): १ ज्समो-

तिक>२ चष्टन १२५>३ जयदामन् १३०>४ रुद्रदामन् १४०>५ दामध्सद १-दामजद-श्री १५८+६ रुद्रसिंह १: १८०+६अ दक्षमित्रा × आंध्र पुलुमायि २; ६ आ ईश्वरदत्त; ५> ७ सत्यदामन्+ ८ जीवदामन् १७८; ६>९ रुद्रसेन १ : १९७+ १० संघदामन् २२२+ ११ दामसेन २२६; ९>१२ पृथ्वीषेण २२२ ?; ११>१३ दामजद-श्री २: २३२ +१४ वीरदामन २३६ + १५ यशोदामन् १: २३९ + १६ विजयसेन २३८+ १७ दामजद-श्री ३ : २४९; १५>१८ रुद्रसेन २ : २५६>१९ विश्वसिंह २७२+२० भर्तृदामन् २७८>२१ विश्वसेन २९४-३००. (३) (३,५,७, ९,१०): १ स्वामि जीवदामन्>२ रुद्रसिंह + ३०८ ? ३ स्वामि रुद्रदामन्; २>४ यशोदामन् ३२० + ४अ दामसिरि ३२०; ३>५ स्वामि रुद्रसेन १:३४८ + ६ क> ७ स्वामि सिंहसेन ३८२+ ? ८ सत्यसिह; ७> ९ स्वामि रुद्रसेन २; ८>१० स्वामि रुद्रसिंह ३८८.

खलजी-दिल्ली (४,९,६,१५,१४): १ तूलकखान कुंदूझी>२ नासिरुद्दीन+ ३ शिहाबुद्दीन-नसुद्दीन + ४ जलालुद्दीन फीरूझ ६८९।१२९०+ ५ यघ्रुशखान; ३>६ अलाउद्दीन मुहम्मद ६९५।१२९६ + ७ अल्मास बेग-उलुघखान; ४>८ महमूद-खानखानान+९ रुक्नुद्दीन इब्राहीम-अर्कलीखान ६९५।१२९६ + १० कद्रखान; ५>११ असदुद्दीन; ६>१२ खिज्रखान + १३ शादीखान + १४ कुत्बुद्दीन मुबारक ७१६।१३१६ + १५ शिहाबुद्दीन उमर ७१५।१३१६; १६ नासिरुद्दीन खुस्रव (राज्यबळकाऊ) ७२०।१३२०.

गव्हर्नर जनरल: १ वॉरन हेस्टिंग्स (१३।४।१७७२, २०।१०।१७७४); २ सर जॉन मॅक्फर्सन (१,८।२।१७८५); ३ लॉर्ड कॉर्नवॉलिस (१२।९। १७८६); ४ सर जॉन शोअर (२०,२८।१०।१७९३); ५ सर ऑल्फ्रेड क्लार्क (१७।३-६।४।१७९८); ६ लॉर्ड मॉर्निंग्टन (१७-१८।५।१७९८); ७ मार्क्विस कॉर्नवॉलिस (३०।७।१८०५); ८ सर जॉर्ज एच्. बार्लो (१०।१०। १८०५); ९ लॉर्ड मिंटो (३१।७।१८०७); १० लॉर्ड हेस्टिंग्स-अर्ल ऑफ मोइरा (४।१०।१८१३); ११ जॉन ॲडम (१३।१।१८२३); १२ जॉर्ज़ अम्हर्स्ट (१।८।१८२३); १३ विल्यम बटरवर्थ (१३।३।१८२८); १४ लॉर्ड विल्यम कॅव्हेंडिश बेंटिंक (४।७।१८२८); १५ सर चार्लस मेट्काफ

(२०।३।१८३५); १६ लॉर्ड ऑक्लंड (४।३।१८३६); १७ लॉर्ड एलेनबरो (२८।२।१८४२); १८ विल्यम विल्बरफोर्स बर्ड (१५।६।१८४४); १९ लॉर्ड हार्डिंज (२३।७।१८४४); २० लॉर्ड डलहौसी (१२।१।१८४८); २१ लॉर्ड कॅनिंग (२९।२।१८५६); २२ लॉर्ड एल्जिन (१२।३।१८६२); २३ सर रॉबर्ट नेपियर (२१।११।१८६३); २४ सर विल्यम टी. डेनिसन (२।१२।१८६३); २५ सर जॉन लॉरेन्स (१२।१।१८६४); २६ लॉर्ड मेयो (१२।१।१८६९); २७ जॉन स्ट्रॅची (९।२।१८७२); २८ लॉर्ड नेपियर (२३।२।१८७२); २९ लॉर्ड नॉर्थब्रुक (३।५।१८७२); ३० लॉर्ड लिटन (१२।४।१८७६); ३१ लॉर्ड रिपन (८।६।१८८०); ३२ लॉर्ड डफरिन (१३।१२।१८८४); ३३ लॉर्ड लॅन्सडौन (१०।१२।१८८८); ३४ लॉर्ड एल्जिन (२७।१।१८९४); ३५ लॉर्ड कर्झन (६।१।१८९९); ३६ लॉर्ड अँप्थिल (३०।४।१९०४); ३७ लॉर्ड कर्झन (१३।१२।१९०४); ३८ लॉर्ड मिंटो (१८।११।१९०५); ३९ लॉर्ड हार्डिंज (२३।११।१९१०); ४० लॉर्ड चेम्सफर्ड (? ।४।१९१६); ४१ लॉर्ड रीडिंग (? ।४।१९२१); ४२ लॉर्ड इर्विन (? ।४।१९२६); ४३ लॉर्ड विलिंग्डन (? ।४।१९३१); ४४ लॉर्ड लिन्लिथगो (? ।४।१९३६); ४५ लॉर्ड वॅव्हेल (? । ? ।१९४३); ४६ सर जॉन कॉलव्हिल (४।६।१९४५); ४७ लॉर्ड वॅव्हेल (? ।९।१९४५); ४८ लॉर्ड मौंटबॅटन (२४।३।१९४७); ४९ चक्रवर्ति राजगोपालाचारी (१९४८).

गव्हर्नर-मुंबई : १ सर अॅब्राहम शिपमन १६६२; २ हम्फ्रे कुक १६६५; ३ सर जॉर्ज गेर्व्हस ल्यूकस १६६६; ४ कॅप्टन हेन्री गॅरे १६६७; ५ सर जार्ज ऑक्झिंडेन १६६८; ६ जेराल्ड ऑंजियर १६६९; ७ टॉमस् रोल्ट १६७७; ८ सर जॉन चाइल्ड १६८१; ९ बार्थोलोम्यू हॅरिस १६९०; १० डॅनियल अॅनेस्ले १६९४; ११ सर जार्ज गेयर १६९४; १२ सर निकोलस वेट १७०४; १३ वुइल्यम ऐस्लेबी १७०८; १४ स्टीफन स्टुट १७१५; १५ चार्लस बून १७१५; १६ वुइल्यम फिप्स १७२२; १७ रॉबर्ट कॉवेन १७२९; १८ जॉन हॉर्न १७३४; १९ स्टीफन लॉ १७३९; २० जॉन गीक १७४२; २१ वुइल्यम वेक १७४२; २२ रिचर्ड बुर्शर १७५०; २३ चार्लस क्रॉमेलिन १७६०; २४ टॉमस होजेस १७६७; २५ वुइल्यम

वाकाटक–वत्सगुल्म : १ विन्ध्यशक्ति १> २ प्रवरसेन १> ३ सर्वसेन >? ४ विध्यशक्ति २–विन्ध्यसेन> ५ प्रवरसेन २>६ ? > ७ देवसेन> ८ हरिषेण.

वाकाटक–सम्राट् (१,३–६,८–१०): १ प्रवरसेन १>२ ? × गौतमी ? <भवनाग भारशिव>३ गौतमीपुत्र>४ रुद्रसेन १>५ पृथ्वीषेण १ > ६ रुद्रसेन २ × प्रभावती<चंद्रगुप्त<देवगुप्त> ७ दामोदरसेन> ८ प्रवरसेन २> ९ नरेंद्रसेन + १० पृथ्वीषेण २<अज्झितभट्टारिका.

विजयनगर–आरवीडु (१४,२२,२४,३१,३७,२८,३६,३८–४०): १ तात पिन्नम> २ सोमिदेव> ३ राघवदेव> ४ पिन्नम> ५ बुक्क> ६ सिंगराज (नंद्याळ शाखा) + ७ रामराज> ८ तिम्म + ९ पेद्द कोंड + १० श्रीरंग १५७१> ११ कोण + १२ तिम्म + १३ अळिय राम १५६५ +

१४ तिरुमल १५७० + १५ वेंकटाद्रि; १३ > १६ कृष्ण + १७ पेद्द तिम्म + १८ कोंड + १९ चिन्न तिम्म + २० श्रीरंग; १४ > २१ रघुनाथ + २२ श्रीरंग १: १५७८ + २३ राम १ + २४ वेंकटपति १: १५८६; १५ > २५ राम + २६ श्रीरंग; १८ > २७ राम; २० > २८ पेद्द वेंकट २: १६३० + २९ चिन्न-पिन्न वेंकट; २३ > ३० तिरुमल + ३१ श्रीरंग २: १६१४ ?; २६ > ३२ वेंकट + ३३ गोपाल; २९ > ३४ तिरुमल + ३५ वेंकट + ३६ श्रीरंग ३: १६४२; ३१ > ३७ राम २: १६१४; ३६ > ३८ वेंकट ३: १६७८ > ३९ श्रीरंग १६९२ > ४० वेंकट ४ : १७०६-१६.

विजयनगर-तुळुव (३-६, ११, १२): १ तिम्म × देवकी > २ ईश्वर × (१ बुक्कम्मा + २ देवकी) > ३ नरसनायक × (१ तिप्पाजी + २ नागलांबिका + ३ ओबांबिका) १५०५ > ४ वीर नरसिंह १५०६ + ५ कृष्णदेव-राय × (१ तिरुमलदेवी, चिन्नादेवी, अन्नपूर्णा, कमला, तुक्खा-जगन्मोहिनी-भद्रा, इत्यादि १२) १५०९ + ६ अच्युत १५२९ + ७ रंग × तिम्मांबा; ५ > ८ तिरुमल (बालमृत्यु) + ९ तिरुमलांबा × अळिय राम-राज आरवीडु + १० वेंगला × तिरुमल आरवीडु; ६ > ११ वेंकटाद्रि १५४२; ७ > १२ सदाशिव १५४२-७०.

विजयनगर-संगम (२,४,९,१५,१७,२३,२७, २९, ३०): १ संगम १ × कामाक्षी > २ हरिहर १: १३३६ + ३ कंपण १ + ४ बुक्क १ × (१ जोम्मा + २ गौरी) १३५५ + ५ मारप्प + ६ मुद्दप; ३ > ७ सावन १: १३५१-६४ + ८ संगम २; ४ > ९ हरिहर २ × (१ विठ्ठलदेवी + २ मल्ला + ३ पंपा) १३७७ + १० कंपण २ + ११ विरूपाक्ष १-विरूपण्ण १३५४ + १२ भास्कर-भवदूर + १३ मल्लिनाथादि १३६२; ५ > १४ सावन २; ९ > १५ बुक्क २ × तिप्पांबा १४०४ + १६ विरूपाक्ष २-विरूपण्ण + १७ देवराय × (१ हेमांबिका + २ मल्लयव्वे) १४०६ + १८ चिक्कराय + १९ जोम्मन १३७५ + १९अ विजयलक्ष्मी; १३ > २० चन्न-चेन्नप १३९७; १५ > २१ भूपति उडैयार-ओबलदेव १३८६-१४२२; १७ > २२ मल्लप-मल्लण्ण १४१२-२१ + २३ बुक्क ३-विजय × नारायणी १४२२ + २४ हरि-हर ३ + २५ रामचंद्र १४०७-१६; २३ > २६ हरिमा × साळुव तिप्प + २७ देवराय २ × (१ सिद्दला + २ पोन्नला) १४२२-४६ + २८ श्रीगि-

रीन्द्र १४४२-४३; २७> २९ मल्लिकार्जुन १४४६ + ३० विरूपाक्ष ३: १४६५-८५> ३१ प्रौढदेव.

विजयनगर-साळुव : १ नरसिंह १४८५> २ इम्मडि नरसिंह १४९३-१५०५.

शर्की : १ मलिक सर्वर ख्वाजा जहान ७९६।१३९४> ? २ मलिक करन्फुल-मुबारकशाह (द) ८०२।१३९९ + ? ३ शम्सुद्दीन इब्राहीमशाह ८०४। १४०२ (द)> ४ महमूदशाह ८४०।१४३६> ५ मुहम्मदशाह ८६२। १४५८ + ६ हुसैनशाह ८६२-८४।१४५८-७९.

शिलाहार-कऱ्हाड+कोल्हापूर : १ जतिग १> २ नायिम्म > ३ चंद्रराज> ४ जतिग २> ५ गोंक-गोंकल + ६ गूवल १ + ७ कीर्त्तिराज + ८ चंद्रादित्य; ५> ९ मारसिंह ९८०।१०५८> १० गूवल २ + ११ गंगदेव + १२ भोज १: १०१०।१०८८ + १३ बल्लाळ १००८।१०८६ + १४ गंडरादित्य १०३२।१११०> १५ विजयादित्य-विजयराज १०६५। ११४३>१६ भोज २:११०१।११७९>१७ गंडरादित्य.

शिलाहार-खारेपाटण : १ सणफुल्ल> २ धम्मियर> ३ अम्मल> ४ ऐयपराज> ५ अवसर १> ६ आदित्यवर्मन्> ७ अवसर २>८ इंद्रराज> ९ भीम-षष्ठ> १० अवसर ३ : ९१०।९८८> ११ रट्टराज ९३०।१००८.

शिलाहार-ठाणें : १ कपर्दिन् १> २ पुल्लशक्ति ७६५।८४३> ३ कपर्दिन् २: ७७५।८५३> ४ वप्पुवण्ण> ५ झंझ ९३८।१०१६ + ६ गोग्गि>७ वज्जड १ + ८ च्छद्वय-च्छर्द्वदेव; ७>९ अपराजित ९१५। ९९३ + १० शशिप्रभा × परमार सिंधुराज; ९>११ वज्जड २ + १२ अरिकेसरिन्-केशिदेव १: ९३९।१०१७; ११>१३ कोंदलदेवी × कदंब षष्ठ + १४ छित्तराज ९४८।१०२६ + १५ नागार्जुन × पद्मलदेवी + १६ मुम्मुणि-माम्वाणि ९७१।१०४९>१७ क × कदंब षष्ठ २ ?; १५>१८ अनंतदेव-पाल × लीलावती १०१६।१०९४>१९ अपरा-दित्य-र्क १: १०३७।१११५; २० हरपालदेव १०७१।११४९; २१ महानंद>२२ मल्लिकार्जुन १०७८। ११५६; २३ अपरादित्य-र्क २: ११०६।११८४> २४ केशिराज २: ११२५।१२०३; २५ सोमेश्वर ११८१।१२५९.

शिंदे-ग्वाल्हेर : १ जनकोजी > २ राणोजी × (१ मैना + २ चिमा) १७४५ + ३ साबाजी; २ > ४ जयाप्पा-जी × (१ लक्ष्मी + २ सखू) १७५५ + ५ जोत्याजी × सगुणा १७४२ + ६ दत्ताजी × भागीरथी १७६० + ७ तुकोजी × लक्ष्मी १७५९ + ८ महादजी १७९२ + ९ आनंदीबाई × निंबाळकर १७८६ + १० भवानी; ३ > ११ नरसिंगराव + १२ निंबाजी + १३ भगवंतराव + १४ बयाजी; ४ > १५ जनकोजी १७६१ + १६ लक्ष्मी; ७ > १७ केदारजी + १८ खलोजी + १९ आनंदराव; ८ > २० बाळाबाई × लाडोजी शितोळे १७९३; ११ > २१ धारराव + २२ मानाजी फाकडे + २३ रघुनाथराव + २४ नारायणराव; १२ > २५ खळोजी; १९ > २६ दौलतराव × (१ रखमा + २ लक्ष्मी + ३ बायजा १८६३) १८२७; २२ > २७ आनंदराव; २६ > २८ जनकोजी × (१ नांव ? + २ ताराबाई) > २९ जयाजीराव × (१ लक्ष्मी + २ चिमा + ३ लक्ष्मी + ४ सख्या राजे) > ३० माधवराव × (१ चिनकू + २ गजरा) > ३१ जार्ज जयाजी.

शुंग-विदिशा : १ पुष्यमित्र इपू १८४ > २ अग्निमित्र १४८ > ३ सु-वसुज्येष्ठ १४० > ४ सु-वसुमित्र १३३ > ५ अन्ध्रक १२३ > ६ पुलिंदक १२१ > ७ घोष ११८ > ८ वज्रमित्र ११५ > ९ भाग-वत-भद्र १०६ > १० देवभूति-मि ८२-७२.

शैशुनाग-मगध : १ शिशुनाग इपू ६०० > २ काकवर्ण; ३ क्षेमधर्म; ४ क्षत्रजित्-क्षत्रौजस्; ५ बिंबिसार-श्रेणिक-शेणिय ५३० > ६ अजातशत्रु ५०० > ७ दर्शक-नागदर्शक ४७५; ८ उदय-उदयिबद्ध-उदयिन् ४५०; ९ नंदिवर्धन ४१७; १० महानंद-महानंदिन् ३८५.

सय्यिद (२,३,५,६) : १ मलिक सुलैमान-मलिकुश्शर्क > २ खिज्रखान ८१७।१४१४ > ३ मुइझ्झुद्दीन मुबारक ८२४।१४२१ + ४ फरीद > ५ मुहम्मद ८३७।१४३४ > ६ अलाउद्दीन आलमशाह ८४७।१४४४.

सावनूर-नवाब : १ बहलूलखान > २ अब्दुर्रहीम > ३ अब्दुल्करीम १६७८ > ४ अब्दुर्रौफ १७१७ > ५ अब्दुल्फतह १७१७ + ६ अब्दुल्मुहम्मद १७१८ + ७ डाफर-गफूरखान १७१८ > ८ अब्दुल्मजीदखान १७५२ + ९ अब्दुस्सत्तारखान + १० करीमखान; ८ > ११ अब्दुल्हकीमखान

१७९५> १२ खैरखान १८२७> १३ फय्याजखान १८२७ + १४ मुनव्वरखान १८३७ + १५ अब्दुद्दलीलखान> १६ दलीलखान.

सिंद-एरं-एलबरगे : १ आचुगि १ + २ नाक + ३ सिंग १ + ४ दास-दान + ५ दाम-दाव + ६ चावुंड-चौंड १ + ७ चाव> ८ बम्म + ९ सिंग २-आचुगि २: १०४४।११२२>१० पेर्माडि १: १०६२।११४० + ११ चावुंड२>१२ आचुगि ३: १०८५।११६३ + १३ पेर्माडि २: १०८५। ११६३ + १४ बिज्जल १०९१।११६९ + १५ विक्रम १०९१।११६९.

सिंद-सिंदवाडी : १ पिरिय चट्टरस १> २ जोगरस> ३ चट्टरस २: १०३९।१११७> ४ माच + ५ मल्लिदेव १ + ६...हरस; ५> ७ रायरस; ६>८ ईश्वरदेव १०८८।११६६>९ पांड्यदेव + १० मल्ल-मल्लिदेव २: ११०९। ११८७ + ११ राय + १२ विजय; १०>१३ ईश्वरदेव २: ११३७।१२१५> १४ केशवदेव ११५४।१२३२> १५ बीरदेव-हरबीर ११६६।१२४४.

सिंध-जाम : १ उनर ७३७।१३३६; २ जूना ७४१।१३४०; ३ बन्हतिया ७४५।१३४४; ४ तिमाजी ७६०।१३५९; ५ सलाहुद्दीन ७७३।१३७१; ६ अली शेर ७८४।१३८२; ७ करान ७९०।१३८८; ८ फतहखान ७९१। १३८९; ९ तुघ्लुक ८०२।१३९९; १० मुबारक ८३०।१४२७; ११ सिकन्दर ८३०।१४२७; १२ सन्जर-राधन ८३२।१४२८; १३ निजामुद्दीन-नंदा ८४१।१४३७; १४ फीरूझ ९००।१४९४.

सूरी-दिल्ली (५,११,१३,९,१०) : १ इब्राहीमखान > २ हसनखान + ३ गाझीखान + ४ ?; २> ५ शीरशाह - फरीदखान ९४५।१५३८ + ६ निजामखान + ७ सुलैमानखान + ८ अहमदखान; ३> ९ इब्राहीमशाह × ६ क ९६२।१५५४; ४> १० सिकंदरशाह × ६ क ९६२।१५५४; ५> ११ इस्लामशाह-जलालखान × ६ क ९५२।१५४५ + १२ आदिलखान; ६> १३ मुहम्मद आदिलशाह-मुबारिझखान ९६०।१५५२.

सेन्द्रक : १ निकुंभ-भानुशक्ति > २ आदित्यराज-आदित्यशक्ति > ३ निकुंभाल्ल-अल्लशक्ति ६५५>४ जयशक्ति ६८०.

सोळंकी-गुजरात (२-५, ७, ९, ११, १५-१९) : १ राजि> २ मूलराज : १९६० > ३ चामुंडराज ९९५ > ४ वल्लभराज १००९ + ५ दुर्लभराज १००९ + ६ नागराज>७ भीमदेव १०२१> ८ क्षेमराज + ९ कर्ण १०६३; ८> १० देवप्रसाद; ९> ११ जयसिंह-सिद्धराज १०९३;

१०> १२ त्रिभुवनपाल> १३ महीपाल + १४ कीर्त्तिपाल + १५ कुमारपाल ११४२; १३> १६ अजयपाल ११७३> १७ मूलराज २: ११७६ + १८ भीमदेव २: ११७८; १९ त्रिभुवनपाल १२४१-३.

सोळंकी-वाघेला (७-११): १ धवल> २ अर्णोराज-आनाक-आना> ३ लवणप्रसाद> ४ वीरधवल> ५ प्रतापमल्ल + ६ वीरम + ७ वीसल १२३३; ५> ८ अर्जुनदेव १२६१> ९ रामदेव १२७४ + १० सारंगदेव १२७४> ११ कर्णदेव १२९६-९९.

होयसळ-द्वारसमुद्र-हळेबीड (१, २, ४, ५, ७-११, १३, १४, १९): १ नृपकाम-राचमल्ल-पेर्मानडि १०२२> २ विनयादित्य-त्रिभुवन-मल्ल × केलेयलदेवी-कलयब्बे १०४० > ३ एरेयंग × एचलादेवी > ४ बल्लाळ १ × (१ पद्मला + २ चावला + ३ बोप्पा) ११०० + ५ विष्णु-वर्धन-बिट्टिग-बिट्टिदेव-विक्रमगंग-भुजबलगंग-त्रिभुवनमल्ल ११०६ + ६ उदया-दित्य ११२२; ५> ७ नरसिंह १-जगदेकमल्ल × एचलादेवी ११४१> ८ बल्लाळ २-त्रिभुवनमल्ल-भुजबलवीरगंग × (१ रेम्मादेवी + २ केतलदेवी + ३ पद्मलदेवी) ११७३> ९ नरसिंह २ × (१ काळलेदेवी + २ पद्मलदेवी) १२२०> १० वीर सोमेश्वर-सोयिदेव × (१ देवलमहादेवी + २ सोमल-देवी + ३ बिज्जलाराणी) १२३४> ११ नरसिंह ३: १२५४ + १२ रामनाथ × कामलादेवी १२५५ + १३ पोन्नंबला; ११> १४ बल्लाळ ३: १२९२ + १५ सोम + १६ मल्लिदेव; १३> १७ विश्वनाथ १२९४ + १८ मंजय्य मागुत्तर; १४> १९ बल्लाळ ४-विरूपाक्ष १३४३ + २० तिप्परस भैरव.

होळकर-इंदूर (२,३,५,४,७,१०,१२, १४, ११, १३, १५-१८): १ खंडोजी> २ मल्हारराव-जी १७६६ × गौतमाबाई> ३ खंडेराव १७५४ × अहिल्याबाई १७९५ + ४ तुकोजी (द) १७९७; ३> ५ मालेराव १७६७ + ६ मुक्ताबाई फणसे १७९१; ४>७ काशीराव १८०८ + ८ मल्हा-रजी १८०६ + ९ विठोजी १८०० + १० यशवंतराव १८११; ९>११ हरि-राव १८३४; १०> १२ मल्हारराव २: १८३३ + १३ तुकोजी (द) ?; ११> १३ खंडेराव (द) १८४३; १२> १४ मार्तंडराव (द) १८३३; १५ तुकोजी (द) १८४४> १६ शिवाजीराव १८८९> १७ तुकोजीराव १९०३> १८ यशवंतराव.

---

९. उत्खनन

इतिहास म्हणजे गतकालीन सर्वांगीण स्थित्यंतरांचें यथास्थित ज्ञान होय. चालू काळाच्या जों जों मागें जावें तों तों हें ज्ञान करून देणारीं साधनें सामान्यतः संख्या, गुण व वैविध्य या तिन्ही दृष्टींनीं कमी कमी होत जातात. जगांत शाश्वत असें कांहींच नाहीं. प्रत्येक वस्तूंत मग ती कर्मज्ञानेंद्रियगम्य असो कीं मनोगम्य असो, तींत सारखा बदल होत असतो. याचा वेग कधीं मंद तर कधीं जलद असतो. यामुळें हा बदल कधीं लवकर तर कधीं उशीरा ध्यानांत येतो. एखाद्या बाबींत हा बदल अगदीं सावकाश होत आहे असें गृहीत धरलें तरी शेकडों वर्षांच्या पूर्वींची ती बाब व आजची बाब यांमध्यें इतकें अंतर असतें कीं, आजची गोष्ट प्राचीन गोष्टीची वारस आहे हें सामान्य मनुष्याच्या चटकन् ध्यानांतहि येत नाहीं. त्या गोष्टींचे मधले दुवे दाखविल्या-नंतरच तें कळूं शकतें. गत गोष्टींचें ज्ञान शाब्दिक वर्णन व वस्तुदर्शन या दोहोंनीं होत असलें तरी पहिल्या पद्धतीनें होणारें ज्ञान बहुधा अपुरें असतें; कारण त्यांत मनानें वस्तूची कल्पना करावी लागते. वस्तुदर्शनानें व ज्ञान-कर्मेंद्रियांचा उपयोग करून तिचें अधिक पक्कें ज्ञान करून घेतां येतें. पण अशा वस्तु एकत्र जमा करून जपून ठेविल्याशिवाय कशा पहावयास मिळणार? ऐतिहासिक कालांत असा प्रयत्न झाला असेल अशी अपेक्षाही करतां येत नाहीं. अर्वाचीन काल हा आपल्या अगदीं जवळचा असल्यानें त्या कालाचें शब्दज्ञान व वस्तुदर्शन हीं दोन्हीं सहज होत असतात. म्हणून त्या कालांतील स्थित्यंतरांविषयीं आपणास इतकें कौतुक वाटणार नाहीं. पण जों जों प्राचीन कालाकडे जावें तों तों स्थित्यंतरांचें शब्दज्ञान करून देणारी साधनेंही कमी होऊं लागतात. मग वस्तुदर्शन कोठून होणार? तें व्हावें यासाठीं उत्खननें करतात.

अतिप्राचीन काळचीं वसतिस्थानें बहुधा बारा महिने वाहणारा प्रवाह, न सुकणारा जलाशय, इत्यादींच्या आश्रयानें असत. साथींचे रोग, आग, पूर, शत्रूची धाड, अधिक फायदेशीर अन्य स्थानांचें प्रलोभन अशा अनेक कारणांनीं जुनीं स्थानें ओसाड पडत. पैकीं आकस्मिक आपत्तीमुळें एखादें स्थान ओसाड झाल्यास तेथें राहणाऱ्या जनतेच्या जंगम वस्तू उचलून नेण्याच्या

सवडीच्या अभावीं तेथेंच पडून राहतात, स्थावर घरें कांहीं काळ उभीं राहून मग पडतात, त्यांखालीं जंगम वस्तू गाडल्या जातात आणि तेथें माती, दगड, वस्तू इत्यादींचा थर बसून एक लहानसा उंचवटा तयार होतो. बरेच दिवस तो उंचवटा ओसाड राहतो. पुढें त्या उंचवट्यावर नवीन लोक येऊन वस्ती करतात व घरेंदारें बांधतात. नवीन वस्तीस कित्येक वर्षें तेथें लोटल्यावर पुन्हा पूर्वीप्रमाणें आकस्मिक आपत्ति येते. पहिल्या वेळीं पुराची आपत्ति आली असली तर दुसऱ्या वेळीं जळिताचें संकट येतें. लोक घरदार व मालमत्ता यांसह तें ठिकाण सोडून देतात व दुसरीकडे वसती करतात. कांहीं वर्षां-नंतर तेथील घरेंदारें पडतात, त्यांखालीं घरांतील वस्तू पुरल्या जाऊन मूळच्या थरावर एक नवीन थर बसतो व मूळचा उंचवटा आणखी थोडा उंच होतो. कित्येक वर्षांनंतर पुन्हा तेथें वस्ती होते आणि घरेंदारें उभीं राहतात. आतां तेथें महामारीसारखी साथ येऊन पुन्हा लोक घरेंदारें टाकून निघून जातात. कांहीं वर्षांनीं तीं आंतील वस्तूंवर पडून पहिल्या दोन थरांवर नवीन तिसरा थर तयार होतो व उंचवटा आणखी थोडा उंच होतो. अशा तऱ्हेनें जितक्या वेळां वसाहती होतील व उठतील तितक्या थरांचा उंचवटा बनतो. हा उंचवटा पद्धतशीर उकरला तर हे थर स्पष्ट दिसूं शकतात. आणि त्या थरांत सांपडलेल्या वस्तू त्या त्या वसाहतीचा परिचय करून देतात.

डॉक्टरला रोग्याची आणि शिक्षकाला विद्यार्थ्याची, तद्वत् पुराणवस्तु-संशोधकाला अशा उंचवट्याची तात्काळ कल्पना येते. अर्थात् कांहीं गमकां-मुळें ही ओळख पटते. कशी ती थोडक्यांत सांगतों. अशा उंचवट्याची माती कधीं पावसानें किंवा पुरानें वाहात जाऊन उंचवट्याचें पोट उघडें होतें व अपरिचित वस्तु बाहेर डोकावतात. कधीं शेजारच्या वस्तींतील लोक येऊन तेथील माती खणून काढतात व तसें करतांना अपूर्व पदार्थ दृष्टोत्पत्तीस येतात. वाऱ्यानें माती उडून जाऊन कधीं अगदीं पृष्ठभागावर जुने अवशेष उघडे पडलेले आढळतात, तर कधीं घराचा पाया खणतांना नवीन जिन्नस नजरेस येतात. पुराणवस्तुसंशोधकानें असे अवशेष पाहिले म्हणजे त्यास त्या उंच-वट्याच्या प्राचीनत्वाची व तेथील थरांची कल्पना येते. अर्थात् तेथें ज्या वस्तू सांपडतात त्यांवरूनच त्या उंचवट्याची परिस्थिती समजत असल्यामुळें वस्तू हेंच तेथील महत्त्वाचें गमक होय.

पद्धतशीरपणें अधिकाअधिक खोल खणत गेलें असतां कोणत्याही सभ्यतेची कालकृत स्थित्यंतरें ध्यानांत येतात. तद्वत् स्थलकृत स्थित्यंतरें समजण्यासाठीं विविध ठिकाणीं पण समकालीन अवशेषांचें उत्खनन करावें लागतें. तसेंच एकाच वस्तीच्या अवशेषांचा विस्तार समजण्यासाठीं त्या वस्तींत जागोजाग तपासणी करावी लागते. जुन्या वस्तींना बहुतेक उदाहरणांत तट असल्याचें आढळून आलें आहे. तेव्हां त्या तटाचा मागोवा घेत उत्खनन करीत गेलें तर बहुतांशीं त्या वस्तीचा निश्चित विस्तार कळतो. अर्थात् अशा वेळीं उत्खनन खोलीनें कमी पण लांबीनें फार मोठें असें होतें व त्यास पैसाही मुबलक लागतो. मोहेंजोदडो, हडाप्पा, इत्यादि ठिकाणीं खोल व सलग विस्तृत अशा दोन्ही तऱ्हेनें उत्खनन केलें आहे.

उत्खननास योग्य अशा स्थानांचे सामान्यतः दोन वर्ग करतात. एक ऐतिहासिक व दुसरा प्रागैतिहासिक. ज्या उत्खननस्थानीं कोणत्याही स्वरूपाचे लेख मिळण्याचा संभव असतो किंवा ज्या ठिकाणच्या वस्तु ऐतिहासिक काळांतील लोकांविषयीं असतील तीं ऐतिहासिक व बाकीचीं प्रागैतिहासिक होत. तक्षशिला, नाळंदा, पहाडपूर, कोल्हापूर, कऱ्हाड, चंद्रवळ्ळि, ब्रह्मगिरि इत्यादि ठिकाणें ऐतिहासिक आहेत. मोहेंजोदडो, चन्हुदडो, हडाप्पा, झुकार वगैरे ठिकाणें आज प्रागैतिहासिक म्हणून समजलीं जात असलीं तरी तेथें लेख सांपडले असल्यानें त्यांच्या अर्थाचा उलगडा होतांच उपर्युक्त स्थानें ऐतिहासिक कालांत येऊन पडतील. उलट लांघणज, पुळणी टेकड्या, इत्यादि ठिकाणीं लेखरूपी अवशेष सापडण्याची शक्यताच नसल्यानें त्यांस कायमचें प्रागैतिहासिक कालांत घालावें लागेल.

प्रागैतिहासिक स्थलांत घळीं, वसतिस्थानें, स्मशानें, दगडी वर्तुळें (Stone Circles) इत्यादींचा समावेश होतो. हीं उकरलीं असतां तेथें मनुष्य व भक्ष्य प्राणी यांच्या हाडांचे सापळे, मनुष्यास मोलाच्या व प्रिय असणाऱ्या वस्तू, नित्योपयोगी खापरीं भांडीं, अशा भांड्यांत केलेला अस्थिसंचय, धातू, दगड, गारगोटी इत्यादींचीं लहान-मोठीं हत्यारें, मणि वगैरे वस्तू सांपडतात. तेथें कोणत्याही स्वरूपांत लेख सांपडणार नाहींत. किंवा बांधकामें आढळणार नाहींत. यांतही अधातुयुग व धातुयुग असे दोन भाग केले पाहिजेत. पैकीं अधातुयुग प्राचीन व धातुयुग अर्वाचीन होय. अधातुयुगांत अग्नि पेटवून

त्याचा उपयोग करून घेण्याची कला मनुष्यास अवगत झाली होती अगर नव्हती. तेव्हांचीं हत्यारें नैसर्गिक किंवा घासून केलेली दगड, गारगोटी इत्यादींचीं होतीं. धातुयुग अग्नीचा शोध लागल्यानंतर सुरू झालें व तें लेखनाचा शोध लागेतों चाललें. त्या युगांत मनुष्याची पुष्कळ प्रगति होऊन तो घरें बांधूं लागला. धातुयुगांत ताम्रलोहादि पोटयुगें आहेत.

ऐतिहासिक उत्खननस्थानीं उकरलें असतां संसाराचीं जेवढीं अंगें आहेत त्या सर्वांची कमी–अधिक प्रमाणांत कल्पना आणून देणाऱ्या वस्तू तेथें सांपडूं शकतात. त्यांचे स्थावर व जंगम किंवा वास्तु व वस्तु असे दोन भाग करतां येतील. वास्तूंमध्यें, साधीं किंवा मजल्याचीं घरें, विहिरी, गटारें, पाट, रस्ते, गुहा, हौद, स्तूप, खांब, कोठारें इत्यादींचा समावेश होतो; तर जंगम किंवा वस्तुवर्गांत माती, दगड, धातू इत्यादींचीं आवश्यक किंवा चैनीचीं भांडीं, दागिने, मणि, साधीं किंवा रंगीत व चित्रित खेळणीं, मूर्ति, हत्यारें, वजनें, नाणीं, उलटसुलट शिक्के, कडीकोयंडे, कुलूप–किल्ली, विटा, कौलें, धान्यें इत्यादि अगणित वस्तु येतात. अशा प्रकारच्या उत्खननाचें सर्वोत्कृष्ट दर्शन तक्षशिला क्षेत्र व म्यूझियम यांयोगें होतें. तेथें स्थावर व जंगम अशा वास्तु व वस्तु दोन्ही पाहावयास मिळतात. त्या खालोखाल दिल्लीचें सेंट्रल एशियन अँटिक्विटीज म्यूझियम, नाळंदा क्षेत्र व म्यूझियम हीं आहेत. पण तक्षशिलेची सर त्यांना येणार नाहीं.

कालनिर्णयाच्या दृष्टीनें नाणीं व लेख या वस्तू फार महत्त्वाच्या असतात. त्यांमुळें त्यांचा काल तर समजतोच; पण त्यांच्या साहचर्यानें व त्यांच्याच थरांत ज्या इतर वस्तू सांपडतात त्यांच्याही कालाच्या मर्यादा समजूं शकतात. येवढेंच नव्हे तर त्यांच्या थराच्या खालचे वरचे थरांची एकेक काल-मर्यादा समजूं शकते. उदाहरणार्थ एका विशिष्ट थरांत प्राचीनतम शातवाहन नाणीं सांपडलीं आणि तीं तेथें संपत्तिरूपानें पुरून ठेवलीं नव्हतीं हें स्पष्ट असलें तर तीं ज्या थरांत सांपडलीं त्या थराचा व त्यांतील वस्तूंचा काळ सामान्यतः त्या नाण्यांच्या पूर्वीचा आणि तीं प्रचारांतून नाहींशीं होण्या-नंतरचा असूं शकणार नाहीं. याचाच अर्थ त्या थरांतील वस्तूंचा काल इ. पूर्व २०० ते इ. २०० यामधील असला पाहिजे. यांतूनच आणखी असें निगमन निघतें कीं, या थराच्या खालच्या थरांचा व तदंतर्भूत वस्तूंचा काल इ. पू.

२०० च्या पूर्वीचा असला पाहिजे आणि या थराचा वरच्या अवशेषांचा काल इ. २०० नंतरचा असला पाहिजे. हिला कालानुपूर्वी म्हणतात.

अशा तऱ्हेनें निर्णीतकालिक वस्तूंच्या साह्यानें अनिर्णीतकालिक वस्तूंच्या कालाचा निश्चय झाला म्हणजे या नवीन वस्तूंशीं एकरूप असलेल्या व इतरत्र सांपडलेल्या वस्तूंच्या कालमर्यादा ठरतात व त्या ज्या थरांत सांपडल्या त्याचाही काल ठरतो. निरनिराळ्या ठिकाणच्या उत्खननांचा तौलनिक अभ्यास केल्यानें प्रत्येक ठिकाणचे थर व त्यांत सापडलेल्या वस्तू यांचे पौर्वापर्य व कालनिश्चय होऊन वस्तु व वास्तु संस्कृति–सभ्यतांच्या विविधकालिक स्थित्यंतरांचीं प्रत्यक्ष चित्रें अभ्यासकाच्या डोळ्यापुढें उभीं करतात आणि इतिहासाचें सम्यक् ज्ञान होतें.

उत्खननानें व्हावयाचें ज्ञान त्यांत सांपडणाऱ्या वस्तूंचीं स्थानें, त्यांचें साहचर्य, त्यांचे थर यांच्या अचूकपणावर अवलंबून असल्यानें वस्तूंच्या प्राप्तीचा शक्य तितका बिनचूक तपशील ठेवावा लागतो. हा तपशील चटकन् ध्यानांत यावा म्हणून ज्या ठिकाणीं उत्खनन करावयाचें तेथें दिशासाधित चौरस आंखून घेतात, चारी बाजूस प्रत्येकीं पांच फूट अंतरावर खुंट्या ठोकतात व त्यांना दोरी बांधतात. सामान्यतः नैर्ऋत्य कोपऱ्यांतील खुंटी पायाची खुंटी समजून तिच्या पूर्वेकडील व उत्तरेकडील अंतरें, मूळ पातळीपासूनची खोली व थर इतका तपशील प्राप्त वस्तूच्या स्थाननिर्णयासाठीं अवश्य लागतो. या तपशीलावरून वस्तूंचें साहचर्य ठरवितां येतें आणि थराची सामान्य खोली ठाऊक असली म्हणजे थराचा तात्कालिक निर्णय चुकला असला तरी तो दुरुस्त करतां येतो. उकरण्याचें काम सुरू असतां कामकऱ्यांवर अतिशय बारकाईनें लक्ष ठेवावें लागतें. काम काळजीपूर्वक न केलें तर कांहीं वस्तु नजरेंतून सुटून गेल्यानें तेवढ्या वस्तूंस आपण मुकण्याचा संभव असतो, किंवा सुरक्षित वस्तु भग्न रूपांत मिळण्याची शक्यता उत्पन्न होते अगर ज्या वस्तु तेथें सामान्यतः मिळूं नयेत त्या तेथें मिळूं लागतात. मजूर मोलाच्या वस्तु चोरतात, किंवा कोणत्याही आवडीच्या अभावीं धसमुसळेपणानें काम करून वस्तु फोडतात अगर विनोदबुद्धीनें किंवा चांगली वस्तु मिळवून दिल्याचें श्रेय मिळावें म्हणून भलत्याच वस्तु आणून टाकतात. असें कांहीं झालें तर महत्त्वाचा पुरावा नष्ट होतो किंवा न सुटणारीं कोडीं पडतात. खड्डा तयार करतांना खड्ड्याच्या

चारी बाजू ओळंब्यांत असलेल्या भिंतीप्रमाणें तासून सरळ कराव्या लागतात. निदान तसा प्रयत्न करावा लागतो आणि उकरलेल्या भागांत चारी भिंतींची माती वरून खालीं पडणार नाहीं अशी काळजी घ्यावी लागते. कारण तसें झाल्यास वरच्या थरांतील वस्तु खालीं पडतात. त्या खालच्या थरांत सांपडल्या असें भासतें. आणि त्या अनपेक्षित असल्या तर पुराव्यांत गोंधळ उत्पन्न होतो. उत्खननाच्या जागेंत बेजबाबदार प्रेक्षकांना येऊं देणें धोक्याचें असतें. ते अनपेक्षित वस्तु उत्खननांत फेकतात, अनुत्खात भाग ढासळवतात, शक्य झालें तर विचित्र वस्तु चोरतात व मजुरांत कलागती लावतात किंवा अन्य तऱ्हेनें कामांत विक्षेप आणतात.

उकरीत असतां वस्तु दिसली रे दिसली कीं लागलीच तेथल्या तेथेंच स्थलनिर्णयाचा तपशील (मोजमापें व थर) नमूद करून मग ती वस्तु हलवितात. तीवर करावयाचा पहिला संस्कार म्हणजे ती स्वच्छ करणें. बऱ्याच वस्तु केवळ पाण्यानेंच स्वच्छ होतात. पण वस्तु धातूच्या असतील तर विशिष्ट ॲसिड्सच्या योगेंच त्या स्वच्छ होऊं शकतात. हस्तीदंती वस्तु खोबरेल तेलांत ठेविल्यानें कठीण बनतात. उलट पाण्यानें धुण्याचा प्रयत्न केला तर त्या तडकून फुटतात. खापरीं भांडीं तर कितीही काळजीपूर्वक सोडवून अलग केलीं तरी हवेच्या दाबानेंही अनेकदां फुटतात. अशा वेळीं काम फारच काळजीनें करावें लागतें. यामुळेंच फार मोठीं भांडीं अभग्न स्थितींत सहसा मिळत नाहींत.

वस्तु मिळून एकदां तिचा क्रमांक, स्थलनिर्णयाचा पुरावा, वर्णन इत्यादि तपशील नोंदला गेला म्हणजे कांहीं झालें तरी ती वस्तु व तिचा तपशील यांचा वियोग होऊं देतां कामा नये. तसें झालें तर अनेकदां समरूप वस्तूंची व तपशीलांची भेसळ होते व पुराव्यांत गडबड उडते. आंगिक स्वरूपाचें पूर्ण परीक्षण करून वस्तूचें ज्ञान झालें म्हणजे तिचा तत्सम इतर वस्तूंशीं तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. त्यामुळें आपल्या वस्तूचें मोल, काल, इतरांचा तीवर किंवा तिचा इतरांवर झालेला परिणाम इत्यादि गोष्टी स्पष्ट होऊन तिचें संस्कृतीच्या अभ्यासांत वास्तविक स्थान कोणतें याचा पत्ता लागतो. एखादी वस्तु प्रथम मोलाची वाटेल; पण तौलनिक अभ्यासांत तिचें महत्त्व कमी होईल. उलट प्रथमदर्शनीं क्षुद्र वाटणारी वस्तु अभ्यासा-

नंतर अमोलिक ठरेल. म्हणून उत्खननांत सांपडणारी कोणतीही वस्तु तिचें निकालीं परीक्षण होईतों फेकून देऊं नये.

उत्खननांत कोणत्या वस्तु सांपडाव्या हें ठरलेलें नाहीं. ज्या वस्तींचें उत्खनन होईल तीस अनुरूप अशा वस्तु तेथें सांपडतात. उदाहरणार्थ, कसब्यांच्या आळीचें उत्खनन होत असेल तर त्यांच्या धंद्यांस अनुरूप अशा वस्तु तेथें सांपडतील. एखाद्या ब्राह्मणआळींचें उत्खनन केलें तर यज्ञपात्रें, होमकुंडें, इत्यादि वस्तुवास्तु सांपडाव्या. पण आज सामान्यतः ऐतिहासिक कालांतील स्थानांचें उत्खनन केल्यास तेथें मृद्भांडीं (pottery), मृण्मूर्ति (terracotta), मणि (beads), मातीचे उलटे-सुलटे ठसे (seals, sealings), नाणीं धातुमूर्ति व इतर संसारोपयोगी वस्तु सांपडतात. या सर्वच वस्तु प्राचीन संसारचित्र डोळ्यापुढें उभें करण्याच्या दृष्टीनें उपयुक्त असल्यानें महत्त्वाच्या आहेत. पण ठसे, नाणीं इत्यादि लेखांकित वस्तूंच्या खालोखाल भांडीं, मणि व मूर्ति यांस फार महत्त्व आहे. त्यांचा सूक्ष्म पण सर्वांगीण अभ्यास कालनिर्णयास व संस्कृतिस्वरूप समजण्यासाठीं फार उपयोगी पडतो.

---

१०. ठसे

संशोधनसंचारांत अनेकदां ताम्रपट, शिलालेख, नाणीं, शिक्के, इत्यादि वस्तू पहावयास मिळतात. पैकीं ताम्रपट, नाणीं, शिक्के मालकांनीं परवानगी दिल्यास अधिक अभ्यासासाठीं संशोधनसंस्थेंत नेतां येतात. पण शिलालेख अनेकदां बांधकामांत बसविलेले असतात. अगर सुटे असले तरी सार्वजनिक मालकीचे असल्यामुळें-खरी मालकी कुणाचींच नसल्यानें-जागेवरून उचलून आणणें धोक्याचें असतें आणि क्वचित् एखादा लेख खाजगी मालकीचा असून मालकानें संशोधनसंस्थेस दान केला तरी तो चटकन् तेथून हलवितां येत नाहीं. कधींकधीं ताम्रपटाचा मालक ताम्रपट संशोधनसंस्थेकडे तात्पुरता म्हणूनही देण्यास नाखूश असतो. आणि अनेक वेळां नाणकसंग्राहक सोन्या-रुप्याचीं तर राहूं द्याच, पण तांब्याचीं नाणींही अभ्यासापुरतीं देखील संस्थेकडे नेऊं देत नाहीं. आणि उपर्युक्त साधनांचा तेथल्या तेथें संपूर्ण

अभ्यास करणें, सवडीचा अभाव, राहण्याची गैरसोय, आवश्यक अशा इतर सामग्रीची अडचण इत्यादि कारणांनीं शक्य होत नाहीं. अशा वेळीं या वस्तूंचे ठसे घेणें येवढा एकच उपाय शिल्लक राहतो. तेव्हां त्याची येथें माहिती देतों.

ताम्रपट : याचे सामान्यतः तीन, आणि कधींकधीं दोन, चार, पांच अशा पत्र्यांचे एका किंवा दोन कड्यांनीं एकत्र आणलेले गट असतात. ठसे घेण्यासाठीं या कड्या तोडून पत्रे विलग करणें आवश्यक असतें. पण मालक कधींकधीं कड्या तोडण्यासही परवानगी देत नाहीं. अशा प्रसंगीं कड्या तशाच ठेवून ठसे घ्यावे लागतात. या वेळचे ठसे उत्तम न येण्याचा संभव असतो. ठसे घ्यावयाचे ताम्रपट स्वच्छ असतील तर उत्तमच; नाहीं तर ते स्वच्छ करून घ्यावे लागतात. केवळ हवेमुळें पत्र्यांवर चढलेलें कीट किंवा गंज, ताम्रपट मीठ–चिंचेच्या पाण्यांत कांहीं काळ उकळत ठेविल्यानें व थोडा चोळल्यानें नाहींसा होतो. पण एखाद्या क्षाराचा परिणाम होऊन गंज अक्षरें न दिसण्याइतका चढला असल्यास तो सौम्य सल्फ्यूरिक किंवा नायट्रिक ॲसिडचा वारंवार उपयोग करून काढावा लागतो. मीठ–चिंचेचें पाणी किंवा ॲसिडें याचा उपयोग करून ताम्रपट आवश्यक तितका स्वच्छ झाला–प्रत्येक अक्षर अगदीं स्वच्छ दिसूं लागलें–म्हणजे तो कांहीं काळ पाण्याच्या धारेखालीं ठेवून त्यावरील ॲसिड निःशेष धुवून काढावें व पुसून कोरडा करावा. नंतर त्यास रबरी रुळानें छापखान्याची काळी शाई प्रत्येक वेळीं थोडी थोडी घेऊन कोनाकोपऱ्यासुद्धां सर्वभर सारखी लावावी. शाई पातळ असेल किंवा एकदम बरीच घेतली तर अक्षरांच्या खाचींत जाईल व ठसे चांगले येणार नाहींत. ताम्रपटाच्या कडा बहुधा उंचाविलेल्या असतात व त्याची रुंदी ठरलेली नसते. म्हणून सुमारें दीड–दोन इंच रुंदीचा रूळ फार उपयुक्त ठरतो. शाई लावण्याच्या अगोदर दुसरी एक व्यवस्था करून ठेवावी लागते. साधारण जाड, पांढरा शुभ्र पण चिवट अशा ड्रॉइंग पेपरचा लांबी-रुंदीनें ताम्रपटाहून प्रत्येकीं २ इंच अधिक असा तुकडा घेऊन तो थोडा वेळ पाण्यांत भिजत टाकावा. नंतर पाण्यांतून काढून टिपकागदाच्या दोन तुकड्यांत थोडा वेळ दाबून ठेवावा म्हणजे तो दमट होतो. हा तुकडा शाई लावलेल्या ताम्रपटाच्या बाजूवर ताठ बसेल असा ठेवून चारी बाजू ताणून

अशा तऱ्हेनें दुमडून टाकाव्या कीं, कांहीं झालें तरी कागद सरकणार नाहीं. नंतर गुळगुळीत कडा असलेली कुपी, फाउंटनपेन किंवा कोणतीही कठीण वस्तू घेऊन तिच्या कडेनें तो कागद वरून खूप जोरानें घासावा, म्हणजे घासलेल्या कागदाच्या भागास शाई चिकटेल व कागद ताम्रपटास चिकटेल. अक्षरांच्या खाचींचा भाग शाईविरहित असल्यानें पांढरा राहून बाकीचा भाग काळा होईल. ही घासण्याची क्रिया जपून पण अशा कसबानें करावी कीं, एकदां घासलेला भाग पुन्हा घासण्याचा प्रसंग येऊं नये आणि कागद ताम्रपटास पक्का चिकटून रहावा. कागद पूर्ण घासून झाल्यावर काढावा म्हणजे ताम्रपटाचा उलटा ठसा तयार होतो. वाचन करण्यासाठीं हा ठसा शाईची बाजू उजेडाकडे व घासलेली बाजू आपल्या डोळ्यासमोर असा धरावा लागतो. पुराणवस्तु-संशोधन-खात्यांत छापखान्यामध्यें प्रुफें काढतात त्याप्रमाणें ठसे काढतात. पण ताम्रपटांच्या कडा उंचाविलेल्या असल्यामुळें प्रत्येक ताम्रपटाच्या कागदावर अनुरूप भार पडण्यासाठीं स्वतंत्र भार वाहकाची आणि दाबयंत्राची आवश्यकता असते. दाबयंत्र प्रवासांत नेणें शक्य नसतें आणि ताम्रपट मिळेल त्या खेडेगांवांत तें दाबयंत्र मिळेल अशी तर अपेक्षाच करतां येत नाहीं. यामुळें ती पद्धत सर्वत्र उपयोगी पडत नाहीं.

नाणीं : ठसा घेण्यासाठीं नाणें प्रथम ताम्रपटाप्रमाणेंच स्वच्छ करावें. रुप्याचें व सोन्याचें नाणें राठ केसांच्या कुंचल्यानें घासलें तरी स्वच्छ होऊं शकतें. तांब्याचें नाणें ताम्रपटाच्या उपायानें स्वच्छ नच झालें तर मऊ तारांच्या ब्रशानें किंचित् घासावें म्हणजे स्वच्छ होईल. **(१) कागदी ठसा :** स्वच्छ नाण्यावर प्रथम एक चिवट, पांढरा शुभ्र, पातळ, कागद घालावा. त्यावर काजळी (कार्बन) कागद पालथा टाकावा म्हणजे काजळी बाजू पांढऱ्या कागदास चिकटेल. त्यावर एक साधा कागद घालून त्यावर पुन्हा साधारणतः नाण्याच्या सव्वादीडपट मोठें भोक असलेला पुठ्याचा तुकडा तें नाणें त्या भोकांत नेमकें मधोमध बसेल अशा पद्धतीनें दाबावा आणि ताम्रपटाप्रमाणेंच खूप घासावें. घासण्यासाठीं फाउंटन पेन, गुळगुळींत बोंडाच्या काचेच्या किंवा धातूच्या नळ्या घ्याव्या. म्हणजे चिवट कागदावर नाण्याचा सुलटा ठसा उमटतो. निरनिराळ्या प्रकारचे चिवट व काजळी कागद वापरून हा ठसा कमीजास्त गुणाचा होऊं शकतो. सवयीनें हा इतका उत्तम येतो कीं,

त्यांवरून छापील प्रतिकृति सहज तयार होऊं शकते. (२) **वास्तव ठसा :** दातांच्या कवळ्यासाठीं वापरला जाणारा डेंटॅक्स (Dentax) नांवाचा एक पदार्थ बाजारांत मिळतो. तो एरवी कठीण असतो; पण उष्णतेच्या संसर्गानें किंवा गरम पाण्यांत ठेवल्यानें चिकणमातीप्रमाणें वाटेल तो आकार देण्याइतका मऊ होतो. याची एक मऊ व आवश्यक तेवढी लहानमोठी गोळी घेऊन तिची एक बाजू सपाट करावी व तीस तेलाचा हात लावावा. नंतर ती स्वच्छ नाण्यावर अशा बेतानें दाबावी कीं नाण्याचा ठसा तर उत्कृष्ट उमटेल आणि नाणें तर आंत अडकून बसणार नाहीं. चार दोन क्षणांत तो रांधा थंड झाल्यावर नाणें काढून घ्यावें म्हणजे नाण्याचा उलटा ठसा मिळतो. या ठशास बोरिक पॉवडर किंवा फ्रेंच चॉक चोळून नंतर त्यांत प्लॅस्टर ऑफ पॅरिस किंवा त्याहून उत्तम असें कॅलिस्टोन याचें साधारण पातळ मिश्रण ओतून थिजूं दिलें म्हणजे नाण्याचा सुलटा ठसा येईल. डेंटॅक्सचा ठसा पुष्कळ काळ पावेतों जसाच्या तसा राहूं शकतो. पण उलट्या ठशाची जरूरी नसल्यास व उपर्युक्त दोन पदार्थांपैकीं कोणतेंही जवळ असलें तर त्याचा उपयोग करून नाण्याचा सुलटा ठसा बनवितां येतो. त्याची कृति अशी— प्लॅस्टिसीन नांवाची एक चिकणमाती बाजारांत मिळते. सामान्यतः ती मऊच असते. पण कालेंकरून ती कडक बनल्यास तींत थोडें व्हॅसलीन मिळवून तीस आवश्यक तितका मऊपणा आणावा. तिचा एक गोळा घेऊन त्याची एक बाजू चपटी करावी. तीस अगदीं पुसट तेल, बोरिक पॉवडर किंवा फ्रेंच चॉक चोळून तीवर नाणें खूप जोरानें दाबावें आणि अगदीं हलक्या हातानें बाजू सोडवून नाणें काढून घ्यावें. एव्हां त्या नाण्याच्या एका बाजूचा उलटा ठसा मिळतो. यांत पूर्वोक्त पद्धतीनें उपर्युक्त मिश्रण ओतून सुलटा ठसा बनतो. संशोधन-संचारांत सामान्य संशोधकास चिकणमाती, कॅलिस्टोन किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिस, फ्रेंच चॉक किंवा बोरिक पॉवडर इत्यादि साहित्य नेणें परवडणार नाहीं. तो कागदी किंवा डेंटॅक्सचे ठसे घेणेंच पसंत करील.

शिलालेख : यांचे उठावीं व खोदीव अक्षरांचे असे दोन प्रकार आहेत. सामान्यतः खरोष्ठी, ब्राह्मी व तिजपासून उत्पन्न झालेल्या लिपींमधील लेख खोदीव तर हिब्रू, युरोपीय, अरबी, फार्सी, उर्दू वगैरे लिपींतील लेख उठावीं अक्षरांचे असतात. मात्र यास कांहीं अपवाद आहेत. आरंभींच्या मुसलमानी

कालांतील कांहीं अरबी–फार्सी लेख खोदीव अक्षरांचे तर खास मुसलमानी अमदानींतील कांहीं नागरी लेख उठावीं अक्षरांचे आहेत. उठावीं अक्षरें पुष्कळ उंच (१–४ दोऱ्या) असल्यानें त्यांचा छाप घेण्यासाठीं साधारण जाड पण पाणशोषी कोणताही कागद चालतो. पण खोदीव अक्षरें सामान्यतः अर्ध्या दोरींपेक्षां अधिक खोल नसल्यामुळें अशा लेखाचा ठसा घेण्यासाठीं उणेअधिक जाड, चिवट, पाणशोषी असे कागद लागतात. अखेर बाजारांत मिळणारे पांढरे फूल्सकॅप कागदही चालतात. असें असलें तरी उठावीं अक्षरांना कच्चा जुन्नरी कागद चांगला उपयोगी पडतो आणि खोदीव अक्षरांना छापण्याचे फेदरवेट, अँटिक वगैरे कागद उत्तम ठरतात. शिला-लेखाचा ठसा संशोधनसंचारांत केव्हां घ्यावा लागेल याचा नियम नसला तरी शक्य असेल तर थंडीच्या दिवसांत व त्यांतही थंड वेळीं ठसा घेणें फार फायदेशीर असतें. उन्हाळ्यांत व उकाड्याच्या वेळीं लेखाचा कागद फार लवकर वाळतो व सुटूं लागतो. कागद हलला म्हणजे अगदीं नेमका पूर्वीच्याच जागीं बसण्याची फारशी शक्यता नसते आणि केलेले श्रम फुकट जातात. अक्षरांचा बारीक–मोठेपणा खोली-उथळपणा पाहून कागदाची निवड केल्यावर शिलालेखाच्या मापाचा कागद घेऊन तो थोडा वेळ पाण्यांत भिजत टाकावा. साधारणतः १॥–२ फूट लांबरुंद कागदाचा ठसा उत्तम निघतो. कागद भिजेतों शिलालेख धुवून केसांच्या ब्रशानें स्वच्छ करावा. नंतर त्यावर भिजवलेला कागद सारखा बसवावा. कोठेंही सुरकुत्या पडूं देऊं नये. नंतर त्यावर कागदाच्या चिवटपणाप्रमाणें मऊ किंवा राठ केसांच्या ब्रशानें लंबरूप ठोके मारून कागद अक्षरांच्या खांचींत चांगल्या तऱ्हेनें बसेल असें करावें. ब्रशाचे ठोके आडवेतिडवे मारल्यानें कागद सारखा सरकतो आणि पक्का चिकटून रहात नाहीं. जुन्नरी कागद ब्रशानें ठोकतां येत नाहीं. तो बारीक विणींच्या पाणशोषी कापडाच्या मोठ्या बोळ्यानें खूप दाबावा लागतो. म्हणजे अक्षरांच्या खांचींत नीट बसतो. कागद नीट बसून तेथेंच दमट होईतों वाळला म्हणजे त्यास बोळ्यानें थोडथोडी शाई लावावी. ठशासाठीं मी इंडियन किंवा चायना ईंकच्या चपट्या कांड्या वापरतो. ती बरोबर सहज नेतां येते. मात्र ती उगाळण्यासाठीं एक लोखंडी खरखरीत तवी–तवा बरोबर बाळगावा लागतो. कित्येक लोक बाजारांत दिव्याची काजळी किंवा आयव्हरी ब्लॅक

किंवा सिल्व्हर ब्लॅक नांवाची एक पूड मिळते ती गोंदाच्या पाण्यांत चांगली मिसळून घोटतात व तें मिश्रण वापरतात. पण संचारांत असें मिश्रण सांडण्या-लवंडण्याचा संभव असतो. शाई लावण्याकरतां तयार करावयाचा बोळा बारीक विणीचे कापडाच्या घड्या घालून त्या तसल्याच कापडानें झाकून टाकून करावा. किंवा आयते बोळे विकत घ्यावे. कानपूरला ब्रशवेअर कंपनींत ठसे घेण्याचे लांब पण मऊ किंवा राठ केसांचे वळविलेल्या दांड्याचे ब्रश आणि लहान–मोठे व निरनिराळ्या आकाराचे बोळे (dabbers) विकत मिळतात. दरएक वेळीं बोळ्यास पुसट शाई फासून किंवा लाऊन ती लेखास चिकटलेल्या कागदास त्यावर बोळा हळूंहळूं मारून लावीत जावी. ब्रशाप्रमाणें बोळाही काटकोनांतच मारावा. नाहींतर कागद सरकतो. कागद सरकला म्हणजे ठसा वाया जातो. एकाच जागीं पुन्हा पुन्हा शाई लावीत गेल्यानें तेवढा भाग अधिकाधिक काळा होत जातो आणि अक्षरांच्या खाचींतील कागद पांढरा राहिल्यानें अक्षरें अधिकाधिक पांढरीं दिसूं लागतात. उलट अक्षरें उठावाचीं असल्यास अक्षरें काळीं होतात व उरलेला भाग पांढरा दिसतो. नीट शाई लावून झाल्यावर कागद थोडा वेळ तसाच हडकूं द्यावा. नंतर काढून चांगला वाळवावा. एक कागद काढल्यावर शिलालेखाच्या पुढल्या भागास दुसरा कागद लावून दुसरा ठसा घ्यावा. लेखाच्या भागाभागांचे ठसे घेतांना एकाच भागाच्या अंशाचा दोनदां ठसा आला तरी हरकत नाहीं. पण कोणताही अंश ठसा न घेतलेला असा राहूं नये. ठसा घेणारा हस्तलाघवी असेल तर अगदीं हीन प्रतीच्या सामुग्रीनेंही तो उत्तम ठसा घेऊं शकेल. पुळुंज या अगदीं लहान खेडेगावीं मिळालेल्या हलक्या प्रतीच्या कागदावर केवळ एकदांच शाई लावलेल्या बोळ्यानें घेतलेला ६′ × २॥′ लांबरुंद शिलालेखाचा ठसा सुमारें वीस वर्षांनंतर आजही उत्तम स्थितींत आहे.

ताम्रपट–शिलालेख फोटो, ठसे किंवा मूळें यांवरून वाचतां येतात. फोटोमध्यें अक्षरें स्पष्ट दिसावीं म्हणून फोटो घेण्यापूर्वी अक्षरांच्या खाचींत खडू भरतात. तो भरण्याची पद्धत अशी—खडू वारंवार पाण्यांत भिजवून ताम्रशिलालेखांवर खूप घासून चांगला फासावा. नंतर तो वाळूं द्यावा. वाळल्यावर दमट फडक्याच्या पट्टीनें पृष्ठभागावरचा खडूचा थर पुसून काढावा. म्हणजे फक्त अक्षरांच्या खाचींत खडू राहील व अक्षरें उठून दिसतील.

———